TIGHT BINDING BOOK

UNIVERSAL LIBRARY
OU_192269
UNIVERSAL LIBRARY

# आपापलें हितगुज

१९४५

मूल्य २॥ रुपये

प्रो. श्रीपाद महादेव माटे, एम्. ए.

# आपापलें हितगुज

प्रो. श्रीपाद महादेव माटे, एम. ए.

आवृत्ति तिसरी

१९४५

मूल्य ] [ २॥ रुपये

प्रकाशक—
श्रीपाद महादेव माटे
टिळक रस्ता, पुणे

[ सर्व अधिकार प्रकाशकाचे स्वाधीन ]

मुद्रक—
हेरंब बापु गुर्जर
आयुर्विद्या मुद्रणालय,
२६१।२ सदाशिव, पुणे २

# माझें हितगुज

चरित्रे वाचावयाची हौस मला अजूनही आहे. होऊन गेलेल्या माणसाची त्यात प्रत्यक्ष गाठ पडल्यासारखी वाटते व मानवी जीविताचा त्यातल्या त्यात खरा बोध होतो. कादबरी, नाटक, इत्यादींना कलेची ओढ असल्यामुळे शुद्ध इतिहासाशीं त्याचे लागते इतकेसें रहात नाहीं व या कारणाने ऐतिहासिक सत्याच्या आसपास तरी जाऊन पोहोचणे चरित्रग्रथाला जितके शक्य बनते तितके या कलाप्रधान ग्रंथाना बनत नाहीं. या दोन प्रकारच्या वाङ्मयातील हा फरक मूळ हेतूमुळें उत्पन्न झालेला असतो. अशीं हीं चरित्रे वाचतांनाच पुरुषश्रेष्ठाचीं चरित्रें लिहिण्याचे काम मीं हळूहळू चालू केले व तें अजूनही चालू आहे. पण चरित्रे वाचताना ती ज्या साहित्यावर आधारलेलीं असतात तें मूळचें साहित्यच वाचावे असे मला वाटू लागले व म्हणून स्मृतिचित्रे, दैनदिनी, आत्मचरित्रे, पत्रव्यवहार, इत्यादि वाङ्मयप्रकार मी पाहू लागलो. त्यात आत्मचरित्रे हीं फारच मनोरजक व त्या त्या माणसाची खरी कल्पना यावयास उपयोगीं असतात असे दिसून आले. अर्थात् आपल्या हेतूचे व कृत्यांचे समर्थन करण्यासाठीं आत्मचरित्रकार सत्याशीं कधींही प्रतारणा करीत नसतील असे मला म्हणवत नाहीं. पण येवढे खरे कीं तीं वाचीत असताना आपण अगदीं मूळारंभापाशीं जाऊन पोंचलों आहों व हीच त्या त्या माणसाची खरी ओळख असें आपणांस वाटू लागते.

लोकानीं लिहिलेलीं चरित्रें व ज्याचीं त्यानीं लिहिलेलीं चरित्रे यातील तफावत विविध प्रकारची असते. पण माझ्या प्रस्तुतांशीं सबंध

असलेली मुख्य तफावत म्हणजे ही कीं आत्मचरित्रात एकादा प्रसंग, एकादे मत, एकादा आग्रह ममत्व–रसाने रसरसलेला आणि विस्ताराने आलेला असतो, पण दुसऱ्यांनीं लिहिलेल्या त्याच माणसाच्या चरित्रात मात्र तोच त्रयस्थाच्या नात्याने व केवळ उल्लेखवजा आलेला असतो. असे होणेही अपरिहार्य असते, कारण आत्मचरित्र लिहिणे व चरित्र लिहिणें या दोन निरनिराळ्या बैठकी आहेत. अर्थात् आत्मचरित्रात हे प्रसंग, ही मते, व हे आग्रह वाचकाच्या मनात फार भरतात, व त्या माणसाची व आपली फार जवळून ओळख झाली असे त्यास वाटू लागते. माझे तर असे कित्येक ठिकाणीं झालें, व जर आपल्याला या मजकुराची येवढी आवड वाटते तर आपल्या सारख्या इतरानाही त्या मजकुराचा रसास्वाद प्राप्त करून देणे युक्त आहे असे माझ्या मनाने घेतलें. हीं आत्मचरित्रें मीं जशीं वाचलीं तशीं अनेकांनीं वाचलीं असतील व हे माझें पुस्तक वाचतांना " यात काय विशेष आहे ? " असेही त्याना वाटेल पण माणस सुशिक्षित आणि रसिक असलीं तरी सर्वानाच सर्व तऱ्हेच वाचन करता येत असे नाहीं कित्येक वेळा तर काहीं विशष प्रकारच्या वाङ्मयाची व पुस्तकाची माहितीही आपल्याला नसते : उदाहरणार्थ, तैमूरलगानें आत्मचरित्र लिहिले असेल याची मला कल्पनाही नव्हती ! म्हणून मुद्दाम तेंच वाङ्मय वाचून त्यातील शेलकीं ठिकाणें वाचक–वर्गाच्या हातीं दिल्यास आपले व त्याचे मनरजन व बुद्धिरजन होईल या अपेक्षेने मीं या पुस्तकाची जुळवाजुळव केलेली आहे. पुष्कळ आत्मचरित्रें वाचावीं, प्रसगाची निवड करावी, त्या मजकुराचे भाषातर करावे, मूळचें मराठीच असले तर नुसता उतारा करावा आणि ज्याच्या आत्मचरित्रातून हे प्रसग घेतले असतील त्याचीं छोटीं छोटी एकदीडपानी चरित्रे लिहावीं व सदर्भ सागावे असा उद्योग

मी चालू ठेवला व हें पुस्तक त्याचेंच फळ होय. 'उच्च दर्जाची करमणूक' येवढेच नाव या पुस्तकातील मजकुराला कोणी दिले तर ते युक्तच होईल, कारण माझीही अपेक्षा अन्य नाही.

ही स्वत:ची व लोकाची करमणूक करताना या साहित्याच्या जुळणीत व बनावात मी जीं धोरणे ठेविली आहेत त्याचा खुलासा करणं अवश्य आहे. प्रस्तावना न वाचल्यामुळे वाचक व टीकाकार काही आक्षेप घेण्यास प्रवृत्त होतात ! ' उपेक्षितांचें अंतरंग ' या माझ्या परवाच्या पुस्तकावर ज्यानी अभिप्राय दिले आहेत त्यातल्या काहींनीं तरी त्या पुस्तकाची माझी प्रस्तावना वाचली नव्हती असें मला खास म्हणता येते ! तथापि आपल्याकडून काहीं खुलासे करून ठेवणें इष्ट असतें. भाषांतर करताना मी ते शब्दश: करण्याचा हट्ट धरलेला नाहीं, पण मूळ मजकुरातील अर्थ, समर्पकता व माधुर्य ही टिकवून धरण्याची खटपट साधली तितकी केली आहे. ' याच माणसाचीं चरित्रें का घेतलीं व त्या दुसऱ्याचीं का घेतली नाहीत ' असे कोणासही म्हणता येण्यासारखं आहे, पण हा रुचिभेदाचा भाग आहे व शिवाय पुस्तकाच्या पृष्ठसंख्येला मर्यादा आहे मी त्या माणसाचीं चरित्र घेतली असतीं तर सध्याचीं हीं राहून गेलीं असती ! तसेच विद्यमान माणसाचीं आत्मचरित्रे मी घेतलेलीं नाहींत. मुळातील मजकूर सलग घेतलेला आहे असे नाहीं. क्वचित् ठिकाणी हा विजोड टिंबानीं दाखविला आहे. स्वतंत्र प्रकरण सुरू झालें म्हणजे त्याच्या आरंभी * अशी खूण घातली आहे, अपरिचित वाङ्मयाचा परिचय करून देण्यावर मीं विशेष कटाक्ष ठेविला आहे, व प्रत्येक चरित्रात ही दृष्टि दिसून येईल. काहीं सर्व प्रसिद्ध आत्मचरित्रातून मात्र मी काहींही उचलले नाहीं रमाबाई रानडे व लक्ष्मीबाई टिळक यांच्या स्मृतीतून मीं काही कसे घेतले नाहीं याचे

कोणा कोणास नवल वाटेल. पण सर्वांचाच माझ्या पुस्तकात आदर करणें हा माझा हेतु नाहीं हे दोन ग्रंथ इतके प्रसिद्ध आहेत आणि सरसकट वाचकवर्गाच्या वाचनात ते इतके येतात की त्यातले कांहीं परिच्छेद दिल्याने अपरिचित असलेलें कांहीं यानें आपल्याला आणून पोचविलें असे वाचकाला खचितच झाले नसते. पण आगरकर व टिळक यांचे पहा 'डोंगरीवरील एकशेएक दिवस' हे आगरकरांचे पुस्तक सहसा आता कोठेही भेटत नाहीं व आणि टिळकचरित्र-वाङ्मय इतकें विपुल झाले आहे कीं कांहीं आत्मानुभवपर मजकूर टिळकांच्याच तोंडून बाहेर पडला असेल अशी अलीकडच्या वाचकाची कल्पनाही व्हावयाची नाहीं ! म्हणून त्या दोघांचे कांहीं परिच्छेद दिले आहेत. पाश्चिमात्य देशात आत्मचरित्र लिहिण्याची प्रथा फार दिवस आहे, अर्थात् त्यातून जास्त मजकूर येणे स्वाभाविक आहे. आपल्या इकडच्या थोर गृहस्थानीं अशीं चरित्रे लिहिलीं असतीं तर बरें झालें असतें. ज्ञानेश्वर, हेमाद्री, कृष्णराय, शिवाजी महाराज, बाजीराव, मोरोपंत, प्रभाकर अशांच्या आत्मचरित्रातील कथाभाग उचलून घेण्यास मला आनंद वाटला असता. त्यातल्या त्यात नाना फडणीस, विष्णुबोवा, पागारकर यांचें कांहीं घेतां आलें ही केवढी भाग्याची गोष्ट आहे ! नानानीं केलेले 'सत्याचे प्रयोग' त्याच्या मूळ आत्मचरित्रातून वाचण्यासारखे आहेत. सातारचे प्रतापसिंह, रंगो बापूजी, बाळाजीपंत नातू, गंगाधरशास्त्री पटवर्धन यांच्या लिहिण्यात आत्मचरित्रपर चुटके सापडतात इतकेंच काय ते : सलग वाटणारे पोटभर लिहिणें सापडत नाहीं. दादोबा पांडुरंगाच्या चरित्रातील मजकूर शेवटीं शेवटीं जागेच्या अभावीं काढावा लागला याचे वाईट वाटते.

## माझें हितगुज

हा माझा प्रयत्न वाचकाना पसत पडला असे दिसून आले तर याच तऱ्हेचा दुसरा हप्ता मला प्रसिद्ध करता येणे शक्य आहे आणि अनेक व्यवसायातील व देशातील पुरुषाचे आत्मचरित्रपर उद्गार एकत्र करून भाषेच्या धनात थोडी तरी भर घालता येण्यासारखी आहे. आपले आपण स्वतत्र लिहिणे लिहावे हे मला मान्य आहे व मी ते मधून मधून लिहितोही. पण इतर वाङ्मयातून काहीं विशेष प्रकारचा मजकूर स्वभाषेत आणता आला तर तसें करणेही युक्त आहे असे मला वाटते. पुष्कळ वाचकाचा अनुभव असेल कीं, आपले बरेच वाचन वाया जाते. या कामीं जर थोडी सावधगिरी ठेवली तर स्वकीय वाचकाच्या लाभासाठी त्यातले काही स्वभाषेत आणता येण्यासारखे असते. उत्तरोत्तर इंग्रजी भाषेचे अध्ययन कमी होत जाईल असा रग दिसतो. तर ज्याना इंग्रजीचा व मराठीतर भाषाचा परिचय आहे त्यानी त्या त्या भाषेतील साधेल ते धन मराठीच्या भाडारात आणून भरणे अगत्याचे आहे. असो.

पुस्तकाचे हस्तलिखित सिद्ध करण्याच्या कामीं माझे विद्यार्थी श्री. मधुसूदन पेठे यानीं मला चागले साह्य केले; व आर्यभूषण छापखान्याचे चालक श्री. विश्वनाथराव पटवर्धन यानीं हे पुस्तक जलदीनें व सोयवार रीतीने छापून दिले. या उभयताचा मी फार आभारी आहे.

टिळक रस्ता, पुणे. श्रीपाद महादेव माटे

१९४२

दुसरी आवृत्ति : १९४४ इ. जून.

हे केवळ प्रथमावृत्तीचे पुनर्मुद्रण आहे.

तिसरी आवृत्ति : १९४५ इ. जून.

हेही पुनर्मुद्रणच आहे.

श्री. म. माटे

२० जून १९४५.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | मला सुठंवड्याची वडी मिळेल कां ? | १ |
| २ | माझा रोमचा राजा ! नाल्यातील राजमुकुट मीं उचलला ! | ११ |
| ३ | मुळ्याच्या पाल्यानें पाठ पुरविली ! | २५ |
| ४ | देवा, मी हा असा आहें ! मीं झुकाडी दिली ! | ३३ |
| ५ | ईश्वरें तृणेंकरून रक्षण केलें ! | ५२ |
| ६ | मला गाझी व्हावयाचें होतें ! | ६२ |
| ७ | माझ्या जीविताची सोडत ! | ७१ |
| ८ | भय्या दार उघडीना ! | ८० |
| ९ | पड खाऊन जिकलें ! | ९७ |
| १० | मला हिंदुस्थाननें जवळ ओढलें ! | ११२ |
| ११ | मला दत्तात्रेयाचा वर आहे ! | १२१ |
| १२ | हा प्रश्न लष्करी खात्याचा आहे ! | १३१ |
| १३ | नेपोलियनची उकडहंडी होणार ! | १४८ |
| १४ | एका कवितेनें बदललों ! | १६३ |
| १५ | माझ्या स्वभावाचे कंगोरे ! | १७२ |
| १६ | मलाही चैन पडेनासे झालें ! | १८७ |
| १७ | मीं चित्रेंसुद्धां पुसून टाकलीं ! | २०१ |
| १८ | आम्ही कवि आहों ! | २१० |

# १ : : मला सुंठवड्याची वडी मिळेल कां ?

बुकर टी. वॉशिंग्टन याचे नाव सध्या जितके महशूर आहे त्याच्या शतपट महशूर तें उत्तरोत्तर होत जाईल. अमेरिकन संस्थानात युरोपियन लोकांची पुष्कळ वस्ती झाल्यानंतर तेथे उद्योग-धंद्याची वाढ फार झपाट्याने झाली. दक्षिणेकडील संस्थानात तर ही वाढ फारच झाली. उद्योगधंदे निघाले याचा अर्थ गिरण्या–कारखाने निघाले असा आहे, आणि जर गिरण्या आणि कारखाने हे निघू लागले तर त्यात राबावयास माणसें हवीं होतीं. हे ओघानेच आले. आफ्रिकेतील नायगर नदीच्या काठीं निग्रो लोकांची दाट वस्ती होती. क्रूर आणि साहसी अशा ख्रिस्ती टोळ्यांनी या प्रदेशातील निग्रो लोक आपल्या जहाजावर भरून अमेरिकेत आणून सोडण्याचा सपाटा चालू केला. त्या लोकांच्या भावना, त्यांचे परस्पराशीं नातें इत्यादींचा कणभराही विचार गुलामाचा व्यापार करणाऱ्या ह्या लोकांनीं केला नाहीं. यांचे तांडेच्या तांडे दक्षिण संस्थानात येऊं लागले. तेथून हळूहळू या लोकांची वस्ती सर्व अमेरिकेभर पसरली. अब्राहाम लिंकन यानं यांच्या गुलामगिरीचा शेवट करण्याचा चंग बांधला आणि बंड करून उठलेल्या दक्षिणेकडील संस्थानाशीं जोराचा सामना करून या लोकांची गुलामगिरी नष्ट केली.

युद्ध चालू असतानाच आपण आता मुक्त होणार आहो या भावनेने अमेरिकेंतील सगळे निग्रो गुलाम हर्षभरित होऊन गेलेले होते याच्यातच बुकर टी. वॉशिंग्टन याची आई होती. गुलामगिरींतून मुक्त झालेल्या आपल्या निग्रो बांधवांना शहाणे करण्याचा प्रचंड उद्योग बुकरने चालू केला. कायद्यानें त्यांची गुलामगिरी नष्ट झाली होती इतकेंच. पण समाजात त्यांना प्रतिष्ठा मिळू लागली होती किंवा सहानुभूति तरी प्राप्त झाली होती, असे मुळींच नाही. अजूनही निग्रो लोकांची स्थिति या बाबतींत तशीच आहे, आणि म्हणून फटाळून जाऊन ' अमेरिकन राष्ट्राच्या पोटातच निग्रो लोकांचें एक राष्ट्र ' अशी चळवळ त्यांनी चालू केलेली आहे. पण या सर्व चळवळीच्या अगदी आरंभस्थानी बुकर टी वॉशिंग्टनने चालू केलेली ज्ञानप्रसाराची चळवळ ही आहे. बुकर हा इ स १८५८ सालीं जन्मला. तो जन्माला आला तेव्हा गुलामच होता हॅम्प्टन इन्स्टिट्यूटमध्ये त्याचें शिक्षण झाले. काही दिवस शिक्षकाचा धंदा केल्यानंतर १८८१ सालीं अलाबामा येथील टस्केजी कॉलेजचा अध्यक्ष म्हणून त्याची निवड झाली. ही संस्था म्हणजे खोपटात भरत असलेली एक शाळा होती वीस वर्षेपर्यंत बुकर याने अव्याहत श्रम केले आणि विद्यार्थ्यांची संख्या एक हजारावर आणून सोडली. आपल्या लोकांचा जर उद्धार व्हावयास हवा असला तर त्यांच्यात ज्ञानाचा प्रसार फार झपाट्यानें व्हावयास हवा, असा हव्यास त्याने धरला होता. बुकरनें युरोप खंडात पुष्कळ प्रवास केला आणि तिकडील देशांतील तीं ठिकठिकाणची विद्यापीठें पाहिल्यानंतर तर ज्ञानप्रसाराचा महिमा त्याला इतका पटला कीं, ही एकच गोष्ट आपण करीत राहिले पाहिजे, आणि या एकाच गोष्टीनें निग्रो लोकांचा उद्धार होईल, अशी त्याची खात्री झाली हा इ. स. १९१५ सालीं मरण पावला. बालपणीं आपण गुलामगिरींत असतां आपले कसकसे हाल झाले याचें मोठें करुणास्पद वर्णन त्यानें केले आहे. त्यांतील काहीं परिच्छेद पुढें दिले आहेत. ]

*** माझ्या घराण्याची मला म्हणण्यासारखी कसलीच माहिती नाहीं. मला आई होती, एवढेंच काय तें मला माहीत आहे. गुलामाच्या वस्तींत राहत असताना, आणि पुढेंही, आम्हां काळ्या लोकांत चाललेली संभाषणाची कुजबूज माझ्या कानीं पडे. आफ्रिकेतून अमेरिकेत येताना गुलामांचा काय छळ झाला, त्याची हकीकत मला या कुजबुजीवरून प्रथम कळली. या गुलामांतच माझ्या आईच्या माहेरची माणसें होतीं. त्यांचा अनन्वित छळ झाला होता; तथापि चौकशी करूनही या माणसाची कसलीही माहिती मला उपलब्ध झाली नाहीं; आई होती, एवढेंच काय तें निश्चित आहे. तिला एक सावत्र भाऊ व एक सावत्र बहीण होती. गुलामगिरीच्या दिवसांत काळ्या माणसांपैकी कुणाचा कोण होता आणि तो कुठला होता याची पर्वा कोणी करीत नसे, आणि त्याच्या नात्यागोत्यांची नोंदही कोणी ठेवीत नसत. गुलाम विकत घेणाऱ्यांपैकी एकाचें लक्ष माझ्या आईकडे गेलें, इतकेंच. पुढे हा गृहस्थ तिचा व माझा मालक झाला. त्याच्याकडीं असलेल्या गुलाम मंडळींत माझी आई येऊन दाखल झाली, पण यांत विशेष काहींच नव्हते. एखादें नवें घोडें, नाहीं तर एखादी नवी गाय गोठ्यांत येण्यांत व माझी आई त्याच्या घरीं येण्यांत काहींच फरक नव्हता. आईविषयीं मला जितकी माहिती आहे त्याहींपेक्षा मला माझ्या बापाविषयीं कमी आहे. मला इतकेंच ठाऊक आहे कीं, माझा बाप गोऱ्या लोकांपैकी होता, पण तो कोणीही असला तरी इतकें खरें कीं, त्यानें माझी पूसतपास केली नाहीं किंवा माझ्या खाण्यापिण्याची व्यवस्था केल्याचें माझ्या ऐकिवांत नाहीं. तथापि या बाबीं माझ्यानें त्याला दोष देववत नाहीं. या राष्ट्रानें त्या काळीं दुर्दैवानें पत्करलेली जी

गुलामगिरीची संस्था होती तिचा इतर लोकांप्रमाणें त्यांनेंही उपयोग करून घेतला होता, इतकेंच

फ्रँकलिन परगण्यात हेल्सफोर्डजवळच्या एका मळ्यांत माझी आई गुलाम होती. तिला विकत घेणारा धनी आणि त्या मळ्यावर कामाला असलेले इतर सर्व गुलाम यांना करून घालण्याचे काम माझ्या आई-कडे होते. एके दिवशी सकाळी आईनें मला जागे केलें, आमच्या घरकुल्यातील जमिनीवर एका रकट्यावर मी निजलो होतों. जागा होऊन पाहतां तो आई माझ्याशेजारी गुडघे टेकून नेहमीप्रमाणें मनो-भावें प्रार्थना करीत होती " देवा, केव्हा ना केव्हा पण मला व माझ्या या कच्च्याबच्च्यांना या दास्यातून मुक्त कर " तिचे शब्द मीं ऐकले तेव्हा मला याची जाणीव आली कीं, आपण गुलाम आहों. माझ्या आईचें नाव जेन असे होतें. आजवर ज्या स्त्रियांशी माझा संपर्क आला आहे त्यात स्त्रीत्वाची सर्वांत उदात्त व थोर मूर्ति अशीच माझी आई मला मरणापर्यंत वाटत राहील. लिहिण्यावाचण्याचा तिला गंधही नव्हता, पळभर तरी तिने हातात पुस्तक धरलेलें मला आठवत नाही. पण जें काय थोडीं वर्षें मला मातृसुख लाभलें तेवढ्यात सद्गुण आणि टुर्कीची राहणी याचें जे शिक्षण तिने मला दिलें तें मी कधींही विसरणार नाही. अँड्ग्लो-सॅक्सन लोकांची जी एक प्रामाणिकपणाची कसोटी आहे ती लावून काही लोक कुरबुरतात की, नीग्रो माणसें असावीं तितकीं प्रामाणिक नाहींत. नसतीलही; मला आठवते की, रात्र झाली, जिकडे तिकडे अंधार पडून निजानीज होऊन सामसूम झाले म्हणजे अपरात्री आम्हा मुलांना आई जागें करी. दिवसा पोटभर अन्न न मिळताच आम्ही झोपीं गेलेलीं असू.

तिनें कुठून तरी अंडीं म्हणा, कोंबडी म्हणा, आणून ती अंधारांत राधून आमच्यासाठीं ठेवलेलीं असत. आता हीं अंडी, कोंबडी तिनें धन्याच्या परवानगीशिवायच नव्हे, तर त्याला न कळूं देतांही आणिलेलीं असत. अर्थात् कोणा लोकांच्या नीतिविचाराप्रमाणें हें तिचें करणें चोरीतच जमा होईल, पण माझ्या वित्ताचा ठाव घेऊन मीं पाहिलें म्हणजे आमच्या तसल्या परिस्थितीत तिनें जें कांहीं आचरिलें त्याला चोरी म्हणावें, हें मला भावत नाही. ती गुलाम नसून स्वतंत्र असती आणि तरीही तिनें असे आचरण केलें असतें तर तिला 'चोरटी' म्हणता आलें असतें, पण गुलामगिरींत असतांना तिनें हें केलें तर तिला चोर म्हणता यावयाचें नाहीं आम्ही गुलामगिरींतून मुक्त झाल्यावर, स्वत अगदी कडकडीत प्रामाणिकपणानें वागणें व दुसऱ्यास तो सद्गुण शिकविणें या कामात माझी आई अत्यन दक्ष असे.

विचारपूस करता सरासरी मानाने असे म्हणता येतें की, माझा जन्म इ. स १८५८–५९ सालीं झाला असावा. त्यावेळीं काळ्या लोकांच्या जननमरणाची नोंद ठेवण्याची व्यवस्था नव्हती. ज्या हेल्स-फोर्ड गांवीं मी जन्मलों त्या गावात एकच घर होतें व एक पोष्टहपीस होतें. तेथून कित्येक मैल लांब एका मळ्यावर माझा जन्म झाला. ज्या खोपटात मी जन्मलों त्यातच गुलामाची बंधमुक्तता होईपर्यंत मी राहत असे. बारा हात लांब आणि नऊ हात रुंद एवढीच ही खोप असे. खिडक्या वगैरे काहीं नव्हतें, मातीचा गारा करून तो चोपलेला होता; हीच खालची जमीन; या जमिनींत मध्यावर एक मोठें थोरलें दार ठेवलेलें होतें; खाली अंधारात मालकाची रताळी ठेवण्याची जागा होती. हीं त्याना हिंवाळ्यात लागत. या खोपीत दिवसभर आई

स्वयंपाकघरात गुंतलेली असावयाची गरज असली म्हणजे आंतल्या माज-घरावर आमचा बिछाना पडे; बिछाना म्हणजे इकडून तिकडून जमा केलेली चार लक्तरं असत.

माझ्या तेव्हांच्या अंगड्याची मला फार चांगली आठवण आहे. उत्तरेकडील व दक्षिणेकडील संस्थानांचे आमच्या गुलामगिरीच्या बाबत युद्ध चालू होतें, तरी आम्हा गुलामांच्या कपड्याच्या बाबतीत फारच हाल होत असत. दक्षिणेतील गोऱ्या लोकांनाच या लढाईत कपड्याची चणचण भासे, अर्थात् गुलामांचे हाल फारच होत असत. आमच्या अंगावर जे एक कुडतं असे होतें त्याला ते ' शर्ट ' म्हणत. हे कुडतं म्हणजे आमच्या तिकडचा गुलाम लोकांतला एक सन्मानच होता ! हे अंगात तरी घालावे, नाही तर ससधस उघडे तरी असावे, असा न्याय असे. ज्या तागाच्या पिंजण्यात अखेरीस पिंजत असे तिच्यातील जो गळाठा उरे त्याचेच हे सदरे केलेले असत. हे अगदी कडकडीत आणि खरबरीत असत. अंगात घालावयाचे म्हणजे शिक्षाच असे. नवे अंगात घातले म्हणजे दोन-दोन महिनेपर्यंत एक सहस्र सुया अंगाला टोंचत आहेत, असे वाटत राही. हा सदरा धनीसाहेबांनी मला दिला तेव्हा मी सगळा सहा वर्षांचा असेन. घालावा, काढावा; घालावा, काढावा; असे मी कितीदां तरी केले, कारण माझ्या कोवळ्या अंगाला तो टोंचत असे. शेवटी कंटाळून मी तो टाकून दिला. अजूनही मी नवा सदरा घालावयाला काढला म्हणजे मला माझ्या तेव्हांच्या त्या नव्या सदऱ्याची आठवण होते. मी तो ' टी शर्ट ' घालण्याचें सोडलेलें पाहून दादाला माझी दया आली. तो माझ्याहून दोनच वर्षांनी मोठा होता पण तो म्हणाला, ' मी

हा तुझा शर्ट घालतों; मऊ झाला म्हणजे मग तूं घाल.' दादाचा हा दयाळूपणा माझ्या मनांत कायमचें घर करून राहिला आहे. त्यानें तो दोनचार महिने घातल्यावर मग मी तो घालूं लागलों; तरी तो थोडा थोडा बोचतच होता. लवकरच थंडीचे दिवस आले व धन्यानें मला एक जोडा घेऊन दिला. या जोड्याचे तळवे लाकडाचे केलेले होते व त्याला वरून जाडेंभरडें कातडें लावलेलें होतें. पण अशा जोड्यानेंसुद्धां मला तेव्हां मोठी ऐट वाटली.

मी थोडा मोठा झालों तेव्हा धन्यानें मला मोठें मानाचें वाटणारें काम सांगितलें. तेव्हांच्या दिवसांत गोऱ्या लोकांच्या बायका घोड्यावर बसून दूरदूर रपेटीस जात. त्यांच्यामागून घोड्यावर बसून जावयाचें व त्या उतरल्या म्हणजे त्यांची घोडीं धरून उभें रहावयाचें, असे हें काम होते. एकदा असें झालें कीं, या आमच्या घरी आलेल्या बायांचीं घोडीं धरून मी उभा होतों व कुणी परत घोड्यावर बसत असल्या तर त्याना हात देत होतों; इतक्यांत आमच्या वाड्यातून कोणीस एक सुंठीच्या वड्यांचें तबक त्यांच्यापुढें आणलें व जातांना सत्कार म्हणून त्या त्यांना दिल्या. वड्या फारच गोड दिसत होत्या. सुंठवडा मी पहिल्यानेंच पाहिला व माझ्या बालमनावर त्याचा भारीच परिणाम झाला. मीं मनांत म्हटलें, 'या थोरामोठ्यांच्या बायका सुंठीच्या वड्या खात आहेत तशा जर आपल्याला पुढें केव्हां खावयास मिळाल्या तर आणखी काय हवें ?'

मी आणखी थोडा मोठा झाल्यावर दळणाच्या गिरणीवर जाण्याचें काम मला करावें लागलें. दोन तीन पायल्या धान्य गोणींत घालून

तीं घोड्याच्या पाठीवर लादावयाची, आपण वर बसावयाचें, तीन-तीन, चार-चार मैलावर असलेल्या गिरणीवर जावयाचें, दळण होई-पर्यंत वाट पाहावयाची व पीठ घेऊन घरीं यावयाचें असें हें काम होतें. या कामीं कित्येकदा असा प्रकार होई कीं, जातांना नाहीं तर येतांना त्या गोणीचा तोल कमीजास्ती वजनामुळें बिघडावयाचा व एकाएकींच ती माझ्यासकट खालीं यावयाची ! माझी स्थिति मोठी केविलवाणी होई; कारण काय करावें हेंच कळावयाचें नाहीं. माझ्या अंगांत ताकद ती किती असणार? तें ओझें घोड्याच्या पाठीवर पुन्हां चढविणें मला होण्यासारखें नव्हतें; शेवटीं तास अन् तास तिष्ठत उभें राहावें व कोणी येणारा जाणारा भेटला आणि तोही चांगला बळकट असला तर गोणी पुन्हां लादून घ्यावी.

माझ्या धन्याचें नांव जोन्स बरोज असें होतें. गुलामांना वागवि-ण्याच्या कामीं हा इतरापेक्षां पुष्कळ बरा असे; याचा अर्थ इतकाच कीं, कांहीं कांहीं वेळा मोडल्या तर तो गुलामाना निर्दयपणें झोडपीत नसे. मी जन्माला आलों तो गुलामच, पण अर्भक असल्यामुळें गुलाम-गिरीच्या वेदना मला जाणवल्या नाहीत. पण एका प्रकरणाचा मात्र माझ्या मनावर विलक्षण परिणाम झाला. तो म्हणजे माझ्या मामाला बसलेल्या माराचा. मामा चांगला मोठा होता. एके दिवशीं सकाळीं त्याला झाडाशीं बांधलें, त्याला नागड उघडें केलें आणि गायीच्या कातड्याच्या वादीनें त्याला एकसारखा झोडपूं लागला. पाठीवर चपका बसला कीं, 'धनीसाहेब, पायां पडतों; धनीसाहेब, पायां पडतों' असें तो ओरडे. खरोखर माझ्या मनाला झालेल्या त्या वेदना मी मेल्या-वरच नाहींशा होतील.

मी लहान असतानाच गुलामाच्या वसतींत लोक हळूहळू कुजबुजत असत कीं, काहीं तरी निराळें शिजत आहे - कदाचित् युद्धच होणार आहे; आणि जर तसें झालें तर आपण सगळे गुलामगिरींतून मुक्त होऊं. रात्रींच्या वेळीं ही गुणगूण फार चालावयाची. युद्ध प्रत्यक्ष सुरू होईपर्यंत हे चाललें होतें. मळ्यांवर असलेल्या इतक्या लोकांत एकालाही वाचतां येत नव्हतें; पण चांगल्या सुबुद्ध माणसांना युद्धाची जितकी बारीकसारीक माहिती असे तितकीच आम्हा लोकांनाही होत असे. "द्राक्षाच्या मळ्या" तलें आमचें तारायंत्र सारखें चालूं असे. सेनापति ली यानें जेव्हा शस्त्र खालीं ठेवून शरणागति पतकरली तेव्हां तें आम्हा सगळ्याना कळून चुकलें होतें; पण जणूं काहीं आपल्याला हें काहीं माहीत नाहीं अशा आविर्भावानें जो तो आपापलें काम करीत होता युद्ध संपताच एके दिवशीं सकाळीं गुलामाच्या घरोघर निरोप आला कीं, सगळ्यानी वाड्यावर म्हणजे धन्याच्या घरापुढें जमा व्हावें. आई, मी, बहीण आमंदा, भाऊ जॉन् आणि इतर शेकडों गुलाम वाड्यावर गेलों. मी आईला चिकटून उभा होतों. एका गृहस्थानें काहीं कागदपत्र वाचले व थोडेंसें भाषण केलें. सभेंतलें भाषण असें हें मी पहिल्यानेंच ऐकलें, पण इतकें मन कबजांत घेणारें भाषण मी पुन्हा कधीं ऐकलें नाहीं. कागदपत्राचें वाचन व भाषण होतांच आई आमच्या कानाशी वाकली व हळूच म्हणाली, " माझ्या लाडक्यानो, आता आपण गुलामगिरींतून मुक्त झालों बरें!" या सत्कृत्याचें स्वागत सर्व गुलामानीं जयजयकार करून केलें. मात्र या मुक्ततेमुळें माझ्या आईची व इतर गुलामाची जबाबदारी कोणीकडच्या कोणीकडे वाढली ! बऱ्याचशा गुलामानी आपल्या जुन्या धन्यांकडेच नोकरी पतकरिली; कोणीं कोणीं नवा उद्योग पाहिला. पण या

नोकऱ्या व हे धंदे सुरू करण्याच्या आधीं या बंधमुक्त गुलामांनीं मळ्यांतून दुसरीकडे कोठे तरी कूच केलें. स्वातंत्र्याची नवी हवा प्यावी आणि आपण खरोखरच स्वतंत्र झालों आहों याची जाणीव यावी म्हणून काही दिवस ही मंडळी दुसरीकडे जाऊन राहिली.

आईनें मागेंच दुसरा नवरा केला होता. हा माझा सावत्र बाप गुलामगिरीला झुकांडी देऊन युद्धकाळांतच पश्चिम व्हर्जिनिया परगण्यात गेला होता तेथें त्यानें मिठागरांत नोकरी धरली होती. बंधमुक्तीची घोषणा होताच त्यानें आईचा पत्ता काढला आणि आम्हां सगळ्यांना तिकडे नेण्यासाठी त्यानें गाडी पाठवून दिली घरातल्या सामानसुमानाची आम्हीं बांधाबांध केली व निघालों. निदान दहा दिवस आम्हां वाटचाल करीत होतों. डोंगरांतून जावें लागलें, वाट खराब, गाडींतच निजावयाचें, पोरानीं चालावयाचें. एकदां वाटेंत एका खोपटात आम्ही उतरलों, चूल पेटताच भला मोठा भुजंग सळ ळत खालीं आला! मग पुन्हा कोठें उतरलोंच नाहीं! उघड्यावरच मुक्काम करीत करीत शेवटी आम्हां बाबांच्या घरी येऊन पोंहोंचलों आणि निरुपाय म्हणून दूर पडलेले माझे आईबाप पुन्हां एकत्र आले!

२ : : माझा रोमचा राजा !

## नाल्यांतील राजमुकुट मीं उचलला !

नेपोलियन हा फ्रान्स देशाचा सम्राट् इ. स. १७६९ साली जन्मला. याचे सर्व शिक्षण ब्रिएन्ना व पॅरिस येथील लष्करी शाळेतच झाले. थोड्याच दिवसांत याचें नेमबाजीचें कौशल्य लोकांच्या ध्यानात येऊं लागले. या वेळी फ्रान्सची सेना इटलीमध्ये लढत होती. त्या सैन्यामध्ये इ. स. १७९६ त ना अधिकारी या नात्याने पुढे आला. लवकरच त्याने एवढे प्रचंड विजय मिळविले की फ्रान्समधील जनता त्याला देवता समजूं लागली. इजिप्तमध्ये केलेल्या छोट्याशा चढाई नंतर तो आपल्या देशात परत आला. फ्रान्स देशाच्या नवीन घटनेप्रमाणे तो फ्रान्सचा सर्वाधिकारी बनला. आता त्याच्या आकांक्षेला पायबंद बसणेंच शक्य नव्हते. सर्व जन्मभर आपणच सत्ताधारी असावें, असे त्याने ठरविले. इ. स. १८०२ मध्ये इटलीवर केलेल्या स्वारीत त्याला मोठा विजय मिळाला. या वेळेपासून मात्र आपण फ्रान्स देशाचे सम्राट् आहो, असे त्याने जाहीर केले. यानंतर देशात शुद्ध राजसत्ता सुरू झाली. नेपोलियन स्वतः दिग्विजय करावयास निघाला होता व त्याला एकसारखे विजय मिळत होते. त्याने ऑस्ट्रियन प्रतिकाराचा बीमोड करून टाकला, इंग्लंडला बलोन येथून हुसकून लावले व रशियाचा फ्रडलँड व एइलॉ येथे पराभव केला. परंतु एवढ्या पराक्रमाने त्याचे समाधान होईना. या विजयामुळे

त्याच्या आकांक्षेला चढती कमान मात्र लागली. तो तमाच लढायावर लढाया मारीत पुढें चालला. या आकांक्षेच्या पोटींच त्याच्या जीवित-नाशाचीं बीजें निर्माण झालीं, व स्पेनच्या चढाईत त्याला माघार घ्यावी लागली. येथून त्याच्या न्हासास सुरुवात झाली पुढें १८१२ सालीं रशियामध्ये त्याला काढता पाय घ्यावा लागला. याचा शेवट लापझिग येथील लढाईंत झाला. दोस्त सैन्यानीं फ्रान्समध्ये शिरून नेपोलियनला हद्दपार केलें व तो एल्बा येथे जाऊन राहिला. इ. स. १८१५ सालीं त्यानें फिरून एकदा शिकस्तीचा प्रयत्न केला. तो फ्रान्स देशात आला व त्यानें ब्रिटिश सैन्याशीं जोराची टक्कर दिली. दुर्देवाने यात त्याचा पूर्ण पराभव झाला. नेपोलिअन स्वतः कैद झाला व त्याला सेंट हेलिना या बेटात नजरकैदेत ठेवण्यात आले. येथेंच हा थोर सम्राट् हालात दिवस काढीत काढीत इ. स १८२१ सालीं मृत्यु पावला. हा बादशहा फक्त रणांगणावरच चमकला असें नव्हे, तर त्यानें फ्रान्सची जी पुनर्घटना केली तीही उल्लेखनीय अशीच होती. त्या घटनेची पडछाया अजूनहि फ्रान्सच्या घटनेंत दिसते. जगातील दिग्विजयी सेनापतींत याचा क्रम पहिला लागेल हें निःसंशय. सेंट हेलना येथें बंदिवासात असता नेपोलियन यानें आपलें मनोगत निरनिराळ्या तऱ्हानीं व्यक्त केले. त्याचा मुलगा 'रोमचा राजा' हा या वेळीं अगदीं अल्प वयाचा होता, पण फ्रान्स देशातील लोक व युरोपातील राजेरजवाडे इत्यादिकाशीं त्यानें कसें वागावें, आपलें अनुकरण करण्याच्या बाबतींत त्याने कशी सावधगिरी बाळगावी, इत्यादि विषयांवर नेपोलियननें फार मनोरंजक विचार प्रकट केले आहेत. एल्बा बेटातून आपण परत आलो तेव्हा लोकानीं व राजे लोकानी कोणत्या चुका केल्या हेंहि त्यानें खुलासेवार सांगितले आहे. ]

* * * माझ्या मुलानें माझ्या मृत्यूचा सूड उगविण्याचें मनांत आणूं नये. त्यानें त्याचा उपयोग मात्र करून घ्यावा. मीं जें कांहीं आजवर केलें आहे त्याची स्मृति त्याच्या मनांतून लोपूं नये. मी जसा होतों तसाच तोही अन्तर्बाह्य 'फ्रेंचमन्' राहिला पाहिजे. शांततेनें राज्य करणें हेच त्याच्या सर्व प्रयत्नांचें ध्येय असलें पाहिजे. खरोखरीची आवश्यकता नसता, केवळ माझ्यासारखे करावयाचें म्हणून जर त्यानें माझी युद्धें चालू ठेविली तर त्या शुद्ध माकडचेष्टा होतील. मी जें केलें तेंच पुन्हा एकदा करणें म्हणजे मी कांहींच केलें नाहीं, असे समजण्यासारखें आहे. जर त्यानें माझें काम परिपूर्ण केलें तर माझ्या कामाचा पाया भक्कम भरलेला होता असें ठरेल. आणि ज्या कामाचा मीं केवळ कच्चा आराखडा काढला होता, त्याची योजना काय होती याचाही खुलासा होईल. एका एका शतकात एकाच प्रकारची गोष्ट दोनदा होऊं शकत नाही. माझ्या तलवारीनें युरोपखंडाला थरकाप भरविणें मला प्राप्तच झालें. आता मात्र तेथील लोकांच्या बुद्धीला शिकवण देणें हें अगत्याचें आहे. आधी झालेली क्रांति मरणारच होती, पण मी ती वाचविली. मी तिला जरेंतून मुक्त केलें आणि तिच्या अंगीं केवढे प्रबल तेज आहे, हें जगतास दाखविलें. फ्रान्समध्यें व युरोपमध्यें मीं नव्या कल्पना रुजत लाविल्या आहेत. आता मागें राहून चालावयाचें नाही; ज्याचें बीज लाविलें आहे, त्याचा मोहोरदार तरु करणें माझ्या मुलाकडे आहे. फ्रान्सच्या भूमींत समृद्धीचीं जी प्रसुप्त तत्त्वें आहेत, तीं त्यानें जागृत करावीं. त्यानें हें केलें तर तो मोठा राजा होईल.

माझ्या मृत्यूनंतर बुर्बोन राजपुरुषांना आलेलें पद संभाळून धरता यावयाचें नाहीं. प्रत्येक ठिकाणीं, खुद्द इंग्लंडमध्येसुद्धा लोकमत माझ्या अंगाला वळेल. ही प्रतिक्रिया म्हणजेच मी मुद्दाम ठेवलेली जिनगी होय. मला हेंसुद्धा शक्य वाटतें की, माझा चार्लविलेचा छळ लोकांच्या मनातून जावा म्हणून, इंग्रज लोकसुद्धा माझ्या मुलानें फ्रान्सवर पुन्हा यावें, ही कल्पना उचलून धरतील. पण इंग्लंडशीं स्नेहभावानें वागावयाचें तर, काय वाटेल तें करून इंग्लंडच्या व्यापार-वृद्धीच्या आड न येणें हें अगत्याचें आहे. यातूनच कोठचा तरी एक प्रकार उद्भवेल—एक इंग्लंडशीं युद्ध तरी करावें लागेल किंवा जगा-वरील व्यापारांत त्यांच्याशी भागीदारी करावी लागेल. सध्याच्या परिस्थितींत शक्य म्हणजे हा दुसरा प्रकार होय. अन्तर्गत प्रश्नापेक्षां बाहेरील धोरणविषयक प्रश्नच फ्रान्स देशाला आधी विचारांत घ्यावे लागतील. मीं आपल्या मुलाला पुरेसें सामर्थ्य व पुरेशी सहानुभूति वारसा म्हणून शिल्लक ठेविली आहे. तिच्या बळावर त्यानें माझें काम पुढे चालवावें. मात्र त्यानें आपलें धोरण मिळतें घेऊन उच्च स्वरूपाचेंच ठेवावयास हवें.

व्हिएन्नाला सध्या तो कसल्या स्थितींत आहे, हें पाहिलें म्हणजे मला दुःख होतें. कसल्याही तऱ्हेचीं बंधनें त्याच्यावर न घालतां ऑस्ट्रियाचा राजा त्याला मुक्त करील का? पण खुद्द फ्रान्सिस दि फर्स्ट हासुद्धा याहीपेक्षा अवघड फेऱ्यांत सापडलेला होता, तरी त्याच्यामुळे त्याच्या फ्रेंचपणाला कसलीही बाधा झाली नाही. परकी राष्ट्रांच्या आश्रयावर माझ्या मुलानें फ्रान्सच्या गादीवर बसूं नये. केवळ राजेपण प्राप्त करून घेणें हीच त्याची आकांक्षा असतां कामा

नये. तर पुढील प्रजाना आपण हवेसे कसे वाटू, इकडे त्याचें लक्ष असावयास हवें. साधेल तेव्हां तेव्हां त्यानें माझ्या घरातील माणसाशी आपलेपणा उत्पन्न केला पाहिजे. माझी आई जुन्यां वळणाची आहे. जोसेफ व यूजीन हे त्याला योग्य सल्ला देण्याप्रमाणे आहेत. हॉर्टेन्स व कॅरोलिन या दोघी काही सामान्य स्त्रिया नाहीत. सध्यां आहे तसा तो परागंदाच राहिला तर माझ्या एकाद्या पुतणीशी त्यानें लग्न केलेलें चांगले. फ्रेंच लोकांनीच त्याला राजा म्हणून परत बोलविलें तर एकाद्या रशियन राजकुमारिशीं त्याने लग्नाचा योग साधावा, तेवढाच दरबार असा आहे की, जेथे घराण्याच्या संबधानीं सरकारचें धोरण अंकित होतें. जो शरीरसंबंध करावयाचा त्यानें फ्रान्सचा दबदबा बाहेर वाढेल, असा असावा; आपल्या घरात एक तिसरेच खटलें आणून सोडावयाचें असा प्रकार होऊ नये. आपण जाणून बुजून जर भलतीकडे नेलें नाही तर फ्रेंच राष्ट्र इतरां-पेक्षा राज्य करावयास सोपे आहे तेथील लोकाना नव्या धोरणाचा वास सहज आणि तत्काळ येतो, असें दुसरीकडे दिसून येत नाही. आपल्या बऱ्यासाठीं कोण राबतो आणि आपलें अनहित कोण करतो हें त्यांना ताबडतोब उमगतें. पण हे व्हावयास त्याना कळेसें बोललें पाहिजे; नाहीतर त्याचें असमाधान त्याच्या मनाला खात राहतें व खदखद करीत राहून शेवटी त्याचा स्फोट होतो.

फ्रान्स हा असा देश आहे की, जेथें पक्षपुढाऱ्याचें फारसें चालत नाहीं. म्हणून त्याच्या आधारावर विश्वसणें म्हणजे वाळूवर इमारत रचणें होय. फ्रान्समध्यें टोलेजंग बनाव करता येतील; पण केव्हा? तर बहुजनसमाज हाताशीं असेल तेव्हा. शिवाय एकाद्या सरकारानें आधार

शोधावयाचा तो तरी जेथें सापडेल तेथेंच शोधला पाहिजे. कांही जड नियम जसे, तसे कांहीं सूक्ष्म नियमही कधीं गय करीत नाहीत आणि आपल्याला वगावयास लावतात. बुर्बोन राजपुरुषाचें नेहमींचें असें असतें कीं कोणचीही राज्यघटना पतकरणें त्याना प्राप्त होवो, ते सरदार व उपाध्याय याच्या आधारावर विसंबावयाचे. पंपानें खेचल्या-मुळें पाणी जरी काही काळपर्यंत वर राहिले तरी शेवटी तें आपल्या पातळीला वहावत यावयाचेंच ! पण मी काय केलें तें पहा. झाडून सारी प्रजा म्हणजेच माझा आधार असें धोरण मीं ठेविलें. अखिल जनतेचें हित पाहील तेंच खरें सरकार असा सक्रिय दंडक मी घालून दिला. सरदार, दरकदार, उपाध्याय, शहरवासी पाढरपेशे किंवा व्यापारी लोक याच्यासाठीं किंवा याच्या बळावर मी राज्य केलें नाहीं. मी सर्व जनतेच्या हितासाठीं, अखिल फ्रेंच लोक हे एक घर कल्पून त्यांच्या हितासाठीं राज्य केले.

आमचे सरदार लोक माझ्या मुलाला हात देणार नाहींत. एक पिढीभर मी झगडलों तेव्हाच त्याना माझ्या विचाराच्या वळणावर मला आणतां आलें; आणि मगच, मी जें तात्त्विक यश संपादिलें होतें त्याचा पवित्र ठेवा परंपरेप्रमाणें जपून ठेवावयास हवा असें त्यांस वाटावयास लागलें. १८१५ पासून सगळ्या उच्च दर्जाच्या लोकानीं उघड उघड माझ्या विरोधकाचा पक्ष स्वीकारला. स्वाभाविकच माझे सेनापति, किंवा अमीरउमराव, फार काय सांगावें माझे दुय्यम अधिकारी म्हणजे कर्नेल्स यांच्यावरसुद्धां मी विश्वसून राहिलों नाहीं. पण एकंदरीनें सर्वसामान्य जनसमूह व कॅप्टनच्या अधिकारापासून खालचें सर्व सैन्य हें माझ्या अंगाला असे. त्यांनीं मला कधींही दगा दिला नाहीं. मीं

त्याचें कितीतरी बरें केलें आहे. मीच त्याचा खराखरा प्रतिनिधी होतों. मी हुकुमशहा होणे हे मला प्राप्तच होते, याची नेमकी खूण म्हणजे ही की मी जेवढे अधिकार मागत असें त्यापेक्षा हे माझे लोक मला जास्तच देत असत सध्याच्या काळी फ्रान्समध्ये जेवढे अवश्य आहे तवढेंच शक्य होणार अशी स्थिति आहे मला जें करता आलें तेंच माझ्या मुलाला करता येईल हे खरं नाही. अगोदर त्याच्या अधिकाराविपर्यीच रणे माजतील स्वातंत्र्याची वासना उदभवली आहे हें त्याने आधीच ओळखिलें पाहिजे सरकार म्हटले की फ्रान्समध्ये त्याचा बोज फार मोठा असतो, आणि त्याच्या अंगी शहाणपण असेल तर सार्वत्रिक पाठिंबा मिळावयास लाचलुचपतीची आवश्यकता पडत नाही असें त्याला दिसून येईल. राजाचें काम म्हणजे नुसतें अंमल चालविणें नव्हे, तर त्याने लोकास शिक्षण द्यावयास हवे; नीतिविचार प्रसृत करावयास हवे, व लोकास सुख उत्पन्न होईल असे केले पाहिजे. वाईट मार्गानीं सत्ता टिकविणे हें गौण आहे.

लहान वयात मलाही काही भ्रम असत. पण मी त्यातून लवकर बाहेर पडलों. आपल्या वक्तृत्वाच्या जोरावर लोकसभावर प्रभुत्व चालविणारे मोठाले वक्ते राजकारणातील अक्कलेच्या बाबतीत अगदींच सामान्य लोक असतात. त्याच्याच पद्धतीनें आपण त्याना विरोध करू नये, कारण आपल्यापेक्षा त्याना शब्दाचा गर्गशा जास्त माजविता येतो. त्याचें वक्तृत्व आपल्या गंभीर व तर्कशुद्ध बुद्धिवादानें आपण लटकें पाडावें. त्याचें सगळे बळ म्हणजे अनिश्चित शब्दजाळ. खडखडीत वस्तुस्थिति त्याजपुढें उभी करून त्याना शुद्धीवर आणावें. व्यवहाराच्या भाषेनें त्याचा निःपात करता येतो. आमच्या प्रधान-

मंडळात माझ्याहून चांगले बोलणारे पुष्कळ लोक होते. पण दोन आणि दोन चार होतात असे मुद्दे दाखवून मी त्याना नामोहरम करी.

माझ्या मुलानें मुद्रण-स्वातंत्र्य देणें हें अगदीं अटळ आहे. सध्यांच्या दिवसांत तें आवश्यक आहे. मुद्रण-स्वातंत्र्याचा उपयोग सरकारानेंच चांगला करावा. साम्राज्याच्या कानाकोपऱ्यातही सत्तत्त्वांचा आणि मताचा प्रसार करण्यास या साधनाचें साह्य मोठेंच करून घेता येईल. मुद्रण-स्वातंत्र्य, मुद्रण-स्वातंत्र्य म्हणून सरकारानें तिकडे कानाडोळा केला तर ज्वालामुखीच्या काठावर खुशाल झोपी जाण्यासारखें तें होईल. तह होऊन सगळी स्थिरस्थावर झाली असती म्हणजे मी एक ' डिरेक्टर्स ऑफ् दि प्रेस ' म्हणजे मंडळ स्थापिलें असतें, तीन देशांतले उत्तमोत्तम लोक घेतले असते आणि खेड्यापाड्यापर्यंत त्यांच्याद्वारां माझ्या कल्पना व माझे हेतु याचा प्रसार केला असता. ....माझ्या मुलानें नव्या कल्पनांचा अंगिकार केला पाहिजे आणि ज्या तत्त्वाला मी सगळीकडे येवढें यश मिळवून दिलें आहे तेंही त्यानें आपलें म्हटलें पाहिजे. संस्था स्थापून त्याच्याद्वारा जहागिर-पद्धतींतील कायदेकानू त्यानें रद्द केले पाहिजेत आणि मानवांचें स्वयंभू वैभव वाढीस लाविलें पाहिजे आणि शेंकडो वर्षे जीं समृद्धि-बीजें रुजत आहेत तीं फोफावलीं पाहिजेत. सध्यां जी राष्ट्रें असंस्कृत आणि रानटी आहेत त्यात ख्रिस्ती धर्माचा आणि संस्कृतीचा प्रसार त्यानें केला पाहिजे. माझ्या पुत्राचे विचार याच दिशेनें चालावे असें हें माझें उदात्त कार्य आहे. श्रेष्ठायत्त राज्यपद्धतीचे पाठीराखे यासाठींच माझा तिरस्कार करीत असत आणि माझा बळी घेत आहेत. माझें कार्य किती पवित्र आहे हें त्यानें ओळखावें. त्याला म्हणावें या

राजांचे खून करणारांकडे पहा! हेच लोक पूर्वीं बुर्बोन घराण्याच्या खलबतखान्यातही होते. उद्या ते आपल्या देशाला परत जातील! आणि युरोपांतील राष्ट्राना माझ्यामुळे जी कैवल्ये प्राप्त होणार होती त्याच्यासाठीं मी व माझे सगेसोयरे याचे मात्र सऱ्या छळ होत आहेत! जे माझे शत्रू आहेत ते मानव्याचेच शत्रू म्हटले पाहिजेत. ते लोकाना मेंढरें समजतात आणि त्याच्या मुसक्या बाधावयास पहा-तात. त्यांना फ्रान्स देशाचा छळ करावयाचा आहे आणि वळचणीचें पाणी आढ्याकडे वहावयास लावावयाचें आहे. त्यानी सावध असावें, बंधारे फुटून पाणी भलतीकडेच वहावते.

माझ्या मुलाच्या अमलाखाली निरनिराळे हितसबंध गुण्यागोविंदानें एकत्र रहावयास काहींच हरकत नाही. नव्या कल्पनाना बळ येऊन त्यांचा प्रसारही होईल; पण हें होतानाही कुणाला अचका बसला आहे, किंवा कोणी बळी गेले आहेत असें होण्याचें कारण नाहीं; म्हणजे माणसाच्या जातीला दुर्दैवाचे चपेटे बसावयाचें आपोआपच बाचेल. पण माझ्या निधनानतर केवळ माझा मुलगा म्हणून आणि तो केवळ राजा झाला आहे यासाठींच त्याचा छळ सुरू झाला तर मात्र माझा सूड उगवण्यास व तोही अगदी कडकडून उगविण्यास मुलानें पुढें आलें पाहिजे. एकाद्या राष्ट्राच्या सरहद्दी फुटल्या आणि सर्व यूरोपभर रक्ताच्या नद्या वाहू लागल्या तर संस्कृतीची हरतऱ्हेनें पिछेहाट होईल. आपसातील यादवी व परकीयाशी युद्ध यांच्या दगलीत शास्त्र आणि ज्ञान याचे प्रदीप विझून जातील. राजसत्ता कितीशी उभी राहिलेली आहे? पराकाष्ठा एकादा दिवस; पण तेवढ्यांत तिनें अखिल प्रजाचे हितसंबंध सुरक्षित ठेविले आहेत; मात्र

हें व्हावयास आणि मध्ययुगीन बंधनें झुगारून देण्यास राजसत्तेला तीन शतकें झगडा करावा लागला. अशा या सत्तेला ठार मारावयाचें ठरलें तर युरोपखंडाला तीन शतकें तरी लागतील, आणि अनिवार हाल सोसावे लागतील. अनेक वर्षें धडपडून राष्ट्रांनी जी सुखे पैदा केलीं आहेत ती नष्ट होतील आणि मग त्याचे विपरीत परिणाम काय होतील हें कोणीं सांगावें ? माझा मुलगा गादीवर बसावा हे सर्व राष्ट्राच्या व राजकुलाच्या हिताचें आहे.

मी हें जनतोंडी सांगून लिहवून घेतले आहे किंवा स्वहस्ते लिहिलें आहे तें प्रसिद्ध व्हावें व माझ्या मुलाच्या नजरेस यावें व त्यानें त्याचें चिंतन करावें.

* * *

❀ त्या गोष्टीला आता एक वर्ष होऊन गेलें. त्या दिवशी निकडेतिकडे हुरूपच भरला होता. अेल्बा बेटातून निघून येऊन मी लिऑन्स शहरीं प्राप्त झालों होतों. माझें सामर्थ्य पुन्हा एकदा जोरानें उभें राहिलें. सगळ्या जगात अधिक बलाढ्य असें साम्राज्य मीं संपादिलें होतें. खरोखर मी अेल्बा बेटातून परत आलों ही गोष्ट कोणीच सुखानें पत्करली नाही हा केवढा चमत्कारिक योग होय ! यूरोपांतील निरनिराळ्या राष्ट्रांत जर कांही तोल राहावयास हवा होता आणि शान्तता प्रस्थापित व्हावयास हवी होती तर मी बादशाहा होणे अवश्य आहे ही गोष्ट कुणाच्याच ध्यानीं आली नाही. पण राजे व प्रजा दोघेंही मला भीत होती. वास्तविक पाहातां ही त्यांची चूक होती. आता या चुकीची किंमत त्यांना द्यावी लागेल.

राजांना माझें कसलें भय वाटत होतें ? ते काय माझ्या महत्त्वाकांक्षेला भीत होते ? मी देश जिंकण्याचा सपाटा लावीन असें त्यांस वाटत होतें ? का सगळीकडे माझें एकछत्री राज्य मी स्थापन करीन असें त्यास वाटत होतें ? वास्तविक पाहाता त्यांच्या हें ध्यानांत यावयास हवें होतें कीं माझें सामर्थ्य व माझीं साधनें ही आतां पूर्वींसारखीं राहिली नव्हती. शिवाय मी जर या राजाचे पराभव केले असले आणि मुलूख जिंकले असले तर ते केवळ आत्मसंरक्षणासाठींच होय याचा प्रत्यय लोकाना उत्तरोत्तर येत जाईल. फ्रान्सवर हल्ला करण्याची इच्छा युरोपांतील राजानी कधींच टाकली नाही. त्या देशांत प्रसृत होणारी नवी ज्ञानेंही त्यांस नको होती, आणि माझ्यावर तर त्यांचा दांतच होता. अर्थात् आमचा आम्हाला जर नष्टांश करून घेणें नको होतें, तर दुसऱ्याचा नाश करणें आम्हांला प्राप्तच होतें. आमच्याविरुद्ध युरोपांतील राजांचा गट नेहमीचाच बनलेला होता; मग तो उघड असो की गुप्त असो; ते कबूल करोत कीं न करोत; हा कट अगदी कायमचा होता. आम्हास गप्प बसवणें हें सर्वस्वीं माझ्या शत्रूंच्या हातीं होतें. माझ्याविषयी म्हणाल तर या लोकांचा असा समज आहे कीं काय की शांतता व सुरक्षितता यांच्या वैभवाची मला कांहींच किंमत नाहीं ? पण जर आमच्या स्वाभिमानालाच कोणी दंश केला तर आम्हीं तरी काय करावें ?

या राजे लोकांना काय अशी भीति वाटत होती कीं, अराजकवादाचा डोंबाळा मी त्यांच्या घरांत माजवीन ? वास्तविक पाहातां या बाबतींत माझीं मतें काय आहेत हें त्यांना अनुभवानें माहीत झालेलें होतें. मी त्यांचीं राज्यें हस्तगत केलेली त्यानीं पाहिलीं होतीं.

तीं हस्तगत झाल्यावर तेथें खूप क्रांति करून टाकावी असें मला किती-कांनी तरी सांगितलें होतें ! शहरांचा कारभार शहरांतील लोकांच्या हवाली करावा आणि तेथील प्रजांत बंडें उभीं करावी हें मला सहज करतां येण्यासारखें होतें. आधुनिक ' अटीला ' किंवा ' रॉबिस्पिअर याचा घोड्यावरील अवतार ' अशी कितीही वाईट नांवे त्यांनीं मला दिलीं असली. तरी मी कोण आहें याची त्याना बरोबर कल्पना होती. मी जर खरोखर तसा असतों तर कदाचित् मी अजूनही गादीवर असतों; पण त्यांना मात्र सिंहासनावरून उड्या टाकून केव्हांच पळून जावें लागलें असतें !

ज्या एका मोठ्या कार्याचा प्रणेता मी होतों, त्यांत या दोहोंपैकीं एका पद्धतीचा अवलंब करावा लागला असता, एक म्हणजे लोकांचें म्हणणें काय आहे तें राजे लोकांना पत्करावयास लावणें, किंवा राजसंस्थेच्या द्वाराच सुखोत्पत्ति होते हें लोकाना दाखवून देणें. आतां हें तर सर्वांनाच माहीत आहे कीं, लोकांचा दील एकदा का बिघडला म्हणजे त्याना आवरून धरणें फार अवघड गोष्ट आहे. त्यापेक्षां त्यांच्यावर अंमल करणारांची बुद्धिमत्ता व त्याचें शहाणपण यांवर अवलंबून राहणें पुष्कळदा युक्त ठरतें. हे राजे लोक आपलें हित कशांत आहे हें उमगण्याइतपत चाणाक्षपणा दाखवितील, असें मानून चालण्यांत माझी कांहीं चूक झाली असें मला वाटत नाहीं. पण मी फसलों हें मात्र खरें. या राजे लोकांनीं नीट हिशेबानें पाहिलें नाहीं. तें संतापानें आंधळे झाले; आणि जो धोंडा त्यांच्यावर पडूं नये म्हणून मीं थोपवून धरलेला होता तोच त्यांनीं माझ्या अंगावर गड-गडत सोडून दिला. शेवटीं, एक साधासुधा शिपाई–गडी आपल्या

डोक्यावर राजमुकुट धारण करितो याचा या राजे लोकांना अपमान वाटला काय? हा नवीनच पायंडा पडेल असें त्यास वाटलें काय! वास्तविक पाहतां मी जेव्हां राजपदावर चढलों तेव्हा मीं योग्य ते ते सर्व समारंभ केले. राजे लोकाच्या ज्या काहीं पद्धती असतात त्यांचा अंगीकार करण्यात मीं मुळींच कसूर केली नाहीं त्याचें आणि माझें जिणें हें पृथक्पणानें मानावयाचें मीं सोडून दिलें. मीं राजघराण्याशीं शरीरसबंधही जोडला; धोरणही त्याचेंच पत्करिलें आणि अशा रीतीनें त्याचाच झालों. इतक्या गोष्टी केल्यानतर माझ्याप्रमाणेच अनेक लोक राजपदाला येतील असें त्याना कां वाटलें असावें!

उलटपक्षीं लोकाना तरी माझें भय कां वाटावें? त्याना काय असें वाटलें कीं मी आलों होतों तो सगळा प्रदेश बेचिराख करावा आणि त्यांच्या सुमत्ता बाधाव्या यासाठीं आलों होतों? मुळींच नाहीं. शांतता प्रस्थापित व्हावी आणि त्याचे हक्क त्याना मिळावे यासाठीं मी आलों होतों. हें माझें नवें सूत्र हेंच काय तें माझें खरें बळ होतें. तें तोडून टाकण्यानें नाशच झाला असता. मी पुनः सागतों कीं, सामान्य लोक आणि राजे लोक या दोघानीं मोठी चूक केली. उध्वस्त झालेलीं राजपदें मीं पुन्हां प्रस्थापित केलीं आणि अगदीं सौम्य स्वरूपाची सरदारसत्ताही स्थापन केली. आतां मात्र या राजांना आणि सरदारांना पुन: धोका प्राप्त झाला आहे. लोकांच्या हक्काच्या युक्त मर्यादा ओळखून ते हक्कही मीं कायम केले होते; आणि त्यांना एक तऱ्हेचा पवित्रपणा आणिला होता. आतां मात्र लोक काय वाटेल तें मागूं लागतील. आपण काय मागतों हें त्याचें त्यांनाच कळावयाचें नाहीं; आणि मागण्या करितांना ते दहशत दाखवू लागतील. माझें पुनरागमन व सिंहासनावर माझी पुनः स्थापना हीं राजे लोकांनीं जर

खुषीनें पत्करली असती तर सामान्य प्रजा आणि राजे लोक या दोघांनेंही सगळें काही लागी लागलें असतें, दोघांचाही फायदाच झाला असता. आता मात्र दोघेही झगडा करू लागतील आणि दोघांचेही नुकसान होईल. मला पत्करलें असते तर त्यांना सर्व गोष्टींचा ताबडतोब निकाल करता आला असता. पण आता मात्र त्याना प्रत्येक गोष्टीचा आरंभापासून खल करावा लागेल. त्यांना दीर्घकालपर्यंत शांततेंत आणि सुखांत नांदतां आलें असतें; आतां मात्र असें झालें आहे की, जर एक ठिणगी पडली तर सगळीकडे डोंबाळा उडेल.

मी काही कोणाचा राजमुकुट बळकावून बसलों नव्हतों. फ्रान्सचा राजमुकुट गरंगळून जाऊन सडकेच्या काठी नाल्यात पडला होता. तो मी उचलिला आणि देशातल्या लोकानी तो माझ्या मस्तकावर ठेवला फ्रेंच राष्ट्राचें नाव सर्व जगात वैभवसंपन्न व्हावें, आणि लोकांना तें आदरणीय वाटावें हीच माझी इच्छा होती. बुर्बोन राजे हे सरदारांचेच राजे होते. मग आपल्या पूर्वजांचा ध्वज कोणचाही इतर रंग लावून त्यानी निराळा भासवावा पण मी मात्र लोकांचा राजा होतों मी एल्बाहून परत आलो तेव्हा राष्ट्रांतील लोक मला सहानुभूति दाखवितील अशी मला पुरेपूर खात्री होतीच, पण मला कोणी कोणी असा आग्रहाचा सल्ला दिला की, राजपक्षीयांतील काहीं प्रमुखाचा सुद्धा मी थोडा अनुनय करावा. पण ही गोष्ट करण्याचें मीं साफ नाकारलें आणि मला सल्ला देणारांना म्हणालो, "सरसकट सर्व प्रजाच्या मनोमंदिरांत जर मला स्थान मिळालें आहे तर राजपक्षीयाशीं मला काय करावयाचे आहे?"

## ३ : : मुळयाच्या पाल्यानें

## पाठ पुरविली !

गोपाळ गणेश आगरकर हे महाराष्ट्रातील सुधारकांचे अग्रणी म्हणून प्रसिद्ध आहेत. यांचा जन्म खिरस्ताब्द १८५६ या वर्षी झाला. यांच्या घरची फार गरिबी असल्यामुळे लहानपणी यांचे दिवस फार हालांत गेले. शिक्षणाची केवळ उपजत हौस म्हणूनच सर्व हाल-अपेष्टा सोसूनही हे महाविद्यालयाचे पदवीधर झाले, आणि विद्वान् लेखकांत त्यांची गणना होऊं लागली. डेक्कन कॉलेजांत आगरकर व टिळक हे सहाध्यायी व मित्र होते आणि आपल्या भावी जीविताची रूपरेषा त्यांनीं या काळांतच ठरवली. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या 'निबन्धमाले'तील लेखनानें ज्या तरुण लोकांच्या मनांत चैतन्य उत्पन्न केले त्यांतच आगरकरांची गणना करावयास हवी. शिक्षणक्रम संपतांच आपण कांहीतरी लोकोपयोगाचेंच केलें पाहिजे असा निश्चय आगरकरांनीं केला, आणि मरेतापर्यंत तो इमानेइतबारें पाळला. पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये ते जरा एक वर्ष उशीरा आले तरी ते काढण्याच्या कामीं चिपळूणकर आणि टिळक यांची त्यांच्यावर भिस्त होतीच. टिळकांच्याहि आधीं ते 'केसरी'चे संपादक होते. परन्तु सामाजिक सुधारणेचे स्वतंत्र मत प्रतिपादन करतां यावें म्हणून त्यांनीं 'सुधारक' नावाचें वर्तमानपत्र काढलें. राजकारणांत ते थोडे कडकच होते हें जरी खरें असलें तरी

त्यांच्या बुद्धीचा खरा व्यास समाजसुधारणा हाच होता. युरोपांत नि मुख्यतः इंग्लंड देशात त्यावेळीं ज मोठमोठे तत्वज्ञानी होते त्यांच्या लिहिण्याचा आगरकरांच्या मनावर फारच परिणाम झालेला होता, आणि त्यास अनुसरून समाजसुधारणेच्या तत्वाचा आग्रहाचा पुरस्कार त्यांनीं केला. वास्तविक पाहाता त्यांनीं ज्या समाजसुधारणा प्रतिपादिल्या, त्यांचा उच्चार दोन पिढ्या आधींच महाराष्ट्रातील सुधारकांनीं केला होता. परंतु ते सुधारक नवीन तऱ्हेनं शिकलेले नसल्यामुळें आणि वर्तमानपत्र हें ज्ञानप्रसाराचें नवे शस्त्र त्यांच्या हातीं नसल्यामुळे त्यांच्या मताचा इतकासा फैलाव झाला नाहीं. आगरकरांनीं मात्र त्याचा भरपूर उपयोग करून घेऊन महाराष्ट्रीय जनतेच्या मनात सुधारणेची बुद्धि अगदीं कायम केली. ते शेवटपर्यंत डेक्कन एज्युकेशन सोसायटींत असून फर्ग्युसन कॉलेजचे प्रिन्सिपलहि होते याचें लिहिणें मोठ मनमोकळेपणानें लिहिलेले असून पुष्कळ वेळा त्यात भावनेचा विलक्षण जोर दिसून येतो. त्यांना अन्यायाची चीड फारच असे आणि तो जेथें कोठे दिसेल तेथें ते आपलें लेखणीचें शस्त्र घेऊन धावत जात. लहानपणापासून गरिबींत वाढल्यामुळे त्यांच्या प्रकृतीची आबाळच झाली होती, आणि जडलेल्या दम्याच्या विकारानें ते चागले सशक्त कधींच झाले नाहींत त्यांच्या पश्चात् ‘ सुधारक ’ पत्र त्यांच्या अनुयायापैकीं कोणासहि त्यांच्याइतक्या तेजानें चालवता आले नाहीं. अशा या उदार, प्रेमळ व देशाभिमानी गृहस्थाला १८९५ सालीं म्हणजे अल्पवयातच मरण आलें.

ते केसरीचे संपादक असताना कोल्हापूरच्या एका प्रकरणासंबधानें त्यांनीं काहीं टीका लिहिली होती, ती अंगलट येऊन त्याना व टिळकाना डोंगरी येथील तुरुंगात एकशेएक दिवस राहावें लागले. तेथील आपल्या अनुभवाचें वर्णन आगरकरांनीं मोठे सुरसपणें केले आहे. ]

* * * कैद्यांना ( टिळक व आगरकर यांना ) 'द्वेषाच्या' चार्जातून मुक्त करून. अविचाराचे लेख लिहिल्याबद्दल शिक्षेची सुनावणी केल्यानंतर हायकोर्ट उठलें व मंडळी खालीं तोंडें घालून आपापल्या घरी चालती झाली. नंतर आम्हांला माडीवरून खालीं आणून तळमजल्यातल्या एका कोठडींत ठेवलं. सहा वाजण्याच्या सुमारास घोड्यांच्या दोन गाड्या आणवून त्यांत आम्हांला व्यवस्थेनें बसविलें व आमच्या बंदोबस्ताकरितां बरोबर शिपाई लोकांचा पहारा देऊन बिनभाड्याच्या घराकडे आमची रवानगी केली. आमच्या समजुतीप्रमाणें देशाच्या बऱ्यासाठीं आम्हीं आरंभिलेले उद्योग, करवीरस्थ प्रभूंचें चांगलें व्हावें म्हणून आम्हीं लिहिलेले लेख, खटला उभा राहिल्यावर आम्हांस व आमच्या मित्रमंडळींस पडलेली दीर्घ यातायात, लोकांची आमच्यावर बसलेली प्रीति आणि त्यांच्याशीं आमचें वर्तन, आमच्या देशाची स्थिति, आणि जगांतील न्यायपद्धति वगैरे अनेक विषय झपाट्यानें आमच्या डोक्यातून जात आहेत तों आमच्या गाड्या तुरुंगाच्या दारापाशीं येऊन ठेपल्या. त्यातून खालीं उतरून दिंडीतून आंत शिरतांना आमच्या मनाची काय स्थिति झाली असेल याची वाचकांनींच कल्पना करावी. आंत गेल्यावर आम्ही थोडा वेळ स्वस्थ बसलों, नंतर घरचे कपडे उतरून टाकल्यावर सरकारी वॉर्डरनें खालपासून वरपर्यंत आमची झडती घेतली व आम्हांस तुरुंगाचे पोषाख दिले. या पोषाखांत तीन भाग असतात; ( १ ) तुमान किंवा गुडघ्याइतका सैल चोळणा; ( २ ) कोपराइतक्या अस्तन्यांचा सदरा; आणि ( ३ ) वाटोळी टोपी. हीं सर्व खादीचीं केलेलीं असून मजबूत व थंडीवाऱ्याला सहसा दाद देणारीं नसतात हीं दर आठवड्यास एकदां धुवून मिळतात. याखेरीज

स्नान करावयाचें असलें म्हणजे त्या वेळेपुरती रुंद लंगोटी मिळते. ही लंगोटी घालताना करदोट्याची गरज न लागावी अशी तिच्यात खुबीची सुधारणा केली आहे! माझी प्रकृति जात्या शैत्यखोर असल्यामुळें मला वारवार पडसे होई, तेव्हा जमादाराच्या परवानगीनें शिप्यापासून (तो तरी एक कैदीच होता) नाक पुसण्यासाठीं मीं एक वीत दीडवीत फडकें मिळविलें. तें आम्ही सुटेपर्यंत माझ्यापाशीं होतें.

वस्त्रपरिधान झाल्यावर आमची नांवें रजिष्टर झाली; व लत्ता-कपड्याचीं टिपणें होऊन त्याच्यावर आमच्या सह्या घेतल्यावर निजण्यासाठीं आम्हास तरळात ( Trial Yard Cells ) नेलें. तेथें एका दगडी फरशीच्या पण बिन–ढेकणी खोलीत आम्हा सगळ्यांस कोंडून घालून व आमच्या अंगावर दहा बारा फाटकीं तुटकीं घोंग-ड्याची रकटी फेंकून देऊन, कोंडण्यास आलला शिपायी दाराला जंगी कुलूप लावून चालता झाला. त्या रात्रीं पोटात थंडी, बाहेर थंडी, व थंड–प्रकृति असल्यामुळें, मी उजाडेपर्यंत सगळे तास मोजले व माझ्याप्रमाणेच सगमरी बाकीच्यांची स्थिति होती. सुमारें सात आठ वाजण्याच्या सुमारास आम्हास तेथून काढून क्लार्कच्या हपिसात आणलें. तेथला विधि आटपण्यास पक्के दोन तास लागले. प्रथम आमचें वजन करून नंतर शरीराची उंची, डोक्याचा परीघ व पावलाची लांबी घेतली व अंगावरील ठळक ठळक निशाण्या टिपल्या. पुढें तुरुंगाच्या नेटिव्ह मेडिकल असिस्टंटानें कोणास कांहीं स्पर्शरोग आहे किंवा नाहीं याचा तपास करून देवी काढल्या न काढल्याची चवकशी केली व आपल्या बुकांत सर्व माहिती लिहून

घेतली. इतक्यात गोरा डॉक्टर आला, त्याबरोबर क्लार्कच्या हपिसातून डॉक्टराच्या हपिसात आम्हाला नेले तेथे त्याने सदरे काढवून देवी वगैरे काढल्या आहेत की नाही हे पाहिलें. तेथून क्लार्कच्या हपिसात आम्ही पुन्हा परत आलों. पुढें हेडक्लार्कच्या हपिसात थोडीबहुत चवकशी झाल्यावर, आम्हास तुरुंगाच्या गोऱ्या सुपर्र्टेडेंटपुढे नेऊन उभें केलें व आमच्या लत्ताकपड्याची यादी पहिल्या क्लार्कनें वाचली. ती बरोबर आहे असे आम्ही सांगितल्यावर आम्हाला तेथून काढून हाटळीवर ( Hard Labour Yard ) नेले. इतका प्रकार होईपर्यंत सुमारें अकरा वाजण्याचा बेत झाला. नतर सर्वांस परसाकडणे, तोंड धुणें घालून जेवायला नेलें.

प्रत्येक कैद्याला अन्न घेण्यासाठी एकेक लोखंडी टकोरें दिलेलें असतें. या पात्राची आकृति कशी असते म्हणाल तर आपल्या कढईसारखी असते, असें म्हणण्यास हरकत नाही; भेद इतकाच की, कढईला कड्या असतात, त्या टकोऱ्याला नसतात. पहिल्या दिवशीं अन्न पुढे आल्याबरोबर त्याचा अमंगळ दर्प आम्हास दुःसह वाटला व तोंडात दोन तीन घास जाण्याबरोबर ओकारी आली. मग थोडेसें पाणी पिऊन घेतल्यावर शिपायांनी आम्हास एका बराकीत कोंडून घातले; तेथे आम्ही संध्याकाळचे चार वाजेपर्यंत पडून होतों....चार वाजल्यावर बाहेर काढून आम्हास संध्याकाळचे जेवण दिलें व सहा वाजण्याच्या सुमारास बराकीच्या दुसऱ्या मजल्यावर निजण्याच्या कोठड्या आहेत त्यात कोंडून घातलें. ही पहिल्या दिवसाची हकीकत झाली व हींच सगळ्या दिवसांची होय असें म्हटलें असता चालेल.

बिनमजुरी कैद्यास तुरुंगात जेवून बसण्याखेरीज दुसरें कांहीं एक काम नसतें. उद्योगात गढलेल्या मनुष्यास दोन घटका स्वस्थ बसण्यास फुरसत केव्हा सांपडेल असें झालेलें असतें; पण आम्हाला तेथें कांहीच उद्योग नसल्यामुळें दोन दिवसात बसण्याचा कंटाळा आला पहिले पंचवीस दिवस आम्हांस पराकाष्ठेचे जड गेले. तुरुंगातील अन्नाची रुचि लागून ते अंगवळणी पडेपर्यंत फार त्रास झाला .. कांदा, लसूण खाण्याची ज्यांना संवय नाहीं, त्याची तुरुंगात फार उपासमार होते व त्याचमुळें १०१ दिवसांत टिळकाचे चोवीस पौंड आणि माझें सोळा पौंड मास नाहीसें झालें ! तुरुंगांत गेल्यावर पहिले कांहीं दिवस संध्याकाळीं कादाबटाट्याची पातळभाजी मिळे, पण पुढे एकदां जो मुळ्याचा पाला लागला त्याने आमची बाहेर पडेपर्यंत पाठ पुरविली. ही भाजी इतकी खराब असते की, ती आम्हीं कधींच तोंडात घातली नाहीं. सकाळच्या डाळींपैकी कांहीं डाळ एका मडक्यात राखून ठेवून त्याबरोबर संध्याकाळच्या भाकऱ्या किंवा रोट्या खात असूं. तुरुंगात गेल्याबद्दल आम्हास कधींच वाईट वाटलें नाहीं पण तेथलें अन्न पुढें आलें म्हणजे मात्र वाईट वाटे. १८७६ सालापूर्वीं बिनमजुरीच्या कैद्यांस आपापलें जेवण हवें असल्यास बाहेरून आणविण्याची परवानगी असे असें सागतात; आमच्या वेळेस असें असतें तर आम्हीं कदाचित् वजनानें एक दोन पौंड वाढून बाहेर पडलों असतों ! तुरुंगांतील धान्य हलक्या दराचें असतें इतकेंच नाहीं, तर अन्नही फार वाईट रीतीनें तयार करतात. तेथें विशेष खप म्हणजे झाडा बंद होण्याच्या औषधाचा असतो ! आम्हापैकीं प्रत्येकास हगवणीची पाळी द्यावी लागली.

दररोज बारा किंवा तेरा तास झोंप घेण्यासाठीं एके ठिकाणीं कोंडून रहाणें अत्यन्त दुःसह आहे. नित्य उठून पाच सात तास गोष्टी तरी कुठल्या सांगाव्या, किंवा चर्चा करण्यास नवीन विषय तरी कोठले आणावे ? शिवाय दररोज त्याच त्याच मनुष्याशीं बोलत बसण्याचा कटाळा येतो, हें सर्वत्र अनुभवप्रसिद्ध आहे. आमचे हंतरण्यापांघरण्याचे हाल होते असें नाहीं. तसेंच खोल्यातून वाराही चांगला खेळत असतो, पण उजेड नसल्यामुळें फार त्रास होई. सगळ्या तीन महिन्यात चांदोबास एकदा किंवा दोनदा मोठ्या खटपटीनें गजातून पाहिलें ! आठ दहा दिवस सुरवंटामुळें फार बेजार झालों होतों. निजण्याच्या घोंगड्याच्या पट्ट्यात सुरवट चिरडले म्हणजे कशी मजा होते हें सर्वांस ठाऊक आहेच. शिवाय अन्नात मिरची फार पडत असल्यामुळें चौघांपैकीं दोघांतिघांस तरी परसाकडेला निदान एकेक वेळ व लघुशंकेस दोन तीन वेळां बसणें भाग पडे. पहिल्या पचवीस दिवसात टकोरें घासण्याशिवाय दुसरा कांहीं व्यवसाय नव्हता. पण ते काय बिचारें लोखंडाचें असून दोन तीन दिवसांत रुप्यासारखें पांढरें स्फेत झाले. पाच सात दिवस लोटल्यावर तर एकसारखी मांडी ठोकून बसण्याचा इतका कटाळा आला कीं, आम्हास सक्तमजुरीची शिक्षा होती तरी आनंदानें दिवस गेला असता असें वाटूं लागलें ! पण हे सगळे मनातील मांडे ! सुपरिंटेंडंट तरी कायद्याबाहेर बिन मजुरीच्या कैद्यास काम कसें सांगणार ? मग एके दिवशीं आम्हीं फारच विनवणी केली, तेव्हां त्यानें आमच्याकडून एक लेखी अर्ज घेऊन आपल्या वरिष्ठाकडे पाठविला. त्या वरिष्ठांनीं आम्हांवर जे उपकार केले ते आमच्यानें कधीं फिटणार

नाहींत. अर्ज येऊन पोंचल्याबरोबर त्यानी सदय होऊन आम्हास पुस्तकें वाचण्याची व कागदशाई वगैरे घेऊन भाषांतरें वगैरे करण्याची परवानगी दिली त्यामुळें कारागृहवास म्हणून जो म्हणतात तो आम्हाला पहिल्या पंचवीस दिवसानंतर फारसा भोंवला नाही. सकाळपासून संध्याकाळपर्यंत वाचण्यात किंवा लिहिण्यात वेळ जाई, व दिवसा मानासिक श्रम झाल्यामुळे रात्री चार पाच तास तरी चांगली झोंप लागे. पण पुढ पुढें जसजशी मेंदूची आणि शरीराची शक्ति क्षीण होत चालली, तसतसें वाचण्यावर देखील मन लागेनासें झालें, व शेवटच्या आठ दिवसात हवी तितकी पुस्तकें व हवे तितके कागद जवळ असताही मी एक ओळ देखील वाचिली नाही किंवा एक टांक देखील ओढला नाही. आपापसांत हळहळू गोष्टी सांगण्या-खेरीच, किंवा अकरा वाजल्यावर बराकींत कोंडून घेतल्यावर तेथे फिरण्याखेरीज कांहींही करमणूक नसे. टिळकाचा व माझा नाना तऱ्हेच्या विषयांवर वाद करण्यात पुष्कळ वेळ जाई. कित्येकदा तर आम्ही रात्रीच्या रात्री बोलत घालविल्याचे मला आठवतें नाही नाहीं त्या विषयांवर आमचा एकेक वेळ येवढ्या जोराने वाद चाले कीं आसपासचे शिपाई " हळू बोला, हळू बोला " असा इशारा करीत व बोलता बोलता रात्र निघून जाई. मधून मधून डाबिस कैद्यांना फटके देताना ते पहाण्यासाठी सर्वांना एकत्रित बोलावित तेव्हां फटके पाहूनहि थोडी सखेद करमणूक होई.

## ४ : : देवा, मी हा असा आहें !

## मीं झुकांडी दिली !

रूसो या फ्रेंच क्रान्तिकारकाचं नाव सर्व जगभर माहीत झालेले आहे. हा इ. स. १७१२ मार्ली जन्मास आला. लहानपणापासूनच याच्या प्रवृत्तींत लहरीपणा, छांदिष्टपणा, स्त्रीविषयक अनावर भावना, आणि फटिंगपणा याचं चमत्कारिक मिश्रण झालेले दिसू लागले. वडील माणसांच्या तावडींतून बाहेर पडण्याचे साहस याने फार लहानपणीं केले, आणि वाट फुटेल तिकडे जाऊन आपले नशीब काढण्याचा उद्योग त्याने चालू केला. हा बुद्धीने चांगला कुशाग्र होता. पण बुद्धीच्या कुशाग्रतेपेक्षा वृत्तीचा स्वतंत्रपणा, इतकेच नव्हे, तर केवळ मोकाटपणा हा त्याच्या स्वभावाचा मुख्य गुण होता. ठराविक यमनियम आणि सामाजिक निर्बंध यांचा त्यानं कधीं क्षितीच बाळगली नाहीं. इ. स. १७५० साली शास्त्र आणि कला यावर त्यानें एक मोठा उत्कृष्ट प्रबंध लिहिला व त्यामुळे त्याची कीर्ति बरीच पसरली. संगीताचाहि त्याला चांगला शोक होता आणि म्हणून त्या शास्त्रावर कांहीं तात्त्विक विवेचन लिहिण्याचा त्याने अनेकदा यत्न केला. पण शेवटपर्यंत या कामात त्याला यश आले नाही. एमिली नावाच्या त्याच्या ग्रथानें

तत्कालीन शिक्षणविषयक कल्पनांत त्याने मोठीच क्रान्ति घडवून आणली आणि शिक्षणपद्धतींचा इतिहास शिकविताना शिक्षणशास्त्र्यांना आजहि त्याच्या नावाचा उल्लेख करावा लागतो. लहान मुलांच्या संगोपनासंबधाने त्याने तेव्हा लिहिलेले विचार आजही लक्षात घेण्यासारखे आहेत. दि सोशल कॉन्ट्रॅक्ट या नावाचा जो ग्रंथ त्याने लिहिला त्यामुळे समाजकारण आणि राजकारण या विषयांत त्याची कीर्ति अजरामर होऊन राहिली आहे. तो जे विचार बोलून गेला त्याच्याही पुढचे पुढचे विचार आधुनिक समाजशासनात आपणाला सापडतात. तथापि धार्मिकांचे वर्चस्व, धर्म-संस्थापकांचे वर्चस्व आणि उच्च कुलीन श्रीमंतांचे वर्चस्व यांच्या मगरमिठीतून फ्रान्स देशांतील लोकांची मने कायमची मुक्त करावयास याचा हा अद्भुत ग्रंथ कारणीभूत झाला. १७८९ साली फ्रान्स देशात जी मोठी राज्यक्रान्ति झाली ती घडवून आणणाऱ्या लोकांच्या मनावर रूसोच्या या लिहिण्याचा फार खोल संस्कार झालेला होता. रूसोने आत्मचरित्र लिहिले आहे आणि त्यांतहि वागतांना त्याने आपले वैशिष्ट्य जगाला दाखवून दिलेले आहे. इतके खरं खरं लिहिलेले आत्मचरित्र जगात दुसऱ्या कोणाचे असेल असे वाटत नाही. त्याने कमलाहि आड पडदा म्हणून ठवलेला नाही. आपले अनिर्बंध वर्तन, अनेक स्त्रियांशी आलेले आपले संबंध, आपली अर्वाच्य प्रवृत्ति, आपले प्रपंचविषयक प्रयोग, आपल्या मनात उत्पन्न होणाऱ्या क्षुद्र वासना इत्यादिकांचा अगदी स्वच्छ शब्दांनी आणि अतिशय मुक्तपणे असा उल्लेख त्याने आपल्या चरित्रात केलेला आहे. त्याच्या चरित्रात चांगला भाग पुष्कळच आहे परंतु आताच सांगितलेले त्याचे उद्गार वाचित असताना वाचकांचे मन त्याच्या चरित्राच्या या बाजूनेच व्यापून जाते. या आत्मचरित्राचा आरंभ तर त्याने इतका सुंदर केला आहे की तो वाचावयास कोणासहि हौस

वाटेल आणि तेच परिच्छेद येथे पहिल्यान दिले आहेत, व मग त्याचे थोडें मनोराज्य देऊन त्यानंतर आपल्या ग्रथात प्रतिपादिलेल्या मते फ्रेंच सरकारास बावडी असल्यामुळे आपल्याला धरण्यासाठी पकड समन्स कसे सुटले व आपण त्याला कशी झुकांडी दिली याचे त्याने केलेले वर्णन दिले आहे हा इ. स. १७७८ त मरण पावला. ]

+ + + मी आता अशा एका लिखाणाला हात घालीत आहे की तसले लिखाण आजवर कोणी लिहिलेंच नाही आणि ज्याचें अनुकरण करण्यास पुढे कोणीही सरसावणार नाही मूळ स्वरूपाशी कसलीही प्रतारणा न करता मी एका माणसाचे चित्र माझ्या बांधवापुढे रंगविणार आहे आणि तो माणूस म्हणजे मी स्वतःच होय. हे करावयास धजणारा मी एकटाच आहे. माझे मनोगत मला चांगले माहीत आहे आणि लोक कसे असतात हेही मी नीट ओळखतो. मी आजवर जीं माणसें पाहिली आहेत त्यातल्या एकाहीसारखा माझा पिंड बनलेला नाही, जी माणसे सध्या विद्यमान आहेत त्यातल्या एकाहीसारखे सृष्टीनें मला घडलें नाही हे मी निश्चित सांगतों. मी त्याच्याहून चांगला आहे असे नव्हे तर त्याच्यापेक्षा निराळा आहें हे खास. माझा बनाव करण्यासाठीं सृष्टीनें जो छाप बनविला होता तो, माझा जन्म होताच मोडून टाकण्यात सृष्टीने उचित तेच केलें की ती अनुचितपणानें वागली हें माझें लिखाण वाचून झाल्यावरच, लोकांना ठरवितां येईल.

आपापल्या कृत्याचा निकाल ऐकावयास या अशी तुतारी सर्वश्रेष्ठ न्यायाधीश जो परमेश्वर तो जेव्हा केव्हा फुकील तेव्हां फुंको, पण ती सुरू होताच हें माझें पुस्तक हातात घेऊन मी त्याच्यापुढें उभा राहीन आणि धट्टपणाने म्हणेन " माझी कृत्यें ही अशी आहेत, माझे विचार हे असे आहेत, मी हा असा आहें; माझ्या हातून झालें तें बरें असो की वाईट असो, तें मी सारख्याच मोकळेपणानें सांगितलें आहे, वाईट म्हणून काही सोडलें नाहीं, कीं मुळात चांगल्याची भेसळ केली नाही; अधून मधून शोभेसाठी काही पदरचेंच लिहिलें असलें तरी ते इतकेंसें महत्त्वाचें नाही, आणि तें लिहिले याचे कारण तरी इतकेंच की विस्मरणानें पडलेले खळगे भरून काढावयास काही लिहिणें प्राप्तच होतें ! ज्या गोष्टी खऱ्या असाव्या असें मला वाटत होते त्या खऱ्या होत्याच असें मी म्हटलें असेल; पण ज्या खोट्या आहेत हें मला ठाम माहीत होतें त्या खऱ्या आहेत असें मात्र मी म्हटलेलें नाही. मी जसला कसला होतों तसलाच या पुस्तकात दाखविलेला आहे; नीच, तिरस्कार्य, भला, उदार, थोर, जसा जेव्हा वागलो तसा यांत दिसेन. हे सर्वदृष्टि अनंता ! तुला माझें अंतरंग जसलें दिसलें असेल तसलेंच मी यात व्यक्त करून दाखविलें आहे. माझ्या असंख्य बांधवांना माझ्याभोंवतीं जमा कर; त्यांनी माझें हें जीवित–रहस्य ऐकावें; अप्रशस्त दिसेन तिथें त्यांना दुःख व्हावे, आणि हिणकस दिसेन तेथें त्यांना ओशाळल्यासारखें वाटावें; मग आपली पाळी आता आली

आहे असे समजून त्याच्यांतील प्रत्येकानें माझाच मनमोकळेपणा धारण करावा आणि तुझ्या सिंहासनापुढें आपल्या चित्तांतील किल्मिषें प्रकट करावी व छाती असेल तर म्हणावें की ' या रूसोपेक्षां मी खचित चांगला होतो. '

इ. स. १७१२ साली जिनिवा येथें माझा जन्म झाला. माझ्या बापाचें नांव इझॅक् रूसो व आईचें नांव सूसान बर्नार्ड; आई व बाबा अगदी जन्मापासून एकत्रच वाढली होती. लहानपण संपून थोडें कळूं लागल्यावर सूसानशी लग्न करावें असें इझॅक् याना वाटूं लागलें. आई बुद्धिमान व देखणी होती. बाबा गरीब असून घड्याळजीचा धंदा करीत असत. सूसानशीं जमवितां येणें कठिण आहे असें त्यांना दिसूं लागलें. उभयतांचें परस्परांवर प्रेम होते, पण जमून येण्याचा योग दिसेना. शेवटी सूसाननें त्याना सांगितलें की तुम्ही कुठें तरी दूर जा म्हणजे माझा विसर पडेल. बाबा गेले, पण दूर जावें तो तों त्यांचे प्रेम जास्तच दृढ होत चालले शेवटी ते परत आले, आई त्याच्यासाठी तिष्ठतच बसली होती. इकडे माझ्या मामाचें माझ्या आत्याबाईवर प्रेम बसलें, पण त्या मामाना म्हणाल्या की तुमच्या बहिणीनें जर माझ्या भावाशी लग्न केले तर मी तुमच्याशीं करीन. शेवटी सगळीं प्रेमासक्तच असल्यामुळें दोन्ही लग्नें झाली. पहिला मुलगा, म्हणजे माझा मोठा भाऊ, तो होतांच बाबांना इस्तंबूलची नोकरी आली. तेथील सुलतानाला घड्याळजी हवा होता. बाबा तिकडे गेले. इकडे आईचें रूप, बुद्धिमत्ता आणि हुषारी पाहून अनेकांनीं

तिला भलतीच गळ घातली, त्यांत एक फ्रेंच मन्त्रीसुद्धा होता ! पण आईचे बाबाच्यावर भारी प्रेम होतें तिने त्यांना परत या म्हणून पुन्हा पुन्हा लिहिलें त्यानी तेथला धंदाबिदा सर्व सोडलें व ते परत आले. मग दहा महिन्यानी मी झालों झालो तो अगदी दुबळा आणि रोगा, अन् शिवाय आईच्या मुळावर आलों. माझा जन्म म्हणजे माझ्या दुर्दैवांतील पहिले दुर्दैव होय

माझ्या आईबापाना दैवाने जें देणें दिलें होतें त्यात कोंवळें मन हें एक देणें होतें, माझ्या वाटणीला तेच आलें या कोंवळ्या मनामुळे त्याना जन्मभर सुख लागले, मला मात्र त्यामुळेंच जन्मभर आपत्ति सोसाव्या लागल्या. मी जन्माला आलों तों अगदी मरतुकडा होतो, मी जगेन असेंही कुणाला वाटलें नव्हतें माझी एक आत्याबाई मोठी प्रेमळ, आणि सद्‌गुणी बाई होती, तिने माझा चागला प्रतिपाळ केला म्हणन मी जगलों ती अजूनही, म्हणजे हा ग्रथ लिहित असता, जिवंत आहे, तिचें वय ऐंशी वर्षाचें आहे तरी दारू पी–पिऊन खगलेल्या आणि आपल्याहून वयाने लहान असलेल्या नवऱ्याची सेवा चाकरी ती करीतच असते अत्याबाई ! मला तू वाचविलेस याची मी तुला क्षमा करतों, पण मला याचेंच वाईट वाटतें की माझ्या लहानपणी तू जी माझी शुश्रुषा केलीस ती मला तुझी तुझ्या वार्धक्यात करतां येत नाही माझी म्हातारी सुईण जॅवलीन ही अजून जिवत आहे. भली धष्टपुष्ट आहे. उपजताच माझे डोळे जिनें उघडिले तीच मी मरतानाही माझे डोळे मिटील असें वाटतें.

## देवा, मी हा असा आहे! मी झुकांडी दिली!

लहानपणी माझें लालनपालन फारच चांगलें झालें, राजपुत्रांचें तरी असें होतें कीं नाहीं कुणास ठाऊक? ज्यानें त्यानें माझें कोड करावें आणि लाडावलेलें पोर म्हणून नव्हे तर आवडत असलेलें पोर म्हणून जो तो मला घेई असें काहींतरी वाटतें. वयाला अनुसरून माझ्यांत काहीं वेडेपणा होतेच मी भारी वटवट करीत असें, खादाडही होतो व केव्हां केव्हां खोटेंही बोलत असें. मी खाऊ चोरला असता! पण दुसऱ्याला त्रास देणें, कोणाचें नुकसान करणें, कुणावर आळ घेणें किंवा मुक्या प्राण्याला छळणें यांत मला कसलाहि आनंद वाटत नसे. मी स्वभावानें दुष्ट होईन कसा? माझ्यासमोर सज्जनपणाचीच उदाहरणें होतीं आणि भोंवतालचे सर्व लोक उत्कृष्ट होते बाबांच्यापाशीं लिहावाचायास मी जो काय बसत असेन किंवा दाईबरोबर हिंडायास जात असेन तेवढें सोडलें तर मी सारखा आईपाशीं असे. तिच्यापाशीं घोटाळत असायचें ती कशीदा काढी किंवा गाई. तिची उल्हसित वृत्ति, तिचा सौम्य स्वभाव आणि तिचा गोजिरवाणा चेहरा यांचा ठसा माझ्या मनावर इतका खोल उमटला आहे की, आणि तें स्मरण इतकें ताजें आहे की तिचें उभें राहणें, तिचें पाहणें. आणि तिची विशेष प्रकारची लकब हीं सगळीं माझ्या डोळ्यापुढें दिसत आहेत ती एकदा गाणीं म्हणूं लागली म्हणजे मला असें वेड लागून जाई की त्यातली कितो तरी मला अजून आठवतात; ती आता मरून गेली आहे आणि मी मोठा होत गेलों तसतशी त्यांतलीं काहीं जरी विसरली तरी आता

तीं पुन्हां आठवतात. त्यांची गोडी वर्णन करून सांगतां यावयाची नाही. कुणाला खरेसुद्धा वाटणार नाही पण मी आतां थेरडा झालों आहें आणि काळज्यांनी आणि अपेष्टानी मला ग्रासलें आहे, तरी त्यांतलें एखादें गाणे अडखळत आणि कांपत कापत जरी माझ्या तोंडी आलें तरी लहान पोरासारखें मला रडू येते.

+ + ×

* भयानें भ्रांत होऊन जेव्हां मी पळून जावयाचें ठरविलें तेव्हां मला फार वाईट वाटलें, पण प्रत्यक्ष पळालों तेव्हां मला तितकाच आनंद वाटला जें स्वतंत्रपण मिळाले आहे असें मला वाटलें त्यानेंच मन अगदीं भरून गेलें. मला वाटलें आतां आपण मोकळे झालों, आपले आपण धनी आहों ! मला वाटेल तें करता येईल, वाटेल तें साधतां येईल. उडी ओकण्याचा अवकाश की हवेंत उड्डाण केलेंच समजावें ! अफाट जगतांत मी एकाकी शिरलों पण मला कसलीही दरद वाटली नाहीं. आपल्या कर्तबगारीच्या कीर्तीनें जग भरून टाकू असें मला वाटले. वाटलें कीं जिकडे जाईन तिकडें उत्सव चाललेले दिसतील, वाटेल तितकें धन हाताला लागेल, हातून शौर्याचीं कृत्येंच होतील, माझ्या दिमतीला मित्र उभे राहातील, आणि मला विरगुळा वाटावा म्हणून सौंदर्यलतिका पुढें पुढें करतील. मी जगताच्या पुढें उभा ठाकण्याचा अवकाश कीं सगळ्या जगाचें लक्ष माझ्याकडे लागलेंच पाहिजे—पण सगळें जग काय करायचें आहे ? इतकें नकोच, इतकें काय करावयाचें

आहे ? जगांतला रम्य समाज तेवढा मला पुरे, बाकीच्याकड पहाण्याची तमदी कोण घेतो ? मी माझा हव्यास आखडताच घेतला. थोडीच पण आपल्या पसंतीची हास्यविनोदी मित्रमंडळी आपल्याला पुष्कळ झाली, त्याच्यात आपला वरचष्मा राहिला म्हणजे झाले. एकाद्या किल्ल्यावर जरी आपल्याला प्रवेश मिळाला तरी रगड झालें, तेथल्या मालकाचा आणि मालकिणबाईचा मी जसा काहीं आवडता होणार, त्याच्या मुलीवर जसें काहीं माझें मन बसणार, नाहीतर त्याच्या मुलाचा मित्र मी होणार किंवा—हें इतकें झालें म्हणजे पुरें, आपल्याला जास्त काय करावयाचें आहे ?

* * *

* होता होता नवी प्रुफें किंवा इतर काही अडचणी यांचें नेहमींचें गाणें कानावर न येताच ' एमिली ' हा माझा ग्रंथ प्रसिद्ध झाला. आतापर्यंत असे होत आलें होतें की माझें पुस्तक प्रसिद्ध झालें की त्याचा गाजावाजा व्हावा, पण ' एमिली ' च्या बाबतीत मात्र यातले काही एक घडले नाही. लोकांनीं खाजगी रीत्या या पुस्तकाची इतकी स्तुति केली की, कोणत्याहि ग्रंथाला यापूर्वी स्तुतीचें एवढें भाग्य लाभलें नसेल. पण प्रसिद्धपणे मात्र ' एमिली ' सबधाने एकहि बरा शब्द कानावर येणें अवघड होऊन बसलें. ज्याना काहीं कळत होते ते जे कांही बोलले किंवा त्यानीं जे काहीं मला लिहून धाडले त्यावरून माझी खात्री होऊन चुकली की, मीं आजवर लिहिलेल्या सगळ्या पुस्तकात माझे हें पुस्तक केवळ

चांगलेंच नव्हे तर अत्यंत महत्त्वाचें असें आहे. पण या लोकांनीं आपलें हें मत मला कळवितांना इतकी चमत्कारिक दक्षता बाळगली होती कीं, या पुस्तकासंबंधानें खरें बोलणें तें गुप्तपणेंच बोललें पाहिजे, असें त्यास खास वाटत असावें, असें दिसून आलें. मदाम डी बोल्फर्स म्हणाल्या कीं, या पुस्तकाच्या कर्त्यानें पुतळेच उभारावयास हवेत आणि सर्व मानव-योनीनें याला नम्र भावानें प्रणाम करावयास हवे. पण या स्त्रीनें ज्या पत्रांत हें आपलें मत नमूद केलें होतें त्याच पत्राच्या शेवटीं कसलाहि संकोच न धरतां तिनें लिहिलें होतें कीं, " मीं आपणास हें लिहिलेलें पत्र मला आपण परत पाठवून द्यावें !" ' डी अॅलेंबर्ट ' यांनीं लिहिलें कीं, ' आपण फार श्रेष्ठ दर्जाचे लेखक आहां ही गोष्ट या ग्रंथानें सिद्ध झाली आहे आणि आजकालच्या सर्व पंडिताच्या शिरोभागीं बसण्याचा मान या ग्रंथानें आपणास प्राप्त करून दिला आहे " पण हें सगळें लिहिलें तरी या गृहस्थानें पत्राच्या शेवटीं आपली सही मात्र केली नाहीं. ' डचक्लॉस ' हा माझा मित्र मोठा सच्चा माणस होता, आणि माझा त्याच्यावर विश्वासहि फार असे, पण हा भारी सावध असे. माझ्या पुस्तकाविषयीं त्याचें मत फारच चांगलें होतें. पण या बाबतींत कागदाला टांक लावण्याचें साहस मात्र त्याच्याच्यानें करवलें नाहीं. ' क्रायरॉट ' यानें मात्र मला निर्भयपणें कळविलें कीं, " आपलें पुस्तक वाचून माझा जीवात्मा अत्यंत संतुष्ट झाला " पण मीं इतक्या लोकांना पुस्तकें पाठविलीं त्यांत हा एकच गृहस्थ असा निघाला कीं, ज्यानें

अगदीं उघडपणे आणि कसलीहि काचकूच न करिता सगळ्या लोकांना माझ्या पुस्तकाबद्दलचें आपले मत सांगण्याचें साहस केलें.

माझा एक मित्र ' मथाम ' यानें ' डी क्लेअर ' याला ' एमिली ' प्रसिद्ध होण्याच्या आधीच त्याची एक प्रत वाचावयास दिली होती. पुस्तक वाचून परत करतांना डी क्लेअर म्हणाला, " हें फार छान पुस्तक आहे पण लवकरच या पुस्तकाचा बोलबाला इतका होईल की, ग्रंथकर्त्याच्या तो अंगी लागणार नाही. " मॅथाम यानें जेव्हा क्लेअरचे हे शब्द मला सांगितले तेव्हा मी नुसताच हसलों, आणि मनात म्हटलें, " हे क्लेअर म्हणजे एक बडे मॅजिस्ट्रेट आहेत. तेव्हा आपल्याला कांही जास्त कळत आहे हें दाखविण्यासाठीं त्याना कांहींतरी गूढ बोललेंच पाहिजे. " हळहळ माझ्या कानावर अशाच तऱ्हेचे चित्तविक्षेप करणारे लोकांचे उद्गार मधूनमधन येऊं लागले• पण मला त्याचें फारसें काहीच वाटलें नाही. वास्तविक पाहाता संकट माझ्या अगदी नजीक येऊन ठेपलें होते, तरी मला त्याची यत्किंचितहि कल्पना आली नाही. उलटपक्षी, आपला ग्रंथ किती सुंदर आहे, आणि किती उपयुक्त आहे, असेंच माझे मत बनत गेले. ' मदाम डी लक्झेंबर्ग ' याचा दबदबाट सगळीकडे मोठाच होता आणि मंत्रिमंडळसुद्धा माझ्यासंबंधाने बरें मत बाळगून आहे असेंच मला वाटत होतें. आणि म्हणून आपण जो एकदा निश्चय केला आहे तोच बरोबर आहे असें माझ्या मनानें घेतलें—निश्चय हा कीं माझ्याशी ज्यानी आजपर्यंत मत्सरबुद्धि बाळगली त्याचा सपशेल

पराभव झालेला पहावयाचा, स्वत:ची कीर्ति दुमदुमून राहिली आहे हें भाग्य भोगावयाचें, आणि मग सार्वजनिक जीवनातून निवृत्त व्हावयाचें.

थोडेसे दिवस गेल्यावर वादळाच्या आधी ज्याप्रमाणें खोलांतून कांहीं घरघर ऐकावयास येऊं लागते तशी ऐकूं येऊं लागली. चाणाक्ष लोकाच्या हे स्वच्छ ध्यानात येऊन चुकले कीं, मी स्वत: आणि माझा ग्रथ याच्याविरुद्ध काही तरी शिजत असावें, आणि लौकरच भडका उडणार आहे. मला स्वत:ला मात्र कसलाच धाक वाटला नाहीं. सगळे काही ठीक आहे अशीच वेड्यासारखी कल्पना मी करून बसलों. आपल्यापुढे काय वाढून ठेवलें आहे याचा यत्किंचित्‌हि कानोसा मला घेता आला नाहीं. इतकेंच काय, पण हें सगळें प्रकरण मला चागलें शेकूं लागल्यानंतर सुद्धा हें असें का घडत आहे याचा सुगावा मला लागला नाहीं. माझे जे दावेदार होते त्यानीं सागावयास आरभ केला की, " जेसुइट लोकाना जर इतका छळ सोसावा लागतो तर ज्या पुस्तकात प्रत्यक्ष धर्मावरच हल्ला होतो त्या पुस्तकाला आणि त्याच्या कर्त्याला कोणी दयामाया दाखवील असे वाटत नाहीं. " कोणी म्हणाले, " ग्रथकर्ता मूर्ख माणूस असला पाहिजे त्यानें आपलें नांव तरी ग्रथावर घालावयास नको होतें. " एकंदरीनें असे दिसू लागलें कीं, मला काहींतरी शासन केले पाहिजे, कारण माझा मीच त्याला कारण झालों होतों असेच लोकाचें मत बनत चाललें होतें. बरें, शासन करावें तर तें

देवा, मी हा असा आहें! मीं झुकांडी दिली!

उगाच केलें असें पुढें वाटूं लागण्याचा प्रसग यावा, अशा काहींशा चमत्कारिक परिस्थितीने माणसाचीं मनें व्यग्र झालीं होतीं. या गोष्टी हळूहळू माझ्या कानावर येत पण त्यामुळें मला कसलेंच अस्वास्थ्य उत्पन्न झालें नाही.

मी गप्पच राहिलो. दिवसेंदिवस जास्त जास्त भुमका उठूं लागल्या आणि त्यांना निराळाच दर्प येऊ लागला. मी जो जो गप्प बसावें तों तों लोक जास्तच चिडू लागले, आणि लोकापेक्षासुद्धां पार्लमेंट फारच बिथरलें. थोड्याच दिवसात मोठी खळबळ माजली; लोक मुठी वळूं लागले, आणि त्याचा रोख पुस्तकावरला सुटून प्रत्यक्ष माझ्याकडेच वळला. खुद्द पार्लमेंटचे सभासद चारचौघादेखत असें धडधडीत बोलू लागले की, "असलीं पुस्तकें केवळ जाळून भागण्यासारखें नाही, त्याबरोबर त्याचे कर्तेसुद्धा जाळून टाकले पाहिजेत." असले शब्द जेव्हा पहिल्यानें माझ्या कानावर आले तेव्हां मला खचितच वाटलें की मला केवळ भिववावे आणि देशांतून पळवून लावावें यासाठी ही हिकमत योजली असावी. पण ही दहशत हळूहळू इतकी वाढली की, हें प्रकरण खरोखर गभीरच असलें पाहिजे असे मला वाटू लागलें. तथापि मला वाटे की, मदाम डी लक्झेंबर्ग आणि डी मॅलेशबर्ग याचें छत्र माझ्यावर असतांना माझ्या शत्रूंचा हात माझ्यापर्यंत कसा पोचेल! तथापि वादळ अधिकच जोरानें वाहूं लागलें.

पुढें थोडचाच दिवसानीं माझ्या एका स्नेह्याला एक पत्र आलें.

त्यात लेखकानें स्वच्छ म्हटले होते की, " रूसो याच्यावर पार्लमेंट आपलें शस्त्र उगारणार हें निश्चित आहे. आणि अमुक एका तारखेस त्याना पकडण्यासाठी त्याच्या घरावर धरणेंहि येईल." शेवटीं या राज्यात आपल्याला पुष्कळ शत्रु आहेत, आणि ते महाप्रबल असून गुप्तातून कारवाई करतात हे माझ्या ध्यानात आलें. म्हणून जरी फ्रान्स देशावर माझे भारीच प्रेम असले तरी तो आता सोडून जाण्याचें मीं ठरविलें. मला प्रथम असें वाटलें की आपण जिनीव्हा येथें जावें. पण थोडासा विचार करता मला कळून चुकलें की, हा मोठाच मूर्खपणा होईल. फ्रेंच मंत्रिमडळाची पॅरिसवर जितकी हुकमत होती त्यापेक्षा जिनीव्हावर जास्त होती. अर्थात् त्याना जर मला छळावयाचेंच असलें तर या दोन शहरामध्यें मी केवळ थारेपालट केल्यानें ते मला तेथें गुण्यागोविंदानें राहू देतील असें मुळीच नाहीं नमेंच जिनीव्हा शहराच्या लोकाच्या मनातहि ...मग ते वरकरणी काहींहि दाखवोत. माझ्यासबधानें थोडासा आकसच वागत होता. अर्थात् मी तेथे गेलो तर मला छळण्याची त्याना आयतीच संधि सापडण्यासारखी होती. शेवटी जिनीव्हाला नाहीं तर त्याच्याच शेजारी स्वित्सर्लंडमध्यें जाऊन राहावें असें मी ठरवलें. मदाम डी बोल्फर हिला हा माझा बेत मुळीच आवडला नाहीं. तिनें मला पुन. पुन्हां म्हटलें कीं, तुम्ही इंग्लंडला का जात नाहीं ! पण माझा निश्चय मी कायमच ठेवला, कारण मला इंग्लंड देशाहि आवडत नाहीं आणि इंग्लंडचे लोकहि आवडत नाहींत !

सकाळ होताच मुक्काम हलवावयाचा असा मीं निश्चय केला होता. पण लोकात मात्र अशी समजूत करून दिली होती की, मी आदल्या दिवशीच निघून गेलो आहे. त्या रोशी याला मीं माझे कागदपत्र आणावयास घरी पाठविले होते; त्याला बायकोने पुष्कळदा विचारले, पण मी परगावी गेलो आहे का येथेंच आहे यासंबंधानें तो तिला नकार शब्दसुद्धा बोलला नाहीं. मला माझें आत्मचरित्र केव्हा तरी लिहावयाचें असल्यामुळे मी पुष्कळ कागदपत्र साठवून ठेवले होते. त्याची मी बरीचशी निवड केलेली होतीच; पण उरलेले चाळून पाहण्यात मीं काही वेळ घालविला अशासाठी की उपयोगाचे वाटतील ते बरोबर घ्यावे आणि उरलेले जाळून टाकावे. पण हे निवड करण्याचे काम माझ्या एका मित्रानें पत्करलें. त्यामुळें मी येथून निघावयास जे काय दोन तीन प्रहर राहिले होते ते माझ्या प्रिय माणसाना भेटण्याच्या कामीं, आणि मी आता कायमचाच जात असल्यामुळें त्याचा निरोप घेण्याच्या कामीं मला खर्चावयास सापडले.

दरम्यान आमच्या मावशींना—मी माझ्या बायकोला विनोदानें मावशी म्हणत असें—मी बोलावणें पाठविलें होतें. ती काळजीनें अगदी खंगून गेली होती. माझें काय झालें आहे आणि होणार आहे, याची तिला काहीच कल्पना नव्हती. सरकारचें धरणें वाटेल तेव्हा येईल आणि आलें तर आपण तेव्हा काय करावयाचें आणि त्याना काय सागावयाचें या विचारानें ती अगदीं भाबावून गेली

होती. लॉ रोशी परत आला तो तिला घेऊन आला. पण त्यानें माझ्याविषयी तिला एक अक्षरही सांगितलेलें नव्हते. तिला वाटत होतें कीं मी येथून आधींच झुकांडी देऊन गेलों आहें. तथापि मला प्रत्यक्ष पाहताच ती अगदी जोराने किंचाळली आणि माझ्या अंगावर जशी काहीं कोसळली. आज जवळजवळ सतरा वर्षे झालीं आम्ही एक दिवसभरसुद्धा एकमेकापासून कधी दूर झालों नव्हतों. त्यामुळें या वियोगाचें दुःख मला अगदी जहरासारखें वाटलें आणि एकमेकाच्या संगतींत आम्ही जो अतिशय सुखाचा, स्वास्थ्याचा, गोड आणि नाजुक असा काळ घालविलेला होता त्यातील सर्व स्मृति माझ्या मनात भराभर जमा झाल्या आम्ही एकमेकास मारलेली मिठी पाहून माझा मित्र डी लक्झेंबर्ग यालाही रडूं कोसळलें आणि तो तेथून निघून गेला. थेरेसी म्हणाली, मी तुम्हाला मुळींच सोडणार नाही. मी तिची समजूत घालन म्हणालों कीं, " तूं आताच माझ्याबरोबर येण्याचा हट्ट धरलास तर मला बसलेला पेंच वाढतच जाईल. शिवाय कोणाकडून काही पैसे यावयाचे आहेत ते वसूल करावयास आणि सामानसुमानाची निरवानिरव करावयास तूं घरींच असावयास हवीस. सरकारचे धरणें आलें म्हणजे ते धरणेकरी नेहमीं कागदपत्र जप्त करतात, त्याच्या याद्या करतात आणि ते कोणाच्या तरी हवालीं करतात; तेव्हा हें सर्व कसकसें होतें हें पाहून योग्य ती व्यवस्था करावयास तूं घरींच असावयास हवीस. " मी तिला सांगितलें कीं मी तुला लवकरच

तिकडे घेऊन जाईन; पण मी कोठें जात आहें हें मात्र मी तिला सांगितलें नाहीं, कारण की, धरणेकरी येऊन मी कोठे आहे असें त्यांनी विचारलें असता, " मला माहीत नाही " असें तिला बिनधोक म्हणता यावें. प्रत्यक्ष वियोग होताना जेव्हा मी तिला पोटाशीं घेतलें तेव्हा माझी भावना अगदी उचंबळून आली आणि मी अगदी गद्गदून तिला म्हणालो—आणि दुर्दैवाने माझे ते शब्द खरे खरे ठरले—" पोरी, तूं धीर धरला पाहिजेस. मी सुखांत होतो, तेव्हा तूं माझ्या सुखाची वाटेकरी झालीस, आता माझ्यावर दु:खाचा प्रसंग येणार आहे, आणि तुझीच इच्छा आहे तेव्हा तुला त्या दु:खाचीही वाटेकरीण व्हावयास हवें. तूं माझ्या संगतीत असलीस तर अपमान आणि आपत्ति याशिवाय तुला दुसरे कांही लाभणार नाही आजचा हा दिवस मला अतिशय उदासवाणा वाटतो, आणि तुला खचित सांगतों आज सुरू झालेलें माझें भोक्तृत्व मरेपर्यंत माझा पिच्छा सोडणार नाहीं "

आता प्रत्यक्ष निघावयाचें एवढेंच काय तें राहिलेलें होतें. सरकारचे प्यादे दहा वाजता येणार होते, म्हणून मी चार वाजताच निघालों. माझा मित्र मार्शल यानें माझ्या प्रवासाची सगळी व्यवस्था केली होती. शेवटीं मदाम मार्शल, मदाम डी बोलफर्स, मदाम डी मिरेपॉय या सर्वांनी मोठ्या जड अंत:करणानें मला निरोप दिला. खुद्द मार्शल यानें मात्र तोंडसुद्धा उघडिलें नाही. त्याच्या तोंडावर जशी कांहीं प्रेतकळा आली होती. तो म्हणाला, " ओढ्याच्या

काठीं गाडी तयार करून ठेवली आहे तेथपर्यंत मी येणारच." आम्ही दोघे निघालों पण बागेच्या फाटकाशीं येईपर्यंत आम्ही एकही शब्द बोललों नाहीं. मी फाटकाचें कुलूप उघडलें आणि बाहेर पडल्यावर फाटक बंद करून किल्ली खिशात टाकावयाच्या ऐवजीं अर्थातच ती मीं मार्शलच्या हवालीं केली—कारण मला आता ती किल्ली ठेवून काय करावयाचे होतें ?—माझ्यानें एक शब्दही बोलवला नाही, शेवटी आम्ही दोघानी एकमेकास मिठी मारली. बराच वेळ आम्ही तसेच राहिलो. कोणाच्याच तोंडून शब्द उमटेना. दोघानाही वाटलें कीं, आता आपली गाठ पुन. पडत नाहीं.

गाडी चालू होऊन ती पुष्कळ पुढें गेल्यावर एका भाडोत्री गाडींत बसलेले चार आसामी समोरून येत आहेत असें मीं पाहिलें. त्यानीं काळे डगले घातले होते. गाडी शेजारून जाताना थोडेसें हंसून त्यानीं मला रामराम केला. पुढे थेरेसीने मला सर्व हकिकत सागितली, तीवरून माझी खात्री होऊन चुकली कीं, मला धरावयास सरकारनें जे लोक पाठविले होते ते हे गाडींत बसलेले लोकच होते! मी पॅरिसच्या भर रस्त्यांतून चाललों होतों आणि माझी गाडी उघडी असल्यामुळें मला लपताही येण्यासारखें नव्हतें. वाटेनें अनेक लोकानीं मला रामराम केला; ते मला ओळखीत असावे असें वाटतें. पण माझ्या ओळखीचें मात्र मला कोणीही भेटलें नाहीं. माझी गाडी मोठी गैरसोयीची होती आणि माझी प्रकृतीही बरी नसल्यामुळें दिवसच्या दिवस तसल्या त्या वाहानात बसण्यानें मला भारी

उपद्रव झाला. शिवाय मी दिसण्यात मोठासा रुबाबदार नाहीं; त्यामुळें नोकर लोक माझ्याशी आदबीनें वागत नाहीत. मी या लोकाना चागले चळचळीत पैसे दिले होते, कारण, मला वाटलें कीं, दरडावून बोलण्याच्या ऐवजी, याचाच उपयोग जास्त होईल. पण याचा भलताच परिणाम झाला. त्याना वाटलें की मी कोणी मचरफटर माणूस आहे आणि असल्या गाडीत सगळ्या जन्मात पहिल्यानदाच बसलों आहें, त्यानीं माझ्या गाडीला कसली तरी खुरटी तट्टे जोडली आणि ती दामटणार गाडीवान तर माझी उघड उघड टर उडवून हसू लागले. अशा परिस्थितींत मी तरी काय करणार ? अगदी गप्प बसलो, आणि ते जे काय करतील तें त्याना करू दिलें.

शेवटी स्वित्झर्लंडमधील बर्न परगण्यात येऊन दाखल होताच " गाडी उभी कर " म्हणून मी मोतद्दारास सांगितले. गाडींतून मी खालीं उतरलों आणि त्या भूमीवर दंडासारखा आडवा पडलों; मीं भूमीचें चुबन घेतलें, तिला कवटाळलें, आणि आनंदानें बेहोष होऊन उद्गारलों, " हे परमेश्वरा तू सद्गुणाचा पाठिराखा आहेस, मी तुझें स्तवन करितो, स्वातत्र्याच्या या भूमीस आता माझा पाय लागला आहे. " त्या तट्टूवाल्याना वाटलें कीं हें गिऱ्हाईक वेडेंच असावें. मी पुन: गाडींत बसलों. प्रहर दीड प्रहरात माझा मित्र रोगीन् याच्या घरीं जाऊन पोंचलों. तेव्हा माझ्या मनाला अत्यंत सात्विक आनंद वाटला आणि गोड समाधान झालें.

## ५ : : ईश्वरें तृणेंकरून रक्षण केलें !

नाना फडणवीस या सुविख्यात मुत्सद्याचें नाव हिंदुस्थानाच्या इतिहासात अजरामर झालेलें आहे. अठराव्या शतकाच्या आरंभी जीं थोडींशीं कुळे कोंकणातून वरघाटे आलीं त्यात भानूंचेंहि कुळ होते. भट घराण्याशी—कीं ज्यातून पुढे पेशव्याची भव्य परंपरा उत्पन्न झाली—भानूंच्या कुळाचा चांगलाच ऋणानुबंध होता, आणि भानूंच्या घराण्यातील लोक पेशव्याच्या कुळाशीं शेवटपर्यंत निष्ठेने वागले. नाना फडणविसाचा आजा, बाळाजी विश्वनाथ पेशव्याबरोबर दिल्लीस गेला होता, आणि स्वराज्याच्या सनदा घेऊन येताना बाळाजीवर जो अचानक प्रसंग गुदरला त्या चकमकींत हा भानू ठार झाला होता. यामुळे तर भानू घराण्यातील पुरुषांना अंतर न देणे हें पेशव्यांना अगत्याचे बनले. भाऊसाहेब पेशवे पानिपतच्या लढाईसाठीं दिल्लीकडे गेले तेव्हा नाना त्यांच्याबरोबरच होते. पण या वेळीं ते अगदीं पोरसवदा माणूस होते. पानिपतास वाताहात झाल्यानंतर नानांवर मोठाच प्रसंग आला. त्यांच्या आईस गिलच्यांनी धरून नेले आणि शेवटपर्यंत तिचा पत्ता लागला नाहीं. झालेल्या धावपळींत कोणी कोणाचा नव्हे अशी स्थिति झाली. नाना कित्येक दिवसपर्यंन्त एकाकी व निर्धन स्थितींत जीव लपवीत लपवीत दक्षिणेचा मार्ग आक्रमीत होते. ते गिलच्यांच्या

हातीं पडले नाहींत हा केवळ योगायोग होता. दक्षिणेत आल्यानंतर माधवरावाच्या कारकीर्दीपासून जी नवीन घडी बसत चालली तिचें अवलोकन या बुद्धिमान् पुरुषानें फार बारकाईनें केलें, आणि पेशव्याच्या घराण्याचा लौकिक व त्याच्या द्वारा मराठ्याच्या राज्याचें हित हीं साधण्याची त्यांनीं मरेतोंपर्यंत शिकस्त केली मराठी राज्याच्या सोयीसाठीं बारभाईचा कारभार करणें जेव्हां अवश्य वाटलें तेव्हां तोहि केला, आणि त्या राज्याच्या उत्कर्षासाठीं आपल्याच हातीं सत्ता वागवणें अवश्य आहे असें दिसलें तेव्हां तीहि वागविली राज्यातील प्रजाच्या सुखसोयी-कडे नानानीं पूर्ण लक्ष दिलं आणि म्हणूनच इंग्रज इतिहासकाराना लिहिता आलें कीं नानासाहेब पेशव्यापासून तो नाना फडणविसाच्या मृत्यूपर्यंत महाराष्ट्रातील शेतकरी वर्ग अगदीं सुखी होता. नाना फडणवीस अत्यंत चाणाक्ष, सावध, आणि मराठी राज्याचे हितसबंध रक्षण्याच्या कामीं अत्यंत दक्ष असत तेव्हांच्या काळीं इकडे आलेल्या इंग्रजी मुत्सद्यांना जर पोटातून कोणाचा धाक वाटत असेल आणि कोणाच्या चतुराईवर दृष्टि ठेवणें अवश्य वाटत असेल तर ते नानाच्याच होय नाना चतुर व राजकारणी असले तरी त्याना रणांगणावरलें कसब कधींच साधलें नाहीं, आणि ही गोष्ट त्याची त्याना उत्तम माहीत होती इंग्रज हा हावभरू झाला आहे, आणि तो आज ना उद्यां या राष्ट्राचा ग्रास करून टाकणार हे नानानी उत्तम ओळखलें होतें. अशा स्थितींतहि सुमारें पंचवीस वर्षेंपर्यंत या मुत्सद्यानें मराठी राज्याच्या रक्षणासाठीं मोठ्या शिताफीनें यत्न केले आणि म्हणून पोवाडेवाल्यानी म्हटलें आहे की, “ खूप शर्थीनें राज्य रक्षिलें यशवंत फडणिस नाना ! ” नानानी आपलें एक लहानसें आत्मचरित्र लिहिलें आहे. त्यात त्यानी आपल्या अवगुणाची जी चर्चा केली आहे आणि त्या दोषाबद्दल जी खत

मानिली आहे तिचे वर्णन वाचले म्हणजे या थोर गृहस्थाविषयींचा आपला आदरभाव द्विगुणित होतो त्यातच निरनिराळया संकटाच्या वेळीं परमेश्वराने आपले रक्षण कसे केल व पानपतावरून आपण कसे परत आलों याचे नानानी केलेले वर्णन खरोखर वाचण्यासारखे आहे. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात अखिल भारतातील श्रेष्ठ लोकात अत्यत श्रेष्ठ पदवीचा मान संपादून नाना इ. स. १८०० सालीं मरण पावले ]

* * * अस्ति, जायते, वर्धते, विपरिणमते, अपक्षीयते, नश्यति हे षड्भाववत् विकार असा देही जो मी त्याला लहानपणी अज्ञाने करून आवृत, परंतु पूर्वसंस्कारे करून देवाची पूजा करावी हा छंद फार. याजकरिता मातोश्रींनीं मारही दिला. परतु संस्कार दृढ. विद्याभ्यासाकरिता मातापितर जे याची शिक्षा, तेणेंकरून लहानपणी अज्ञानाकरता चित्तास फार वाईट वाटून त्याचेही अनिष्ट चिंतीत असें. दहावें वर्षी विवाह झाला विघ्नें पडलीं असता निर्विघ्न केलें. पुढे अकरा बारा वर्षानतर कामाविर्भाव शरिरी होऊ लागला. तेणेंकरून व असत्समागम किंचित् झाला तेणेकरून पाप-प्रवृत्ति होऊ लागली — मध्यें घोड्यावरून पडलों अंत व्यवस्था कठिण, दोन दिवस शरिरभान नाहीं याप्रमाणे जालें असता गोविंद जो त्याचे कृपेनें बरें केले. पुढें पंधरावे वर्षीं पित्याचा काळ झाला. त्याचे और्ध्वदेहिक ईश्वरें करविलें. त्यांत पापदृष्टि एक समयीं झाली. हा अपराध झाला. पाप व शरीरनाश समजू लागलें. तेव्हा सोडून देऊन

निश्चय केला. परतु कामाविर्भाव विशेष, येणें करून पापबुद्धि होत असे.

पुढें परंपरा—सेवाधर्म चालावा यायोगें, व श्रीमंतांची कृपा पुत्रवत् असें जाणून, कर्नाटक प्रांतीं श्रीरंगपट्टणापर्यंत गेलो. घरीं आल्यावर रमणीयोग झाला. परंतु पापबुद्धि निःशेष सुटेना. तेव्हां चित्तांत विचार केला की, पितामह यांची बुद्धि धर्मशील असतां व सत्यवचनी, एकनिष्ठ, देवाब्राह्मणाचे ठायीं परम भक्ति, सात्विक आणि निषिद्ध कर्म करणेंच नाहीं असें असतां माझे चित्त पापाकडे थोडेंसें का जातें? याचा विचार करता मातामह—पक्ष अतिव्यभिचारी तो संस्कार आहे, बुद्धीचा निश्चय करावा तत्रापि स्थिरता राहू नये, तेव्हां संस्कार बलवत्तर ( असें वाटलें ) पुढें टोकयास अतिरुद्र करावयास गेलों. तेथें देवतार्चननेम धरिला. परंतु शरिरीं पीडा; तेणेंकरून वैराग्य असें कीं, परस्त्री मनातही येऊं देऊं नये, मग पाहणे कोठील? मातोश्री व कुटुंब सहवर्तमान भाऊबरोबर हिंदुस्थानांत जाऊन स्वर्गंगा त्रिपथ भागीरथीचें स्नान, त्रिस्थळी यात्रा करावी, अन्तःकरणशुद्धि होईल, या भावनेकरून गेलो. त्याकाळीं चित्तास अति वैराग्य. याचें कारण शरिरीं किंचित् पीडा. तेणेकरून चित्त अतिवैराग्यशील जहालें कीं, एक भगवंताची पूजा व ध्यान मात्र करावें. उष्णशीत यांचीही पीडा. परंतु चित्तास नाहीं. मातेचे ठायीं भक्ति होतसाना चाललों. ते नर्मदा महागंगेमध्यें स्नान करून एका वृत्तीनें ध्यान केलें. त्या दिवसापासून उत्तरोत्तर वैराग्य, अन्तःकरण-

शुद्धीच होत चालली. भाऊची ममता विशेष; व आवेची व्यथा बहुत जहाली, उठावयास शक्ति नाही. रेचन बहुत, ग्लानी फार, तेव्हा कूच जहालें असता मुक्काम श्रीमतानी करवावा. त्याकाळीं ईश्वरें आरोग्य केलें. पुढें दरमजल चरमण्वतीतीरीं गेलों. तेथें ग्रहण पडलें. स्नानध्यानादिकें करून आत्मा पवित्र होत्साता ध्यानें करून कालक्षेप चालत असे. पुढें गौघाटाजवळ गेलों. तेथें स्नानसंध्या करून श्रीमथुराक्षेत्री गेलों तेथें क्षौर प्रायश्चित्त श्राद्धादिक करून वृंदावनास गेलो तेथें कदंबवृक्षाखाली जाऊन स्नानतर्पण करून तदनंतर गोपीचंदनाचे टिळे व तुळशीच्या माळा घालून भगवंताचें ध्यान करीत होत्साता भगवताच्या मूर्तीचीं दर्शनें घेतली. चोपाळ्याची दोरी आपले हातीं ओढून भगवान् जो त्यास आन्दोलन-लीला केली. अनेक जन्माचें पुण्य कीं असें वृंदावन दृष्टीस पडलें. तेणें करून भगवताच्या मूर्ति व भगवत्भक्त त्यांचें दर्शनें करून नेत्र पवित्र जाले; पादेंकरून चालत गेलों तेणेंकरून पायांचें सार्थक जालें, हस्तेंकरून नमस्कार करता झालो तेणे करून हस्त पवित्र जाले; मुखें करून नामस्मरण केलें तेणें करून मुख पवित्र जाले, कर्णेकरून भगवत्कथा-श्रवण केलें तेणेंकरून श्रोत्र पवित्रता पावले, स्नानेंकरून सर्व देह पवित्र झाला.. एका बैराग्यानें कृपा करून एक मंत्र भगवंताचे नामाचा सांगितला, कीं याचा जप करीत जावा. तो भगवंतेंच सांगितला असा मानून, सर्वांस यथाशक्ति देणें देऊन संतोषातें पावलों.

ईश्वरें तृणेंकरून रक्षण केलें!

पुढें दिल्लीस गेलों. तेथें पृथ्वीपतींचें दर्शन श्रीमंतांचे आज्ञेवरून घेतलें. त्याणी बहुत कृपायुक्त भाषण करून आशीर्वाद देऊन आपले जवळील वस्त्रें दिलीं तीं घेतलीं किंचित् संतोष जहाला कीं भगवताचे कृपेचे अन्तर्वर्ती ही कृपा आहे श्रीमंतांजवळ बसलो असतां भूमिकंप जाहला. परंतु भगवंताचे ध्यान चित्तांत आणितां झालों. दिल्लींतील चित्र वगैरे विषय ज्यांत पाप नाहीं असेही घेतले, पाहिले.. पुढें कुंजपुरा श्रीमंतांनीं शौर्येकरून घेतला मीही युद्धात होतों. ईश्वरें रक्षिलें तों इतक्यांत यवन अलीकडे आला... गाठ पडली. गोळे प्रत्यही शत्रूचे राहुटीवरून जात. मातोश्री व स्त्री भयभीत होत ..कीं कसें होईल. ते ते समयीं मातुःश्रीस विनंति करीत गेलों कीं मी विनंति करतों एक ईश्वरी लक्ष असावें, त्यांत मातुल युद्धांत होते ते पडले. मातोश्रीस श्रम फार झाले. युद्धास गोळागोळीचा प्रारंभ झाला. श्रीमंत अतिबुद्धिमान्, धैर्यवान्, शूर, कृतकर्म, गर्व मात्र विशिष्ट परंतु तदूंद् फारच सैन्याची वगैरे केली .. मी श्रीमंतांसंनिध ईश्वरस्मरण किंचित करून असे तोंडातोंडी होऊं लागली. श्रीमंत दिसेनासे जाले. तेव्हां ईश्वरें बुद्धि दिली. माघारें फिरलों. पूर्वीं युद्धांत बापूजीपंतीं बोध केला. माघारें फिरावें. त्यास उत्तर केलें कीं अशा समयी श्रीमंतांस सोडणें ठीक नाहीं. परंतु पुढें याप्रमाणें झालें. सर्व वाताहात झालें.

मी सायंकाळचे दोन घटिका दिवसास घोड्यावर पाणिपतात आलों. त्या देशाचा मार्ग अगदीं ठाऊक नाहीं. तेथें परमेश्वरें वाट

दाखवावयापुरतें रामाजीपत उभे होते. सांगू लागले घोडे वस्त्रें टाकून द्यावीं. त्यावरून सर्व टाकून शुद्ध लंगोटी लावून बसलों. रात्र झाल्यावर चाललों. तों एका कोसांत तीन चार वेळ शरीरास हात लावून टोपीवाल्यांनीं झाडा घेतला. दर खेपेस समागमेचे दहावीस तोडून टाकीत त्यात मी राहिलों. ही ईश्वराची सत्ता. असे जाता दहा बारा कास पश्चिमेकडे गलो. तों तेच शत्र घेऊन रामाजींपंत... बापूजीपत, वगैरे यांस जखमी भारी केलें. पडले. मी एकटा राहिलों. तों गवतांत गेलों. ईश्वरें तृणें करून माझें रक्षण केलें. त्यास मोहनी घातली. सर्वांस मारिले असता मी जवळ असता न मारिलें, व गवत लाब असतां जाऊं दिलें. ते पुढें गेल्यावरी जाऊं लागलों. तों पुढें दोन कोशावर दुसरे मागती दृष्टीस पडले. तेव्हा मागती तृणांत जाऊन बसलों तों जवळ येऊन काढू लागले. ते समयीं ईश्वर त्यांतीलच एका वृद्धाचे मनात सचार करता झाला कीं कशास मारता ? मग गेले. तदनंतर माझी शक्ति पाणिपतावर बहुत क्षीण, आमातिसारादि विकारयुक्त, अन्न चालेना, असा मी, त्याजवर दयासमुद्र साबसदाशिव जो त्याणें कृपा करून, शरीर अशक्त, ऊन पाहिलेच नाहीं व पादचारी, अभ्यास नसता सोळा सतरा कोस अन्नउदकाव्यतिरिक्त आलों क्षुधा तिसरे प्रहरीं लागली. तेव्हां बोरीचा पाला सापडला तो खाऊन पाहिला. तो तोंडांत जाईना तसाच सायंकाळीं एका ग्रामाबाहेर आलों. तों एका बैराग्यानें पीठ आणून दिलें. त्याची भाकर खादली. ती अमृतप्रमाण

लागली नंतर निद्रा केली. प्रातःकाळीं गगासहस्त्रनाम म्हणत ईश्वर-स्मरण करीत चाललों तों एका गांवामध्यें गेलों.

तेथें एक साहुकार होता, त्यानें घरी नेलें. भोजन, एक ब्राह्मण होता व यशवंत चाबुकस्वाराकडील भेटला, त्याजकडून स्वयंपाक करवून भोजन केलें. तो शत्रूचे स्वार गांवात आले, हें वर्तमान कळलें तेव्हा साहुकार म्हणाला कीं आम्ही गाडी करून जयनगराकडे पावते करतों. गाडींत बसून चालला. तो पाहिलें कीं हा फसवितो. असें बुद्धीस येऊन गाडी टाकून पाय उतारच होऊन चाललों. बरोबर दोन तीन ब्राह्मण, दोन मराठी माणसें, याप्रमाणें दहा बारा कोश गेलो. असे सात दिवस पायी चाललों. नित्य भोजनाचें साहित्य ईश्वर देववी. तणेंकरून समागमाचे मंडळींसुद्धा भक्षून रेवडीपावेतों आलों. तों लष्करचे पळे त्या वाटेनें गेले. त्यास गावात बाळोराव म्हणून चौघे भाऊ असत ते माझें नाव ऐकून पुसत कसें आहेत ? चेहरा कसा ? खुणाखाणा सर्व त्यानी पुसून घेतले मागाहून हे येतात हें जाणून मार्गावर नेहेमीं पहात बसत आम्ही आलों तों त्याणी रेवडींबाहेर ओळखलें पुसू लागले. नाव न सागावें हा निश्चय परंतु तो अंगीच नांव लावू लागला. त्याचे बोलण्यांत वाकडी गोष्ट नाहीं आम्हास साहित्य करून द्यावें, उपकार करावा हें पाहिलें. तेव्हा नाव सागितल्यावर आपले घरास मडळींसुद्धा नेऊन उत्तम प्रकारें भोजनाचे साहित्य करून दिलें. भोजन केल्यावर वस्त्रें दिलीं. तदनतर रामजीदास जोशी मातबर रेवडींत असे त्यास

वर्तमान कळल्यावर त्याणें आपले घरीं नेऊन ठेविलें सात दिवस भोजनास व उत्तम वस्त्रे दिलीं. पुढे आमचे मानस ठीक भरतपुरास जावयाचें. परतु तो म्हणे सोबत चांगली लावून गाडी करून देऊन पावते करीन. त्यावर एक लग्न निघालें. त्याबरोबर गाडी करून देऊन बराबर पेढे साहित्य करून दिलें.

आम्ही निघालों तों वाटेंत कृष्णभट वैद्य आले. त्यांणी सांगितलें कीं स्त्री विरोजी बारावकर याणी संभाळून आणिली. ती जिगनीस नारोपत गोखले यांचे घरीं आहे. तेथें त्या गृहस्थानें साहित्य वस्त्र-पात्रांचें केलें. आम्ही तेथें गेल्यावर भोजन क्षिरेचे घातलें. तेव्हां आनंद झाला. मग स्त्रीस एक गाडी दुसरी करून तेथून निघालों. तों दिगेस आलों. तेथे पुरुषोत्तम महादेव पाणिपताहून आले होते. ते बानवळे याचे गुमास्त्याचे बिऱ्हाडास राहिले होते. त्यांस कळतांच त्याणीं आपलें बिऱ्हाडास नेलें. तेथें कुटुबसुद्धा कमकसर महिनाभर होतों. क्षुधा फार लागत असे. त्याणीं वस्त्रे वगैरे साहित्य भोजनाचें चागलें केलें. तेथून मातोश्रीचा शोध फार फार केला. परतु घरचा खिजमतगार बराबर होता. त्याणें सांगितलें कीं, घोड्यावरून जखम लागून मेली. हेंच ठिकाण लागलें अन्तःकरणापासून होतें कीं श्रीकाशीस जाऊन नेहमीं वास करावा. प्रपंचांतिल विषयमात्रीं दुःख हें पुरतें समजलें. परंतु देहप्रारब्ध बळवंत. ग्वालेरीस आल्यावर सर्वांनीं निषेध केला. एकदां देशीं जावें मातोश्रीचा विधि करावा, वगैरे कित्येक प्रकार काशींत गेल्यावर कसें होईल. पाणिपत जालें

तेव्हां काशीही कसी होते, असें चित्तांत येऊन लष्करावरोबर येऊं लागलो. पाणिपताचें वर्तमान श्रीमंत नानासाहेबांनीं ऐकून माझें स्मरण फार गुरुजीजवळ केलें कीं त्याचें शरीर अशक्त, कसा निभाव होईल ? परंतु ईश्वरकृपेनें व त्याचे आशीर्वादें महत्संकटातून पार पडलों.

श्रीमंत टोक्यास आले. एक दिवस प्रदोष पडला. ते दिवशीं थोरले राव याचे श्राद्ध म्हणून मला भोजनास बोलाविलें. एकीकडे श्रीमंत माधवराव व एकीकडे मला बसविले आणि दुसरे स्त्रीकडून वाढविलें अर्थात् मातोश्रीकडून लेकरास वाढविलें...श्रीमंत कूच करून पुण्यास गेले. शेवटील समय, लवकर यावें म्हणून पत्रें आलीं. त्याचें अन्नाचे शरीर, समयीं जवळ असावें याकरता पुण्यास येऊ लागलों तो पारनेरा अलीकडे वर्तमान ऐकले कीं कैलासवास केला. श्रीमत दादा राजश्री माधवराव साहेब यास सातार्‍यास पेशवाईची वस्त्रें घ्यावयाकरता घेऊन गेले. समागमे मलाच घेऊन गेले. राजद्वारीं वस्त्रे घ्यावयास समागमे येणे म्हणून बहुत आग्रह केला. विनंति केली कीं आम्हांस गरज काय ? आमचे खावंद आपण, म्हणोन गेलो नाहीं. त्यावर श्रीमंतीं राजआज्ञा घेऊन पुण्यास यावयास निघाले. समागमेंच होतों. वाटेंत चालता एक गाडदी शेतातील कुणब्याचे बायकोवर बलात्कारें सर्वदेखता जाऊन पडला. तो एका राऊताने भाल्याने मारला तेव्हा कामाची दशा पाहिली. नंतर श्रीमत निरा उतरोन पलीकडे गेले. आम्ही उद्या उतरोन जाऊं म्हणोन शिरोळ गांवांत

राहिलों. नदीस पूर आला, याकरतां नावेंत बसलो. मध्य धारेत नाव आली ती प्रवाही पडली. नावाड्यांनीं सांगितलें कीं, आमचा उपाय नाहीं. तेव्हां पुढें खडक जवळ आला, फुटली, म्हणजे शेवटीलच पक्ष. तेव्हां ईश्वरस्मरण केलें तों दोन मनुष्यांनीं उड्या टाकून नाव ओढून काढिली. हें रक्षण क्षीराब्धिशयन महाविष्णू यानें केलें. पुढे पुण्यास आलों. तो श्रीमंतानीं कृपा करून यासमगी कार्यांत मन घालावें हे आज्ञा केली

## ६ : : मला गाझी व्हावयाचें होतें

[ तैमूरलंग हा चंगीझखान, सीझर, नेपोलिअन, अलेक्झँडर अशा प्रकारच्या मोठमोठ्या दिग्विजयी लोकांपैकी एक होता. इ. स. १३३६ साली याचा जन्म झाला. लहानपणी हा फार सौम्य स्वभावाचा दिसे. त्याची वृत्तिही चांगली अभ्यासू होती. परंतु शरीराला आणि मनाला अठरा वीस वर्षांच्या वयात थोडा निबरपणा येताच त्याच्या प्रकृतीत प्रसुप्त असलेली साहसाची प्रवृत्ति जागृत झाली, आणि ज्या तुर्कस्थानात त्याचें राज्य होतें तेथून त्यानें पश्चिमेकडे स्वाऱ्या करावयास सुरवात केली. तुर्कस्थान म्हटलें म्हणजे आज आपल्या डोळ्यापुढे आशियामायनरमध्ये जे तुर्कांचे राज्य आहे ते येतें. पण तैमूरलंगाचें तुर्कस्थान तें नव्हे. काश्मीरमधून आपण जर सरळ उत्तरेकडे गेलो तर समरकंद इत्यादि जी अनेक शहरें लागतात तेथें त्याचें तुर्कस्थान होतें. आणि अजूनहि त्या प्रदेशाला तेंच नाव आहे. परंतु तुर्कांच्या आधुनिक कालातील प्रतापाचें स्थान आशियामायनरमध्ये झालें असल्यानें त्यालाच मुख्य तुर्कस्थान म्हणण्याची चाल पडली आहे. आपल्या इतिहासात मात्र समरकंद इत्यादीकडील भागालाच तुर्कस्थान म्हणण्याची चाल होती. असो. या प्रदेशात तैमूरलंग यानें स्वारीचा जो झपाटा सुरू केला तो पश्चिमेला थेट उरल पर्वतापर्यंत गेला, त्याच्या

फौजा कॅस्पियन समुद्रापर्यंतही पोहोचल्या, आणि मग हा पर्वत आणि हा समुद्र मागे टाकून तो प्रत्यक्ष व्होल्गा नदीपर्यंत जाऊन पोहोचला. इराणातही तो शिरला, आणि तेथून मिसर देशात, म्हणजे इजिप्तमध्येही त्याने प्रवेश केला. त्याची मुलुखगिरीची हौस एवढ्यानेच न भागता तो दक्षिणेकडेही वळला आणि दिल्लीपर्यंत चाल करून आला. दिल्लीच्या बादशाहतीची आणि दिल्ली राजधानीची त्याच्या माऱ्यापुढे काय दैना उडाली आणि त्याने कसली क्रूर कर्मे केली याची हकीकत लहान मुलांच्या इतिहासातसुद्धा वाचावयास सापडते. हिंदुस्थानातून परत जाताना त्याने जशी अगणित संपत्ती नेली तशी शेकडो कसबी माणसेही नेली. यातील काहींच्या वंशजांनी, शहाजहानच्या आमंत्रणावरून, हिंदुस्थानात परत येऊन ताजमहाल बांधला असे काही इतिहासकाराचे मत आहे. तैमूरलंग हा जरी दिल्लीच्या प्रलयामुळेच माहीत झालेला असला तरी त्याची तेवढीच बाजू ध्यानात ठेवणे युक्त नाही. त्याने लिहिलेले आत्मचरित्र वाचले म्हणजे खऱ्या खऱ्या मध्यआशियापासून भूमध्य समुद्राच्या रेषेपर्यंत जिकडे तिकडे धुडाई माजविणाऱ्या या पराक्रमी माणसाच्या चरित्राला दुसऱ्याही काही बाजू होत्या हे दिसून येते. आपण हिंदुस्थानावर स्वारी का केली याचे त्याने आपल्या चरित्रात सविस्तर वर्णन केले आहे. स्वतःच्या धर्माचा हिंदुस्थानात प्रसार करावा आणि ज्या हिंदुस्थानातील लोकांना तो काफीर समजत असे त्यांना मुसलमान करावे यासाठीच त्याने स्वारी केली होती. त्याने आपले हे मनोगत, कसलाही आडपडदा न ठेवता अगदी मोकळेपणे, सांगून ठेवले आहे. पुढील थोड्याशा पानात ते मनोगत वाचावयास सापडेल. तें वाचले म्हणजे त्याच्या स्वभावाचा प्रांजलपणा आणि

त्याच्या हेतूचें खरेखरे रूप आपल्या ध्यानात भरतें इ. स. १४०५ सालीं हा जगज्जेता मृत्यु पावला. ]

* * * याच सुमारास माझ्या चित्तात वासना उत्पन्न झाली कीं नास्तिकावर चाल करून जावें आणि ' गाझी ' ही पदवी प्राप्त करून घ्यावी. मीं असें ऐकलें होतें की जो नास्तिकाना ठार मारतो तो गाझी होतो आणि या कामात जर त्याचाच घात झाला तर त्याची गणना हुतात्म्यात होते. हें लक्षात घेऊनच मी माझा निश्चय कायम केला; पण चीन देशातील नास्तिकावर चाल करून जावें, का हिंदुस्थानातील नास्तिकांवर आणि बहुदेव लोकावर जावें याचा मनाशीं निकाल होईना. शेवटी या प्रकरणी कुराणातूनच काहीं शकुन सापडतो का हे पाहावे म्हणून ते उघडलें तों पुढील श्लोक निघाला " हे द्रष्ट्या, जे नास्तिक आहेत आणि अश्रद्धाळु आहेत त्याच्यावर हत्यार उचल आणि त्याना जालिम शासन कर. "

माझ्या पदरच्या मोठमोठ्या अधिकाऱ्यानीं मला सागितलें कीं, हिंदुस्थानचे रहिवासी हे नास्तिक आणि अश्रद्धालु आहेत. मग सर्व शक्तिमान् परमेश्वराच्या आज्ञेप्रमाणें मी त्याच्यावरच चाल करावयाचें ठरविलें आणि केले—सवरलेले अमीर आणि शूर योद्धे याना पाचारण केलें. ते जमताच मीं त्यांच्यापुढें प्रश्न टाकला कीं, मीं हिंदुस्थानवर स्वारी करावी का चीन देशावर करावी ? आणि म्हणालों कीं, " परमेश्वराच्या आणि पैगंबराच्या आज्ञेप्रमाणें जे लोक नास्तिक

असतील आणि बहुदेव असतील त्यांच्यावरच शस्त्र उपसणें मला अगत्याचें वाटतें. " माझ्यापुढें गुडघे टेकून त्यांनीं माझें शुभ चिंतिलें. पण मी त्याना जरबीनें विचारलें कीं हिंदुस्थानातील नास्तिकावर, का चीनमधील नास्तिकावर मीं हत्यार धरावें याचा जबाब मला तुमच्याकडून हवा आहे. प्रथम त्यानीं मला काहीं अन्योक्तिपर कथा सांगितल्या आणि काहीं सुभाषितें म्हणून दाखविलीं आणि मग ते म्हणाले कीं, " हिंदुस्थानच्या रक्षणाचीं चार साधनें आहेत. त्या देशावर स्वारी करणारानें जर हीं चारींही उच्छिन्न करून टाकलीं तर त्यानें हिंदुस्थान जिंकलें असे होईल. पहिलें बचावाचें साधन म्हणजे तेथें पाच मोठाल्या नद्या आहेत. त्या काश्मीरच्या पर्वतातून उगम पावतात. पुढें सर्व एक होतात, आणि सिंध देशातून वाहत जाऊन अरबी समुद्रास मिळतात. नावा आणि पूल याशिवाय या नद्या ओलांडणें अशक्य आहे. दुसरें साधन म्हणजे रानें, अरण्यें आणि झाडी हें होय. बुऱ्याला बुंधा लागून झाडें असल्यामुळें आणि फांद्यात फांद्या गुंतून गेल्यामुळें त्यांतून त्या देशात शिरकाव करणें महाकर्म कठीण आहे. तिसरें साधन म्हणजे तेथील लढवय्ये शिपाई, जमीनदार व राजेरजवाडे हे होत. हे त्या अरण्यातील आडवळणी मकाणात राहतात आणि हिंस्र श्वापदासारखे वागतात. बचावाचें चवथें साधन म्हणजे तेथील राजांचे हत्ती हे होत. लढाईच्या वेळीं या हत्तींना चिलखतें घालतात, आणि सैन्याच्या आघाडीवर त्यांना ठेवतात. त्यांच्यावर या राजाची मोठी मदार असते. कारण त्यांनीं

या हत्तींना असें तरबेज केलेलें असतें कीं, ते आपल्या सोंडेनें स्वाराला घोड्यासकट अल्लाद उचलतात आणि हवेंत गरगर फिरवून ते त्याला जमिनीवर जोरानें आदळतात. ”

यावर कांहीं उमराव उद्गारले, “ सुल्तान महमद सबक्तगीन यानें २०,००० स्वारानिशीं हिंदुस्थान देश पादाक्रान्त केला; आपल्या नोकराच्या हवालीं तेथलें राज्य केलें; सोनें, रुपें, हिरेमाणकें यांचीं सहस्त्रावधि ओझीं वाहून नेलीं, आणि वर वार्षिक खंडणीहि बसविली. मग आमचे अमीर सबक्तगीनपेक्षा तुम्ही हलके समजतां काय ? देवाच्या दयेनें असें मुळींच नाहीं, आज अमीरसाहेबाच्या रिकिबीपाशीं एक लाख पराक्रमी तातार घोडेस्वार सज्ज उभा आहे. त्यानीं स्वारी करावयाचें ठरविलें तर देव त्याना यश देईल; ते ‘ गाझी ’ होतील आणि देवापुढें मुजाहिद म्हणून उभे राहतील. गाझी बनलेल्या अमीराचे सेवक म्हणून आम्ही राहूं, खजिना सर्वोत्तम धनानें गडगज भरेल आणि हिंदुस्थानच्या या पैशावर आमचे अमीर सगळें जग जिंकतील आणि पृथ्वीवरील राजात त्याचा डंका वाजेल. ”

तेव्हा राजा शहा रुख म्हणाला, “ हिंदुस्थान हा विस्तीर्ण देश आहे. जो सुलतान हा देश जिंकील तो चारहि दिशांचा स्वामी होईल; आमच्या अमीरांच्या निशाणाखालीं जर आम्हीं तो जिंकला तर आम्हीहि सप्तखंडाचे राजे होऊं. ” तो पुढें म्हणाला, “ मीं पर्शियाच्या इतिहासात वाचलें आहे कीं, पर्शियन सुलतानाच्या

दिवसांत हिंदुस्थानच्या राजाला दराई असें वैभवाचें व प्रतिष्ठेचें नाव होतें. त्याच्या थोरवीमुळें त्याला दुसऱ्या नावाची आवश्यकताच वाटत नसे. रोमच्या सम्राटाला नुसतेंच सीझर म्हणत आणि पर्शियाच्या सुलतानाला किश्र म्हणत, तार्तारच्या सुलतानाला 'खाकान्' आणि चीनच्या सम्राटाला 'फगफूर' अशी नावें असत. पण इराण आणि तुराण इकडील राजाला 'शाहमशाह' ही पदवी असे आणि या शाहमशाहाच्या आज्ञा हिंदुस्थानच्या राजेरजवाड्यांना बंधनकारक असत. आम्हीं सध्याच्या काळीं इराण–तुराणचे शाहमशाह आहोंत आणि जर आम्ही हिंदुस्थानावर आपली सत्ता प्रस्थापित केली नाहीं तर आमची किंमत काय उरली ?" राजा शाह रुख याच्या या उद्गारानीं मला अपरिमित आनंद झाला. यानंतर राजा महमद् सुलतान म्हणाला, "सगळा हिंदुस्थान देश सोन्यानें आणि हिऱ्यामाणकानीं भरलेला आहे. सोनें, रुपे, हिरे, माणकें, पाचू, जस्त, लोखंड, पोलाद, तांबें, आणि पारा इत्यादींच्या सतरा खाणीं तेथें आहेत, तेथील वनस्पतींत कांहीं अशा आहेत की, ज्याचीं वस्त्रें बनविता येतात, काहीं वनस्पति सुगंधित आहेत, तेथें ऊंस पिकतो, तो देश नेहमी हिरवागार असतो आणि त्याची सगळी चर्या मोठी आनंदकारक आणि सुखकारक वाटते. आता, ज्या अर्थी तेथील रहिवासी मुख्यत. अनेक देव मानतात, आणि नास्तिक आहेत, आणि मूर्तिपूजा करतात आणि सूर्याची पूजा करतात, त्या अर्थी,

परमेश्वराच्या आणि पैगंबराच्या आज्ञेवरून, आपण त्यांना जिंकून टाकावें हें अगदी योग्य आहे."

माझ्या वजिरानीं मला सांगितलें कीं, हिंदुस्थानचा सर्व वसूल सहा अब्ज आहे. एक अब्ज म्हणजे शंभर कोटि, एक कोटि म्हणजे शंभर लक्ष, आणि एक लक्ष म्हणजे चांदीची १,००,००० नाणीं होतात मग कांहीं उमराव म्हणाले, "परमेश्वराच्या कृपेनें आपल्याला हिंदुस्थान जिकता येईलहि; पण आपण जर का तेथें कायमचे राहिलों तर आपला वंश खालावत जाईल व आपली प्रजा तेथील लोकांसारखी बनेल आणि थोडया पिढ्याच्या अवकाशांत त्याचें बळ आणि शौर्य नष्ट होईल." हे शब्द ऐकून माझ्या सेनानायकांना गडबल्यासारखें झालें, पण मी त्याना म्हणालों, "हिंदुस्थानवर स्वारी करण्यांत माझा हेतु असा आहे की, येथील नास्तिकांवर आक्रमण करावें; पैगंबराच्या (त्याच्यावर व त्याच्या घराण्यावर देवाची कृपा असो!) वचनाप्रमाणे तेथील लोकाना सत्यधर्माची दीक्षा द्यावी, नास्तिक्य आणि बहुदेवत्व ही तेथील घाण झाडून टाकावी, त्या लोकाचीं देवालयें व त्याच्या मूर्ति मोडून फोडून टाकाव्या आणि आपण गाझी आणि मुजाहिद ही पदवी पावावी," पण त्या सेनानायकानी आपली समति कचरत कचरत दिली आणि मीहि ती तितकीशी खरी मानिली नाहीं.

याच वेळी आमच्या धर्माचे कांहीं जाणते लोक माझ्याकडे आले आणि नास्तिक व बहुदेव अशा लोकावर शस्त्र उचलणें योग्य कीं, अयोग्य याविषयी आमचें बोलणें सुरू झालें. ते म्हणाले, "आमचें

स्वच्छ मत असें आहे कीं, इस्लामी धर्माचे सुलतान आणि " अल्लाशिवाय देव नाहीं; आणि महमद हा अल्लाचा प्रेषित आहे. " हें सूत्र ज्यांनीं ज्यांनी पत्करलें आहे ते. यांचें हें कर्तव्यकर्मच आहे कीं, आपल्या धर्माच्या शाश्वतीसाठीं आणि आपलें शासन बलिष्ठ व्हावें म्हणून, आपल्या धर्माच्या शत्रूंना दडपून टाकण्यासाठीं त्यांनीं आपली पराकाष्ठा करावी. तसेंच प्रत्येक मुसलमानाचें व सद्धर्मीयाचें हें कर्तव्यच आहे कीं, त्यानें आपल्या शास्त्राच्या आज्ञेप्रमाणें वर्तण्याची शिकस्त करावी.' त्या ज्ञात्या लोकांचे थोर नीतिकथन करणारे हे उद्‌गार जेव्हां त्या सेनानींच्या कानीं पडले तेव्हां मात्र हिंदुस्थानभर धर्मयुद्ध पुकारण्याच्या वासनेनें त्यांचीं मनें भरून गेलीं आणि गुडघे टेकून त्यांनीं कुराणांतील विजयाध्यायाचें आवर्तन केलें. या स्वारीला मीं कंबर कसली तेव्हां हजरत शेख झायनुद्दिन यांना पत्र लिहून कळविलें कीं, धर्मासाठी हिंदुस्थानवर स्वारी करण्याचें मीं ठरविलें आहे. त्यांनीं माझ्या पत्राच्या समासात लिहून धाडिलें कीं, अबुल गाझी तेमूर ( देव त्याचें भलें करो ! ) यांस कळावें कीं, या त्यांच्या कृत्यानें त्यांना इहलोकीं मोठेंच वैभव प्राप्त होईल आणि या स्वारीवरून ते सुखरूप परत येतील. " .. माझ्या सर्व मुलुखांतून मीं शिपाई गोळा केले; राजा उमार याला समरकंदचा सुभेदार नेमलें; सुमुहूर्तावर रिकिबींत पाय ठेवला आणि माझ्या समरकंद राजधानीचा निरोप घेऊन हिंदुस्थानच्या दिशेला तडक निघालों.

## ७ : : माझ्या जीविताची सोडत !

[ एडवर्ड गिबन् या सुविख्यात इतिहासकाराचा जन्म इ. स. १७३७ सालीं झाला. 'रोमन साम्राज्याचा ऱ्हास व अंत' या नावाचा एक प्रचंड इतिहास-ग्रंथ त्यानें लिहिला आहे. शिक्षण संपले म्हणजे निदान यूरपखंडात तरी थोडा प्रवास करावा अशी तिकडे वहिवाट आहे. या वहिवाटीस अनुसरून, गिबन हा शिक्षण संपल्यानंतर थोड्या उशीरानेंच, रोम शहर पहावयास गेला. तेथील ते प्राचीन वैभव पाहून त्याला मोठा विस्मय वाटला व या वैभवाचा ऱ्हास व अंत कसा झाला याचा इतिहास आपण लिहावा ही बुद्धि त्याला तेथेच झाली. इतिहासरचनेचें साहित्य जमविण्यात व तिची कल्पना बसविण्यात बरींच वर्षे गेलीं आणि प्रत्यक्ष लेखनाचें काम १७७२ त सुरू झालें. लेखनाचें काम सुरू झाले तरी त्या कामात हात बसावयास व सराईतपणा यावयास त्याला पुष्कळ कष्ट पडले आणि १७७६ त या इतिहासाचा पहिला खंड त्याने प्रसिद्ध केला. साहित्याची चालना, लेखनाचे श्रम व आत्मपसंती आणि शेवटीं विद्वानाचे अभिप्राय याविषयीं आत्मचरित्रात त्यानें मनमोकळेपणाने पुष्कळच लिहिलें आहे. हें सर्व लिहिणे एकत्र करून वाचण्यासारखें आहे. प्रत्येक खंड प्रसिद्ध झाला कीं निरनिराळे अनुभव येत व मनाची बरीच चलबिचल होई.

इ स. १७८७ या वर्षी या ग्रथाचा शेवटचा खड त्याने प्रसिद्ध केला. आपल्या हातून हे प्रचड कार्य तडीस गेले हे पाहून, हातातील लेखणी खाली ठेवताच, त्याला आनदाचे भरते आले, आपला जन्म कारणी लागला असे त्याला वाटले, कीर्तिमदिरात आपली कायमची स्थापना झाली हे मनात येऊन, मानवप्राण्याला स्वाभाविक असा अभिमानही त्याला वाटला, आणि त्या स्फुरणाने प्रसन्न होऊन आपल्याला केवढी धन्यता वाटली याचे अत्यन्त उदात्त वर्णन त्याने आत्मचरित्रात केले ग्रथरचनेच्या कामातील अनुभव व हे शेवटचे आत्मसमाधानाचे वर्णन पुढील थोड्याशा पानात वाचावयास सापडेल हा इतिहासकार १७९४ त वारला

' रोमन साम्राज्याचा ऱ्हास व अत ' या ग्रथाची इतिहास म्हणून जी किंमत आहे ती बव्हशी कायमच राहिली आहे, आणि जगातील महत् ग्रथात त्याची अजूनही गणना होते पण भाषेच्या व प्रतिपाद नाच्या दृष्टीनेही हा ग्रथ केवळ अमोलिक आहे त्याच्या भाषेचा डौल व प्रौढपणा आणि तिची गजगति ही जितकी मनोरम वाटतात तितकेच त्यातील विवेचनाचे समर्पकत्व, वर्णनाचे सुरसत्व आणि प्रदर्शित मताचें उचितत्व हेंही आल्हादकारक वाटते ]

* * * या घरांत येऊन सामानसुमान आणि पुस्तकें हीं नीट लावून होतांच माझ्या इतिहासग्रंथाचा पहिला खंड मी लिहावयास घेतला. ग्रंथाला नाव काय द्यावें, रोमन साम्राज्याच्या ऱ्हासाचा कोणता कालखंड उचलावा, प्रस्तावनेंत काय सांगावें-न सांगावें, प्रकरणें कोणतीं पाडावीं, आणि कथानुसंधान कसें ठेवावें, याचा मनाशीं उलगडाच पडेना, प्रत्येक कामात विकल्प उत्पन्न होई. सात वर्षेपर्यंत या विषयावर केलेले सर्व परिश्रम चुलीत घालावे असे कित्येकदां वाटे. पहिलें प्रकरण मीं तीन वेळां लिहिलें व दुसरे व तिसरे हीं दोनदां लिहिली, तेव्हां कोठें हीं बरीं जमलीं आहेत असें मला वाटलें, बाकीचीं प्रकरणें मात्र मग लिहावयास सोपीं गेलीं तरी पण पधरा व सोळा हीं प्रकरणें म्हणजे मुळात एक स्वतंत्र जाडा ग्रंथच झाला होता. तीन वेळा हात फिरवून त्याचा संक्षेप केला, तेव्हां हीं सध्यांच्या आकाराचीं झाली. मजकूर किंवा मतें यांची हानि न करताही ही प्रकरणे अजून लहान करतां येतील पहिल्या पहिल्यानें माझीं हस्तलिखितें विनयबुद्धीने मी माझ्या मित्रांना वाचून दाखवीत असें; पण मला लवकरच त्याचा वीट आला. कारण त्यांतले कोणी शिष्टाचार म्हणून माझी तारीफ करीत व कोणी उगाचच टीकाकाराची ऐट आणीत. मला वाटतें, आपल्या कृतीची परीक्षा आपल्यालाच चांगली करतां येते, कारण आपल्या विषयाचा इतरांनीं आपल्या इतका खोल विचार केलेला नसतो आणि कोणी इतकें मनापासून लक्षही घालीत नाही.

पुस्तकाचीं शेवटचीं प्रुफें मीं स्वतःच पाहिलीं; हस्तलिखितांत भाषेचे जे दोष मला दिसले नव्हते ते छापील मजकुरांत दिसून आले. विक्रीविषयीं बुकसेलरचा व माझा अंदाज अगदीं बेताचा होता, म्हणून आम्ही पांचशें प्रतीच काढावयाचें ठरविलें; पण मुद्रकाच्या धोरणाला मान देऊन आम्हीं हजार काढल्या. दरम्यान कीर्तीच्या अपेक्षेनें मी हुरळूनही गेलों नाहीं, की लोक झिडकारून टाकतील म्हणून खट्टू होऊनही बसलों नाहीं. माझी दक्षता आणि कसोशी याविषयीं माझें मनच मला साक्ष देत होतें. माझ्या ग्रंथाचा जो जयजयकार झाला त्याचें वर्णन करावयाचें म्हणजे माझी अहंता प्रगट होणारच. पहिली आवृत्ति थोड्याच दिवसात उडाली; दुसरी आवृत्ति काढली, तिसरी काढली तरी मागणी म्हणून हटेना. पुरुषांच्या टेबलापासून स्त्रियाच्या फणीकरड्यापर्यंत प्रत्येक ठिकाणीं त्याचा प्रवेश झाला. ज्याना कळत होतें, त्यानीं माझें पुस्तक अर्थातच वाचलें, पण ज्याना कळत नव्हतें त्यांनी हौस म्हणून तरी तें विकत घेतलें. टीकाकारांची भुंक कोठें कानावर आली नाहीं. जयजयकार सार्वत्रिकच होता, पण मला खरें समाधान, मर्मज्ञांची पसंती कानीं आली, तेव्हांच झाले. माझे गुरु डॉ. राबर्टसन् यांनीं उदारपणानें मला कवटाळिलें; आणि ह्यूम यांनीं पाठविलेलें पत्र मीं जेव्हां वाचलें तेव्हां तर दहा वर्षाच्या परिश्रमाचें सार्थक झालें असें मला वाटलें.

पहिला खंड प्रसिद्ध झाल्यावर दुसरा खंड लिहावयास घेण्यास मला दोन वर्षें लागलीं. हीं दोन वर्षें थोडीबहुत सकारणच गेलीं.

मी इतर कांहीं विषयांत मन घातलें; कांहीं अभ्यास शुद्ध वाया गेला; कॉन्स्टाइनूच्या काळाची नीट परीक्षा होईना; त्या काळावर लिहिलेले पन्नास बंद माझे मलाच इतके गचाळ वाटले कीं, मीं ते जाळूनच टाकले. पुढें ह्या खंड लिहावयास घेतल्यावर आपल्यांत पुष्कळच सुधारणा झाली आहे असें मला दिसून आलें. विषय व भाषा हीं हस्तगत झाल्यासारखीं वाटूं लागलीं, रोजचें लिखाणहि अधिक होऊं लागलें; आणि मजकूर खोडण्याचे व दुरुस्त करण्याचे प्रसंग कमी येऊं लागले, माझी नेहमींची पद्धति अशी आहे कीं, एक मोठा लांब परिच्छेद लिहून काढावयाचा, तो आपला आपल्याला ऐकायला येईल अशा बेतानें वाचावयाचा, तो मनांत घोळत ठेवावयाचा, आणि मग त्याची साफसफाई होईपर्यंत लेखणी बंद ठेवावयाची. हेंही सांगतों कीं, पार्लमेंटची बैठक व इतर गडबडी हे हिंवाळ्यांतले प्रकार चालू असले म्हणजे माझ्या मनाला जितका हुरूप येई व माझें लिखाण जितकें सुरस वठें, तितकें इतर कोणच्याहि दिवसांत होत नसे ! दुसरा व तिसरा असे दोन खंड मीं एकदमच प्रसिद्ध केले. पोप व त्याचे हस्तक यांच्या पक्षपात्यांनीं आपल्या दुरभिमानास अनुसरून जें लिहिलें तें सोडलें तरी, ट्रॅव्हिसनें केलेला हल्ला फार भयकर होता, पशुच तो ! पण पोर्सन् यानीं त्याचा परस्परच असा कडकडून समाचार घेतला कीं, त्याला तिडका देतच बसावयास लावलें. मीं स्वतः मात्र अगदीं गप्प बसत असल्यामुळें माझी हजेरी घ्यावयास उठलेल्या लेखणीबहाद्दरांची निराशा होई. पण एकंदरीनें

माझ्या ध्यानांत आलें की, माझे हे खंड लोकांच्या फारसे पसतीस उतरले नाहीत, त्याचें स्वागत सुमारच झालें. पुष्कळ वाचकाच्या मताने पहिल्या खंडाच्या मानाने माझें हे लिखाण अगदीच सपक झालें आहे पण यातही मला कांही विशेष वाटलें नाही, कारण लेखकाला पूर्वीपेक्षा आपल्या लेखनाची कमान जर चढती ठेवतां आली नाही तर तो मूळच्यापेक्षांही खाली जात आहे असें लोकांस वाटतें. बिशप न्यूटन यानी लिहिलें आहे की, ' गिबनच्या पाल्हाळाने, रे रे करीत बसण्यानें व निष्कारण डिमाखखोरपणानें अगदी वीट येऊन जातो ' पण काही काही देशी व परदेशी लेखकांनी माझी वाहवा केली आणि हळूहळू खप व कीर्ति या दोनही दृष्टींनी हे खंड पहिल्याच्या पायरीला जाउन बसले

लंडनहून लॉसान येथें राहावयास गेल्यावर लवकरच मी चवथा खंड संपविला. त्याच्या शेवटी अनेक धर्मविषयक विवादांचे साराश मीं दिलेले आहेत पाचव्या व सहाव्या खंडात वर्णन केलेले रोमन साम्राज्यातील व जगाच्या इतर भागातील उत्पात झपाट्यानें घडत असलेले, विविधरूप, आणि बोधप्रद असे आहेत. पुष्कळ प्रकारच्या योजना करून आणि प्रयोग करून पाहिल्यावर माझ्या मनानें असें ठाम घेतलें कीं, निरनिराळ्या राष्ट्रांची चित्रें निरनिराळीं काढावीं, कालानुक्रम साधण्यासाठी तीं एकमेकांत मिसळूं नयेत. अर्थात कालानुक्रम राहिला नाहीं असें वरवर पाहताना वाटतें,पण तो नसला तरी त्या राष्ट्रांची चित्रें मनोवेधक आणि सुस्पष्ट निघाल्यामुळें हीच

पद्धति मला अधिक ग्राह्य वाटली. माझ्या पहिल्या खंडाची भाषा कांहींशी अनगड आहे आणि लिहितांना लेखकाला कष्ट होत आहेत असें तीवरून दिसतें, दुसऱ्या व तिसऱ्या खंडात पक्क होऊन तिला सोंपें, शुद्ध आणि नादमधुर असें रूप प्राप्त झालें आहे. शेवटच्या तीन खंडात मात्र लेखणीला सफाई आलेली असल्यानें मी तिच्या नादानेंच चालत आहें असें दिसतें शिवाय घरींदारी स्विस भाषा बोलावयाची व लिहितांना इंग्रजी लिहावयाची, यामुळें माझ्या इंग्रजींत स्विस वाक्यप्रयोगाची कांहींशी भेसळ झालेली असणें शक्य आहे.

सूर्य मावळला की मी पुस्तक मिटतो. यामुळें माझे डोळे बरे राहिले आहेत, आणि शरीराला व मनाला कसलाही शीण न येऊ देता एवढें सौम्य पण सुदीर्घ परिश्रम मला शेवटास नेता आले. पण माझी उरलेली हयात आणि माझ्या हातातील कामाचा पल्ला यांचा एकत्र विचार केला म्हणजे मला दिसून येई की, खंडाच्या प्रसिद्धी-करणाच्या कामीं जर एक महिना उशीर केला तर सगळें काम संपण्याच्या मुदतींत आणखी एक वर्ष वाढणार. म्हणून कळस दिसू लागताच मी जलदीने चालू लागलों आणि गेल्या थंडीत तर दिवस मावळल्यावर सुद्धा कुणाच्या गाठीभेटीच्या भानगडीत न पडतां कार्यव्यापृतच राहिलों आहें. मग मला दिसून आले कीं, पुनर्वाच-नास हाताशी पुरेसा वेळ राहिला आहे. कामाला मुळारंभ कसा झाला हें सांगितलेच आहे. तर आता त्यातून उत्तीर्ण केव्हा झालों हेंहि सांगतों. इ. स. १८८७ च्या जून महिन्याच्या सत्ताविसाव्या

तारखेस रात्रीं अकरा ते बाराच्या दरम्यान माझ्या उपवनातील वसंतकुंजांत शेवटच्या पानावरील शेवटच्या ओळी मीं लिहिल्या.

लेखणी खालीं ठेवली आणि झाडाच्या गर्द राईतून अनेकदां हेलपाटे घातले. तेथून डोंगर, सरोवर आणि समोरचें विशाल भूपृष्ठ स्वच्छ दिसत होते. हवा सौम्य होती, आकाश स्वच्छ होतें, चंद्रबिंब खालीं पाण्यात स्पष्ट उमटलें होतें आणि जिकडे तिकडे शांत झालेलें होतें. हातीं घेतलेल्या कामातून मुक्त झाल्यामुळें व आपल्या कीर्तीचा पाया भक्कम झाला याच्या जाणिवेनें जी हर्षभावना मनात एकदम उसळली ती दडविण्यांत काहीं अर्थ नाहीं. पण इतक्यात माझा अभिमान क्षीण झाला आणि मनावर सौम्य औदासिन्याची छाया पसरली. मला वाटू लागलें, हा इतक्या दिवसाचा आपला प्रियकर मित्र—लेखनविषय— आपल्यापासून आता कायमचा दुरावला. आणि त्याचें आयुर्मान किती का ठरेना, आपलें स्वतःचें आयुष्य मात्र आता अल्प आणि अस्थिरच असणार. दोन बाबी मात्र सांगतों. माझें पहिलें कच्चें हस्तलिखितच, दुसरें चांगलें न करता, मी छापखान्यात धाडीत असें; आणि माझ्या लिखाणाचा एकही चतकोर मीं व मुद्रक याच्याशिवाय कोणीं तिऱ्हाइतानें पाहिलेला नाहीं. ग्रंथाचे गुण व दोष सर्वथा माझेच आहेत. गेल्या चार वर्षांत माझ्या घरापासून दहा मैलांच्या पलीकडे मी फिरकलों नव्हतों. आता पर्वत व समुद्र याच्या पलीकडे असलेल्या मित्राकडे जावयास निघालों तों मनाला थोडी भीति वाटू लागली !

माणसाच्या जीविताचा सामान्यतः विचार करता मला हें मान्य केलेंच पाहिजे कीं जीवितरूप सोडतींत मला मोठेंच बक्षिस मिळालें आहे. पृथ्वीवरील बहुतेक देशांत जिकडे तिकडे रानटीपणा आणि दास्य हींच भरलीं आहेत. जे देश सुधारलेले आहेत त्यांतील बहुसंख्य लोक अज्ञान व दारिद्र्य यांत बुडालेले आहेत. अर्थात् एका स्वतंत्र आणि ज्ञानशील देशांत, आणि त्यांतहि एका सन्मान्य आणि सधन घराण्यात, जन्मास यावें हे माझें दुहेरी भाग्य लाखात एखाद्याच्याच वाट्यास येते. मी मनानें नेहमी आनदी असतों; मला डॉक्टरच्या सल्ल्याची विशेष आवश्यकता कधींच भासलेली नाहीं, मन आणि शरीर ठीक असल्यामुळें मला गाढ आणि स्वप्नावाचून झोंप लागते, स्वित्सरलंडच्या मानानें पाहाता मी चागला सधन आहे; कारण खर्चापेक्षा माझा आदा मोठा आहे आणि खर्चहि मनाप्रमाणें सर्व करतों. इतिहासग्रंथाच्या परिश्रमानें माझ्या वयाचीं वीस वर्षें उल्लसित झालेलीं आहेत व त्यात मला यश लाभल्यामुळें जगतात मला कीर्ति, प्रतिष्ठा, आणि मान हीं प्राप्त झालीं आहेत. राजेमहाराजे यांच्या मैत्रीचा किंवा कृपेचा दिमाख मला करता आलेला नाहीं; पण इंग्लिश विक्रेते हेच वाङ्मयाचे पोशिंदे बनले आहेत. भूतकाळ गेलेलाच आहे, वर्तमान पायाखालून निसटत आहे, आणि भविष्यत् हा तिमिरमय आणि शंकास्पद आहे. माझें आजच कशावरून सपणार नाहीं ? पण संभवशास्त्राच्या नियमाप्रमाणें पाहता—जे नियम सामान्याचा विचार करता लागू पडतात पण विशेषाचा विचार करतां दगा देतात—मला अजून पंधरा वर्षें जगावयास हरकत नाहीं. आणि मन व शरीर अकालींच थकतील असेंहि वाटत नाहीं.

८ : : भय्या दार उघडीना !

[ लोकमान्य बाळ गंगाधर टिळक याचे नाव माहीत नाहीं असा मनुष्य हिंदुस्थानात विरळाच सापडेल १८५६ साली याचा जन्म झाला. शाळेत आणि कॉलेजात बुद्धिमान विद्यार्थी म्हणून याची प्रसिद्धी होती विष्णुशास्त्री चिपळूणकर यानीं चालू केलेल्या निबधमालेतील लिखाणाचा याच्या मनावर मोठाच परिणाम झाला आणि म्हणून शिक्षणक्रम सपताच काहीं लोकोपयोगी कामच करावे इकडे त्याची बुद्धि वळली. विष्णुशास्त्र्याच्या पुरस्काराने त्यानीं पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना केली आणि पुढे दहा वर्षेपर्यंत डेक्कन एज्युकेशन सोसायटींत त्यानी प्रोफेसरशिपचे काम केले. गणित आणि सस्कृत हे दोन विषय त्याना फार आवडत आणि त्यातील त्याचे प्राविण्य पुढें लोकाच्याही निदर्शनास आले. शिक्षणाचा उद्योग करीत असतानाच ते केसरी पत्राचे सपादक झाले होते, आणि तो उद्योग सपल्यानतर तर केसरी पत्राचे सपादकत्व हाच त्याचा मुख्य व्यवसाय बनला. या पत्रात त्यानीं ज्या कल्पना प्रसृत केल्या आणि राजकर्त्यांशीं झगडण्याच्या कामीं जो नवा माड माडला त्यातून त्याचे पुढारीपण उत्पन्न झाले आणि १९२० सालीं जेव्हा त्याना मृत्यू आला तेव्हापर्यंत हें पुढारीपण त्यानीं अखड गाजविलें. त्याच्या सामाजिक मताचा कल

थोडासा जुन्या बाजूकडे असे ही गोष्ट काहीं खोटी नाहीं. पण उपा सामाजिक सुधारणाची आवश्यकता राजकारणाच्या क्षेत्रात त्याना पटत असे त्या सुधारणाचा पुरस्कार मात्र ते निर्भयपणे करीत असत. पण परकी सरकारशीं जन्मभर खडा सामना करणे हेच त्याच्या जीविताचे सारसर्वस्व होते. १८९७ साली प्लेगच्या धामधुमींत सरकारने जे धोरण स्वीकारल त्या बाबतीत त्याचे व सरकारचे प्रथम बिनसले आणि त्याना शिक्षा झाली. तेव्हापासून जवळजवळ शेवटपर्यंत दड, शिक्षा, कारटाइन, मुस्कटदाबी इत्यादि जे जे काही सरकारच्या पदरी शिक्षेचे प्रकार होते त्या सर्वांचे प्रयोग टिळकावर झाले. परतु दरवेळी या प्रयोगातून बाहेर पडून त्यानीं आपला राजकारणाचा लढा जवळजवळ यशाच्या मार्गावर आणून सोडला इग्रजी राज्याच्या सुखाच्या तद्रींतून लोकाना जागृति आणून देऊन त्याच्या ठिकाणी उग्र अस्वास्थ्य उत्पन्न केल्याचा मान लोकमान्य टिळक याचाच आहे. तसेच या अस्वास्थ्याला निर्भय आणि चाल करून जाणाऱ्या अशा चळवळीचे रूप कसे द्यावे याचे हिंदुस्थानच्या लोकाना शिक्षण दिल्याचा मानहि त्याचाच आहे. पण या राजकारणाच्या जोडीला त्याची विद्वत्ता जर नसती तर हिंदुस्थानातील बुद्धिमान लोकाच्या मनावर त्याच्या चारित्र्याचा इतका परिणाम झाला नसता. गणित आणि खगोलशास्त्र या विषयाचा त्याचा व्यासग जबर होता ' मृगशीर्ष नक्षत्र ' व ' उत्तर ध्रुवावरील आर्यांचे वसतिस्थान ' या त्याच्या ग्रथानीं पाश्चात्य पडितवर्गाच्या मनात मोठेच कुतूहल उत्पन्न केले आणि ' गीतारहस्य ' या ग्रथाने तर आर्यावर्तातील तत्त्वज्ञानी आचार्यात त्याची कायमची गणना होऊन बसली. १९०८ साली त्याना शिक्षा झाली व १९१४ साली ते मडालेहून परत आले. तेव्हापर्यंतची हकीकत त्यानीं स्वमुखाने सागितलेली आहे ती अशीः— ]

+ + + शिक्षा झाल्यानंतर हायकोर्टात मला कोणास भेटूं न देता लागलीच पोलिसांनीं खालीं आणून तेथें पूर्वीच तयार ठेवलेल्या मोटारगाडीत बसविलें. मोटार गाडीतून आम्हीं बी. बी सी आय. च्या स्टेशनानजीक बाजूला उभ्या असलेल्या स्पेशल ट्रेनमध्यें बसलों. पोलिसाचा व ड्रायव्हरचा जो संवाद झाला त्यावरून ही आमची स्पेशल ट्रेन येथें कांहीं तासापूर्वी आणून ठेविलेली होती असें समजलें. मला कोठें नेणार हें त्यावेळीं कोणीही सांगितलें नाही. मीहि विशेष चवकशी केली नाहीं. दुसरे दिवशी सकाळीं सात वाजता अहमदाबादच्या पुढें साबरमती स्टेशनवर जेलच्या पुढें गाडी उभी राहिली अहमदाबादचे कलेक्टर तेथें आले होते. त्यानीं व पोलिसानीं लागलींच गाडींतून मला उतरून घेऊन साबरमतीच्या तुरुंगाकडे नेले.

त्या ठिकाणीं माझी खाण्यापिण्याची वगैरे व्यवस्था इतर सक्तमजुरीची शिक्षा झालेल्या कैद्याप्रमाणेंच होती. अन्न व वस्त्र जेलचेंच मिळत होतें. पण त्यामुळें माझें वजन दहा दिवसात सुमारें दहा पौंड कमी झालें. तेव्हां जेलात मिळणारें अन्न मी खात नसून उपास करीत असल्यामुळे वजन तुटलें अशी तेथील अधिकाऱ्यास शंका येऊन त्यानीं मी अन्न खातों कीं नाहीं हें पहाण्यास दोन तीन दिवस पहारा ठेवला ! तेव्हां त्याची शंका खोटी आहे असे त्यास आढळून आलें. आणि डॉक्टरच्या सल्ल्यानें अन्नात फरक होऊन तेव्हापासून रोज दोन पौंड दुध व दोन औंस तूप देण्यास सुरवात झाली व त्याचप्रमाणें एका वेळेला गव्हाची रोटी व एक वेळेला

भात देऊं लागले. त्यामुळें पुढें एक महिन्यात वजनात थोडा फरक पडला, व मग तेंच अन्न पुढें चालू ठेवलें. शिक्षा सक्तमजुरीची होती तरी वजन कमी भरल्यामुळें अहमदाबादेस कांहीं काम दिलें नाही.

माझी शिक्षा काळेपाण्याची असल्यामुळें मला अहमदाबादेसच फार दिवस ठेवणार नाहींत हें मीं समजूनच होतों. एके दिवशीं ( ता. १३–९–१९०८ ) रात्रीं आठ वाजता जेलर, मी खोलींत निजत होतों तेथें, आले व दाराचें कुलूप काढून ते मला हापिसात घेऊन गेले. तेथें माझी रवानगी करण्याची सर्व तयारी करून ठेविली होती व एक आगगाडी जेलच्या बाहेरच उभी होती. तथापि आम्हाला कोठें पाठविणार हें यावेळीं कोणीही सांगितलें नाहीं. बरोबर स्वयंपाक करण्याकरता एक गुजराथी ब्राम्हण होता. त्यासही पुढें कोठें जावयाचें हें माहीत नव्हतें. एक पोलिसाची पार्टी आमचे बरोबर होती. पैकी एक युरोपियन इन्स्पेक्टर होता आणि दुसरे आठ मुसलमान होते. यापैकीं एक जमादार व सात कॉन्स्टेबल होते, त्यानाही कोठें जावयाचें हें कळविलें नव्हतें. निघण्याच्या दिवशीं संध्याकाळीं त्याना बोलवून आणून प्रवासाची तयारी करण्यास सांगितलें. नाशिकबिशिककडे जावयाचें आहे अशी त्याची समजूत झालेली होती. कोणाला न्यावयाचें आहे हें सुद्धा त्यास समजलेलें नव्हतें. मला बाहेर काढताना पोषाख जेलचा नसून माझा पूर्वीचा धोतर, अगरखा, पगडी वगैरे दिला होता. यापूर्वीं सक्तमजुरीची शिक्षा सरकारनें साधी केल्याचा ठराव जेल सुपरिंटेंडेंटकडे दोन तीन दिवस

आला होता, पण मला त्यावेळीं तो कळविला नाही तो मंडालेस गेल्यावर मला समजला. या ठरावालगतच मंडालेस रवानगी करण्याचा हुकूम असावा अशी माझी समजूत आहे.

एवढ्या बदोबस्तानें व गुप्तपणानें साबरमतीहून जरी रवानगी झाली तरी बडोद्यापुढील मियागाव स्टेशनवर आल्याबरोबर बाहेरच्या काहीं लोकांनीं ' टिळक महाराज की जय ' अशी ओरड केल्याचें माझे कानीं आलेंच ! लोक माझ्या दृष्टीस पडले नाहींत, कारण गाडीचे दरवाजे बंद होते. सकाळीं सुमारें ६।–६॥ वाजता मुंबईच्या बंदरावर गाडी उभी राहिली. मुंबईचे पोलिस अधिकारी तेथे हजर होतेच. त्यानी आम्हास गाडींतून उतरून घेऊन तेथें तयार असलेल्या स्टीम लॉचमध्यें बसविलें, आणि लागलीच ' हार्डिंग ' नावाच्या सरकारी मिलिटरी ट्रान्सपोर्टच्या मोठ्या बोटीवर चढविलें. बोट कोठे जाते हे बोटीवरील कप्तानाखेरीज दुसरे कोणास माहीत नव्हतें. बोट मोठी होती खरी, पण अपराध केलेल्या खलाश्यांस कोंडून ठेवण्याच्या अशा ज्या लहान खोल्या तळमजल्यात असतात त्यापैकीं एका खोलीत मला व दुसऱ्या खोलींत स्वयंपाक करण्याकरता बरोबर आलेल्या दुसऱ्या कैद्यास कोंडून ठेविलें होते. दिवसातून सकाळीं किंवा सध्याकाळीं एक तास गोरा इन्स्पेक्टर मला डेकवर फिरावयास नेई. बाकीचा वेळ खोलींतच काढावा लागे ! खोलींत बारा आणि बारा चोविस तास एकसारखें उकडत असे.

हार्डिंग बोट मुंबईहून निघाली ती मध्यें कोठेंही न थांबता

नवव्या दिवशीं रंगूनच्या बंदरांत उभी राहिली. ती रंगूनास येणार ही बातमी रंगूनच्या लोकांस आधींच कळली होती. त्यामुळें मी आगबोटींतून बंदरावर उतरण्याच्या वेळीं तेथें सुमारें एकदोन हजार लोक गोळा झाले होते ! आगगाडी पूर्वी बंदरावरच आणून ठेविली होती, आणि हार्डिंग बोटींतून उतरल्याबरोबर जवळच असलेल्या या गाडीत मला, पोलिसच्या इतर लोकांना, व बरोबर स्वयंपाकाकरतां आणलेल्या कैद्याला बसविण्यांत आलें. त्यावेळीं सन्ध्याकाळचे तीन किंवा चार वाजले होते. दुसऱ्या दिवशीं सकाळीं आठ वाजतां आम्ही मडालेच्या स्टेशनवर येऊन पोंचलों. तेथून बरोबर आलेल्या अहमदाबादच्या पोलिसानें मला तेथील सुपरिंटेंडटच्या ताब्यांत दिलें व ते परत गेले. मडाले जेल सु. ला पूर्वी तार गेली असल्यामुळें मला कोठें ठेवावयाचें याची त्यानें आगाऊच योजना करून ठेविली होती व मी तेथें गेल्यावर योजून ठेवलेल्या कोठडींत जेलर मला घेऊन गेला. जेल मंडालेच्या किल्ल्यांतच एका बाजूला नैर्ऋत्य कोपऱ्यांत बांधलेला आहे. मी तेथें असेपर्यंत मला या जेलाबाहेर केव्हांही काढलें नाही ! एकदां मंडाले जेलांत जेव्हां कॉलरा बराच वाढला तेव्हां मात्र दोन अडीच महिने मंडाले जेलांतून काढून मिकट्टिला येथील जेलांत तेवढ्यापुरतें मला नेऊन ठेविलें होतें.

मला ज्या कोठडींत ठेविलें होतें ती कोठडी दुसऱ्या मजल्यावर असून दोन खणांची ( २० × १२ ) फूट होती. एका आठ खणाच्या मोठ्या बराकींतून हे दोन खण मधें लाकडी भिंत घालून

निराळे काढलेले होते व त्याप्रमाणें सभोंवारचें कांपाऊंड विटांच्या भिंती घालून मोठ्या बराकीच्या कांपाऊंडपासून वेगळें करून टाकलेलें होतें. ही व्यवस्था केवळ माझ्याकरतां नवीन केली होती असें नाहीं. गोऱ्या कैद्यांकरता हें आवार व कोठडी तुटक केलेली असून मी गेल्यावर मला तेथेंच ठेवण्यात आलें खोलींत प्रथम कांहीं दिवस साध्या शिक्षेचे दुसरे कांहीं कैदी असत, पण पुढें सरकारच्या हुकमानें म्हणा किंवा दुसऱ्या कांहीं कारणानें म्हणा, मी व माझ्याबरोबर स्वयपाकाकरता असलेला दुसरा कैदी या दोघांखेरीज तिसरे कोणासही तेथें ठेविलें नाही. आमच्या खोलीभोंवतालचें आवार सुमारें १३० फूट लांब व ५० फूट रुंद होतें. तेवढ्यातच हिंडण्याफिरण्यास आम्हांस मोकळीक होती. शेवटीं शेवटीं जवळच्या आवारांत संध्याकाळीं एक तासभर सोडू लागले होते. आमचे आवारात, जेलर बरोबर असल्याशिवाय दुसऱ्या कोणास येण्याची परवानगी नव्हती. दिवसरात्र आवाराचे दरवाजास कुलुपें लावीत व रात्री खोलीसही कुलूप असे. पुढें पुढें म्हणजे अखेर, रात्रीं आवाराचे दरवाजास कुलूप लावण्याचे सोडून दिलें होते. आम्हांस दिलेली खोली पिंजऱ्याप्रमाणें लाकडी गज लावलेली होती; व त्या तुरुंगात इतर सर्व बराकीही तशाच होत्या. खोलींत सामान एक टेबल, एक खुर्ची, एक कापडी ईझीचेअर, एक लोखंडी कॉट व बुकें ठेवण्याकरता दोन कपाटे इतकें होतें. स्वयंपाकासाठीं बरोबर दिलेला गुजराथी ब्राह्मण कैदी, त्याची मुदत संपल्यामुळें, एक महिन्याचे

आंतच परत पाठवावा लागला व त्याच्याऐवजी येरवडा जेलमधून सातारा जिल्ह्यातील एक कुळकर्णी आला त्याची शिक्षा पाच वर्षांची होती. पण ज्युबिली वगैरे कारणासाठी त्यास एकदर सुमारें १॥ वर्ष माफी मिळून त्याचीही पुढें माझ्यापूर्वीच सुटका झाली. तेव्हा तिसरा एक ब्राह्मण पाठविण्यांत आला. पण तोही दोन वर्षांनी परत पाठवून दिला. ब्रह्मदेशाच्या तुरुंगांत त्यावेळीं शिक्षा होऊन आलेला उत्तर हिंदुस्थानातला एक ब्राम्हण कैदी अखेर मजबरोबर होता

अमदाबादेस दूध व तूप सुरू केलें होतें तें मंडालेस कायम राहिलें एक वेळ गव्हाचा आटा व एक वेळ तांदूळ व त्याखेरीज डाळ मिळत असे पुढें काही दिवसानतर इन्स्पेक्टर जनरल ऑफ प्रिझन्स याचे हुकुमानें दर आठवड्यास थोडी फळें देऊ लागले. पण विशेष फरक म्हटला म्हणजे मधुमेह वाढल्यानंतरचा होय.

ब्रम्हदेशांतील जेल मॅन्युएलप्रमाणें साध्या शिक्षेच्या कैद्यांस आपल्या घरचा पोषाख बाळगण्याची परवानगी आहे. शिवाय मला ' फर्स्ट क्लास मिसडिमीनंट ' प्रमाणे वागवावें असाही हुकूम होता. त्यामुळें धोतरें, सदरे वगैरे मी घरीं वापरीत असें त्याप्रमाणेंच तेथेंही वापरण्यास, व अथरूण व पांघरूणही घरचें नेण्यास मोकळीक होती. यास लागणारा खर्च, व स्वयंपाकाकरतां भांडींकुंडीं विकत घ्यावी लागलीं त्याचा खर्च मला आपल्या पदरचा करावा लागे. तथापि कोणचीहि वस्तु जेल सु. नें पास केल्याखेरीज मिळत नसे. या

वस्तूखेरीज पुढें पुढे चहा, कॉफी किंवा सुपारीही माझ्या खर्चानें मला देण्याबद्दल हुकूम आला होता.

मला ग्रंथ बाळगण्याची परवानगी मिळाली नसती तर हे दिवस जाणें अत्यंत दुर्घट होतें. कारण मघां सांगितलेली खोली आणि आवार यांचे बाहेरील जग आम्हास शून्य झालें होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. ग्रंथांसंबंधींही तीनदां तीन हुकूम आले पहिल्यानें मीं जितकीं बुकें मागितलीं तेवढीं, त्यांचा विषय काय आहे हें तपासून, माझ्या ताब्यात दिलीं. वर्तमानकालीन पॉलिटिक्स या विषयावरील कोणचेंही बुक ठेवण्याची परवानगी नव्हती व तें मिळतही नसे. तसेंच वर्तमानपत्रें व मासिक पुस्तकें इंग्लंडांतील असोत किंवा हिंदुस्थानांतील असोत, इंग्रजींत असोत किंवा देशी भाषेत असोत, सर्व बंद केलेली होतीं. कदाचित् एकादें कोणीं पाठविलें असल्यास तें मजकडे केव्हाही आलेलें नाहीं हीं सर्व पुस्तकें माझ्याजवळ ठेवण्याचें कांही दिवसांनीं बंद होऊन, फक्त चार पुस्तकेंच मजजवळ एका वेळीं ठेवावीं असा हुकूम आला. त्यावर बर्मा सरकारकडे मीं अर्ज केल्यानंतर ग्रंथलेखनासाठी म्हणून सर्व पुस्तके पुन्हा मजजवळ ठेवावी असा हुकूम झाला. तथापि प्रत्येक पुस्तकांत पानें किती आहेत तीं तपासून व त्यांची संख्या मुखपृष्ठावर लिहून त्याच्यावर खालीं सु. ची सही होऊन ती पास व्हावीं लागत. अशा रीतीनें सर्व पुस्तकें तपासून झाल्यावर तीं माझे ताब्यांत आलीं. पुस्तकाची संख्या मी तेथून निघालों तेव्हां सुमारें

३।। शेंपासून ४ शेंपर्यंत झालेली होती. ग्रंथलेखनासाठीं जे कागद देत तेही सुटे न देतां बांधलेलीं बुकें—आंतील पानें मोजून—देत असत व लिहिण्याकरतां शाई न देता फक्त शिसपेनसिलीच व त्याही करून देत असत. कारण जेलच्या नियमाप्रमाणें चाकू बाळगण्याची परवानगी कैद्यास नाहीं फक्त घरी दर महिन्यास जें पत्र मी लिहीत असे तेवढ्यापुरता मात्र सुटा कागद, शाई व पेन मिळत असे.

भगवद्गीतेवर हल्ली जी भाष्यें व टीका उपलब्ध आहेत त्यांत गीतेचें रहस्य सांगावे तसें सांगितलेले नाहीं अशी माझी शिक्षा होण्यापूर्वीं पुष्कळ वर्षे समजूत झालेली होती. या समजुतीस व्यवस्थित रूप देऊन, पाश्चात्य व पौर्वात्य तत्त्वज्ञानाच्या तुलनेसह गीतेवर माझ्या मताप्रमाणें मीं एक ग्रंथ मराठी भाषेंत लिहून तयार केला आहे. हा ग्रंथ सुमारें चारसहा महिन्यांत लिहून काढला. पण त्याचे पूर्वविभागांत व पुढे, सुधारणा करण्यास बराच काळ गेला. सध्यां तो ग्रंथ सरकाराकडे पाहण्याकरतां गेला आहे. मजजवळ सुटकेचे वेळीं दिला नाहीं.

मंडाले शहराची हवा उष्ण असल्यामुळें हिवाळ्याखेरीज दुसऱ्या कोणत्याही ऋतूत ग्रंथलेखनाचें काम चांगलें करता आलें नाहीं. त्याशिवाय व्यवसाय म्हटला म्हणजे फ्रेंच, जर्मन आणि पाली या तीन भाषांचें केवळ स्वतःचेच अभ्यासानें जें थोडेंबहुत ज्ञान संपादन करतां येणें शक्य आहे ते संपादन करणें हें होय. शिवाय गणित, ज्योतिष, वेदांत वगैरे विचारांच्या विषयांतही कांहीं काळ गेला

असून दुसऱ्या कांही किरकोळ विषयांवर टिपणें केलीं आहेत. फ्रेंचपेक्षां जर्मन व पाली भाषाचें ज्ञान मी जास्त संपादन केलें

पुण्याहून दर महिन्यास एक पत्र मला येत असे, व मी त्यास एक उत्तर पाठवित असें. तथापि, या पत्रात घरच्या बातमीखेरीज पर्यायानेंही दुसरी काही बातमी आल्यास ती कापून काढीत असत व मलाही तशा प्रकारचा मजकूर उत्तरात लिहिण्याची परवानगी नव्हती. सुप० स शुष्क शंका येण्यासारखा एकादुसरा शब्द उत्तरात गेल्यास मला ते फिरून लिहावें लागे. वरील दोन प्रकारच्या पत्राखेरीज दुसऱ्या कोणत्याही प्रकारचें माझे नावें आलेलें पत्र मला दिलें नाहीं व हा पत्रव्यवहार अद्याप माझे हाती न आल्यामुळे बाहेरच्या किती लोकानी पत्रें धाडली हेंही मला आतां सांगतां येत नाही. तीन महिन्यांतून एकदा बाहेरच्या माणसांची भेट घेण्याची मोकळीक होती. पण या सवलतीचा उपयोग घरच्या माणसांखेरीज मीं दुसऱ्या कोणासाठींही केलेला नाहीं. एकदा मात्र मुंबईचे सॉलिसिटर राघवैय्या व पुढे विलायतेहून परत आल्यावर खापर्डे व रंगूनचे वकील रा. विजापूरकर हे लीगल अड्व्हायझर या नात्यानें भेट घेण्यास आले होते. या मुलाखतींतील सर्व संवाद किंवा भाषण इंग्रजीत सुप. च्या हपिसांत त्यांचेसमोर करावें लागत असे.

हिंदुस्थानांतील अधिकारी तिकडे भेटावयास येणें शक्यच नव्हते व ते आलेही नाहींत. मंडाले जेलासाठीं ब्रम्हदेशाच्या सरकारनें नेमलेल्या ऑफिशियल व्हिजिटरांत ज्या सरकारी इंग्रजी अंमलदारांची

नांवें होतीं ते जेलच्या तपासणीकरितां आले म्हणजे माझ्या आवारात येऊन माझी चौकशी करीत. आणि याच नात्यानें बर्माचे ले. गव्हर्नर एकदां माझ्या आवारात आले होते. पण असल्या भेटींत महत्त्वाचा काही सवाद झालेला नाहीं व एका प्रसगाखेरीज त्यांत काहीं खोंचही नव्हती. दुसरा कोणी म्हणजे ऑफिशियल व्हिजिटराखेरीज इंग्रजी अंमलदार अगर गृहस्थ जेल पाहण्यास आल्यास जेलचे सुपरिंटेंडेंट त्यास माझ्या खोलींत आणत नसत.

एकंदर प्रकृति बरी होती. वर्षातून एकाददुसरा वेळ साधा ज्वर येई. पण तें साधारणच असे. मोठें दुखणें असें कधी आलें नाहीं. डायबिटीस मात्र वाढली. मधुमेहानें व वयोमानानें माझे पांचसहा दात पडले आहेत ऐकूही कमी येऊ लागलें आहे व दूरचे पदार्थ नीट दिसत नाहींत. ‘कृतान्तकटकामलध्वजजरा’ अधिक फडकूं लागली आहे आणि त्या मानानें काम करण्याची पूर्वीची उमेद व शक्ति थोडी मदावलेली आहे, आणि वजनही थोडें कमी झालेले आहे. याखेरीज शरीरावर किंवा मनावर दुसरा कांहीं परिणाम घडला आहे असें मला वाटत नाहीं. मग तुम्हांला काय दिसेल तें खरें.

प्रिव्हि कौन्सिलचा निकाल झाल्यावर दोनतीन वर्षांनीं मुबई सरकारकडे व विलायत सरकारकडे मीं एक अर्ज केला होता. मला मूळची झालेली शिक्षा सक्तमजुरीची होती व ती तशीच राहिली असती तर इतर सक्तमजुरीच्या कैद्यास जेल नियमाप्रमाणें मिळते

तशी मलाही माफी मिळाली असती ती आतांही द्यावी असा त्या अर्जातील मतलब होता; पण मुंबई किंवा विलायत सरकारनें ही विनंति मान्य केली नाही.

शिक्षेची मुदत संपत आली तेव्हां आता सुटका होईल हें दुसऱ्या कोणी मला सांगावयाची जरूर नव्हती व म्हणूनच मजजवळ जीं पुस्तकें होती तीं मीं मे महिन्याच्या आरंभींच इकडे रवाना केली होती. जेलच्या नियमाप्रमाणें काळ्या पाण्यावर पाठविलेल्या कैद्यांस शिक्षा संपण्यापूर्वी दोन महिने अगोदर आपल्या मुलखीं पाठवावें लागतें, त्याप्रमाणें माझीही व्यवस्था होईल असा माझा अदमास होता. त्यामुळे सोमवार ता ८ जून रोजीं सकाळीं आठ वाजतां मंडाले जेलचे सुपरिंटेंडट यानीं माझ्या खोलींत येऊन एकाएकीं सामानाची बांधाबांध करण्यास जेव्हा मला सांगितलें तेव्हा पुढला प्रकार माझ्या लक्षांत आला. त्याच दिवशीं दुपारीं एक वाजता रंगून व मंडाले पोलिस अधिकाऱ्याच्या पाहऱ्यात देऊन जेलांतून मोटारमधून माझी स्टेशनावर रवानगी झाली. तेथून मेल ट्रेन दोन वाजतां निघते, व त्यात आमच्यासाठीं एक डबा रिझर्व केला होता. स्टेशन आलें कीं डब्याचीं दारें लावून घेत. डोक्यास घालण्यास तांबडी पगडी मजजवळ होती. पण त्यावेळीं प्रथम टोपी व रंगूनच्या पुढें रुमाल घालण्याबद्दल हुकूम झालेले होते! अशा बंदोबस्तानें मंगळवारीं सकाळीं सहा वाजता रंगूनच्या पलीकडे एक लहान स्टेशन आहे तेथें आम्ही येऊन पोंचलों. स्टेशनवर रंगूनचे सी.आय.डी.पोलिसचे

डे. कमिशनर तयारच होते. त्यानीं लागलीच गाडींतून उतरवून मला मोटारीत बसविलें आणि बंदरावर घेऊन गेले. सकाळचीच वेळ असल्यामुळें तेथें कोणीही मला ओळखलें असेल असें वाटत नाहीं. शिंवाय बातमी न फुट्ट देण्याचा या वेळचा बंदोबस्तही बरा होता. हा बदोबस्त मुबईच्या सी. आय. डी. चे डे. इ. जनरल यानी यापूर्वी तेथें जाऊन केला होता असें मला मागाहून समजलें. त्याप्रमाणें बदरावर आणल्यानंतर मडालेहून मजबरोबर सैपाकासाठीं दिलेला एक कैदी व सामान मागाहून घोड्याच्या गाडीने बदरावर आलें. तेव्हा त्यालाही मागाहून स्टीम लॉचमध्यें घेऊन तेथें पूर्वीच तयार करून ठेविलेल्या सरकारी लष्करी खात्यातील ‘ मेयो ’ नावाच्या बोटींत आम्हास चढविलें. पण ही बोट आम्हास कलकत्त्यास नेणार का मद्रासेस उतरविणार, किंवा एकदमच मुबईचा प्रवास करावा लागतो, त्याबद्दल मला काहीं माहिती कळविली नाहीं, आणि मींही, काहीं झालें तरी आता घरच्या रस्त्यास लागलों हें ओळखून, त्याबद्दल जास्त विचारपूस केली नाहीं.

“ आगबोटीवर चढल्यावर पुणेंकर पोलिसाचे चेहरे माझे दृष्टीस पडले; तेव्हां ती मडळी मला नेण्यासाठीं पूर्वीच आलेली असावी असें मी ताडलें. मुंबईच्या या पार्टींत पो. इ. रिंग व सार्जंट जोन्स् हे दोघे गोरे पोलीस असून सी. आय्. डी. मधले पो. इस्पेक्टर सदावर्ते, जमादार मारुतिराव, व कान्स्टेबल दाते हे इसम होते. या पंचकानें मला आणि माझ्याबरोबर असलेल्या कैद्यास व सामानास आपले

ताब्यात घेतलें व रगूनचे पोलीस आपल्यापैकीं दोन कान्स्टेबल ठेवून परत गेले. पुढें चौकशी करता पुण्याच्या पोलिसाची ही पार्टी आदल्याच दिवशीं रंगूनास पोंचली होती व त्यास इकडेतिकडे कोठें संचार करू न देता त्याच दिवशीं संध्याकाळीं या आगबोटीवर चढवून ठेविलें होतें असें कळलें.

" ही बोट सामान्यत: ४।५ दिवसात मद्रासेस जाते व समुद्र शात असल्यामुळें शुक्रवारीं व शनिवारीं आम्हीं मद्रासेस पोंचावयास पाहिजे होतें. पण दोन दिवस समुद्रात बोट मुद्दाम अर्ध्या वेगानें चालविल्यामुळें सोमवारी संध्याकाळीं ६ वाजता आम्हीं मद्रासच्या बदरात येऊन पोंचलों. सरकारनें मद्रासेस बोट लावण्याची वेळ पूर्वींच ठरवून दिलेली असल्यामुळें ही दिरगाई झालेली असावी असें वाटतें. मजबरोबर सैपाकाकरिता जो मनुष्य दिला होता तो बोट लागून सारा वेळ पडून राहिलेला होता व पोलिस पार्टीपैकींही पो. इन्स्पेक्टर सदावर्ते याचेखेरीज इतराना वरुण महाराजानी थोडाबहुत हात दाखविला होता. त्यामुळें बरोबर बरेच लोक असूनहि जेवणखाणाची थोडी गैरसोय झाली; मला बोट लागत नाहीं. आमच्या खेरीज बोटीवर दुसरे कोणीही उतारू नव्हते.

माझ्याबरोबर मंडालेहून पाठविलेल्या कैद्याम मद्रासेसच सोडण्यात आलें. रात्रीं आठ वाजता बोटींतून रगूनाहून बरोबर आलेल्या दोन पोलिस शिपायास आणि पुणें पोलिसासह मला, मचव्यात उतरून धक्क्यावर आणलें. आणि तेथें मद्रास पोलिसानीं

तयार ठेवलेल्या मोटारींत बसवून लागलीच मद्रासच्या मोठ्या स्टेशनवर नेलें. तेथें मेलगाडीला ब्रेकचे मागें जोडलेला एक सेकंड क्लासचा डबा आमच्या करता रिझर्व केला होता. त्यात आणून बसविल्यानंतर डब्याचे दरवाजे बद करण्याचा पूर्वप्रघात पुढेंहि चालू होता. अद्यापही मला कोणत्या स्टेशनवर उतरणार याची बातमी देण्यात आली नव्हती !

गाडी पुण्यास बहुतेक राइट टाइमलाच आली असेल. पण मी मात्र पुण्यास उतरलों नाहीं ही सर्व व्यवस्था पूर्वीं करून गेलेले सी. आय. डी चे डे इ. जनरल दौंडापर्यंत आले होते व त्यांनीं हडपसर स्टेशनावर गाडी मिनिटभर थांबावी वगैरे व्यवस्था पूर्वींच करून ठेविली होती. हडपसर स्टेशनावर आम्हास उतरावयाचें आहे हें आम्हास त्याचे मागच्या स्टेशनवर कळविण्यात आलें, व त्याप्रमाणें आम्हीं तयारीही ठेवली होती. हडपसर स्टेशनावर गाडी थाबते न थाबते इतक्यात पुण्याचे डे. पो. सुपरिटेंडट हे तेथें आले व त्यांनीं मला व पो. इ. सदावर्ते यास खाली उतरविलें, व लागलींच मि. गायडरहि तेथें आले. स्टेशनाबाहेर पूर्वींच दोन मोटारगाड्या तयार ठेवल्या होत्या. त्यात लागलीच आम्ही जाऊन बसलों. ही गाडी हडपसरावर का थाबली हें स्टेशनमास्तरासहि माहीत नव्हतें असें दिसलें, कारण मी स्टेशनाबाहेर पडताना त्यानें मजजवळ तिकीट मागितले ! साहेबांकडे बोट दाखविणें येवढेंच माझें त्यास उत्तर होतें !

' शिक्षेची मुदत सपत आली होती. तेव्हा आता नाहीं तर महिन्यानें तरी मी सुटणार येवढें मी निश्चित समजलों होतों. परंतु असेंही वाटे कीं येवढ्या बदोबस्तानें व गुप्तपणानें पुण्यात आणून येरवड्याचे जेलांत महिनाभर ठेवल्यास बोभाटा झाल्याखेरीज राहणार नाहीं. तेव्हा एकपक्षी आत्ताचे आत्ता सोडून देतील. पण निश्चित काहींच नव्हते. म्हणून ' तुका म्हणे उगी राहा, जें जें होईल तें ते पहा ' या भगवद्भक्ताच्या वचनावर भरवसा ठेवून मी स्वस्थ बसलों होतों. पहिल्याने डे. पो सुपरिंटेंडंटची पायलट ( बिनीची ) मोटार आणि मागून आमची मोटार याप्रमाणें चालू होऊन येरवड्याकडची दिशा जेव्हा सुटली तेव्हा संशय दूर झाला. बिनीची मोटार मध्येंच अर्ध्या मार्गावरून परतली. आणि मगळवार ता. १६ रोजीं मध्यरात्रीनंतर सुमारें एक घटकेनें मागची मोटार गायकवाडांचे वाड्यासमोर येऊन उभी राहिली मागची म्हणजे ज्यांत मि. गायडर, इ. सदावर्ते व मी होतों ती मोटार होय. आणि तेथें गायडरसाहेबानी शिल्लक राहिलेली ( सुमारे १ महिन्याची ) शिक्षेची मुदत सरकारनें मेहेरबान होऊन बिनशर्तीनें माफ केल्याची गोष्ट मला कळविली, व मीही त्यास त्याबद्दल माझे आभार सरकारास कळविण्यास सांगितलें. पोलिसाबरोबर मध्यरात्री घरीं आलेल्या मालकासही दरवाजा उघडून आत घ्यावें कीं नाहीं याची दारवानास शंका पडली ! म्हणून त्यानें धोंडोपतास बोलावून आणलें आणि मग सत्तेच्या घरात आमचा प्रवेश झाला !"

## ९ : : पड खाऊन जिंकलें !

[ लक्ष्मण रामचंद्र पांगारकर यांचे नाव महाराष्ट्रातील सुशिक्षित वर्गात जसे तसेच वारकरी पंथाच्या अनुयायी वर्गातही मश्हूर आहे. त्यांचा जन्म इ. स. १८७२ साली झाला पुणे येथील न्यू इंग्लिश स्कूलच्या जुन्या विद्यार्थ्यांपैकी ते एक होते, आणि त्या वेळेच्या आठवणीहि ते फार सुरसपणे सांगत असत. ते शेवटपर्यंत अगदी कट्टे सनातनी राहिलेले असले तरी आगरकरांच्याविषयी त्यांच्या मनात अत्यंत गाढ आदर वसत होता संस्कृत भाषेत विद्यार्थीपणापासूनच ते चांगले प्रवीण असत. त्यांचा शिक्षणक्रम थोडासा रेंगाळत झाला, आणि शिक्षकाचा धंदा करीत करीत ते पदवीधर झाले. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं आपल्या लेखनानें महाराष्ट्रातील ज्या तरुण लोकांना स्फूर्ति दिली त्यांत पांगारकरांची गणना होते " मोरोपंतांची कविता " या चिपळूणकरांच्या निबंधाचा त्यांच्या मनावर मोठा हितकर परिणाम झाला. आपल्या जुन्या कवींचे आणि विशेषतः सन्त कवींचें अध्ययन नवीन तऱ्हेने शिकलेल्या लोकांनीं केलें पाहिजे आणि त्यांच्या वाङ्मयाचे संशोधनहि केलें पाहिजे, हा विचार पांगारकर यांच्या मनात अगदीं तरुणपणीं स्थिर झाला, आणि तेव्हापासून इहलोकची यात्रा संपेतोंपर्यंत त्यांनी हा आपला उद्योग सतत चालू ठेवला. वयाच्या

पाहिल्या अमदानीत संशोधनाचें आणि अभ्यासाचे खरे काम त्यांनीं केलें आणि पोक्त वयात आपल्या या ज्ञानाचा लाभ त्यांनीं मुख्यतः वारकरी पंथातील लोकास दिला. " मोरोपतांच चरित्र " हा त्याचा पहिला ठळक ग्रंथ होय. या ग्रंथाच्या जुळणीसाठीं त्यानीं फारच कष्ट केले व अभ्यासहि केला, आणि या ग्रंथाने महाराष्ट्रातील विद्वान् मंडळींत त्याची जागा एकदमच कायम झाली. ' तुकारामाचें चरित्र ' हाहि त्याचा ग्रंथ तितक्याच योग्यतेचा आहे. ' मराठी वाङ्मयाचा इतिहास ' त्यानीं पुढं लिहावयास घेतला, आणि ज्ञानेश्वरापासून रामदासापर्यंत तीन खंड प्रसिद्ध केले. या ग्रंथाना इतिहास असें नाव जरी त्यानीं दिलेलें असलें तरी त्या त्या काळच्या वाङ्मयाची जी सविस्तर ओळख त्यानीं या खंडात करून दिली आहे तीच या खंडाची खरी उपयुक्तता आहे. पांगारकर हे मोठे मिठ्ठास बोलणारे होते, आणि भक्तिरस आळवावयास ते उभे राहिले म्हणजे श्रोते केवळ तल्लीन होऊन जात. त्याच्या या वक्तृत्वाच्या गुणामुळेच श्रीमंत तुकोजीराव महाराज होळकर आणि श्रीमंत प्रतापशेट यानीं त्याना फार मोठाल्या देणग्या दिल्या. ' भक्तिमार्गप्रदीप ' या त्याच्या वेच्याच्या पुस्तकानेहि त्याना बरीच मोठी प्राप्ति करून दिली. सर्व जन्मभर नोकरी अशी त्यानीं कोणाचीच केली नाहीं. केवळ विद्येच्या बळावरच त्यानीं आपला प्रपंच केला. " चरित्रचंद्र " या नावाचें त्यानीं आपले आत्मचरित्र लिहिलें आहे. तें वाचलें म्हणजे संशोधनाची आवड, चिकित्सेचा मगदूर, विद्येची अभिरुचि आणि भावनेची श्रद्धा याचें मोठें चमत्कारिक मिश्रण त्याच्या स्वभावात झालें होतें असे दिसून येते. वर त्याच्या चारपाच पुस्तकाचींच नावे जरी दिलीं असलीं तरी त्याची ग्रंथरचना मोठी विपुल होती. ज्ञानेश्वर, एकनाथ, मुक्तेश्वर इत्यादिकाचीं चरित्रे त्यानीं लिहिलेलीं आहेत आणि

स्वत: चालविलेल्या ' मुमुक्षु ' पत्रात अनेक सुदर लेख त्यानी लिहिले. तथापि त्याच्या मनाचा ओढा पाडित्य आणि चिकित्सा यावरून भक्ति आणि श्रद्धा याकडे जास्त जास्त होऊ लागला आणि शेवटीं शेवटीं तर त्याच्या अनुयायाचे आणि चहात्याचे मडळही अगदीच बदलले. तथापि इग्रजी शिकलेल्या पदवीधरानी जुन्या सतवाङ्मयाचा अभ्यास सशोधनपूर्वक आणि आस्थेने केला पाहिजे हा विचार महाराष्ट्रात कायम करा वयास पागारकराचे सक्रिय श्रमच कारणीभूत झाले आहेत. हे इ. स. १९८१ साली दिवगत झाले ]

* * * आण्णा विजापुरकरांकडे दहा–वीस माणसें रोज दोनदा जमत व तेथें ' विद्वद्गोष्टी ' चालून रोज माझे २।३ तास विद्वज्जनसमागमात आनदात जात. ह्या मंडळींत व बाहेरही दाजीबा पुजाऱ्याविषयीं मीं चौकशी चालविली होती. शेवटीं दाजीबा पुजारी निपुत्रिक वारले व त्याचा सर्व सग्रह कोल्हापूर येथेंच एका वैद्याकडे गेला असें कळल्याचें मी वरील मंडळात सागितलें. तो वैद्य स्वभावानें मोठा विक्षिप्त व तामसी असल्याचें सर्वांनीं मला सागितलें. दाजिबाचा सग्रह त्याजकडे आहे हें कळताच मीं त्यांजकडे जाण्याचें ठरविलें. आण्णा म्हणाले: ' तो मनुष्य म्हणजे एक पिशाच्च आहे. तो तुम्हाला शिव्या देईल व खवळला तर मारील सुद्धा ! तुम्ही आमच्या गांवांत येऊन अप्रतिष्ठा भोगून जावें हें आम्हांला योग्य वाटत नाहीं. ' मीं आण्णाना म्हणालों : ' तुम्हीं मला सावध केलेंत

हे फार चांगलें झालें. मी, पहा, यश घेऊन येईन. मानापमान मी ओळखीत नाही, पंताच्या हातची एक चिट्ठी मिळाली तरी शिव्या व मार खाण्यातही मला अत्यानंद होईल.' असें बोलून मी मनानें घट्ट बनून घराबाहेर पडलों व शोध करीत त्या वैद्याचे घरीं गेलों. सकाळचे १० वाजले होते. पंताच्या हातचे कागद पहायला मिळणार या कल्पनेने माझी भूकतहान नाहीशी झाली. कार्याचें वेड माझ्या अंगात भरलें. मी वैद्यराजाच्या अंगणात प्रवेश केला। ऊन कडक पडलें होतें. घरकामावर सुतार, गवंडी लावून त्याच्या कामावर देखरेख करीत वैद्यराजाची स्वारी उभी होती ! त्याच्या चेहऱ्याची ठेवणच एकाद्या मारकट बैलासारखी होती !

मी हळूच पायावर डोकें ठेवून वंदन केले।

कर्कश आवाजानें व क्रुद्ध मुद्रेनें वैद्यराज बोलले. 'अरे ! हें काय माडले आहेत ? माझ्या पाया काय पडता ! मीं काय साधु आहे काय ?'

'होय ! साधूचे भक्त साधूच असतात. आपण मोरोपंतांचे परमभक्त आहात. मला त्याच्यासारखे गुरुतुल्य वाटता.'

'मला तुमच्याशीं बोलायला वेळ नाही. ( सुतार—गवंड्याकडे बोट करून ) मी बोलत राहिलों तर हे माझे बाप काम करितील काय ? ह्या चोरांवर सारखी नजर ठेवायला पाहिजे.'

'माझ्याशीं बोलायला आपणास केव्हां सवड मिळेल ? तेव्हा येईन. ( जरा विचार करून ) 'तेथें उभे रहा' असें म्हणून

वैद्यराजानें मला उन्हांत उभें केलें ! दोन तासांचें हें उन्हांत उभें राहण्याचें एक तपच झालें ! तपश्चर्येशिवाय कोणत्याहि कामांत यश नाहीं. ' वीर्यं मे दुस्तरं तप '.

बारा वाजले, सुतार—गवंडी जेवायला निघून गेले. वैद्यराज जिन्याच्या तळच्या पायरीवर उभे, मी भीत भीत जवळ गेलों.

' तुम्ही मोरोपतांच्या कवितेचा अभ्यास केला आहे काय ? '

' हो थोडाफार केला आहे. '

यावर वैद्यराजांनीं एकामागें एक अशा पांच आर्यांचा अर्थ व कथासदर्भ मला विचारला सुदैवानें त्या पाचही आर्या मला पाठ होत्या ! त्यानी प्रथम चरण म्हणताच मी सबध आर्या म्हणावी. रसालंकाराचीही त्यानी जी जी माहिती विचारली ती ती मीं सागितली. वैद्यराजाच्या परीक्षेंत मला शभरातले शभर गुण मिळाले ! ते प्रसन्न झाले पण ती प्रसन्नता त्यानीं मुद्रेवर बिलकूल दिसू दिली नाहीं ! आपण जिना चढूं लागले व मला पाठोपाठ येण्यास खूण केली. आम्हीं वरती गेलों. ते एक सतरजी होती ती पसरू लागले. मी सतरजीचें दुसरें टोंक ( त्याना मदत म्हणून ) धरू लागलों तोंच ते खेंसकले—

' काय करिता हे ! मी काय गद्धा आहे काय ? माझ्या घरचें मला काम करता येत नाही ? '

' चुकलों. क्षमा असावी. '

दोघेही सतरजीवर बसलों. वैद्यराजानीं एकेक दप्तर आणावें,

सोडावें, मी त्यांतील काव्यें पहावीं. त्यांनीं पांच दप्तरें सोडलीं. त्यांत पतांची कविता दाजीबानें लिहून घेतलेली पण छापलेली सापडली. त्यांनी पृष्ठ हातांत घेतलें कीं हें भारत आहे, हें मन्त्ररामायण आहे, हें कुशलव–चरित आहे, हीं भागवती प्रकरणें आहेत असें मीं म्हणावें वैद्यबुवांनीं नुसतें गुरगुरत होकार द्यावा पतांच्या हातचीं दाजीबांना आलेलीं कांहीं पत्रें सांपडतील अशा मोठ्या आशेनें मी होतों, पण निराशा झाली. सहावें दप्तर त्यानी सोडलें मात्र तोच पहिलें पृष्ठ पाहतांच मी ओरडलों. 'हें पंतांचें अक्षर आहे!' वैद्यराज उद्गारले 'कशावरून म्हणता?' 'मी दीड वर्ष सतत पंतलिखित पतकाव्यें पहात आहे. त्याचें लहान, मोठें, बालबोध, मोडी कोणतेंही अक्षर मी स्वप्नातही ओळखीन! इतके ते माझ्या डोळ्यात भरलें आहे.'

'बरोबर आहे हे पतांचें काव्य शेवटीं दाजिबांकडे आलें. त्यांनीं केलेली नक्कल व मूळ पत्र अशा दोन्ही प्रती वरच होत्या. त्या मीं हातात घेऊन पाहिल्या. ती पतांच्या हरिश्चंद्राख्यानाची मूळ प्रत होती ती पाहून माझ्या तोंडाला पाणी सुटलें!

'पंतांचें हरिश्चंद्राख्यान मुळाबरहुकूम छापलें तर काय मौज होईल!'

'इंग्रजी शिकलेले लोक मूर्ख असतात. ही प्रत किती जपून ठेवली आहे! दप्तराच्या फळ्या पहा किती सुंदर आहेत! जुन्या

लोकांना हस्तलिखिताची किंमत असे. पुस्तकें छापायला लागल्यामुळें यांना पोथ्यांची किंमत वाटत नाहीं ! '

' आपण म्हणता तें खरें आहे ! '

म्यां हळूंच म्हटलें, ' ही प्रत मूळाप्रमाणें तपासून घ्यायची परवानगी मिळेल तर— '

' तुम्ही येथें महिनाभर रहायला तयार आहात काय ? '

' मी नोकर आहें. मला उद्याला येथून निघालें पाहिजे. रजा भरत आली ! '

' नोकर कोठें आहात ? '

' मी पढरपूर हायस्कुलांत मास्तर आहें. '

' इंग्रजी शिकलांत काय ? '

' होय, मी बी ए. आहे. येथें प्रो. विजापूरकरांकडे उतरलों आहें. '

' पताच्या किती आर्या तुम्हांला पाठ आहेत ? '

' फार नाहीं, पण पाचचार हजार आर्या आता माझ्या तोंडांत आहेत. '

' तुमचें पाठांतर दांडगें आहे ही माझी खात्री झाली. अभ्यास चांगला केला आहे. '

' येथें म्हणाल तर येथें बसून मी प्रत लिहून तपासून घेईन. '

' पण तुम्हाला तर येथें रहायला सवड नाहीं तुम्हाला या कामाला पधरा दिवस—चांगला महिना लागेल. '

' मी प्रत प्राणांपलीकडे जपून ठेवीन. पंधरा दिवसांनीं परत करीन. '

' तें होणार नाहीं. महिना दोन महिने लागतील ! तुम्ही मोरोपंतांचे खरे भक्त आहांत. तुमच्यासारखा मयूरभक्त मीं दुसरा पाहिला नाही. ही पोथी मीं तुम्हांला बक्षीस देत आहें ! '

मी पोथीला वंदन केलें व वैद्यराजांच्या पायावर डोकें ठेवून तो प्रसाद घेतला व घर गांठलें !

दुपारीं आण्णांच्या घरीं मंडळींना हा सारा प्रकार सांगितला. सर्वांनीं माझें अभिनंदन केलें. आण्णा म्हणाले ' तुम्ही पिशाचाला वळविलेंत, खडक फोडलांत ! तुम्ही आपल्या कामांत यशस्वी व्हाल यांत शका नाहीं. तुम्ही वाङ्मयप्रांतांतले वीर आहात. मोरोपतांचें चरित्र लिहावयास तुम्ही सर्वतोपरी योग्य आहांत. तुमच्या हातून स्वभाषेची मोठी सेवा होवो ! ' आण्णांचें अंत करण सद्गदित झालें त्यांच्या व माझ्या नेत्रांतून अश्रू वाहिले. मी त्यांचा शुभाशिर्वाद अभिवादन-पूर्वक घेतला. आण्णा प्रेमळ, सात्विक व थोर पुरुष होते, खरोखरींचे साधु होते.

पंतांची हरिश्चद्राख्यानाची मूळ प्रत माझे घरीं आहे. तें एक माझें छोटेंसें विजयस्मारक म्हणून मी राखून ठेवलें आहे !

वैद्यराजांच्या स्वभावाचें चिंतन करीत मी पढरपुरास गेलों. बाहेरून रागीट पण अंत:करणाचे प्रेमळ व उदार अशा बळरामदादांच्या स्वभावाचें जें चित्र पतांनीं ' सुभद्राख्यानांत ' काढलें आहे त्याचे

मला स्मरण झालें. ' रागीट पण प्रेमळ, राग यायलाही उशीर नाहीं जायलाही उशीर नाही, रागावल्यावर कृतातानेंही त्यांजकडे पाहू नये व राग ओसरल्यावर मेघानेंही त्यांच्या औदार्याशीं स्पर्धा करूं नये ! सतप्त झाले कीं फाडून खातील, प्रसन्न झाले म्हणजे ढुगणाचे सोडून देतील !' ( मोरोपत चरित्र पृ० २२६ ). बळरामदादांच्या जातीचे आमचे वैद्यराज होते एवढेंच मला येथें सुचवायचे आहे.

मी चार दिवस पन्हाळगडावर राहून आलों. तेथें मिळालेल्या माहितीचें व स्फुरलेल्या विचाराचें संकलन मीं मोरोपत–चरित्रांत पहिल्याच प्रकरणांत केलें आहे.

पन्हाळ्याहून परत आल्यावर कोल्हापुरास वाचनालयांत माझें मोरोपतावर रात्रीं एक व्याख्यान झालें. न्यायाधीश पंडितराव अध्यक्ष होते. गर्दी खूप झाली होती. अध्यक्ष शेवटीं म्हणाले, " विद्यापीठा-तून बाहेर पडल्यापासून जें आम्हीं करायला पाहिजे होतें तें केलें नाहीं असा अनुताप मला हें व्याख्यान ऐकल्यापासून झाला आहे ! रा. पांगारकर आपल्या आयुष्याचें व विद्येचें सार्थक करीत आहेत हें पाहून मला अत्यंत आनंद झाला आहे ! " कोल्हापूरच्या समर्थ पत्रानें एक अग्रलेख लिहून, व्याख्यानाचे वेळीं श्रोतृसमाज कसा नागासारखा दोन तास डोलत होता व प्रसंगोपात्त निघालेल्या शेंकडों आर्या व त्यांचें स्पष्टीकरण ऐकून कसा तन्मय झाला होता, याचें रसभरित वर्णन केलें होतें.

* * *

द्रव्यदृष्टीने पाहता १९२३ साल माझ्या आयुष्यातील अत्यंत भाग्याचें होय. पहिली देणगी तीन हजारांची जानेवारींत मिळाली. त्या देणगीनें बाळपणापासून माझ्यामागें लागलेल्या कर्जातून मी कायमचा मुक्त झालों. दुसरी तीन हजारांची देणगी आगस्टमध्यें मिळाली व तिनें तितक्याच किंमतीचे सोनेंनाणें घरात आणलें व तिसरी देणगी पचवीस हजाराची नोव्हेंबरमध्यें हातात आली व या देणगीनें परिस्थिति सुधारली व पुढील दहा वर्षे निश्चितपणात गेलीं ' हे ३१ हजार रुपये सारे इंदूरचे महाराज तुकोजीराव होळकर यांजकडून आले हें सांगावयास नकोच महाराजांचे माझे संबध आगत्य-प्रेमाचे होते. इंदोर सोडले १९१९ च्या मे महिन्यांत १९२० च्या मे महिन्यात महाराजांनीं १५०० रुपये स्वसंतोषानें पाठविले व त्यानंतर चार वर्षांनीं महाराजांनीं स्मरणपूर्वक बोलावून वरील रकमा दिल्या. यावरून त्यांच्या अंतःकरणाचा उदारपणा तर दिसतोच पण त्याच्या मनात माझ्याविषयीं ह्या सर्व काळात केवढा सद्भाव जागृत होता हेंही स्पष्ट दिसून येतें १९२२ च्या ऑक्टोबर महिन्यांत मीं ग्वाल्हेरची फेरी काढली. ग्वाल्हेरीस शिरगांवकराच्या मठात दासबोधाची फार जुनी अस्सल प्रत आहे; तिच्यावरून दासबोध अक्षरशः तपासून घ्यावा व तो सार्थ छापावा या उद्देशानें मी ग्वाल्हेरीस गेलों. तेथें माझें राहणें तीन महिने झालें. तेथें गेल्यावर १९ दिवसांनीं मथुरेला गेलों व मथुरेस यमुनापूजनाचा थाट पाहून वाटलें कीं हा आनंद आपल्याही मंडळींस भोगावयास मिळावा. म्हणून तारेनें

बायकामुलांस बोलावून घेतलें. मथुरा, वृंदावन, गोकुळ, गोवर्धन, मधुवन, कृष्णचरित्रानें पावन केलेली पवित्र स्थळें कुटुंबासमवेत १९ दिवस पाहून पुन्हा ग्वाल्हेरीस आलों. तेथें नंतर दोन महिने राहून दासबोध तपासण्याचें काम केलें व तेथून निघण्यापूर्वी महाराजांस पत्र पाठविलें. “ महाराजांनीं तुकारामचरित्राच्या प्रसिद्धीच्या कार्यांत मला सर्वतोपरी साह्य केले. हें चरित्र प्रसिद्ध होऊन लोकप्रिय झालें आहे चरित्र महाराजानीं पाहिलेंच आहे. ग्रंथशोधनाचें, लेखनाचें व प्रसिद्धीचें काम लोकहिताचें आहे व या कार्यास केव्हांही मदतीची अपेक्षा असते. महाराष्ट्रवाङ्मयाच्या इतिहासाचे ४—९ खंड काढून त्यांत संपूर्ण इतिहास देण्याचें प्रचंड कामही अंगावर घेण्याची मनीषा आहे. देव करील तें खरें. येतांना उज्जनीस चार मुक्काम करून पुढें जावयाचा बेत आहे ” यानंतर आम्ही मंडळी उज्जनीस आलों, तेथें महाराजांची बडवाईहून तार आली कीं उद्यां आम्ही इंदोरास जात आहोत. आपण परवां तेथें यावें. अवश्य यावें. भेटल्यावांचून पुढें जाऊ नये. हाऊसहोल्ड ऑफिसर यांस कळविलें आहे ते स्टेशनवर येऊन आपली फर्स्टक्लास गेस्ट म्हणून सरबराई ठेवतील. त्याप्रमाणें मंडळी उज्जनीसच ठेवून मी एकटाच इंदोरास तिसरे दिवशीं गेलों. आठ दिवस राहणें झालें. व्यवस्था अगदीं चोख होती. महाराणींची भेट झाली. त्याना खूप आनंद झाला. ‘ आता येथेंच राहायचें, परत पुण्यास जायचें नाहीं पहिल्यापेक्षा उत्तम व्यवस्था ठेवण्यांत येईल आपणांस अगदीं त्रास व्हायचा नाही ’ असें उत्साह-

पूर्वक बोलल्या. मीं म्हटलें माझीं कामें तिकडे सुरू आहेत, मुमुक्षु मला तेथेंच राहून चालविला पाहिजे महाराजांची भेट झाली, पुष्कळ इकडचें तिकडचें बोलणें झालें यानंतर दुसऱ्या दिवशी भेट होउन उज्जयिनीस येण्यास निघालों. महाराजांनी ए. डी सी. बरोबर तीन हजार रुपये पाठवून दिले, व आणखी तीन हजार आपलें लिहून येईल तेव्हा पाठविण्यांत येतील असें कळविलें मी पुण्यास सहकुटुंब आलों व तीन हजार रुपये देऊन कर्ज निवारण केलें ! डोक्यावर आज कोणाचें देणे नाहीं हा विचार मनात येऊन समाधान वाटलें. मुबईस दासनवमीच्या उत्सवांत ब्राह्मणसभेमार्फत प्रवचन झालें. गोरेगांवकर बिल्डिंग व विलेपारलें येथें कीर्तनें झालीं ! महाशिवरात्रीचें कीर्तन जगन्नाथाच्या चाळींत झालें व दुसरे दिवशीं ब्राह्मण सभेंत झालें ! एप्रिल १९२३ मध्यें मुमुक्षु—कचेरी पुण्यास ठेवून आम्हीं नाशकास राहू लागलो.

माझा मुक्काम पंचवटींत होता सकाळीं दहा वाजता एक टांगा दारापुढें येऊन उभा राहिला. मी माडीवरून डोकावून पाहिलें तों इंदोरचें दृढपरिचित असे सीतारामपंत गवारीकर ! भोजनोत्तर ते म्हणाले " महाराजासाहेबांनी आपल्याला इंदुरास नेण्यासाठीं मला मुद्दाम पाठविलें आहे. मला हुकूम झाला व लगेच निघालों. उद्या-पासून नवरात्र सुरू होत आहे नऊ दिवस आपल्या तोंडून एखादा परमार्थाचा विषय ऐकावा अशी महाराजांची इच्छा झाली व त्यांनीं मला पाठविलें आहे आपणांस आजच निघालें पाहिजे. आपण आज

रात्रीं निघालों म्हणजे उद्या सकाळी दहा वाजता इंदुरास पोहचूं. आपली समति मिळाली कीं तार करितों म्हणजे सर्व व्यवस्था होईल." मी समति दिली व दुसरे दिवशीं सकाळीं १० वाजता इंदोरास पोचलों. फर्स्टक्लास गेस्ट या नात्यानें सर्व व्यवस्था उत्तम राहिली; माझें राहणें २१ दिवस झाले. लछमनअय्या हा नामांकित आचारी–रोजी १० रुपयावर आमचे तैनातीस दिला होता त्याचे हाताखालीं ४० रुपयाचा एक दुसरा ब्राह्मण होता, दोन हडपी उर्फ हडपेकर, एक हुजऱ्या–इतर चार नोकर–स्पेशल मोटार तैनातीला दोन पक्वानें दुपारीं व दोन रात्रीं. सकाळी आठ वाजता व दुपारी तीन वाजता दूध, बदाम, पिस्ते, केळी व इतर फळे. खरें राजैश्वर्य भोगावयास मिळालें. महाराणींनीं दुपारीं चार वाजता भेटावयास बोलविलें. भेट झाली–आनंद झाला. रात्रीं ९ ते १०॥ पर्यंत राजवाड्यांत प्रवचनें सुरू झालीं. दासबोधाच्या आधारें–११ दिवसात नवविधा भक्तीवर ११ प्रवचनें झालीं. महाराज, उभयता महाराणी, बाळासाहेब व इतर निवडक ३०।४० स्त्रीपुरुष मंडळी येत. एक दिवस देवासचे महाराज येऊन बसले होते. चारपाच दिवस केवळ विश्रांतींत गेले. रोज प्रवचनोत्तर मंडळी गेल्यावर महाराज एकटे अर्धा पाऊण तास बोलत असत, अगदीं घरोब्याचें सर्व वागणें होतें. कोजागिरी पौर्णिमेच्या रात्रीं स्वतंत्र प्रवचन झालें. एकवीस दिवस सर्वांचे आमचे अत्यानंदात गेले. मीं २।३ महिने रहावें अशी महाराजाची इच्छा होती. पण मी २० व्या दिवशीं महाराजांस कळविलें कीं, 'एकदोन

दिवसांत मोकळीक झाल्यास बरें,' दुसऱ्या दिवशी (ता. २९।८) महाराजाची दीड तास बैठक झाली.

'पुणें सोडून नाशकास का राहता?'

'उतारवय क्षेत्रात घालवावें अशी बालपणापासून इच्छा होती. नाशिक क्षेत्र आहे व शहरही आहे मध्यवर्ती आहे. गंगामाई व राम यामुळें नाशकास पावित्र्य आलें आहे.'

'आपलें नाशकास घर आहे?'

'नाहीं.'

'मग काय पुण्यास घर आहे?'

'नाहीं. पुण्यासही नाहीं.'

'मग आपलें घर कोठें आहे?'

'हा साडेतीन हाताचा देह असेल, पडेल येवढेंच माझें घर!'

'नाशकास राहणें आवडतें मग नाशकास घर का बांधीत नाहीं!'

'रामाची इच्छा असेल तेव्हा घर होईल.'

महाराज जरा थांबले. विचार करून म्हणाले.—

'नाशकास घर बांधायला काय खर्च येईल?'

'मध्यम स्थितीच्या चांगल्या घराला २०–२५ हजार रुपये लागतील.'

'मग ही रक्कम पधरा दिवसांनीं आपल्याला मिळाली तर चालेल काय?'

‘ होय चालेल. ’

‘ मग मी पधरा दिवसानी चेक पाठवितों, आपण आलात, मोठे उपकार झाले. ’

पधराव्या दिवशी ( ता १९-११ ) नाशकास सकाळी २९ हजाराचा चेक पूना इंपीरिअल बॅकेवर दिलेला माझ्या हाती पडला. तो चेक बरोबर घेऊन मी कार्तिकीसाठीं पढरपुरास गेलो येताना पुण्यास उतरून चेकचे २९ हजार रुपये घेतले व मुबईस इंपीरिअल बॅकेंत ठेवले. वयाच्या ९१ व्या वर्षा निष्कर्ज होऊन पैसे बॅकेंत ठेवता आले

## १० : : मला हिंदुस्थाननें जवळ ओढलें !

[ मॅक्समुल्लर हा इंग्लंडचा रहिवासी झालेला जर्मन पंडित होय. १८२३ सालीं याचा जन्म झाला. लायूप्झिग आणि बर्लिन येथील विश्वविद्यालयात त्याचे शिक्षण झाले आणि हळूहळू भाषाशास्त्राच्या अभ्यासाकडे त्याच्या मनाचा कल झाला. त्यावेळीं या शास्त्राला येवढे महत्त्व प्राप्त झालेले नव्हते. किंबहुना त्याने या शास्त्राचा अभ्यास केला म्हणूनच त्या शास्त्राला येवढे महत्त्व आले असे म्हणता येईल. पण या अभ्यासाची त्याला जी एवढी गोडी लागली आणि त्यात त्याने जी येवढी चिकाटी दाखविली तिचे उगमस्थान निराळेच आहे हिंदुस्थानात इंग्रजाचे राज्य प्रस्थापित होत असता वॉरन् हेस्टिंग्जसारख्या काहीं मोठ्या अधिकाऱ्याना हिंदु लोकाचे धर्मग्रंथ, त्याचे धार्मिक तत्त्वज्ञान, त्याचे वाङ्मय आणि त्याची संस्कृति याविषयी बरेच कुतूहल वाटू लागले होते. हेच जलदीने वाढत जाऊन ज्या लोकाचा देश आपण जिंकला आहे, ते लोक जीविताच्या काहीं काही शाखात तरी आपल्या बरोबरीचे इतकेच नव्हे तर क्वचित् प्रसंगीं आपल्याहून श्रेष्ठही आहेत ही जाणीव प्रथम इंग्लंडमध्ये व मग खुद्द युरोप खंडात पसरू लागली. हिंदु लोकाचें हे वैभव मान्य करणे इंग्रजाना फार कठिण गेले. पण खुद्द युरोपमध्ये मोठमोठाल्या पंडिताच्या मनात विजेतेपणाची भावना नसल्या

मुळे त्यांनीं हे वैभव खुषीनें मान्य केले आणि त्याच्या अभ्यासाकडे आपली बुद्धि वळविली. ग्रीस व रोम ह्याच काय तीं पृथ्वीवरील सर्व ज्ञानाची मूलस्थाने आहेत आणि जगातील प्राचीनतम ज्ञान तेथेच काय तें सापडते असा युरोपात सार्वत्रिक समज होता. वरील पंडितानी हिंदु लोकाच्या वैभवाचा अभ्यास सुरू केल्याबरोबर युरोपातील हा समज डळमळू लागला आणि थोड्याच दिवसात साफ ढासळला. युरोपातील लोकाच्या मनात घडून आलेली क्रान्ति ज्याच्या प्रयत्नाने घडली त्या लोकात मॅक्समुल्लर हा अग्रगण्य होय. ह्याने संस्कृत भाषेचा फार गाढ अभ्यास केला. ऋग्वेदाचे यान इंग्रजी भाषेत उत्कृष्ट भाषांतर केले आणि सर्व वैदिक वाङ्मयासंबधानें अत्यंत खोल विचाराची आणि पांडित्यान भरलेली अशी चर्चा केली. अर्थात् त्याच्या भाषाशास्त्रविषयक व्यासंगाची उपपत्ति अशा रीतीने लागते मॅक्समुल्लर याला संस्कृत विन्याच्या अभ्यासाला इंग्लंड हा देश जास्त साईस्कर वाटला. हिंदुस्थानातील ज्या पंडितांना, मग ते नव्या तऱ्हने पढलेले असोत वा जुन्या तऱ्हेन पढलेले असोत, गीर्वाण वाणीचा आणि हिंदु संस्कृतीचा अभ्यास केला होता त्याच्याशी ओळख करून घेणे आणि ते जर खरे विद्वान् असतील तर त्याना आदर दाखविणे ही बुद्धीही मॅक्समुल्लरच्या ठिकाणी होती. १८९७ साली टिळक हे बंदिवासात असता या पंडिताने ऋग्वेदाच्या आपल्या भाषांतराची एक प्रत त्याना नजर म्हणून पाठविली. टिळकाच्या सुटकेसाठी व्हिक्टोरिया राणीपाशीं त्याने रदबदलीही केली होती असे सांगतात. याने आत्मचरित्र लिहिले आहे, पण त्यातील एक भाग आपल्या वारसाने प्रसिद्ध करू नये अशी त्याची इच्छा होती. तथापि प्रसिद्ध न करण्यासारखे त्यात काहीच नाहीं असे वाटल्यावरून वारसाने

तोहि भाग प्रसिद्ध केला त्यातील कांहीं मनोरंजक परिच्छेद पुढे दिले आहेत. त्यावरून स्वकर्तव्याविषयींची त्याची कल्पना दिसून येईल. हा इ. स १९०० सालीं मरण पावला. ]

* * * एक आरोप मला पतकरलाच पाहिजे; न्याय करणारे माझे मित्र असोत कीं शत्रु असोत, त्याच्या हातून माझी सुटका व्हावयाची नाहीं. मी आजवर ' केले ' असें काही एक नाहीं; नेह-मीच्या अर्थानें खटपट्या, गिऱ्हाइकी पैदा करणारा, बाहुली नाचवि-णारा, किंवा दिवाणजी असा मी कधींहि झालेला नाही, मीं कोणत्याही चळवळींत पाऊल टाकलेलें नाही. कधी एखाद्या क्लबाचा मेंबर किंवा चवकडींतला चंडाळ झालेला नाही. इतकेंच नाही पण अतिशय सामान्य अशा संस्था किंवा मंडळ्या यातहि मीं गेलेला नाहीं. पुष्कळ माणसें म्हणतील कीं, हा एक आळशी, अजागळ, आणि खुशालचेंडू असामी आहे; आणि माझ्या जीवितांतील थोडे-सुद्धां प्रहर जरी मीं वाया घालविले नसले तरी ही गोष्ट मला नाका-रतां यावयाची नाहीं, कीं मी कधीं लढाया खेळलों नाहीं, की नवे देश जिंकण्याच्या कामीं हात उचलला नाही, कीं अगडबब पुंजी जमा करायला एकाद्या कंपनीचा चालक झालों नाहीं. मी आपला एक व्यासंगी माणूस राहिलें आहें !

एका गांवाहून दुसऱ्या गावाला रस्ता करायला आपल्या कॉलेजां-तील मित्रांना उत्तेजन द्यावें व साह्य करावें म्हणून रस्किननें जेव्हां

हातात खोरें-कुदळ घेतलेली मीं पाहिली तेव्हा मला त्याचे कौतुक वाटलें, पण मी स्वत. मात्र केव्हाही कुदळीनें खणलें नाही, खोऱ्यानें माती ओढली नाही, की ती भरून गाडी ढकलली नाही. रस्किन् एकदा म्हणाला, " आपण जें मनन करतों, जें ज्ञान संपादितों किंवा जें श्रद्धेनें पत्करतों त्याचा शेवटी कसलाही उपयोग नसतो, उपयोगाची जर एकादी गोष्ट असेल तर आपण काय करतों ही आहे." हे त्याचे उद्गार ऐकताना मला नेहमींसारखेंच सुख वाटत असे. पण त्याचें म्हणणें मला मुळीच मानवलें नाहीं. माझी जीविताची कल्पनाच मुळी साफ निराळी आहे आपण जे काय करतों किंवा काडीला काडी लावून रचतों त्यात मला कसलेंही तात्पर्य दिसून आलेलें नाहीं येवढें मोठें निनवी शहर पण तेथें सध्या नुसतें रेताड आहे, आणि आपल्या रस्किनने बांधलेला नवा रस्ता तर केव्हाच धुपून गेला आहे ! मला वाटतें, तात्पर्य जर कशात असेल तर आपलें मनन काय आहे, ज्ञान काय आहे, आपली श्रद्धा काय आहे यांत आहे ! मला माहीत आहे कीं असले शब्द कानीं पडताच 'अब्रह्मण्यम् अब्रह्मण्यम' म्हणून रास्किन् कानात बोटें घालील आणि विशेषतः इंग्लंडांत तर बहुतेक लोक असल्या बोलण्याला केवळ धादांत पाखंड म्हणाले नाहींत तरी अत्यत धोक्याचें म्हणून त्याचा निषेधच करतील. माझा मित्र चार्ल्स किंग्ज्ले ' कष्टाळू ख्रिश्चियानिटी ' चें प्रतिपादन करी. म्हणजे असें कीं तो कांही ना कांही तरी शरीरकष्टाचें काम करीत राही. माझा आणखी एक मित्र म्हणजे कार्लाइल सर्व जन्मभर

सागत मेला कीं "जर प्रत्यक्ष हातानें काही होईना तर नुसतें बोलणें वृथा आहे...." तथापि मी जरी शरीरानें कष्ट करणारा नसलों तरी माझें सुदीर्घ आणि शात जीवित केवळ आळशी मैदा-सारखें गेलें आहे असें मी कधींहि म्हणणार नाही.

विद्याव्यासग हा मी इहलोकचा स्वर्ग समजतों, केवळ मीच असें मानतों असें नाही. इमर्सननें म्हटलें आहेच ना की व्यासंगी पंडित हा युगंधर पुरुष होय ! सबध जन्मभर ज्यानें अव्याहत धडपड केली त्या मॅझिनीला, असें म्हणावें लागलें कीं 'एक दिन जाना रे भाई'; पण या भाईनें जें सत्य संशोधिलें असेल तें मात्र त्याच्याबरोबर कधीही मरावयाचें नाही. आणि कार्लाइलनें काय केले ? तो स्वतः कधी पार्लमेंटच्या निवडणुकीला उभा राहिला काय ? कधी एकाद्या कपनीचा तो भागीदार झाला काय ? ट्रॅफल्गार चौकाचे खास शिपाई किंवा चार्टिस्ट्स याच्यांत त्यानें कधी नाव दाखल केलें काय ? मग आमच्यामागेच भुणभुण का ? मैफलींत जसे गाणारे हवे असतात तसे श्रोतेहि हवे असतात. आपल्या सार्वजनिक जीवितात जसे आरोळ्या ठोकणारे आणि टोले देणारे हवेत तसे केवळ बघत राहणारेही हवेतच कीं ! ख्रिश्चानिटी कष्टानेंच व्यक्त व्हावयाची तर प्रत्येक ख्रिस्त्याला अवश्य तेवढे स्नायु लाभलेले आहेतच;मग ट्रॅफल्गार चौकातील कष्ट क्षणभर सोडून द्या, पण कार्लाइल व रस्किन याना हाईडपार्कपर्यंतच्या एकाद्या मिरवणुकींत सामील व्हावयास काय हर-कत असते ? तेवढ्या एकाद्या फलाटावर उभें ठाकून बायका–पोरा-

पुढें व्याख्यानबाजी करावयास त्यांना कां हरकत वाटावी ? मला वाटतें दगड कापावयास आपण वस्तरे चालवूं लागलों तर वस्तऱ्यांना जें वाटेल तेंच या लोकांना वाटत असावें. ते म्हणत असतील—' हा आमचा धंदा नव्हे. '

बुद्धीशीं बुद्धि मिळाली तर बुद्धिवादांत मोठी मौज आहे. मग आपण जिंकतों कीं हरतों हें निराळें; पण स्वभावतःच जे बोजड, बथ्थड किंवा मूर्ख आहेत किंवा ज्यांच्या डोक्यांत कांहीं शिरतच नाहीं आणि जे अगदीं निर्बुद्ध आहेत त्यांच्याशीं बुद्धिवाद करणें म्हणजे मला अगदीं कंबर मोडल्यासारखें वाटतें. बहुमत म्हणजे जिकडे हात जास्त भरतील तें बहुमत, कीं ज्याचा वरचष्मा सध्यां जगभर चालू आहे, तें शुद्ध नंदीबैलांचें मत असें मला वाटतें, अर्थात् मी हें चांगलें उमगतों कीं सध्यां त्याच्याविरुद्ध वाद घालणें म्हणजे रुळांत उभें राहून धांवत येणाऱ्या आगगाडीशीं वाद घालण्यासारखें आहे. ग्लॅड्स्टनसाहेबांना बाजारी श्रोत्यांपुढें ओरडण्याचें चांगलें साधलें होतें, डिझराइलसाहेबांनाही तें साधलें होतें; दोघेहि बडे असामी आहेत. पण कार्लाइल किंवा रस्किन् याच धंद्याला उभे राहिले तर काय होईल बरें ? रस्त्यांत गोळा झालेल्या हजारों असंतुष्टांपुढें तोंड वाजविणें म्हणजे कासवाच्या पाठीवर नाहीं तर सेंट पॉलच्या घुमटावर टिचक्या मारीत बसण्यासारखें आहे असेंच त्यांना वाटेल. माझें म्हणणें येवढेंच कीं, ज्यानें त्यानें आपापलें काम करावें. पण कार्लाइल किंवा इमर्सन यांच्याइतकाही मी कार्यकर्ता नाहीं;

कारण या दोघांनीं आपल्या पुस्तकांत तरी घोशा मांडला आहे, ' अरे हें करा, अरे तें करू नका. ' ज्यू-द्रेष्ट्यांनीं हाच ठोका ठेविला होता. तेहि कोठें विटा पाडायला गेले होते असें लिहिलेलें नाहीं, पण त्यांना कोणी ' निरुपयोगी ' असें मानिलें नाही. बिचाऱ्या अभ्यासकाला मात्र तेंही समाधान मिळत नाही मधून मधून एकादे वेळीं कोणीतरी त्यांना शाबासकी देतो. हिंदुस्थानचे चिटणीस लॉर्ड डर्बी एकदां म्हणाले कीं, ' ज्या पंडितांनीं संस्कृत व इंग्लिश यांतील इतकें जवळचें नातें उघडकीस आणिलें, त्यानीं हिंदुस्थान सरकारचें एकाद्या फौजेनें जेवढें काम करावें त्यापेक्षा जास्त काम केलें आहे ! लॉर्ड डर्बीसारख्या माणसानें असे विधान कां करावें बरे ? फार दिवसाच्या अनुभवानें त्याना जें सत्य दिसून आलें त्यावरूनच ते असें बोलले कीं नाही ?

पण माझ्या स्वत:विषयी आणि ज्याला ' काम काम ' म्हणून म्हणतात त्याविषयी माझी काय कल्पना आहे तेंच मला सांगितलें पाहिजे. व्यासंग करीत असतांना एकादें नवें प्रमेय हातीं लागलें, मग तें एकाद्या विशाल द्वीपासारखें असो किंवा छोट्याशा माळजमिनी-सारखें असो, म्हणजे मला समाधान वाटते. तसेंच मित्रांची खात्री पटवायची असेल तर मी सरळ सरळ सत्य असेल तेवढेंच सांगेन व तें खुषीनें सांगेन. पण मतप्रचार करणें, कोणावर दडपण आणणें, घटना करणें, संस्था काढणें, पत्रें सुरू करणे, या असल्या उद्योगांचें मला मनापासून वावडें आहे. कांहीं सत्य आपल्याला प्रतीत झालें तर

नेमकें तसेंच प्रतीत होणारांत दहा पांच लक्ष जास्त असले काय किंवा कमी असले काय ? सत्य म्हणजे सत्य, मग लोक तें आज पतकरोत, नाहीं तर लाख वर्षांनीं पतकरोत, सत्याला कसलीच घाई नसते, मला तरी निदान तसें वाटतें.

जर्मनीच्या खालोखाल मला हिंदुस्थानानें जवळ ओढलें, आणि तेथील विचारानें माझ्या मनाला शांति प्राप्त करून दिली रोम, अथेन्स, निनवी, बाबिलोन या नांवाचा लहानपणीं आपल्या मनावर केवढा परिणाम होतो ! पण तीं नगरें आता कोठें आहेत ? ज्यासाठीं हजारों लोकानीं आपले प्राण खर्चीं घातले त्या वस्तू केवळ शब्दरूप, स्वप्नवत झाल्या आहेत, पुराणें, दतकथा, कल्पितकथा बनल्या आहेत! हिंदुस्थानात शिकण्यासारखे आहे तें हें की एकादा देश जर सुसंस्कृत बनत चालला असला तर त्यांत दोन प्रकारचे लोक असावयास हवे; ब्राह्मणांची म्हणजे विचार करणाराची जात व दुसरी लढवय्यांची म्हणजे क्षत्रियांची जात. मशागत करणाराची व सेवा करणारांच्याही जाती तेथें होत्या. लढाया येवोत व जावोत, ब्राह्मण व शेतकरी आपापल्या कामात मग्न असत. सगळ्या चळवळीस हाच न्याय लागू पडावयास हवा. राजकीय, धार्मिक, सामाजिक इत्यादींत ज्यांना लढावयाचें आहे त्यांनी लढावें, पण ज्यांना आपापली नियोजित कामें सथपणें करावयाचीं आहेत त्यांना तीं करूं द्यावीं. मला वाटतें ब्राह्मणांना हें ध्येयच साध्य करोंवेसें वाटत असावें. आळशांची किंवा ऐतखाऊची बाजू मी मांडीत नाही. पण विद्येचा व्यासंगी या नात्यानें

मला इतकेंच म्हणावयाचें आहे की, मतप्रचार, पत्रें लिहिणें, सभा भरविणें, कमिट्या, शिष्टमंडळें यातून माझ्यासारख्यांना वांचवा ! व्यवहार जाणणारे म्हणतील कीं, हा शुद्ध स्वार्थी माणूस आहे. मला त्यांना असें म्हणू द्या, पण जगाच्या इतिहासांतील महान् योद्ध्यांपैकीं एकाला ते काय म्हणतील बरें ? प्रत्यक्ष ज्यूलिअस सीझर एकदां म्हणाला, " रोमन साम्राज्याच्या सीमा वाढविण्यापेक्षा रोमन बुद्धि-वैभवाच्या सीमा वाढविणे हे अधिक उदात्त काम आहे आणि म्हणून रोमन योद्ध्यांनी मिळविलेले विजय व त्याच्या गळ्यात पडलेले हार यांपेक्षां सिसिरोनें प्राप्त केलेले विजय व त्याच्या गळ्यात पडलेले हार हे अधिक शोभादायक आहेत " यावर माझे टीकाकार काय बरें म्हणतील ?

## ११ : : मला दत्तात्रेयाचा वर आहे !

[ विष्णुबुवा ब्रह्मचारी गोखले या विचारवंत वैराग्याचा आपल्या लोकाना जेवढा परिचय व्हावयास हवा आहे तेवढा अजून झालेला नाही १८१८ साली मराठी राज्य बुडाल्यानंतर पुढील दहा वर्षांत जी मोठाली माणसे जन्मास आली त्यातच विष्णुबुवांची गणना होते याचा जन्म १८२५ साली झाला त्यानी लिहिलेले आत्मचरित्र लहानच आहे. वास्तविक पहाता सर्व जन्मभर सद्धर्मप्रचारासाठी आणि ख्रिस्ती मिशनऱ्यांची लाट परतवून लावण्यासाठी त्याने जे अविश्रान्त श्रम केले त्याची साग्र हकीकत त्याने लिहून ठेवली असती तर महाराष्ट्रातील तेव्हाच्या धार्मिक चळवळीची आपल्याला चांगली माहिती झाली असती. परंतु आत्मचरित्र लिहिणे हा जो वाङ्मयातील प्रकार आहे त्याची ओळख आपल्या लेखक वर्गाला तेव्हा नसल्यामुळे आणि थोडीशी असली तरी स्वतःच्या संबंधानेच जास्त लिहिणे हे विनयबुद्धीस सोडून आहे, असे कदाचित् वाटल्यामुळे ज्यानी आत्मचरित्र लिहिण्याची कल्पना उचलली त्यानी ती अगदी तोटकी व अपुरी राहू दिली. ज्याला आधुनिक कालात शिक्षण म्हणून म्हणतात आणि पूर्वीच्या काळी विद्येचा संस्कार म्हणत असत, त्याचा कसलाही लाभ विष्णुबुवांना झालेला नव्हता. केवळ जिज्ञासाबुद्धीने स्वतःच जे काय ज्ञान त्यांनी

संपादिलें तेवढेच. पण त्याचे मन उपजतच विशाल होते आणि त्याची बुद्धि स्वभावतःच अत्यंत कुशाग्र होती. यामुळे उत्पन्न होणाऱ्या अनेक प्रश्नांशीं त्यांची ओळख झाली आणि त्यांच्याशीं झोंबी करावयास लागणारें बळ त्यांना कमी पडलें नाहीं. इंग्रजी अमलाच्या पहिल्या पन्नाशींत जे कोणी मोठे आकांक्षी, भावनाशील असूनही अत्यंत तर्कशुद्ध बोलणारे, स्वकीयांची होत असलेली धार्मिक पिछेहाट पाहून हळहळणारे आणि ती थांबविणारेच नव्हे तर, परधर्मांच्या प्रतिपादकांना उलट टोले लगावणारे सुधारक झाले त्यांत विष्णुबुवा गोखले हे अग्रगण्य आहेत. त्यांनीं सांगितलेल्या समाजसुधारणेच्या आणि धर्मसुधारणेच्या कल्पना आपल्याला अजून पुष्कळ दिवस पुरतील. छापखाने आणि वर्तमानपत्रें यांचा महिमा वाढल्यानंतर आणि प्रत्यक्ष महाविद्यालयीन शिक्षण मिळूं लागल्यानंतरसुद्धा जे मोठाले सुधारक महाराष्ट्रांत झाले त्यांनी सांगितलेले सर्व सुधारणाविषयक विचार विष्णुबुवांच्या लिहिण्यांत सूत्रपणानें पण अत्यंत प्रसादयुक्त भाषेनें सांगितलेले आढळतात. परधर्मांचा हल्ला आला असतांना पौराणिक वाङ्मयाच्या निबिडांतून मागें हटून वैदिक कल्पनांच्या आश्रयाला जावें ही पुढें दयानंदांनी उचललेली कल्पना विष्णुबुवांनीं महाराष्ट्रांत सिद्ध करून दाखविलेली होती. देशांतील सर्व वस्तूंवर सर्व लोकांचेंच स्वामित्व असावें आणि कोणालाही त्या खाजगी म्हणून ठेवतां येऊं नयेत हा आधुनिक कालांत रूढ होत असलेला विचार विष्णुबुवांनीं तेव्हांच सांगितलेला आहे. त्यांचे लिहिणें शुद्ध, तार्किक आणि न्यायनिष्ठुर असें आहे. तेव्हांच्या कालमानास अनुसरून व त्यांनीं घेतलेल्या दीक्षेस अनुसरून एक प्रकारचा फटिंगपणा व तुसडपणा मात्र त्यांत दिसून येतो. त्यांचा मृत्यु इ स. १८७१ सालीं झाला.]

* * * माझा जन्म शालिवाहन शकाच्या सत्राशें सत्तेचाळि-साव्या वर्षी अधिक श्रावण शुद्ध पंचमीस सूर्योदयाबरोबर झाला, व माझी जन्मभूमि मुंबई इलाख्यात जो ठाणे जिल्हा आहे, त्यांतील राजापुरी तालुक्यापैकी निजामपूर पेट्यांत शिरवळी नांवाचा ग्राम-देवघाटाचे पायथ्याजवळ मोठ्या अरण्यांत शय्याद्रि पर्वताखालीं दोन नद्यांचे मध्यभागीं आहे, तीच माझी जन्मभूमि आहे व माझी उत्पत्ति ब्राम्हणवर्गात चित्तपावन ब्राम्हणाचें कुल आहे त्यांत झाली. ती अशी की, माझ्या प्रपितामहांचें नाव रामचंद्रपंत गोखले, व पितामहांचें नांव महादाजीपंत गोखले, व बापाचें नांव भिकाजीपंत गोखले, व आईचें नांव उमाबाई गोखली, व माझें नांव विष्णुपंत गोखले, असें आहे. माझ्या आईला अकरा मुलें झाली त्यांत सहा मुलगे व पांच मुली. त्यांत मी दहावा झालों. व मी लग्न केलें नाहीं. या कारणावरून व माझ्या वर्तणुकीवरून मला ब्रह्मचारीबावा म्हणतात. आता, मला वेदाध्ययन, किंवा शास्त्राध्ययन किंवा लेखनवाचनज्ञान, काय तें, माझें मौंजीबंधन सातवे वर्षी झाल्यानंतर एक वर्षपर्यंत झालें.

नंतर माझे अक्षर सहज रीतीनें आणि अल्प अभ्यासानें उत्तम जाहलें, म्हणून नवव्या वर्षी मी इंग्रज सरकारच्या जमीन-वसुलातीकडील तालुके कचेरींत उमेदवारी करूं लागलों. नंतर दीड वर्ष उमेदवारी झाल्यावर, गरीबीमुळे, व माझा बाप माझ्या वयाच्या पांचव्या वर्षी मेला म्हणून, माझ्या आईनें मला घराच्या शेतजमिनीचें उत्पन्न करण्याचे कामात, व घरची गुरें चारणें या कामांत, व लांकडें

फोडण्याचे व बागशाईचे वगैरे कामांत घातलें. तें काम मोठ्या मेहनतीनें दोन वर्षे केल्यावर मी बारावे वर्षीं माझ्या जन्मभूमीच्या गांवापासून बारा कोसांवर रायगड तालुक्यांत महाड म्हणून शहर आहे त्या महाडास भर बाजारांत वाणीपणाचे दुकानावर स्वसंतोषानें चाकरीस राहिलों, आणि मोठ्या मेहनतीनें तागडी व ताजवा भरून जिन्नस विकण्याचें व मापानें जिन्नस विकण्याचें, व कापड विकण्याचें व खुर्दा विकण्याचें सराफीचे व अल्पस्वल्प हुंडीचें, जमाखर्चाचें, व सावकारी लिहिण्याचें, हिशेबी व्याजबट्टा वगैरे काम दोन वर्षे केलें. नतर माझी इच्छा इंग्रज सरकारची चाकरी करण्याची जाहली; परंतु ज्याच्या दुकानावर चाकरीस होतों तो सोडीना; तथापि मी त्याचे हुकमानें त्यानें जितके दिवस जास्ती राहण्याची मुदत केली तितके दिवस राहून, नतर रजा घेऊन, चवदावे वर्षीं स्वसंतोषानें जहाजांत बसून, समुद्रांतून रत्नागिरीस गेलों. पुढें इंग्रज सरकारच्या कष्टम खात्यांत रत्नागिरी तालुक्यांत संगमेश्वर बंदरावर उमेदवारीस राहिलों. पुढें एका कारकुनाचे बदलीनें दोन महिने सरकार चाकरी केली. नंतर ठाणें जिल्ह्यात निघून आलों, आणि परीक्षेस्तव इंग्रज सरकारांतून क्यामेटी बसून परीक्षा झाल्या त्यांत मी परीक्षा देऊन सरकार चाकरी देण्यास लायक ठरलों. नतर लागलीच मला सोळावे व पंधरावे वर्षाचे मध्यभागीं सरकार चाकरी ठाणें जिल्ह्यांतील साष्टी तालुक्यांत कष्टम खात्यांत मिळाली. नंतर मिठाकडील बंदोबस्ताचीं व जलमार्ग जकातीचीं वगैरे कामें, मुकत्यारीनें वगैरे, साष्टी, वसई,

कल्याण, भिवंडी, उरण व कष्टम कलेक्टर–कचेरी वगैरे, सात वर्षे मेहनत घेऊन व हुशारीनें व अब्रूनें सरकारची चाकरी केली.

परतु लहानपणापासून वेदोक्त धर्मांचा विचार करण्याची सवय होती, त्यामुळें मी वेदोक्त धर्माचीं पुस्तकें वाचीत असें; व ऐकत असें; त्यापासून माझी बुद्धि पापभीरु झालेलीच होती. पुढें माझ्या वयाचे विसावें वर्षी मला ईश्वराकडून साक्षात्कारद्वारां सूचना झाली. नतर मी आपले वयाचीं तेवीस वर्षे, आठ महिने, तेवीस दिवस झाल्यावर कौपीन धारण करून एकात विचार करण्याकरता सप्तश्रृंगीचे डोंगरावर व आजूबाजूचे अरण्यात वगैरे गेलों. त्या ठिकाणीं निर्मनुष्य स्थलावर कांहीं वर्षे मास दिवस भक्ति करून निवास केला. तों मला आत्मप्राप्तीच्या अत्युत्कंठतेमुळें व विचारामुळें, ईश्वराचे साक्षात्कार होऊन, आत्मज्ञानप्राप्ति झाली. पहा, मला ईश्वरावांचून सद्गुरु कोणी मिळाला नाही. पूर्वी मीं व्यवहारांत असतांना व व्यवहार सोडल्या-वरही ज्ञानाच्या गोष्टी कोणाजवळ विचारावयास गेलों म्हणजे त्याणें सांगावें कीं, आमची पूजा कराल व आमचा मंत्रोपदेश घ्याल तर मग आम्हीं ज्ञान सांगू. त्याप्रमाणें मी बहुताचे, त्यांची परीक्षा पहाण्याकरतां, मंत्रोपदेश घेतले आणि नंतर त्यांना ज्ञानाच्या गोष्टी विचारल्या, परतु त्यांना ज्ञान नाहीं असें मीं समजलों व ते सर्व अज्ञानी व ढोंगी आहेत असें मी उघड समजत गेलों. कारण कोणी दारुबाज, कोणी किमयाच्या फंदात, कोणी जादूच्या नादांत, कोणी विषयाच्या छदांत, कोणी द्रव्यलोभी भोंदू, कोणी मतवादी, इत्यादि

बहुतेकांचा तपास मीं केला शेवटी त्या सर्वांना प्रश्न केले तों त्याचें बोलणें मूर्खपणाचें, व संशययुक्त, व शंकेचें समाधान करवेना, म्हणजे आपणच अज्ञानी असें ठरतें, परंतु आपल्याला कोरडा मोठेपणा मिळावा म्हणून शंका घेणाऱ्या दुसऱ्यास नास्तिक म्हणविणारे असे सर्व लोक मीं अनुभविले. नतर ते ढोंगी लोक लुच्चे असें जाणून मी विचार केला कीं अरेरे ! या गुरु म्हणवून घेणाऱ्या ढोंग्याना धिक्कार असो. ह्या ढोंगी लोकाना आपण अत:पर समजून रहावें, आणि प्राणावसानापर्यंत एक ईश्वराची आराधना प्रेमळपणानें ग्रथ वाचून कशी करावी हें जाणतच आहों. त्याप्रमाणें एकाग्रचित्तानें भक्ति करावी असा निश्चय केल्यानंतर सप्तशृंगीचे अरण्यात गेलों, आणि ईश्वरावर भरंवसा ठेवून अरण्यासबधी कंदमूलफळ भक्षण करून, झर्झरोदक पान करून, गुहेंत वगैरे ठिकाणी निर्मनुष्य स्थळीं नग्न अवधूत राहिलों, आणि वेदांत विचार ध्यानधारणा अतिशय केली. तेणेंकरून ईश्वरानें दयाळूपणानें मला अनुभविक आत्मज्ञानी करून, उपदेश करण्याची आज्ञा केली. म्हणून मी उपदेश करीत फिरत आहें.

मी अनेक मतवाद्याच्या जमावात राहिलों आहें, व अनेक लोकांस पारखून पारखून सोडलें आहेत, व जगांतील अनेक कपटें, व अनेक खरेपणाचीं कृत्यें, सर्व मीं पाहिलीं आहेत; व लाखों मनुष्याबरोबर वादविवाद, धर्मविषयावर करून, त्यांचीं मतें खडण केलीं आहेत. मला हजारों मनुष्यांच्या सभेंत ज्या ज्या इसमास

जें जें पाहिजे तेंच सुचतें हाच काय तो माझ्यात गुण आहे. तो दत्तात्रेयाचा मला वर आहे. मला प्रश्नाबरोबर तत्काळ आणि जलद उत्तर देऊन समाधान करता येतें. कसलेही कोणी का संशय काढीना, मी त्याच्या सशयाचें छेदन करतों आणि समाधान देतों. मला दत्तात्रेयाचा वर आहे त्यामुळें बोलण्यात मला कोणी जिंकील असें नाहींच नाहीं. हा अनुभव बहुतानी पाहिला, तसा आणखी पहा. मला महाप्रसग पडला तरी निर्भयता दिसत्ये. माझें बोलणें स्वतःच्या अनुभवाचें, व युक्तीचें, व शास्त्रप्रमाणानें सिद्ध असतें, त्यामुळें कोणाचा इलाज चालत नाही व चालणार नाहीं. मी कोणाच्या घरीं घरगुती चाकरी केली नाहीं त्यामुळें मला खुषामत करण्याची सवयच नाहीं. म्हणून जे खुषामती करून घेणारे व करणारे असे अज्ञानी असून, आढ्यता मिरवितात तेही अंतरातून मला जब्बर समजतात, तरी पण बाह्यात्कारीं माझ्या पाठीमागें माझी निंदा करतात. खरे जे निष्पक्षपाती ज्ञानेच्छू आहेत ते माझी यथाशक्त्या स्तुति करतात. आणि मी तर सर्वास म्हणजे निंदिणाऱ्यास व वंदिणाऱ्यास आत्मप्राप्ति होईल असा समान उपदेश करतों. आता तुम्ही सुचेल तसें म्हणा.

.......हे ईश्वरा, तूं मला अरण्यांत शंकरपार्वती—रूपानें अनेक वेळां दर्शन देऊन आज्ञा दिल्हीस कीं माझ्या वेदोक्त विषयात ज्या तारक गोष्टी आहेत त्या लोकांच्या मनांत ठसवून दे; कारण कीं त्या गोष्टींचा लोप झाला आहे. त्या तूं सागितलेल्या गोष्टी मी

जगांत प्रगट केल्या आणि ह्या वेदोक्त धर्मप्रकाश ग्रंथात व भावार्थ सिंधु ग्रंथांत लिहून सर्वांस दिल्या. या गोष्टी ऐकून सर्वांचे अंतःकरणांत ज्ञान उद्‌भूत व्हावें याविषयीं तुझी कृपारूपी दृष्टि सर्वांकडे व्हावी. हे ईश्वरा, बापा, तूं दत्तात्रेय अवताररूपानें दर्शन देऊन बोललास कीं, तू जगात तारक उपदेश कर. पण त्या वेळेस मी बोललों कीं, मला संस्कृत भाषा येत नाहीं. मग तूं हास्यवदन करून बोललास कीं, जा विष्णु ! तूं सहज भाषण करशील तोच वेदगर्भांचा परमसिद्धान्त होईल. त्याप्रमाणें या जगात मी बोलतो आणि सर्व पोकळींत तुझे ज्ञानरूपी कान आहेत म्हणून तूं ऐकतोस. यासाठीं त्या बोलण्यात चुकभूल अथवा यथार्थ, जें काय तू बोलवितोस ते मी बोललों. यास्तव सर्वच बोलण्याचा अभिमान मला नसो.

.......अरे बारीक सुईच्या नेढ्यात दोरा ओवणाऱ्यास कुऱ्हाडीच्या व कुदळीच्या पावड्याच्या इत्यादि स्थूल नेढ्यात दांडा ओवणें काय कठिण ! त्याप्रमाणेंच आत्मविद्येने माझी सूक्ष्म बुद्धि झाली आहे त्या मला अन्य विद्या कळणें काय अशक्य ! मजसाठीं रडाल, अरे, माझी आठवण कराल "ब्रह्मचारीबावा लंगोटी घालून कफनी गळ्यात घालून लोकास ज्ञान व नीति सांगतात तसे ब्रह्मचारीबावाच्या वेषासारखे आमच्या घरोघर येतात, त्यांना ज्ञान नसतें, मग ब्रह्मचारीबावाच अधिक काय आहेत" असा विचार लोकहो ! तुमच्यांत होतो, परंतु फसाल, मी गेल्यावर

फसाल : कारण तुम्हास तरणोपायास्तव आत्मज्ञानी झालेंच पाहिजे, तेव्हा माझी आठवण कराल, आणि रडाल कीं आम्ही विषयमस्तीनें फसलों, आता ज्ञान कोठून ? तर माझा हा ग्रंथ तरी वाचा अथवा ऐका . वेदोक्त धर्माप्रमाणें उपदेश करण्याचा माझा सांप्रदाय आहे, तो सोडून मी लोकांच्या मनधरणीकरता अशास्त्र उपदेश करूं कीं काय ? माझा प्राणान्त झाला तरीही मी अशास्त्र उपदेश करणार नाहीं, हीच माझी प्रतिज्ञा आहे. कारण मला परमेश्वराचा पूर्ण साक्षात्कार आहे. त्या माझ्यानें अशास्त्र उपदेश कसा करवेल ?....

अतिशूद्रास वगैरे असें बोलूं नये कीं तुम्ही नीच आहां, तुम्ही नीच आहां. कारण असें नित्य त्यांना बोलूं लागलें कीं ते अधिकच नीच होतात यास्तव भूदेव जे श्रेष्ठ ब्राह्मण त्यांणीं नीच अवस्थेंतील मनुष्यास उत्तम स्वभाव अभ्यासवून त्यांना नीच पदवीपासून मुक्त करून उत्तम पदवीस आणावें, कारण नरदेह हा उत्तम पदवी मिळविण्यास योग्य आहे आणि ब्राह्मणांनीं हेंच आपलें मुख्य कर्तव्यकर्म आहे असें स्मरावें. आतां हें त्यांना, मातेस बाळकाच्या सूचना देण्याप्रमाणें स्मरण दिल्हें आहे. कारण माझी मातापिता चित्तपावन ब्राह्मण व माझ्या देहाची उत्पत्तीपासून गणना ब्राह्मण वर्गात श्रेष्ठपणानें आहे म्हणून सर्व ब्राह्मण माझे आईबाप आहेत. म्हणून मीही निर्भयपणानें बोललों—आम्ही वेदप्रतिपाद्यधर्माची माहितगारी करून देऊन भ्रष्टता दूर करणारे वस्ताद आहों. या कारणांमुळें जेथें फार भ्रष्टता असेल तेथेंच आमचें आगमन, तेथेंच आमचें काम, तेंच आमचें स्थळ—वेदाच्या भागांची निंदा करणारीं

अशीं अनेक मतें उत्पन्न झालीं. ही सर्व मतें माझ्याशीं वाद घालताना लयास गेलीं—माणसावर प्रवासात व तीर्थयात्रेस जाण्यात दंगेखोराच्या हस्तें अनर्थ गुजरतात : मजवरही हे सर्व अनर्थ गुजरले पण भयंकर रीतीनें मी सुटलेला आहें—अरे शिव्या दिल्या म्हणोन निंदा कराल तर तुम्हाला खचित सांगतों मी ब्रह्मचारीबावा आहे. माझ्या शिव्याचा विचार करा. माझ्या शिव्या साधारण नाहींत. माझ्या शिव्या तत्त्वमसि महावाक्याच्या बरोबरीनें उपदेशक आहेत.

शालिवाहन शकाच्या सत्राशे चौसष्टाव्या वर्षी पाश्चिम दिशेस धूमकेतु ( आकाशातील चकमकणाऱ्या गोळ्यापासून सुटलेला प्रकाशाचा खांबासारखा झोत ) जमिनीवर टेकलेला, वैशाख व ज्येष्ठ या दोन महिन्यांच्या बहुतेक दिवशी मी पाहिला : व शालिवाहन शकाच्या सत्राशे ऐंशीच्या वर्षी भाद्रपदाच्या वद्यपक्षात व आश्विन शुद्धपक्षात पुच्छकेतु,-मीं पाहिला. आता पहिल्या धूमकेतूचा विचार केला तर तो सिंधु देश व मुलतान देश या देशावर त्यांच्या दक्षिण दिशेनें उतरला होता. याचे फळ पाहूं गेलो तर ते दोन्ही देश बहुधा त्या वेळेसच युद्धप्रसंगाने परस्वाधीन झाले. मागाहून जो पुच्छकेतु पाहिला तो दिसण्याच्या अगोदरच सत्रा महिने अन्य द्वीपनिवासी लोकाचें आणि हिंदुस्थानच्या कांहीं हिंदु लोकाचें हाडवैर पडलें आणि एकमेकाचे एकमेकानीं निर्दयपणानें प्राणनाश केले व अद्याप करीतच आहेत असा रक्तपात झाला. अरेरे, अद्यापि रक्तपाताचा शेवट झाला नाही; याचें कारण त्या पुच्छकेतूचें पुच्छ पश्चिमेकडून हिंदुस्थान देशावर लवलेलें दिसतें हेंच असावें, असें अनुमान होतें.

# १२ : : हा प्रश्न लष्करी खात्याचा आहे !

बिस्मार्क हा आजवर झालेल्या सर्व जर्मन मुत्सद्यात श्रेष्ठ मुत्सद्दी ठरलेला आहे याचा जन्म इ स १८१५ साली झाला प्रशियन सरकारकडे नोकरींत असतानाच याचे राजकारणपटुत्व लोकाच्या ध्यानात येऊ लागले होते फ्रँक फोर्ट, सेंट पीटर्सबर्ग आणि पॅरिस या तीन ठिकाणी त्याने मोठे जोखमीचे राजकारण केले १८६५ सालीं प्रशिया देशाचा राजा पहिला वुइल्यम यान त्याला आपला मुख्य प्रधान नेमले दोघाच्याही राजकीय आकाक्षा एकच असल्यामुळ वुइल्यमने बिस्मार्कच्या मुत्सद्देगिरीस पूर्ण वाव दिला वटबर्ग, सॅक्सनी, बव्हेरिया इत्यादि अनेक जर्मन सस्थाने प्रशियापासून अलग असत या सर्वांचा एक मोठा गट करावा आणि त्याच्या अग्रस्थानी प्रशिया देश असावा अशी या राजाची आणि प्रधानाची उत्कट इच्छा होती पण ह घडन यावयास पूर्वेच्या बाजूला ऑस्ट्रियाचे बल क्षीण करावयास हवे होते आणि पश्चिमेच्या बाजूला फ्रान्सचा वरचष्मा कमी व्हावयास हवा होता हे व्हावयाचे म्हणजे या दोन्हीं देशाशीं युद्ध करणे प्राप्त होते. बिस्मार्क याने आपल्या राजकारणाचे डाव असेच चालू ठेवले कीं, या दोनही राष्ट्राना जर्मनीशी युद्ध करणे अवश्य वाटू लागले. आपणच आरभलेल्या डावाप्रमाणे केव्हा ना केव्हा तरी आपल्याला याच्याशी युद्ध करावे

लागेल हे ओळखून बिस्मार्कने युद्धाची फार मोठी तयारी करून ठेवली होती. १८६६ साली ऑस्ट्रियाशी युद्ध सुरू झाले आणि एक दोन धडकात त्या देशाचा बिस्मार्कने चुराडा उडविला. पुढे १८७० साली फ्रान्सशी युद्ध झाले आणि युद्धमंत्री फॉन मोल्टके याच्या रणचातुर्याने फ्रान्सचे एवढाले पराभव झाले की, फ्रेंच बादशहा तिसरा नेपोलियन हा कैद झाला आणि फ्रान्स शरण आला. सर्व जर्मन संस्थानाच्या एकीकरणाला अवश्य असलेले हे विजय संपादन केल्यानंतर प्रशियाच्या छत्राखाली या सर्व संस्थानांचे मिळून जर्मन साम्राज्य स्थापित झाले आहे अशी घोषणा फ्रान्सच्या राजधानीतील व्हर्सायच्या राजवाड्यातच बिस्मार्क याने केली. या साम्राज्याचे संरक्षण आणि संवर्धन करण्याचे काम बिस्मार्क याने अनेक वर्षे केले. पहिला वुइल्यम मरण पावला व त्याचा मुलगा फ्रेडरिक हाही मरण पावला. त्यानंतर दुसरा वुइल्यम हा गादीवर आला. हा राजा स्वतःच मोठा कर्तबगार असल्यामुळे त्याचे व बिस्मार्कचे जमेनासे झाले. आणि शेवटी १८९० साली त्याने आपली प्रधानकीची वस्त्रे खाली ठेवली. १८९८ साली या थोर मुत्सद्याचा अन्त झाला. गेल्या शतकाच्या शेवटच्या तीस वर्षांत युरोपियन राजकारणावर बिस्मार्कच्या धोरणाची मोठीच छाप पडलेली होती. ह्याच्या एवढा करडा मुत्सद्दी आजवर कदाचित् झालाही नसेल. आपल्या हेतूच्या सिद्धीसाठी लष्करी सामर्थ्याचा उपयोग करावयास मागेपुढे न पाहणारा हा माणूस होता. निर्बळ भावनांना तो यत्किंचितही किंमत देत नसे. त्याच्या अमलात जर्मनीचे वैभव घरात आणि बाहेर फारच वाढले. याने लिहिलेल्या आत्मचरित्रात अनेक गमतीची प्रकरणे आलेली आहेत. आपल्यावर लहानपणी कसकसे प्रसंग आले, आपल्या बरोबरचे लोक

कशा प्रकारचे होते, आणि फ्रान्सचा बादशहा आपल्या हातीं आल्यावर आपण कसे वागलो इत्यादींचे त्याने जे मोठे सरस वर्णन केले आहे ते पुढील थोड्याशा परिच्छेदात दिले आहे. ]

* * * अगदीं नाहीं नाहीं म्हटलें तरी मी सुमारें पन्नास वेळां तरी घोड्यावरून पडलों असेन. घोड्यावरून खाली आपटणें यांत विशेष काहींच नाही पण पडल्यावर जर कां तुम्ही घोड्याच्या खाली सापडलात तर मात्र फजिती आहे. एकदां माझ्या बरगडीचीं तीन हाडें मोडली. मला वाटलें आता सगळाच ग्रंथ आटोपला ! पण वाटलें होतें तितकी इजा मला झाली नव्हती. ठणका मात्र फारच लागला होता मी ऐन जवानींत असतांना असाच एकदां घोड्यावरून पडलों तेव्हा आपल्या विचारशक्तीचा आणि मेंदूचा किती निकट संबंध आहे हें माझ्या ध्यानी आलें. मी आणि माझा भाऊ असे दोघेजण घोड्यावरून चाललों होतों. दोघांनीही घोड्याला टाच दिली आणि ते भरधांव निघाले माझा भाऊ थोडा पुढे होता. त्याला वाटलें कीं, कांही तरी ताडकन् वाजलें. तो मागें पाहतो तों माझें डोकें सडकेवर आपटलेलें त्याला दिसलें. समोरून येत असलेल्या एका गाडीतील कंदिलाला माझा घोडा बुजला आणि एकदम दोन पायांवर उभा राहिला आणि पाठिवर आपटला. मीही कोलमडून डोक्यावर पडलो कांहीं वेळ मी बेशुद्धच होतों. शुद्धीवर आल्यावर

माझ्या ध्यानांत आलें की, आपल्याला कांही गोष्टी स्वच्छ कळत आहेत पण काही मात्र मुळींच ध्यानात येत नाहीत. मी घोडयाचें वर्तमान काय आहे तें पाहिलें तेव्हा लगाम तुटला आहे असें आढळून आले. म्हणून मी मोतद्दाराला बोलविलें आणि त्याच्या घोडयावर बसून घरी गेलों. मी घरी आलो म्हणून घरची कुत्री जेव्हा लाडानें भुंकूं लागलीं तेव्हा मला वाटलें हीं कुत्रीं कोणाची आहेत कोणास ठाऊक मी त्याच्यावर फार रागावलों आणि त्यांना माझ्या समोरून हाकलून दिलें मग मी घरांत सांगितलें की, मोतद्दार घोडयावरून पडला आहे आणि म्हणून त्याला आणावयास डोली पाठवावयास हवी, परतु घरची माणसें कांहीच हालचाल करीनात हें पाहून मला फार राग आला. त्या बापडयाला हे लोक तसाच सडकेवर पडला राहू देणार की काय ? पण घरातले लोक अगदी घुम्मच बसले कारण माझ्या भावानें मी असा बावचळल्यासारखा का करतों याचें मर्म सांगितलें होतें. मला शुद्धच नव्हती आणि मी घरी आलों आहें हेंही मला कळत नव्हतें. तसेंच मोतद्दार आणि आपण दोन्ही आपणच बनलों होतों याचाही उमग मला पडला नाही. मग मी थोडेसें खाल्लें आणि झोपी गेलों. रात्रभर झोप लागल्यानंतर सकाळी मी अगदी नेहमींसारखा झालों. पुन्हा एकदां असेंच झालें होतें. एका झाडींतून मी घोडयावरून चाललों होतों. घोडा एका खांचेवर थोडा ठेचाळला आणि साफ खालीं पडला, आणि मीही बेशुद्ध झालों. चांगला तीन तास मी तसाच पडलेलों होतों आणि घोडा माझ्या-

शेजारी उभा होता. शुद्धीवर आल्यावर मी जवळच्या एका शेतांत गेलों. रक्तानें माखलेलें माझें तोंड पाहून शेतकऱ्याची बायको दूर पळाली. तथापि तिचा नवरा जवळ आला आणि त्यानें माझें रक्त पुसून काढलें. मग मी कोण, काय, हें त्याला सांगितलें आणि मला अगदींच हलवत नव्हतें म्हणून त्यानें गाडींत घालून मला घरीं पोहोचविलें. खोगिरावरून मी चांगला बारा चौदा हात दूर उडालों होतो व झाडाच्या बुंध्यावर आपटलो होतों. डॉक्टरनी जेव्हा मला तपासलें तेव्हां ते म्हणाले, " आमच्या शास्त्रनियमाप्रमाणें पाहतांना तुमची मानच मोडावयास हवी होती. " आणखी दोन तीनदां माझा जीव असाच धोक्यांत सापडला होता. १८९२ चा सुमार असावा. सेमरिन गाडीचा रस्ता अजून पुरा व्हावयाचा होता. कांहीं मंडळी बरोबर घेऊन मी एका बोगद्यांतून चाललों होतों. आंत अगदी काळोख किट्ट होता. हातांत कंदील घेऊन मी पुढे चाललों होतों. पण वाटेंत एक मोठी भगळ होती. चांगली पंधरा फूट खोल आणि पांच चार फूट रुंद असलेल्या या भगळीवर एक फळी टाकलेली होती. ही फळी कुजलेली असावी असें वाटतें. कारण तिच्यावर माझें पाऊल पडतांच ती काडकन् मोडली अन् मी खालीं पडलो. पण स्वाभाविकपणेंच मीं दोन्हीकडे हात पसरलेले असल्यामुळे दोन्हीं कडांचा आश्रय मला मिळाला आणि मी लोंबत राहिलो. दिवा अर्थातच गेला होता, बरोबरच्या लोकांना वाटले कीं, मी खास खालीं आपटलों ते मला म्हणाले, " अरे, मेलास का ? " त्यांना वाटलें,

त्या नाल्याच्या तळांतून उत्तर येईल. पण मी जवळच लोंबत होतों! तेथूनच म्हणालों, " नाहीं अजून जिवंत आहें ! "

या गोष्टीची मोठीच जिकीर होते कीं जो कोणता बेत मीं पहिल्यानें करावा त्यासंबंधानें पाचसहा माणसाशीं मला उरसफोड करावी लागते, वास्तविक यांतल्या एकालाही या विषयाचें कसलेंही ज्ञान नसतें. पण चर्चा म्हटली कीं, हे लोक काही ना कांहीं तरी आक्षेप काढतात आणि यत्किंचितही न चिडतां त्या सर्व आक्षेपांचें निरसन करीत बसणें मला भाग पडतें. यामुळें अलीकडे असें झालें आहे कीं, ज्या एखाद्या गोष्टीचा मीं तीन मिनिटांत निकाल लावला असता तिचा निकाल लावावयास तीन दिवस खर्ची पडतात एखादा तोफखाना कोठें बसवावा याविषयीं मी आपलें मत द्यावें आणि लष्करी अधिकाऱ्यानें माझें म्हणणें खोडून काढून माझें समाधान करावें अशातलाच हा प्रकार आहे. काल असें झालें की, मोल्टके आणि रून हे दोघे माझ्याशीं बोलत बसले होते. माझें म्हणणे काय आहे हें मी त्यांना समजावून सांगितलें. रून याला दरबारी शिष्टाचाराच्या पद्धति माहीत झालेल्या ! त्यामुळें गप्प बसून त्यानें मला खुशाल बोलूं दिलें आणि शेवटीं म्हणाला, "आपण म्हणता तें बरोबर आहे." इकडे मोल्टकेही माझें बोलणें लक्ष लावून ऐकत आहे असेंच मला वाटत होतें. बाजूनें पाहिलें असतां या मोल्टकेचा चेहरा अलीकडे अधिक अधिकच एखाद्या गिधाडाच्या चेहऱ्यासारखा बनत चालला आहे असें वाटतें. माझें बोलणें संपतांच हा बोलूं लागला, पण

हा काय म्हणतो आहे हेंच मला कळेना. माझ्या ध्यानांत आलें कीं, आपण इतका वेळ बोलत होतों त्याच्याकडे या बापड्यानें यत्किंचितही लक्ष नसावें. उलट ज्याचा प्रस्तुताशीं कांहींही संबध नाहीं त्या विषयाचीं वळवटें हा मनांत वळीत बसला असावा. वास्तविक पाहतां मोल्टके हा विलक्षण बुद्धिमान मनुष्य आहे आणि ज्या गोष्टीकडे तो बारकाईनें लक्ष देईल ती गोष्ट त्याला कळेलच कळेल अशी माझी खात्री आहे. पण आज कित्येक वर्षे तो एकाच विषयाचें–लष्करी प्रश्नाचें–चिंतन करीत राहिला आहे आणि त्यामुळें दुसरा कोणचाही विषय त्याच्या डोक्यांत शिरत नाहीं आणि त्यांत त्याचें मनही लागत नाहीं. पण आपलें इतक्या वेळचें बोलणें केवळ बहिऱ्यापुढे गायल्याप्रमाणे झालें हें पाहून मलाही थोडा राग आला. आणि मीही एका निराळ्या तऱ्हेनें सूड घेतला. आपण काय म्हणालों हें मीच पुन्हा बोलून दाखवण्याच्या ऐवजी मी रूनला म्हणालों, तुम्हीं आपलें मत मला दिलेंच आहे. याचा अर्थ असा आहे कीं, मी काय म्हणालों हें तुम्हाला कळलेलें आहे मेहरबानी करून काय कळलें तें पुन्हां एकदां सांगाल काय ? "

१ सप्टेंबर महिन्याच्या पहिल्याच दिवशीं जी लढाई झाली ती संपताच फ्रेंच सरकारशीं वाटाघाट करण्यासाठीं मी व मोल्टके असे दोघेजण, सेडनपासून आठदहा मैलांवर असलेल्या दोनचेरी गांवाला गेलों. वाटाघाट मध्यरात्रीपर्यंत चालली होती. पण कांहींच निष्पन्न झालें नाहीं. बोलणें करतांना आमच्याबरोबर ब्लू मेंथाल आणि

तीनचार दुसरेहि मोठाले लष्करी अंमलदार होते. फ्रेंचांच्या बाजूनें बोलणें करण्याचें काम सेनापति विपफेन याजकडे होतें. मोल्टके यानें आपलें म्हणणें अगदीं थोडक्यांत मांडले. त्यांची मागणी अशी की, सगळेंच्या सगळें फ्रेंच सैन्य युद्धकैदी म्हणून आम्हांस शरण आलें पाहिजे. विपफेन म्हणाला, " ही अट फार कडक आहे, आमच्या सैनिकांनीं युद्धांत मोठेंच शौर्य प्रगट केले आहे आणि म्हणून तुम्ही त्याच्याशीं असें वागता कामा नये, यापुढें युद्धांत न पडण्याची अट जर त्यानी पत्करली तर त्याना तुम्ही सोडून द्यावे व ज्या दुसऱ्या कोणच्या टापूंत त्यानी जाऊन रहावें असें तुम्ही ठरवाल तेथें त्यानीं जाऊन रहावें, आग्रहच असेल तर त्यांना तुम्ही अल्जीर्स येथें रवाना करा. " तथापि फार न बोलतांना मोल्टके यांनीं आपलीच अट पुन्हां एकदा सांगितली. विपफेन यानीं आपल्यावर किती विपरित प्रसग आला आहे हे पुन. पुन. सांगितलें. ते म्हणाले, " दोन दिवसांपूर्वीच मी आफ्रिकेंतून इकडे आलों आणि फौजेत दाखल झालों. मॅकमेहन याला लढाईच्या शेवटीं शेवटीं जखम झाली आणि म्हणून सैन्याचें अधिपत्य माझ्याकडे आलें आणि मागोमाग शरणचिठ्ठीवर सही करण्याचा प्रसंग माझ्यावर ओढवला आहे. माझ्या मनांतून किल्ला झुजत ठेवावा असें आहे किंवा तुमचा वेढा फोडण्यासाठीं तुमच्यावर तुटून पडावें असेंही मला वाटतें. " आमच्या सेनापतीनें उत्तर केलें कीं, तुमच्यावर हा विचित्र प्रसंग यावा याचें मला फार वाईट वाटतें. पण तेवढ्यामुळें माझी अट मला ढिली करतां येईल असें वाटत नाहीं,

फ्रेंच शिपाई शूर आहेत असें आपण म्हणता तें मलाही मान्य आहे. पण सेडनचा किल्ला झुंजवू म्हणून तुम्ही म्हणता तें मात्र मला शक्य दिसत नाहीं आणि आमची फळी फोडून बाहेर पडण्याचा तुमचा मनसुबा तर विचारांत घेण्याचीही जरूरी नाहीं, मी म्हणतों हें खरें कीं खोटें हे पहावयाचें असल्यास तुम्ही आपला कोणीतरी अमलदार आमच्या तळावर पाठवा त्यानें नीट निरीक्षण करावें आणि तुमचा हा बेत कितपत शक्य आहे याविषयी आपली खात्री करून घ्यावी

यावर विंपफेन यानी मुद्दा माडला कीं, " राजकीय धोरण म्हणून तरी तुम्ही सौम्य अटी घालाव्या, तुम्हांलाही तह जितका लवकर होईल तितका हवाच आहे आणि तो जितका टिकाऊ स्वरूपाचा होईल तितकाही हवा आहे, आणि असें जर आहे तर थोडेसें औदार्यानें वागल्यानें दोन्ही गोष्टी आपोआपच साधतील. फौजेला जर तुम्ही दिलदार मनाने वागवलेंत तर फौजेंतील सर्व शिपाई आणि एकंदर जनता हीं दोघेंही तुमची उपकारी होतील, आणि त्याच्या मनात तमच्याविषयी मित्रभाव उत्पन्न होईल. उलट तुम्ही जर आपलेंच म्हणणें धरून बसाल तर या वैरभावाचा शेवट कधीही होणार नाही " येथें या दोघांच्या बोलण्यांत मी पुढें झालों. कारण विंपफेन याने काढलेला मुद्दा माझ्या टापूंतील होता. मी त्यांना म्हणालों, " एखादा राजा उपकार स्मरेल असें कोणी म्हटलें तर मला तें शक्य वाटतें. पण कोणी लोक उपकार स्मरतील या गोष्टीवर माझा विश्वास बसत नाहीं आणि त्यातल्या त्यांत फ्रेंच लोक आमचे उपकार मानत

राहतील हें तर मला मुळींच खरें वाटत नाही. आपणच पहा कीं, याच्या सस्थाना काहीं शाश्वति आहे काय ? आज हें प्रधानमंडळ, उद्यां तें प्रधानमडळ, आज या राजाशीं स्वामिनिष्ठा, उद्यां त्या राजाशीं स्वामिनिष्ठा, यामुळें असें होतें कीं, जें नवें सरकार अस्तित्वात येतें तें आधींच्या सरकारच्या वचनांनीं मुळींच बांधलेलें राहत नाहीं. तुमच्या बादशहाचें सिंहासन जर डळमळलें नाहीं तर आम्हीं अधिक सौम्य अटी घातल्यामुळें तुमचे बादशहा कृतज्ञ राहतील हें मला शक्य दिसतें. पण सध्याच काय परिस्थिति उद्भवली आहे ती तुम्हीं पहा. अर्थात् आम्हाला मिळालेल्या यशाचा पूर्ण फायदा करून न घेणें हें अगदीं मूर्खपणाचें ठरेल. फ्रेंच लोक मोठे मत्सरी आहेत आणि ते आमचा हेवाही करतात. आम्हाला ऑस्ट्रियावर जय मिळाला याचा त्याना काय म्हणून राग यावा ? वास्तविक पाहता आमच्या त्या जयानें त्याचें कसलेंहि नुकसान झालेलें नव्हतें तरी त्यांच्या मनाला ती गोष्ट लागून राहिली होती असें जर आहे तर आता खुद्द सेडन गावींच—खुद्द फ्रान्समध्येंच—आम्हीं त्याचा पराभव केलेला असल्यामुळें, आमच्या अटी किती जरी सौम्य असल्या तरी त्याच्या मनातील दश कसा नाहींसा होणार ? ”

विपफेन हे उत्तरादाखल म्हणाले, “ छे हो ! तसे होणार नाही. अलीकडे फ्रेंच लोक अगदीच बदलले आहेत. युद्धांतील यशापेक्षां शांततेच्या वैभवाची किमत त्यांना प्रस्तुतच्या बादशाहींत जास्त आवडूं लागली आहे. सर्व राष्ट्रं हीं एकमेकाचीं भाऊभाऊ आहेत

असेंहि उंच घोष करून मान्य करावयास ते तयार आहेत. " फ्रेंच सेनापति यासारखें बरेंच बोलत राहिले. वास्तविक पाहता त्याचा मुद्दा उलटविणे अगदी सोपे होतें तसेंच त्याच्या अटी मान्य केल्यानें युद्ध हें संपण्याऐवजी चालू राहण्याचाच संभव कसा आहे हेंहि सिद्ध करणें शक्य होतें. पण बोलणें संपवावयाचें म्हणून मी एवढेंच म्हणालों कीं, तुम्ही कांहींही म्हणा, आमच्या अटी आम्हाला परत घेता येत नाहींत. यावर फ्रेंच सेनापति कासल्नो बादशहाच्या वतीनें म्हणाले कीं, काल बादशहाने तलवार खालीं ठेवली तेव्हा त्याना असेंच वाटत होतें की, आपण शरण गेलो तरी आपली मानखंडणा होणार नाही. मीं विचारलें, " ती तलवार कोणाची होती ? बादशहाची होती, का फ्रान्स देशाची होती ? " सेनापतीने उत्तर केलें, " ती दुसरी कोणाची नव्हती. बादशहाचीच होती. " फ्रेंच सेनापति सापडलासे पाहून, मोल्टके याच्या त्या ससाण्यासारख्या चेहऱ्यावर थोडेंसें समाधान झळकलें. ते ताडकन् म्हणाले, " झाले तर. तलवार देशाची नव्हती ना ? मग आमच्या अटी बदलण्याची आम्हास कांहींच जरूरी नाहीं—आता लोकानी तलवार खाली ठेवावी आणि शरण यावें—" यावर विंपफेन थोड्या खड्या आवाजाने म्हणाला, " ठीक आहे. असेंच असेल तर आम्ही उद्या पुन्हा मारामारीला सुरुवात करूं. " मोल्टकेनेही उत्तर केलें, " बरें आहे. पहांटे चार वाजताच तोफखाना सुरू करण्याचा हुकूम आम्ही आमच्या गोलंदाजाना देऊन ठेवतों. " इतकें होताच मुलाखत संपली असें समजून फ्रेंच

सेनापतींनीं जाण्याची तयारी केली. तेव्हां मी त्यास म्हटलें, " तुम्ही असें करू नका. आणखी कांहीं वेळ थांबा आणि या प्रकारणाचा पुन्हा एकदा नीट विचार करा " होतां होतां शेवटीं ते म्हणाले की, युद्धाच्या तहकुबीची मुदत तरी थोडीशी वाढवा, कारण सेडनला जाऊन तेथील मंडळींशीं आम्हास थोडें बोलावयास हवें. मोल्टके यालाही होय म्हणेनात. परतु यांत " आपलें काय नुकसान आहे ? " असें मी त्यांना म्हटल्यावर त्यांनीं या मंडळींचें म्हणणें पत्करलें व त्यास जाऊं दिले.

दोन तारखेला सकाळीं सहा वाजण्याच्या सुमारास, मी उतरलो होतों तेथे सेनापति रिली हा आला आणि म्हणाला कीं, बादशहांना आपल्याशी दोन गोष्टी बोलावयाच्या आहेत. मी एकदम अंगात घातलें आणि घोड्यावर स्वार झालों. अजून अंघोळ, तोंडधुणे वगैरे व्हावयाचेच होतें, आणि कपडेहि घाण झालेले होते, तरी तसाच जावयास निघालों. बादशहा सेडन गावीं असतील म्हणून तडक त्याच मार्गाला लागलों. पण निम्म्या वाटेंतच फ्रेसनॉय म्हणून एक खेडें आहे तेथे सडकेवरच त्याची भेट झाली. एका दोन घोड्यांच्या गाडींत ते स्वतः आणि तिघे अधिकारी असे बसलेले होते शिवाय आणखी तीन अमलदार घोड्यावर बसून गाडीशेजारी उभे होते. या मंडळीपैकीं रिली, कासल्नो, मोस्कोबा आणि वाबर्ट इतके जण माझ्या माहितीचे होते.माझ्या कमरपट्याला माझे पिस्तुल लोंबत होतें. त्या सहा अंमलदारांच्या घोळक्यांत आपण एकटेच आहोंत हें

ध्यानांत आल्यावर कदाचित् सहजासहजी माझी दृष्टि पिस्तुलाकडे गेलीही असेल. कदाचित् स्वाभाविकपणेंच मीं पिस्तुलाला हातही घातला असेल. नेपोलिअन बादशहानें बहुधा हें पाहिलें असावें. कारण त्याचा चेहरा अगदीं मालवल्यासारखा झाला होता. त्याला कदाचित् वाटले असेल कीं प्रिन्स दि कॉंडे हा युद्धात गिरफदार झाला असता त्याचा खून झाला होता तसाच आपला होतो की काय, न कळे ! मी लष्करी पद्धतीनें सलाम केला, तेव्हा बादशहाने टोपी काढून सलामी पत्करली. त्याच्या अंमलदारानींही तसेंच केलें. यावर मींही माझी टोपी काढली, वास्तविक पाहता नियमाप्रमाणें वागावयाचें तर मी काढावयास नको होती.

सेंट क्लाउड येथें त्याची गाठ पडली असती तर मी त्याच्याशीं जसा वागलों असतों तसाच येथें वागलों आणि म्हणालों " महाराजाची आज्ञा काय आहे ? " तो म्हणाला, " मला तुमच्या राजे सरकारशीं बोलता येईल काय ? " मीं सांगितलें की, तें शक्य दिसत नाहीं. कारण आमच्या सरकारची छावणी येथून बरीच दूर आहे. मीं मनात म्हटलें कीं, शरणागतीचें काय ते निश्चित झाल्या-शिवाय याला आमच्या सरकारशीं बोलू देता उपयोगाचें नाही. यावर ते म्हणाले कीं, आम्ही आता कोठें रहावें ? मला कळून आलें कीं, यांच्या मनांत सेडन गावीं परत जावयाचे नाहीं. तेथें यांना काहीं तरी उपद्रव झाला असावा किंवा होईल असा धाक वाटत असावा. तेंही खरेंच होतें. कारण तें सगळें गाव झिंगलेल्या

शिपायानी भरून गेलेलें होतें, आणि तेथल्या लोकानाच अतिशय जिकीर होत होती. म्हणून मी बादशहाला म्हणालों, "डॉनचेरी गावीं मी जेथें उतरलों आहे तें ठिकाण मीं आपल्याला खाली करून देतों." त्यानें हें माझें म्हणणें पत्करलें, पण त्या गावापासून थोड्याशा अंतरावर येताच तो मला म्हणाला कीं, हें शेजारी जें एक घर दिसत आहे, येथें नाहीं का मला राहता येणार? माझ्या मागोमाग माझा पुतण्या आला होता. त्याला मी म्हटलें कीं, तू तें घर पाहून ये. तो सागत आला कीं, हें घर अगदीं कसलें तरी आहे बादशहा म्हणाला कीं, कांही हरकत नाहीं. या घरात बादशहाचे आणि माझें जवळ जवळ पाऊण तासपर्यंत बोलणें झालें. तो म्हणाला, " हें गळ्यात आलेलें युद्ध कसें सुरू झालें कुणास ठाऊक? मला स्वत:ला तर तें अगदीं नको होतें. पण लोकमताचें टुमणें माझ्यामागें सारखें लागलेलें होतें. " मीं उत्तर केले, " जर्मनीतल्या कोणाही प्रजाना हें युद्ध नको होतें आणि आमच्या राजाला तर मुळीच नको होते, स्पेन देशात उपस्थित झालेल्या प्रश्नासबधानें आमचें इतकेंच म्हणणें होतें कीं, हा प्रश्न स्पेन देशाचा आहे, जर्मनीचा नव्हे, आणि आमचे राजघराणे आणि आपण स्वत: यांच्यामध्यें जो सलोखा नांदत होता त्यावरून आम्ही युक्त अशीच अपेक्षा बाळगीत होतो कीं, स्पेन देशाच्या सिंहासनावर कोणीं बसावें या प्रश्नाचा निकाल अगदीं सहज आणि समंजसपणानें लागेल. "

यानतर हळूहळू चालू परिस्थितीबद्दल बोलणें निघालें. अर्थात्

सर्वांत महत्वाची गोष्ट म्हणजे आम्हीं ज्या अटी घातल्या होत्या त्या कमी कडक कराव्या, असें बादशहांना वाटत होते. मीं निकाल केला कीं, हा प्रश्न केवळ लष्करी खात्याचा आहे आणि म्हणुन मला त्यांत कांहींच बोलतां येत नाहीं. मोल्टके यांनाच फक्त बोलतां येईल. तथापि शेवटीं जर तह करावयाचा असला तर त्यासंबधानें मात्र मला बोलता येण्यासारखें आहे. बादशहा उद्गारला, "हें कसें व्हावें? मीं तर तुमच्या हातीं बंदिवान् झालेला; तह करावा किंवा नाहीं हें मीं कसें ठरवावें?" मीं विचारले कीं, हें ठरविण्याचा अधिकार तरी मग कोणाच्या हातीं? बादशहानें सांगितलें की, सध्यां पॅरिस शहरांत जें कारभारी मडळ आहे तें याचा निकाल करील. यावर मीं त्याला बजावलें कीं, तर मग कालचीच परिस्थिति आजही कायम आहे आणि म्हणून सेडन गावच्या फौजेनें कैदी म्हणून आमच्या स्वाधीन व्हावें ही आमची अट कायम आहे. कारण मिळालेल्या यशाचें फळ आमच्या पदरांत पडलेंच पाहिजे. दरम्यान मीं मोल्टके याना निरोप धाडला होता, आल्याबरोबर त्यांनींही राजाला हीच गोष्ट बजावून सांगितली व ही गोष्ट आमच्या राजे सरकारांना सांगण्यासाठीं ते निघून गेले.

आम्ही तेथें घरासमोरच उभे होतों. बादशहानें आमच्या फौजेची मोठी तारीफ केली आणि, 'तुमचे सेनापतीही मोठे कुशल आहेत' असें तो म्हणाला. मीही म्हणालों कीं, फ्रेंच शिपायीही चांगले शौर्यानें लढले. होतां होतां शरणागतीच्या अटीच्या मूळ पदावर

बादशहा येऊन पोहोंचला आणि म्हणाला, " सेडन शहरांत कोंडून पडलेल्या फौजेला तुम्ही बेल्जमच्या हद्दींत जाऊं देणार नाही का ? तेथें ते आपोआपच नि.शस्त्र होतील आणि कैदी म्हणूनही राहतील." मीं बादशहाला पुन्हां सांगितलें कीं, हा प्रश्न लष्करी अधिकाऱ्याचा आहे आणि म्हणून मोल्टके यांची संमति असल्याशिवाय याचा निकाल होण्यासारखा नाहीं; शिवाय आपणच म्हणता कीं, मी तर कैदी होऊन पडलों आहें; मला आतां अधिकार कोठला ? शिवाय अशा प्रकारच्या प्रश्नाची वाटाघाट सेडन गावातील लष्कराचा जो मुख्य अंमलदार आहे त्याच्याशींच केली पाहिजे.

दरम्यान बादशहा यांस जरा चांगली जागा सापडावी म्हणून शोध चालविला होता आणि तशी ती मिळालीही होती. मग मी त्यास म्हटलें, " आपण या विणकऱ्याच्या घरातून निघून त्या नव्याच जागी जावें. आपण थोडी विश्रांतिही तेथें घ्यावी." त्यांनी तें मान्य केलें आणि मीही कपडे बदलण्यासाठी डॉनचेरीला गेलों. बादशहानें इच्छा प्रदर्शित केली कीं, आपली वाटाघाट जेव्हा चालू होईल तेव्हा तुमचे राजेसरकार तेथें असावेत. आमच्या राजेसरकारचा गोड स्वभाव आणि कोमल अंतःकरण याचा काहीं तरी उपयोग होईल असें बादशहाला वाटत होतें. तथापि तुम्हीही तेथें हजर असावें अशी इच्छा त्यानें प्रदर्शित केली, पण माझें अगदीं ठाम मत ठरलेलें होतें कीं, शिपाईगड्यांनींच या प्रश्नाचा निकाल लावावा. कारण ते चांगले कडक आणि दमदार असतात आणि

म्हणून मीं बाजूस होऊन एका अंमलदाराला सांगितलें कीं, तूं आता जा आणि पाच मिनिटानीं मला परत येऊन सांग की, राजेसरकारांनीं आपल्याला बोलावलें आहे. याप्रमाणें मला बोलावणें आलें. मीहि गेलों आणि बादशहांना निरोप धाडला कीं, शरणागतीच्या अटी ठरल्यानंतरच राजेसाहेबाची व आपली भेट होईल. शेवटी मोल्टके आणि विपफेन यानीं या अटींचा निकाल केला आणि आदल्या दिवशीं रात्री आम्हीं जें म्हटले होते ते जवळ जवळ जसेंच्या तसें विपफेननें मान्य केले यानंतर मग या दोन राजांची मुलाखत झाली. मुलाखतीच्या जागेतून फ्रेंच बादशहा बाहेर पडला तेव्हां त्याचे डोळे पाण्यानें डबडबलेले होते. मात्र मग माझ्याशी बोलताना त्यानें आपला तो आवेग पुष्कळच आवरून धरला आणि नेहमींच्या डौलानें आणि धिमेपणानें भाषण केलें.

# १३ : : नेपोलियनची उकडहंडी होणार !

[ हिंडनबुर्ग : हा जगप्रसिद्ध जर्मन सेनापति १८४७ साली जन्मला. हे हिंडेनबुर्ग घराणे पिढ्यानुपिढ्या लष्करी पेशातच वागले होते. पॉल हिंडेन्बुर्ग हाही लष्करात शिरला तेव्हा केवळ पोरसवदा माणूस होता. पण आपण आपल्या मुलाना जसे लहानपणी शाळेत घालतो तसेच त्याच्या बापाने त्याला लष्करी शाळेत नेऊन घातले. १८६६ साली ऑस्ट्रिया व जर्मनी याचे जे युद्ध झाले त्यात हा होता. पुढे चार वर्षांनी फ्रान्सशी झालेल्या युद्धातही तो अमलदार म्हणून होताच. तेव्हापासून जर्मनीला बरीच वर्षेपर्यंत कोठे युद्ध करावे लागले नाही. पण त्या राष्ट्राचा लष्करी बाणा मात्र दिवसेदिवस वाढतच होता. हिंडेन्बुर्ग हा स्वतः मोठा करडा असून शिस्तीचा भोक्ता होता. वाढत वाढत तो एका जर्मन फौजेचा सेनापति होऊन १९११ साली सेवानिवृत्त झाला. परन्तु नोकरीवर असताना त्याची दिसून आलेली धानत, त्याची शिस्त, निरनिराळ्या रणक्षेत्राचा त्याचा अभ्यास आणि शिपाई लोकाची त्याच्यावरील भक्ति ही जर्मन कैसर व एकदर राष्ट्र याच्या मनात इतकी भरली होती की, १९१४ साली पहिले महायुद्ध सुरू झाल्याबरोबर कैसरने त्या वृद्ध सेनानीला पुन्हा लष्करात येऊन दाखल होण्याची आज्ञा केली. सैन्यात येऊन प्राप्त होताच त्याने आपले

तेज प्रकट केले आणि टॅनेनबर्ग येथे झारच्या फौजाचा प्रचड पराभव करून रशियाने जर्मनीवर केलेली स्वारी याने मारून काढली. तेव्हांपासून त्याचे समरांगणावरील कसब अधिक अधिकच वाढत चाललें. आणि शेवटीं जर्मन देशाचा राखण करणारा हा एकच पुरुष आहे अशी त्याच्या सबधींची भावना राष्ट्रात उत्पन्न झाली. शेवटीं जर्मनीचा पराभव झाला, पण जर्मन राष्ट्र व जर्मन फौजा सभाळून धरण्याचें कठिण काम यानेच तडीस नेलें. यानतर जर्मनींत प्रजासत्ताक राज्य प्रस्थापित झालें आणि लोकानीं १९२५ सालीं या वृद्ध पितामहाला आपला अध्यक्ष म्हणून निवडलें पुन्हा १९३२ सालींही हाच मान त्यानीं त्याला दिला. अनेक पक्षोपक्षानीं जर्मन राष्ट्र पिंजून गेले होतें. तरी या सर्व पक्षाची या वृद्ध सेनापतीच्या ठिकाणीं नितान्त भक्ति होती. जर्मन राष्ट्र त्याला शेवटी विभूतीचा मान देऊ लागले आणि वयाच्या ८७ व्या वर्षीं, जर्मन राष्ट्राचे अधोगतीस गेलेले वैभव पुन्हा उत्कर्षाच्या मार्गास लागलेले आहे हें पाहिल्याचा आनन्द पावून हा थोर पुरुष कालवश झाला. १९२० सालीं यानें आपलीं स्मृतिचित्रें प्रसिद्ध केलीं. बालपणापासून लष्करात असल्यामुळे, साध्या शिपाई गड्याच्या कामापासून तों पन्नास पन्नास लक्ष सैन्याच्या अधिपतित्वापर्यंत सर्व प्रतींचीं कामे केलेलीं असल्यामुळें, आणि जर्मन राष्ट्राच्या नव्या बनावाचे, साम्राज्याचे व वैभवाचे भाग त्याने स्वतःच्या डोळयानें तंतोतत पाहिले असल्यानें या स्मृतिचित्रात अनेक सुरस कथाभाग आलेले आहेत. त्यातील काहीं वेचक प्रसग निवडून घेऊन तयार केलेले सणग पुढे थोड्याशा पानांत दिलें आहे. ]

* * * इ. स. १८४७ सालीं पोसेन येथें माझा जन्म झाला. माझा बाप सैन्यांत लेफ्टनटच्या जागेवर होता आणि माझी आई एका सर्जन जनरलची मुलगी होती. बाबा आपला धदा अगदीं मनापासून करीत; पण त्यांतल्या त्यात वेळ काढून,आम्ही दोघे भाऊ आणि एक बहीण अशा आम्हां तिघांच्या शिक्षणाकडे ते लक्ष देत असत. अर्थात् आईही त्यांत असेच. आई व बाप यांचे स्वभाव परस्परांना पूरक असे असत. आई थोडी कडक आणि प्रपंचाचें कसें होईल या काळजींत असे, बाबा मात्र अगदी शांत आणि सदा विचारात मग्न असत. त्या उभयतांची आमच्यावर भारीच माया असे. आम्हांला धार्मिक आणि नीतीचें शिक्षण देण्याच्या कामी दोघेंही एकोप्यानें झटत असत. आमची शरीरें व मनें बळकट व्हावीं म्हणून उभयतांची दक्षता फार असे. त्यांना वाटे की, जीवितांत या मुलांना जें जें करणें प्राप्त होईल त्याला त्याला ही तयार असलीं पाहिजेत. आमच्या मानवी भावनांना मार्दव आणून, आणि आडपडद्यानें सुचवून सुचवून, मातापितरांनीं मुलांना जे देणें आवश्यक असतें तें त्यांनीं आम्हांला देण्याची खटपट अव्याहत केली. परमेश्वरावर दृढ श्रद्धा, पितृभूवर नितान्त प्रेम, आणि पितृभूला आधारस्तंभासारखें असलेलें जें प्रशियाचें राजघराणें त्याच्यावर गाढ प्रेम या गोष्टी त्यांनीं आम्हांस शिकविल्या.

१८५९ सालच्या वसंतऋतूत एके दिवशीं सध्याकाळीं मी केवळ अकरा वर्षांचा असतां सायलेशियांतील एका लष्करी शाळेंत दाखल

झालों व पोंचवावयास आलेले आमचे बाबा परत निघाले. बाबाच मला सोडून चालले नव्हते तर लहानपणच मला सोडून चाललें होतें. मला दुःख आवरेना, माझ्या डोळ्यांतून आपोआपच पाणी येऊं लागलें, तें माझ्या लष्करी पोषाखावर पडलेले पाहतांच माझ्या मनांत असा विचार चमकून गेला की अंगावर हा वेष असतां असें मुळुमुळू रडणें आपल्याला शोभत नाहीं. माझें पोरपणचें तें वाईट वाटणें मी आंवरून घेतलें आणि पोटांत थोडें धस्स होत होतें तरी माझ्या नव्या सोबत्यांत मी जाऊन मिसळलों मी सैन्यांत शिरावें हा विचार कांही आम्ही कोणी योजना करून ठरविला असें नाहीं; तें वळणा-प्रमाणेंच झालें आम्ही मुलें खेळत असतांना किंवा मनांत कांही तरी चालूं असतानासुद्धा ' पुढें कोण होणार ' असा प्रश्न निघाला कीं, मी शिपाई होणार असेंच मी म्हणत असें. राजवंश आणि पितृभू याच्या सेवेंत शस्त्रधारी बनणें ही आमच्या घरची फार जुनी पीठि-काच होती.

प्रशिअन् लष्करी शाळेंतील तेव्हाचें शिक्षण जाणून बुजून आणि हेतुपुरस्सरच करडे ठेवलेलें असे यांत कांहींच शंका नाहीं. शिक्ष-णाची खरीखुरी कल्पना ध्यानांत घेऊनच शरीर व मन हीं बलिष्ठ कशीं होतील याचें शिक्षण देत असत. ज्ञानाला जितकी किंमत देत तितकीच करारीपणा आणि काम करण्याची रग यांना देत असत. म्हणजे शिक्षणांत कांहीं कोंझेपणा होता असें नव्हे, तर शिक्षणाच्या पद्धतींत कांहीं विशेष प्रकारचा राकटपणा असे. कसल्याही निर्बंधाचा

काच नसल्यामुळें प्रत्येक माणसाला आपलें बलशाही व्यक्तिमत्व विकसित करतां येत असे, आणि असेच व्हावयास हवें. आमच्यावर यॉर्क नांवाचा एक शिक्षक असे. ज्यांनीं त्याच्या पद्धतीचें वरवर अवलोकन केलें होतें त्यांचें मत त्याच्यासंबंधानें फारसें चांगले नसे. ही गोष्ट खरी कीं यॉर्क हा मोठा करडा शिपाई आणि कडक शिक्षक असे. पण तो दुसऱ्यानाच असा होता असें नाहीं; तर स्वतःलाही तो तसाच असे त्याच्या हाताखालच्या प्रत्येक माणसासंबंधानें त्याची अशी उग्र अपेक्षा असे कीं, यानें कसल्याही परिस्थितींत दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहता उपयोगाचें नाहीं, स्वतःच्या वर्तनांतही हीच आत्मनिष्ठा तो सदैव व्यक्त करी. स्वाभाविकपणेंच हें यॉर्कचें स्वतःचें वैशिष्ट्य लष्करी करडेपणाच्या रूपानेंच नव्हें तर शिपायाच्या अंगीं अवश्य असलेल्या स्वतंत्र बुद्धिस्वातंत्र्याच्या दृष्टीनें आमच्या सैन्याचेंच एक मोठें वैशिष्ट्य बनून राहिलें होतें.

ॐ मुख्यतः मृत भाषांत सांठविलेलें जें संस्कृतिविषयक ज्ञान त्याची लज्जत मला केव्हांच कळलेली नाहीं. जीवितांत त्याचा प्रत्यक्ष उपयोग काय असतो याची मला बरोबर कल्पना नाही. त्यांची उपयुक्तता लक्षांत घेतली तर असें वाटते कीं या मृत भाषांचा अभ्यास आपला वेळ आणि शक्ति फार खातात; एक विशेष प्रकारचा अभ्यास एवढेंच त्यांचें महत्व असलें तर मग तो मोठेपणीं केलेला चांगला. मला कोणी अडाणी म्हटल्यास चिंता नाहीं; पण मला असें वाटतें कीं, या आपल्या शाळांतून अलीकडील भाषा, आधुनिक

इतिहास, भूगोल आणि खेळ यांचें शिक्षण जास्त मिळावें; मग लॅटिन आणि ग्रीक यांना वेळ नाहीं राहिला तरी चालेल. 'तमोयुगां'त ज्यांचा आश्रय केल्यावाचून मानवी संस्कृतीचें चालतच नसे त्या भाषा आपल्या या आधुनिक कालांत इतक्या महत्त्वाच्या मानाव्या हें बरोबर आहे काय ? तेव्हांपासून आतांपर्यंत जो काळ लोटला आहे त्यात सारखे श्रम करून आणि मोठा विकट झगडा चालवून आपण नवा इतिहास बनविलेला नाहीं काय ? नवें वाङ्मय लिहिलेलें नाहीं काय ? आणि नव्या कला काढल्या नाहीत काय ? जगाच्या एकंदर उलथापालथींत आपली जागा जर आपल्याला घट्ट धरून बसावयाचें असेल तर या मेलेल्या भाषांच्यापेक्षां जिवंत भाषांचा उपयोग आपल्याला जास्त होणार नाहीं काय ? याचा अर्थ प्राचीन विद्यांचा मी तिरस्कार करतों असा मात्र नव्हे. अगदीं लहानपणापासून प्राचीन इतिहासाची मला मोठीच गोडी लागलेली आहे. रोमन इतिहासाची पकड तर माझ्या मनावर फारच विलक्षण आहे. पण असें असलें तरी मला आवडणारे शूर वीर माझ्या जर्मन लोकांतूनच मीं निवडलेले आहेत.

❀ १८९९ सालच्या ऑक्टोबर महिन्यांत चवथा फ्रेडरिक विल्यम् याचा शेवटचा वाढदिवस साजरा झाला. या राजाचे फार हाल झालेले होते. या उत्सवाच्या प्रसंगीं मीं पहिल्यानेंच प्रशियन गणवेष अंगावर घातला. मरेतोंपर्यंत हा पोशाख म्हणजेच खरा मानाचा पोशाख असें मला वाटत राहील. राजा वारल्यानंतर १८६१

सालीं माझी बढती झाली आणि एलिझबेथ राणीसरकारच्या दिम-तीस मला दिले. त्यावेळीं राणीसरकारनी मला बक्षिस दिलेलं एक घड्याळ, तीन युद्धें झालीं, माझी चाकरी अजून इमानानें करीत आहे! याच्या आधीच म्हणजे १८६३ सालींच माझी नेमणूक बर्लिन येथे झाली होती. प्रशिया देशाची ती राजधानी मीं पहिल्यानेंच पाहिली आणि वसत–ऋतूंत राजधानींतील पटांगणावर आम्हां सैनिकांचें संचलन झालें. त्या वेळी त्या थोर कृपाळू राजाचें म्हणजे विल्यमचें मला ओझरतें दर्शन झालें दोनचार वर्षांनी पुढें ऑस्ट्रियाशीं आमच्या कटकटी सुरू झाल्या, फौजा जमा झाल्या आणि त्या अमरकीर्ति राजाच्या–फ्रेडरिक दि ग्रेटच्या–समाधीच्या दर्शनास आमचे शिपाई गेले. बोहेमियावर स्वारी सुरू होण्याच्या आधीं सैनिकांना जें आज्ञा-पत्र निघालें त्यातही या राजाचा उल्लेख होताच, त्यांत शेवटीं म्हटलें होतें, " शूर सैनिक हो ! आपापल्या बळावर विश्वास ठेवा, तुमच्या सर्वश्रेष्ठ फ्रेडरिक राजानें चिमुकल्या फौजेनिशीं ज्या शत्रूची दाणा-दाण उडविली त्याच शत्रूचा पराभव करणें हें तुमचें कर्तव्य आहे." माझ्या हाताखालच्या लोकांनी मोठीच बहादुरी केली. पण निमे लोक खलास झाले तथापि एकंदरींत या युद्धांत विजयश्री आम्हांस प्राप्त झाली बोहेमियातून परत शिरून स्वदेशात शिरताच आमच्या स्वागतासाठीं उभारलेल्या कमानींतून आम्ही चालत गेलों ! माझें चित्त अभिमानानें उचंबळून आलें.

इ. स. १८७० सालीं फ्रान्सबरोबर आमचें युद्ध जुंपलें. पहिल्या

पलटणीवर मी ॲडजूटट म्हणून होतों;. . . सेडनवर जी लढाई झाली ती मी आपल्या डोळ्यांनी पाहिली. माझ्या पलटणीला तींत पडण्याचा हुकूम नव्हता. फ्रेंच फौजाना आमच्या सैन्याचा गराडा पडूं लागला. होतां होता सगळीकडून फ्रेंचाच्या फौजेवर आमच्या तोफा आग ओकू लागल्या आमचा गराडा फोडून बाहेर पडण्याची त्यांनीं अनेक ठिकाणी झटापट केली, पण आमची सांखळी कुठेंही तुटेना. येथें एक मौजेची गोष्ट झाली. लढाईच्या आदल्या दिवशीं मी एका फ्रेंच जिनगराकडून चाबूक विकत घेत होतों. बोलतां बोलतां तो म्हणाला, “ दादा, आमच्या या सैन्यांत खुद्द राजेसरकारची स्वारी आहे ! ” ही बातमी वरपर्यंत पोंचावी म्हणून मीं पुन्हा पुन्हा ती चार चौघात बोलून दाखविली, पण ती कुणाला खरीच वाटेना ! दुसरे दिवशीं जेव्हा ही सेना आमच्या आगीच्या भडक्यात सापडली तेव्हा मी उद्गारलों, “ खुद्द नेपोलियन सुद्धा या उकडहंडींत शिजून निघणार आहे ! ” हें ऐकतांच भोंवतालचे लोक थट्टेनें हंसले; पण जेव्हा कां मग खरी गोष्ट जाहीर झाली तेव्हां जो तो माझें कौतुक करूं लागला सकाळी आमचा राजपुत्र फौजेंत प्राप्त झाला, त्यानें सागितलें कीं, फ्रान्सच्या बादशहास आपण कैद केले आहे ! संध्याकाळी खुद्द राजेसरकार व सेनापतिमडळ येऊन दाखल झालें. राजाचा सत्कार लोकांनी किती आणि कसा केला हें सांगणें अशक्य आहे ते शिपाईगडी लष्करी रांगा सोडून धांवले व भोंवती जमून त्यानी त्याच्या हाताची व पायाचीं चुंबनें घेतलीं.

राजाच्या नेत्रांतूनही सारखा अश्रुपात होत होता. त्यानें आमचे आभार मानले. राजाबरोबरच्या मंडळींत बिस्मार्क होता. स्वार होऊन घोडदळाच्या शेवटीं शेवटीं येत असलेला हा धीरगभीर पुरुष एकाद्या पर्वताच्या शिखरासारखा दिसत होता. त्याचें दर्शन होतांच आम्हीं पुन्हां जयजयकार केला. थोडेंसें हंसून त्यानें त्याचा स्वीकार केला.

आम्ही पॅरिसकडे निघालों. येतां येतां वर शृंगापाशीं आलों. पुन्हां एकदां म्हणजे १९१८ च्या मे २८ ला महायुद्धात मी याच ठिकाणीं उभा होतों. त्या वेळीं शेजारीं उभ्या असलेल्या कायझर बादशहास मी म्हणालों, 'सरकार, अठ्ठेचाळीस वर्षांपूर्वीं मीं याच ठिकाणीं माझा तळ ठोकलेला होता!'....कूच चालूं करून आम्ही पॅरिसपासून इतक्या नजीक येऊन ठेपलों कीं, शहरांतील देवळें, मनोरे हीं स्वच्छ दिसूं लागलीं. धर्मयुद्धांतील शिपायांना जेरूशालेम दिसूं लागतांच जो आनंद झाला असेल तोच आनंद आमच्या पायापाशीं प्राप्त झालेलें पॅरिस शहर पाहून आम्हास झाला...अठरा तारखेस व्हर्सायच्या राजवाड्यात झालेल्या समारंभाच्या आठवणींनीं माझें मन अजूनही गजबजून गेलें आहे.

पॅरिसचा वेढा चालू असतांच शहरांत क्रांतीची धामधूम चालू झाली आहे हें आम्हीं ओळखलें होते. पॅरिस शहराच्या गव्हर्नरला हाताखालच्या राजकीय जहालांनीं शेफारल्यासारखीं उणीं उत्तरें करावयास आरंभ केला आहे हें बाहेर कळून चुकलें होतें. युद्ध

तहकुबी जाहीर होतांच ही क्रांतीची लाट जोरानें उठली. बोलणी करावयास आलेल्या फ्रेंच वकिलांना बिस्मार्क म्हणाला, " एक क्रांति होऊन तुम्हीं अधिकारी झालां, आता दुसरी क्रांति होऊन तुम्हीं कोठें तरी सार्दीत जाऊन पडाल. " शहरांतून पळून आलेले लोक सांगू लागले कीं, गावात अनर्थ सुरू झाला आहे. लुटालूट, जाळपोळ, खून हे सगळे रोग—कीं ज्यांना सध्या बोल्शेविझम हें नाव आहे—ते शहरांत फैलावले. पराभूत झालेल्या सत्तेच्या वाताहातीच्या या खुणा सगळीकडेच दिसून येतात. बंधमुक्त केलेला एक कम्युनिस्ट कैदी त्या सरकारला म्हणाला, " माझा मुडदा पाडण्याची सरकारची छाती नाहीं, पण या सरकारचा मुडदा पाडण्याची छाती मात्र मी दाखवीन. " फ्रेंच राष्ट्रांत अत्यंत प्रबल आणि तटकन् उभी राहणारी जी एकराष्ट्रीय भावना होती तिचा पुरा पुरा उच्छेद या कम्युनिस्टांनीं कसा केला होता हें त्यांच्या एका घोषणेवरून चांगलें ध्यानांत भरतें. ते म्हणाले, " आमचें सरकार शत्रूशीं झगडत असतां त्या शत्रूंच्या देखत आमच्या सरकारच्या पाठींत सुरा खुपसण्यांत आम्ही पुरुषार्थच मानतों. " यावरून असें दिसून येईल कीं, या सगळ्या जगाला नवा जन्म द्यावयास निघालेल्या बोल्शेव्हिक शासनपद्धतीनें—कीं जिच्या प्रादुर्भावाचा आम्हांला नुकताच नकोनकोसा अनुभव आला आहे—तिनें आपलें ज्ञान या वरील मंडळींपासूनच चोरून घेतलेलें आहे ! जून महिन्यांत आम्हीं पॅरिसकडे पाठ फिरविली व तीन दिवसांनीं आमच्या जयशाली पितृभूमींत पुन्हां प्रवेश केला.

❀ युद्धकथेच्या धामधुमींत कदाचित् मी हे सांगावयाचें विसरूनच जावयाचा कीं स्टेटिन गांवी माझें लग्न झालें. माझी बायको ही एका तलवारबहाद्दराचीच छोकरी होती ७० सालच्या युद्धात तो कामीं आला होता. माझी पत्नी मला प्रपचांत मोठी प्रेमळ वाटेकरी मिळाली. जो माझा आनद तोच तिचा आनद, जे माझें दुःख तेंच तिचें दु.ख. माझी काळजी तिच्या प्रीतीमुळें कमी होई व माझ्या कष्टाचें तिच्या सगतींत मला फारसें कांहीं वाटत नसे. तिनें मला एक मुलगा व दोन मुली दिल्या गेल्या महायुद्धात माझा मुलगा सेनापति मंडळात होता. दोघी मुली आपापल्या घरी आहेत. माझे दोघेही जावई महायुद्धात रणांगणावर लढलेले आहेत.

१८८६ च्या वसतात झोसेन येथें आमच्या सेनेचा 'रणसंचार' सुरू झाला. राजपुत्र विल्यम हा त्या संचारांत सामील झाला होता. हा प्रयोग कित्येक दिवस चालू होता. आम्ही सुरू केलेल्या नव्या उपक्रमांची परीक्षा या खोट्या लढाईत लागावयाची होती. हा राजपुत्रच पुढें आमचा कैसर बादशहा झाला. पुढील हेमंतात सेनापति मंडळाचें एक 'युद्ध' झालें. त्यात मी रशियन फौजेचा अधिपति होतों वाढत वाढत मी १९०० सालीं २८ व्या पलटणीचा सेनापति झालों. १९०५ साली कायझरच्या कृपाप्रसादानें चवथ्या सेनाशकटाचा अधिकार माझ्याकडे आला. या अधिकाराची जबाबदारी फारच मोठी असते. प्रत्येक शिपायावर आपल्या प्रकृतीचा ठसा सेनापतीला उठवितां येतो; अशी ही जागा असते. सैन्यात जर सुसज्जता यावयास

हवी असेल, तर सैनिकांची सेनापतीवर भक्ति असावयास हवी. ही भक्ति सुसज्जतेचें उगमस्थान होय. माझ्या शिपायाची माझ्यावर मोठीच भक्ति होती पहिल्याच वर्षाच्या अखेरीस कैसर बादशहाच्या पुढे माझ्या सेनेचे सचलन झालें. ते पाहून ते अत्यन्त हर्षभरित झाले. मी सूचकपणानें म्हणालों, 'माझ्या आधींचे अधिकारी फार लायक लोक होते व माझे शिपाईही फार लायक लोक आहेत.' अनेक अधिकार चालविता चालविता मला शेवटी वाटू लागलें कीं, आता नोकरी पुरी झाली. मी केवळ साधा, खाद्यावर बदुक टाकलेला शिपाई होतो, त्याचा सेनापति झालों आता तरुण लोकाना अवसर द्यावा हें योग्य आहे असें वाटून १९११ सालीं 'मला सोडवावें' म्हणून मी बादशहाना विनति केली. चौथ्या फौजेचे नायकत्व सोडताना मला अत्यत दु.ख झाले. तथापि मला काय माहीत, की थोड्याच दिवसात पुन्हा कबर बाधून राजा व पितृभू याच्या सेवेसाठीं मला याच सेनेचे आधिपत्य पत्करावें लागेल ?

१९१४ ऑगस्ट ता.२२ रोजीं दुपारी तीन वाजता बादशहांकडून तारेनें मला पृच्छा आली कीं, ताबडतोब कामावर येण्यास तयार आहात काय ? मी उत्तर धाडलें, "होय, तय्यार आहे" ही तार त्याना पोंचावयाच्या आधीच त्याची पुन्हा तार आली की, "तुमचा होकार असणारच, लुडेन्डॉर्फ हे तुमच्या हाताखाली दिले आहेत, पूर्व प्रशियात तुमची नेमणूक झाली आहे. सत्वर उपस्थित व्हावें.' सेनापति लुडेन्डॉर्फ व मी म्हणजे एक प्रेमी जोडपेच होतें म्हणा ना !

असें असल्यामुळे माझें काम कोणचें व त्याचें काम कोणचें याची चिकित्सा तिऱ्हाइताना कशी करतां येईल ? विचार आणि आचार ही आम्हा दोघांचीं एकच असत. एकानें जे तोंडानें वदावें तें दुसऱ्याच्या भावनाचें केवळ शब्दरूप होय असें आम्हांस दिसून येई. या माणसाची बलाढ्य बुद्धिमत्ता, परिश्रमाची अतिमानुषीय शक्ति, आणि कधीं न ढळणारा निश्चय या गुणाना पुरता अवसर द्यावयाचें मी ठरविलें. रणांगणावरचा जो एक बन्धुभाव जर्मन सैन्यांत अढळ होऊन राहिला आहे तो मी या शूर सेनापतीस पूर्णपणें दाखविला... ऑगस्ट महिन्याचया ३१ व्या तारखेस राजेसाहेबास मी पुढील तार धाडली, " रशियन फौजेच्या बहुतेक शकटाना गराडा देण्याचें काम काल पुरें झालें. तेरा, पंधरा आणि अठरा हे त्यांच्यातील तीन सेनाशकट साफ मोडून पडले आहेत. आतापर्यंत ६०,००० कैदी आणले असून त्यात १३ व १५ या सेनाचे सेनापति आहेत. हस्तगत झालेल्या तोफा अजून रानांतच आहेत, त्या हळूहळू इकडे आणीत आहों. लूट तर प्रचड सांपडली आहे. अजून तपशीलवार किंमत ठरवितां आलेली नाही. आमच्या गराड्याच्याबाहेर राहिलेल्या १ व ६ या रशन फौजाचीही धूळधाण उडाली आहे व त्या म्लावा व मिर्झेनिक याच्या रोखानें पळून जात आहेत." शेजारच्या प्रार्थना–मंदिरात आम्ही प्रार्थनेसाठीं जमा झालों. ती संपतांच सर्व सेनाधिकारी व तरुण शिपायी यानीं गुडघे टेकले आणि आठ दिवस केलेल्या प्रचंड स्वार्थत्यागाचें फळ मिळालें म्हणून त्यांनीं प्रभूचे आभार मानिले....

१९१८ च्या सप्टेंबर महिन्यांत मी मनाशीं विचार करूं लागलों, हा बेहद्द ताण माझ्या फौजा किती दिवस सोसत राहतील ? अत्यन्त भीषण प्रश्न माझ्यापुढें उभा होता, तो म्हणजे हा ग्रंथ केव्हां आटोपणार ? मानवी जीवनातील सर्वश्रेष्ठ पुरोहित जो 'इतिहास' त्याला अशा प्रसंगीं शरण गेलों तर तो सागतो, "धैर्यानें लढा." "सावधगिरीनें चाला" असें तो सागत नाहीं. आमच्यातील सर्वश्रेष्ठ राजा जो फ्रेडरिक त्याच्या तोंडाकडे पाहावें तर तोही हेंच सागणार कीं, "जागचे हलू नका." पण दीडशें वर्षापूर्वीची व सध्यांची परिस्थिति यात महदंतर पडलेलें आहे तेव्हा धंदेवाल्या फौजाच लढत असत, आता अवघे राष्ट्र लढाईत गुंतून पडतें. .आमचा युद्धवीर कायझर रणावरून घरीं परत आला, पाठोपाठ ऑक्टोबर १ ला मीही आलों. तशा त्या दिवसात त्याना मी जवळ हवा असेन हें मला माहीत होतें. ४–५ तारखास आम्ही यु. स्टे च्या प्रेसिडेंटकडे आमच्या तहाच्या उन्मुखतेविषयीं बोलणें सुरू केले फौजेपेक्षा देशातील लोकांनींच कच्च लवकर खाल्ली...मुत्सद्दी व शिपाई याच्यात मतभेद माजूं लागले. आता परिस्थितीला आवर राहीना. कोणी तरी बळी हवा होता. तो ऑक्टोबर २९ ला मिळाला मी रणांगणाकडे एकटाच परत आलों कारण लुडेन्डॉर्फ यानीं त्यागपत्र दिले ! ऑक्टोबरच्या शेवटीं सर्व रणक्षेत्रभर आमचा पूर्ण पाडाव झाला.. देशांत क्रातीची लाट पसरत होती...सगळीच्या सगळी राज्यशासनसस्था हिंवानें थडथडू लागली. शात विचार मागें पडला, सर्व देशाचा विचार

कोणासच करतां येईना. नवीन सत्तेपुढें जर्मन सिंहासन डळमळून कोसळलें; त्याबरोबर जर्मन राजवंशही कोसळला. हें सर्व होताना मी माझ्या सम्राटाच्या शेजारीच होतों...फौजा सुरक्षित परत आणा येवढेंच त्यांनीं मला सांगितलें. नवंबर ९ ला सन्ध्याकाळीं सम्राटांची व माझी भेट झाली. त्यानंतर त्याचें दर्शन मला पुन्हां झालेलें नाहीं. योग्य अशा तहाच्या अटी मिळत नाहीत हें ओळखून आणि आपल्यासाठीं स्वदेशाला जास्त कष्ट होऊ नयेत म्हणून सम्राटानें देशत्याग केला.

वर्तमान हातचा गळाला आहे. आता भावी काळाची आशा बाळगिली पाहिजे. मला दुर्दम आशा वाटते कीं, आमच्या प्राचीन ऐतिहासिक सातत्यात सध्या पडापड झाली असली तरी त्यांत खंड पडणार नाहीं. आमचें प्राचीन ' जर्मन चैतन्य ' आमच्यात पुन्हा प्रवेश करील. दरम्यान चित्तक्षोभ व विपत्ति ही सोसलींच पाहिजेत. 'जर्मन-चैतन्य ' म्हणजे काय हें आमच्या शत्रूंना पुरें माहीत आहे.

## १४ : : एका कवितेनें बदललों !

( अँड्र्यू कार्नेजी या दानशूर गृहस्थाचे नाव यूरोप व अमेरिका या खडात घरोघर झाले आहे. याचे घराणे मूळ स्कॉटलड देशातील, पण उद्योगधद्यानिमित्त याचे वडील अमेरिकेत गेले व हाही तिकडेच गेला. लहानपणापासून त्याने पोटास मिळविण्यास आरभ केला प्रथम रेल्वे कपनीच्या तारखात्यात त्याला नोकरी मिळाली पण त्याला तेथे चैन पडेना. नवा धदा काढावयाचे त्याच्या मनाने घेतले व त्याने एक लोखडाचा कारखाना काढला. होता होता अशा कारखान्याचा एक मोठा संघ तयार होऊन तो त्याचा नायक झाला. या धद्यात त्याला इतकी किफायत होऊ लागली की, या पैशाचे काय करावे या विचारानेच त्याचे मन व्यग्र होऊ लागले. इ स. १९०१ साली त्याने धंद्यातून अग काढले आणि अमेरिकेतून परत येऊन तो स्कॉटलडमधील आपल्या वाड्यात राहू लागला. ‘ ज्ञानाची सदावर्ते ’ जिकडे तिकडे घालावी आणि पृथ्वीवर शातता नादेल अशा योजना कराव्या, या दोन गोष्टीत त्याने आपली उरलेली हयात खर्च केली. तसेच त्याने आपली अफाट सपत्तीही याच कामात वेचिली. सुमारे एक अब्ज रुपयाहून थोडी जास्त रक्कम त्याने ज्ञानप्रसार आणि शातता यावर खर्च केली. ज्ञानप्रसारासाठी वाचनालये काढण्याचा झपाटा त्याने सुरू केला

आणि युद्धात मिळालेल्या विजयापेक्षा शाततेने मिळविलेले विजय हे मानवी सुखाला जास्त कारण झालेले आहेत असे पाहून त्या विजयाच्या सपादनाला जितके प्रोत्साहन देता येईल तितके द्रव्यरूपाने देण्याची त्याने शिकस्त केली. एक कविता वाचल्याने या विजयासबंधाने आपल्याला कशा उदात्त कल्पना सुचल्या याचे वर्णन त्याने आपल्या आत्मचरित्रात केले आहे. त्या इग्रजी कवितेचे मराठी भाषातर मी मुद्दामच दिले आहे ब्रिटन व अमेरिका येथ त्याने कित्येक वाचनालये स्थापिली, हेग येथे एक शाततापरिषद स्थापून तिच्यासाठी एक सुदर व भव्य मदिर बाधून दिले, महत्कृत्ये करणाराना पारितोषिके देण्यासाठी द्रव्याची योजना केली, हुजार विद्यार्थ्याना शिष्यवृत्त्या देण्याची व्यवस्था केली, व निराश्रित वृद्धाना सेवान्तवेतने मिळण्याची तरतूद केली. अशी महत्कृत्ये करून हा उदार पुरुष १९१९ साली परलोकवासी झाला. त्याने लिहिलेल्या अनेक पुस्तकातील ‘ द्रव्यार्जन ’ हे पुस्तक विशेष प्रसिद्ध आहे. )

* * * सपत्ति-साधनावरचा माझा ग्रथ प्रसिद्ध झाल्यावर, अधिक धन मिळविण्याचें बंद करून, ग्रथातील प्रतिपादनाप्रमाणे वागणें आतां मला प्राप्तच झालें. नवें धन मिळविणें बंद करण्याचें ठरविलें व त्यापेक्षां शतपट अधिक महत्त्वाचें व अवघड काम, कीं या धनाचा देकार कसा करावयाचा, तें हातीं घेण्यास उद्युक्त झालों. आमचा सालीना नफा बारा कोट रुपये होता · व येथून पुढें होणारें वाढतें उत्पन्न भलतीकडेच दांडगें होणार हें स्पष्ट दिसत होतें. ज्या कंपनीला आम्ही

आमचा कारखाना विकला त्या युनायटेड् स्टेट्स् स्टील कॉर्पोरेशननें पहिल्याच वर्षी वीस कोटी नफा काढला. आम्हींच जर धंदा चालू ठेविला असता, आणि ठरल्याप्रमाणें तो वाढविला असता, तर आम्हांला तीस कोट नफा झाला असता. लोखंडाचा महिमा इतका वाढला कीं, त्याच्यापुढें इतर कमकुवत वस्तु टिकाव धरीनात, बांधकामांत लोखंडाला राजपद प्राप्त झालें अर्थात भविष्यत्काळीं मोठाच गल्ला जमा होण्याची खात्री होती, पण माझ्यापुरतें मला दिसूं लागलें कीं, हस्तगत संपत्तीची निरवानिरव करण्याचें काम मला म्हातारपणीं फारच जिकीरीचें होऊन बसेल शेक्सपियरनें याही कामीं आपल्या लेखणीचा परिस या विचाराला लावला व कशी सोन्याची ओळ लिहिली पहा: " अवश्य असनें त्यापेक्षा जें जास्त हातीं येईल तें वाटून टाक म्हणजे प्रत्येकाला पुरेसें लाभेल. "

या ठेकारातील माझी पहिली देणगी मीं गिरणींतील कामगारांना दिली. दानपत्रांत मीं लिहिलें, " ज्या कामगारवर्गानें माझ्या यशः-प्राप्तींत मला इतकें साह्य केलें त्याचा मी अत्यन्त ऋणी आहें. त्याचें उतराई व्हावें म्हणून धंद्यातून बाहेर पडतांना मी एक कोट रुपये बाजूस काढून ठेवतों. अपघातानें जे पंगू होतील व ज्यांना वार्धक्यांत मदतीची आवश्यकता आहे त्याच्या अडचणीचा परिहार या द्रव्यांतून व्हावा. शिवाय आणखी पस्तीस लक्ष रुपये मी देतों. कामगारासाठीं मीं जीं सभागृहें बांधिलीं आहेत व वाचनालयें स्थापिली आहेत त्याचा खर्च या रकमेच्या व्याजांतून चालावा. "

' स्कॉटिश अमेरिकन ' हें मोठें मोलवान् पत्र आहे. यांत मला अनेक बहुमोल विचारमणि सांपडतात. एकदां एक चुटका आढळला; तो असाः—" कोणी सणग विणू लागला तर देव सुताची वाण पडू देत नाही. " हा चुठका जणूं कांही मला उद्देशूनच लिहिला आहे असें मला वाटलें तो माझ्या अंतरंगाला जाऊन भिडला, आणि आपणच सणग विणूं लागावें असा निर्धार मी केला, आणि न्यूयॉर्क शहरातील अद्ुसष्ट वाचनालयासाठी सपाट्यासरशी दोन कोट रुपये मीं देऊन टाकले. डन्फर्मलिन या गांवीं माझ्या वडिलांनी परिपाठ ठेवला होता की, ज्यांच्यापाशीं पुस्तकें नाहींत त्यांनीं आपल्या घरीं येऊन वाचत बसावें. पुढें मीं त्या गांवाला एक वाचनालयच स्थापून दिलें. या मंदिराचा पाया माझ्या आईच्या हस्तें भरला. हें सार्वजनिक वाचनमंदिर म्हणजे मी लोकांस दिलेली पहिली देणगी होय. याच्या मागोमाग अलेघानी शहराला, कीं जिथें आम्ही पहिल्यानें वस्ती केली, तेथें एक सभागृह व एक वाचनमंदिर मीं स्थापून दिलें. यांचें उद्घाटन करावयास प्रेसिडेंट हॅरिसन हे वॉशिंग्टनहून मुद्दाम मजबरोबर आले होते हें होतांच पिट्सबर्ग नगरानें आम्हाला वाचनालय द्या अशी विनंति केली. मी ती मान्य केली. हळूहळू या इमारतीच्या शेजारीं दुसऱ्या इमारती उठल्या, एक-वस्तु-संग्रहासाठीं, एक चित्रमंदिर म्हणून, कांहीं इमारती कला—शिक्षणमंदिरासाठीं, व एक तरुण स्त्रियांच्या शिक्षणासाठीं म्हणून. या सर्व इमारती १८९५ च्या नोव्हेंबर पांचला लोकोपयोगासाठीं मीं खुल्या केल्या.

या पिट्सबर्ग शहरींच मीं इतका पैसा मिळविला होता. अर्थात् वरील संस्थांवर मीं जवळ जवळ दहा कोट रुपये खर्च केला.

दुसरी फार मोठी देणगी म्हणजे वॉशिंग्टन येथील 'कार्नेजी इन्स्टिटयूट' स्थापन करण्यासाठीं दिलेली होय. प्रथम या संस्थेसाठीं मीं चार कोट रुपये दिले व पुढें तिची उपयुक्तता जसजशी प्रत्ययास आली तसतशी जास्त रकमा देत देत ही देणगी दहा कोटींपर्यंत मीं नेली. स्वाभाविकपणेंच मला वाटलें कीं, प्रेसिडेंट रूझवेल्ट यांना या प्रकरणीं विचारावें व सेक्रेटरी ऑफ स्टेट यांनाच म्हणावें कीं, या संस्थेचे मुख्य कारभारी आपण व्हावें. त्यांनी तें काम खुषीनें पतकरलें. त्यांच्या जोडीला डायरेक्टर्स म्हणून मीं आणखी आठ दहा मंडळी निवडलीं. ही यादी जेव्हां रूझवेल्ट यांना दाखविली तेव्हां ते उद्गारले, "दुसरें इतकें चागले मंडळ निवडावयाचें म्हटलेंत तर आतां माणसेंच नाहीत !" या संस्थेनें केलेली कामगिरी इतकी प्रसिद्ध आहे की, तपशिलांत शिरण्याची आवश्यकता वाटत नाहीं. तथापि दोन उदाहरणें देतों. तिची ही कामें विशेषच म्हटलीं पाहिजेत. लांकूड व पंचरशी धातु यांची बांधलेली एक संशोधन-नौका या संस्थेनें सर्व सातासमुद्रांत फिरती ठेविली आहे. पूर्वीच्या जलप्रवाश्यांनी जी सामुद्रिक पाहणी केली होती व जे नकाशे काढले होते ते नाविकांना भलतीकडेच नेत. त्यांची जहाजें लोखंडानें मढविलेलीं असल्यामुळें समुद्रांतील किंवा समुद्रकांठच्या लोहचुंबकाची त्यांच्यावर ओढ बसत असे व प्रथम अवलोकनांत

आणि म्हणून मग नकाशांत चुका झालेल्या असत. आमची ही जी पंचरशी ' कार्नेजी ' नौका तिला ही भीति मुळींच नाही. त्यामुळें तिचें अवलोकन व मार्गसशोधन अगदीं बिनचूक येऊं लागलें. याचें ढळढळीत उदाहरण म्हणजे अझोरेसबेसवर रेताडांत सांपडलेल्या कुनार्ड या जहाजाचें होय या जहाजावर हा प्रसंग कां आला, हें कार्नेजीच्या ताडेलाने पडताळून पाहिलें. त्याला दिसून आलें कीं, कुनार्डच्या कप्तानाचें काहींही चुकलें नव्हते, तो नकाशाबरहुकूम जात होता पण नकाशाच चुकला होता. अशा किती तरी चुका आमच्या सशोधन नौकेनें दुरुस्त केल्या आहेत. समुद्र-फेरिस्त्यानीं आमचे या कामीं आभार मानले हेंच आमचें पारितोषिक होय

दानपत्रात मीं अशी आशा व्यक्त केली होती कीं, पुराण राष्ट्रांनीं आमच्यावर जे उपकार केले आहेत त्याची थोडी तरी परतफेड आमच्या या नव्या राष्ट्राच्या हस्तें व्हावी. ती होत असलेली पाहून मला पराकाष्ठेचें समाधान होत आहे. अशी आणखी एक ठळक कामगिरी कॅलिफोर्नियांतील आमच्या वेधशाळेनें केली आहे. समुद्रसपाटीपासून ५८८६ फूट उंचीवर विल्सन पर्वतावर ही वेधशाळा बांधलेली आहे व प्रो. हेल हे ती चालवितात. एका सालीं बरोबर चागले चांगले ज्योर्तिविद घेऊन हेल हे रोम शहरच्या ज्योतिष-परिषदेस गेले असता त्यानीं तेथें इतक्या नव्या नव्या गोष्टी सागितल्या कीं, पुढील आपली परिषद् आपण विल्सन पर्वतावरच भरवू असें सर्व पंडितांनीं ठरविलें व

त्याप्रमाणें ती भरली. पर्वत म्हटला तरी 'मौंट विल्सन' हा एकच सुळका आहे. भुईच्या पोटात बहात्तर फूट खोल तळघर करून तेथून नव्या ताऱ्याचीं छायाचित्रें त्यांनी घेतलीं. पहिल्यान्त कांचेवर, मला वाटतें, मोळा नवे तारे स्पष्ट उमटलेले दिसले, दुसरीवर साठ नवे भूगोल उमटले; व तिसरीवर शंभरांहून जास्त गोलकाच्या छाया उमटल्या ! यांतले कित्येक आपल्या सूर्याच्या वीसपट मोठे आहेत. कांहीं तर इतके अतरावर आहेत कीं, त्यांचीं किरणें पृथ्वीवर पोहोंचावयास आठ वर्षें लागतील. हें पाहिलें म्हणजे शिर लववून पुटपुटावेंसे वाटतें कीं जें ज्ञान ज्ञान म्हणून वाटतें तें अज्ञानाच्या मानानें काहींच नव्हे ! सध्याच्यापेक्षां तिप्पट मोठी ती नवी होत असलेली राक्षसी दुर्बिण एकदां उभी झाली म्हणजे काय काय नवे चमत्कार दिसतील कोण जाणे ! जाणते लोक म्हणतात कीं, चद्रलोकावर जर माणसाची वस्ती असली तर तीं माणसें या दुर्बिणीतून स्वच्छ दिसतील.

एकदा माझ्या एका मित्रानें "शांतिकाळांत" या नावाची एक कविता माझ्याकडे पाठवून दिली. ती सत्यार्थ व सुंदर कविता मीं पुन पुन्हा वाचली व "वीरपरितोष" या नावाचा निधि मी प्रस्थापित केला कविता अशी होती:—

"युद्ध—गर्जना, डमरु—घोषणा,
जरी निमाल्या रणावरी
पराक्रमाची वार्ता कुठली ?
वीर्य लोपतें धरेवरी !" ॥ १ ॥

अभद्र वाणी, असली कोणी,
वदे, ऐकतां ती कानी
बाहु उभारुनि, गर्जुनि सांगे,
" हा मी येथें उभा " कुणी ! ॥ २ ॥
" अनय–असुर, पदतळीं रगडितों,
बळी घेत जो कल्पवरी,
दिसे दीन परि, मारिन गर्दन,
मर्दुनि टाकिन, त्यासि तरी. " ॥ ३ ॥
नारी कोणी, गोरीमोरी,
थरथर कापे, तिची तनू ।
अंगावरती हात टाकित्या
पशूपुढें परि व्याघ्र जणू ! ॥ ४ ॥
बालक सानें, गोजिरवाणें,
सोशी दुखणें, कण्हेचिना ।
म्हणे " आइला क्लेश लेशही
पडतां काळिज तडेल ना ! " ॥ ५ ॥
निसर्ग–गूढें, धार्मिक मूढें,
नेणुनि, दडिति पडित त्या ! ।
सत्यासाठीं, हत्या हो जरि,
दंड ठोकितो पुढती ज्या ! ॥ ६ ॥

कानु-कायदा, जिगजिग करुनी,
रोगट शांती फेसाळी
दे लाथाडुनि कुणी फाटका,
गिटिते सारें जग टाळी; ॥ ७ ॥

आपण मरुनी, जग जगवावे,
यास्तव अर्पी देह कुणी
शोधक, ऐसे शूर धरेवरि.
शांतिकाळचे वीरमणी ! ॥ ८ ॥

अशा प्रकारच्या शांतिकाळांतील वीरांनीं दुसऱ्यासाठी आपले प्राण अर्पण केले तर त्यांच्या मुलांमाणसांची कांहीं सोय व्हावी म्हणून, मीं दीड कोटि रुपये बाजूस काढून ठेविले. कांहीं अपघातानें कोणी आश्रयहीन झाले तर त्यांनाही यांतून मदत करावयाचें ठरविलें. पुढें असाच एक निधि माझ्या भूमीत म्हणजे इंग्लडांत मीं स्थापिला. हळूहळू फ्रान्स, जर्मनी, इटली, बेल्जम, हॉलंड, नॉर्वे, स्वीडन, स्वित्सर्लंड व डेन्मार्क या देशांतही असे निधि प्रस्थापित केले. ब्रिटिश सम्राट् एडवर्ड व जर्मन सम्राट् विल्यम यांनीं माझ्या या योजनेची मोठीच वाहवा केली; आणि तिचा उपयोग किती होत आहे याच्या प्रत्यन्तराचीं प्रत्यक्ष उदाहरणें जर्मन केसरनें वकिलाच्या हस्तें मला कळविलीं.

## १५ : : माझ्या स्वभावाचे कंगोरे !

[ हरबर्ट स्पेन्सर या इंग्रज गृहस्थाचे नाव तत्त्वज्ञान संशोधनात अजरामर झाले आहे महाराष्ट्रातील आधुनिक सुधारकांच्या विचारसरणीवर या तत्त्ववेत्त्याच्या लिखाणाचा मोठाच संस्कार झाला आहे. याचा जन्म इ स. १८२० या वर्षी झाला पुढे दिलेल्या परिच्छेदावरून दिसून येईल की याचा बाप एक साधा शिक्षक होता, पण त्याच्या अंगातील काही काही गुण हरबर्ट याला उपजत प्राप्त झालेले होते. तत्त्वज्ञानाची आवड त्याला बापाकडूनच प्राप्त झाली होती हा प्रथम रेल्वेखात्यात एंजिनियर म्हणून काम करू लागला. त्याच्या मनाचा कल हळू हळू स्पष्ट होऊ लागून इ स १८४८ त तो 'दि इकॉनमिस्ट' या नियतकालिकाचा दुय्यम संपादक बनला. तथापि या कामातही त्याचे मन रमेना. तत्त्वज्ञानाकडे असलेला त्याचा ओढा अधिकच स्पष्ट झाला. पण परंपरेने इतरांकडून प्राप्त झालेल्या ज्ञानाचा केवळ संचय करणे त्याच्या चवकस मनाला आणि स्वतंत्र बाण्याला मानवण्यासारखे नव्हते. मानवी जीविताचे व वस्तुजाताचे स्वतंत्र निरीक्षण करून आपणच काही नियम बांधावे व अनुमाने करावी अशी उमेद त्याने बाळगिली व सतत उद्योग, चिकाटी, आणि प्रतिभा यांच्या बळावर त्याने खरोखरच तत्त्वज्ञान-राशींत अमूल्य भर घातली. आपले तत्त्वज्ञानाचे विचार त्याने पाच ग्रंथांत सांगि-

तले आहेत आद्य तत्त्वे, जीवितशास्त्राची तत्त्वे, मानसशास्त्राची तत्त्वे, समाजशास्त्राची तत्त्वे व नीतिशास्त्राची तत्त्वें हे ते पाच ग्रथ होत. याशिवाय अनेक लहानसहान पुस्तकें त्याने लिहिली. त्याच्या तत्त्वज्ञानाचा मध्यवर्ती विचार हा आहे कीं, "सर्व शारीरविकसन म्हणजे एकविध-त्वाकडून बहुविधत्वाकडे जाणं होय." इ स. १९०३ त हा तत्त्ववेत्ता कालवश झाला.

हरबर्ट स्पेन्सरने लिहिलेल आत्मचरित्र केवळ मनोरंजकपणाच्या दृष्टीने पहाता अगदीं सुमारच आहे पण आपल्या मनोविकासाचे विवेचन मात्र त्याने फार सुंदर तऱ्हेने केले आहे. साध्या हकीकती सांगत असताना सुद्धा पुन्हा पुन्हा तात्त्विक विचाराकडे वळण्याची त्याची प्रवृत्ति ध्यानात ठेवण्यासारखी आहे. आपल्या स्वभावाचे काही काही कंगोरे त्याने फार सुबकपणाने दाखविले आहेत. त्यातील थोडेसे मासल्यासाठी येथे दिले आहेत. ]

* * * रोम शहरी मी सुमारें पधरा दिवस होतों. तेवढ्यात माझी मोठीच करमणूक झाली मात्र लोकाना जितका त्या स्थलाचा महिमा वाटतो तितका मला वाटला नाहीं. कारण मला ऐतिहासिक आठवणी अगदी कमी होत्या रोमन इतिहास मी लहानपणीं वाच-लेला; त्यातले काहीं पुसट पुसट सस्कार माझ्या मनावर होते. तथापि एक मात्र सांगतों कीं, जरी मला इतिहास चागला आठवत असता तरी तीं तीं स्थळें पाहून मला विशेष कांहीं वाटलें असतें असें मात्र नाही. प्राचीन इमारती पाहिल्या म्हणजे मला दुसरें तिसरें कांही वाटत नाहीं. इतके दिवस त्या येथें उभ्या आहेत याचेंच काय वाटेल तें.

आणि पडझड झाली असली तरी तिच्यातच जे काही विशेष सौंदर्य असतें तेंहि मला पहावेंसें वाटतें. एखादें जुने देऊळ नाही तर एखाद्या किल्ल्याचे अवशेष हे पाहावयास मी जेव्हा जातों तेव्हां हे कोणी बांधले, येथें कोण राहत असत, येथें कोण मेले, आणि येथें काय अघटित झाले, असल्या गोष्टींकडे माझें मनच वळत नाहीं. अगदीं जवळ असलेलें एखादे रणक्षेत्र पाहावयास जाण्याचीसुद्धा मला कधी बुद्धि होत नाही. अनेक लोक एकत्र जमले, त्यात कोणी मेले, आणि कोणाला जय मिळाले ! असलें स्थळ पाहण्याची मला यत्किंचितही वासना होत नाही. कोणी वाटाड्या बरोबर असला तर मला त्याचा उपद्रवच होतो. पण एखादा बरोबर घेतलाच पाहिजे असें असलें तर गप्प बसावयास काय घेशील म्हणून मी त्याच्या हातावर कांहीं तरी ठेवीन. कारण त्या जुनाट भिंती आणि कमानी याचे रग आणि आकृति यानीं माझ्या मनात जी अनुकूल चलबिचल होते तिचा अनुभव घेण्याच्या आड या वाटाड्याची वटवट येते. एखाद्या स्थळाच्या इतिहासाचा जितका मोह मला पडतो, त्यापेक्षां त्या स्थळाच्या काव्याचा म्हणजे सौंदर्याचा मोह मला अधिक पडतो. असे असल्यामुळें ज्यांना इतिहास माहीत आहे त्यांना या शहरांतील जीं ठिकाणें अत्यंत रमणीय वाटलीं तीं ठिकाणें मीं केवळ उदास-बुद्धीनेंच पाहिलीं.

पण या ठिकाणीं प्राचीन काळच्या थोर व्यक्तींविषयींचें माझ्या बुद्धीतलें आणखी एक पाखंड मला बोलून दाखविले पाहिजे.

तें वाचून कांहींजणाना बरें वाटेल पण पुष्कळांच्या अंगाचा संताप होईल. कुलगरच्या चित्रकलेवरील पुस्तकात रॅफेल या चित्रकाराच्या मृत्यूची हकीगत देतांना म्हटलें आहे, " या चित्रकाराच्या कृतीकडे लोक धार्मिक आदरबुद्धीनें पाहत असत, प्राचीन कालीं अवतारी पुरुषाच्या द्वारा ज्याप्रमाणें परमेश्वरानें आपल्या स्वरूपाचा आविष्कार केला त्याप्रमाणें रॅफेलच्या द्वारा परमेश्वराने आपले रूप प्रगट केलें आहे." याच पुस्तकांत पुढें म्हटलें आहे की, " रॅफेलच्या कृतींवर टीका करण्याची बुद्धि झालीच तर ती अत्यंत विनम्र भावानें प्रकट व्हावी हें आपल्यालाच भूषणास्पद आहे " उघड उघड टीकाकाराची भूमिका घेतलेल्या माणसाची प्राचीन काळच्या कीर्तिमान् माणसापुढें झालेली ही शरणागति पाहिली म्हणजे त्या प्राचीन पुरुषाची जी सध्याच्या काळीं नौबत वाजत असते तिच्यांत खरोखरी तथ्य किती आहे याविषयीची माझी भूमिका अधिकच बळकट होते....कोणी कोणी म्हणतात कीं, " या प्राचीन कलावन्तांवर आपण अशी टीका करतां कामा नये. त्याच्या कृतींनें आपल्या मनात ज्या कल्पना आणि ज्या भावना उत्पन्न होतात त्यांकडे आपण लक्ष द्यावें. चित्रणांतील पृथक् वस्तूचा त्यांनीं मेळ कसा घातला आहे हें पहावें. पण जर तंत्रविषयक कांहीं चुका झाल्या असल्या तर मात्र त्यांची उपेक्षा करावी." माझें असें स्वच्छ मत आहे कीं तंत्रांच्या चुकांची उपेक्षा करावी असें म्हणणें अगदीं चूक आहे. एखादी कविता वाचून झाल्यावर मला जर कोणीं असें सांगितलें कीं, या कवितेची कल्पना किती

सुबक आहे, तें पहा, व्याकरण चुकलें आहे, वृत्तरचनेंत बिघाड झाला आहे, यमकें कर्णकटु आहेत, शब्दसहति कर्कश आहेत, रूपकाचा गोंधळ झाला आहे, असल्या गोष्टी पाहून तुम्हांस काय करायचें आहे ? आणि जर मीं हें पत्करलें तर मात्र हीहि भूमिका मी पत्करीन कीं, एकाद्या चित्राचा विचार करताना निरनिराळ्या दिशाहून उजेड येत आहे असें दाखविलें आहे अथवा अमुक एका बाजूकडून येत आहे हें पाहण्याकडेहि आपण बेलाशक दुर्लक्ष करावें ! . आपण जें मत द्यावयाचें त्यावरून आपण निरीक्षक आहों असें दिसलें पाहिजे, आपण निरीक्षकच नव्हों असें दिसतां कामा नये.

꧁ कोणी कोणी असें म्हणतात कीं, माझ्या अंगात एकादी वस्तु खुलवून सांगण्याची शक्ति विलक्षण आहे, हातीं असलेलें साहित्य, त्यावर चालविलेली माझी तर्कपद्धति, आणि शेवटीं मी काढलेले निर्णय हीं मी इतक्या सुस्पष्टपणानें व सुसंबद्धपणानें सागतो कीं, तसें सहसा इतर कोणास साधत नाही. ही शक्ति माझ्या अंगी कोठून आली ? माझ्या आजाचा सगळा जन्म शिकविण्याचे काम करण्यात गेला. आणि माझ्या वडिलानीहि सगळ्या जन्मांत दुसरें कांहीं केलें नाही. आतां शिकविणें, शिकविणें म्हणजे मुख्यतः एखाद्या वस्तूची खुलावट करणें होय. तासन् तास आणि दिवसानुदिवस शिकविणारा माणूस, मग तो शाळेंत शिक्षक असो कीं खासगी शिकवण्या करीत असो, सगळा वेळ वस्तूचा उलगडा करीत असतो. त्याला जर आपल्या धंद्याची कांहीं कल्पना असली तर, पोरांनीं पाठ केलेले

घडे ऐकत बसण्याचा उद्योग तो करणार नाही; तर ते धडे त्याना समजावून देण्याची दक्षता तो राखील, आणि त्याची समजूत पडावी म्हणून कठीण स्थळांचा उलगडा करील; अथवा त्याहीपेक्षां हा उलगडा ज्या तत्त्वाना अनुसरून व्हावयाचा तीं तत्त्वेंच त्याना शिकवून, कठीण स्थळांची समजूत त्यांची त्यांसच व्हावी असे करील चांगला शिक्षक म्हणजे तो की जो स्वाभाविकपणेंच किंवा संवयीनें, जिला बौद्धिक सहानुभूति म्हणतात, ती संपादितो. ज्या कल्पना सांगावयाच्या आहेत त्या कल्पनांचा अनुक्रम कसा लावावा हें बरोबर कळावयास ऐकणाराच्या मनःस्थितीत शिरण्यास लागणारा गुण म्हणजे बौद्धिक सहानुभूति. आमच्या आजोबाच्या अगीं हा गुण कितपत होता हें सागवत नाहीं. नित्य तोच धडा असल्यामुळे या गुणाचा उदय त्यांच्या ठिकाणीं थोडासा झालेला असावा. पण वडिलांच्या अंगी मात्र हा गुण विलक्षण होता. आणि उत्तरोत्तर त्याचा विकासच होत गेला. माझ्या अंगात ही शक्ति वडिलाच्यापेक्षाही जास्त आहे. अर्थात् माझें व माझ्या वडिलाचें शिकविणें पाहिलेल्या एका तरुण माणसानें असें मत दिलें होतें ! याचा अर्थ असा कीं, माझी ही शक्ति आनुवंशिक असून सरावानें वाढलेली आहे.

मला टीका करण्याची फार खोड आहे हें कोणालाही अमान्य होणार नाही ! माझीं मते उकलून दाखवितांना मी नेहमीं दुसऱ्यांच्या मतातील वैगुण्यें दाखवीत असतों, आणि माझ्या लेखनात जर माझी ही खोड एकपट दिसत असली तर माझ्या बोलण्यांत ती दुप्पट

दिसून येते. दोष काय आहेत हें पाहण्याची प्रवृत्ति माझ्यात अगदीं प्रखर आहे; नसावी इतकी प्रखर आहे. भोंवतींच्या लोकांच्या बोलण्यांतील व विचारातील चुका दाखविणें ही माझी जित्याची खोड आहे; ती कांहीं केल्या जात नाहीं. माझें मलाच त्याचें भारी वाईट वाटतें; पण स्वभाव दुरतिक्रम आहे. ही सवय मला कोठून लागली ? माझ्या विवेचनबुद्धीचें जें उगमस्थान तेंच माझ्या या संवयीचेंही आहे. शिक्षकाचा निम्मा वेळ विवेचनांत खर्च होतो आणि उरलेला निम्मा टीका करण्यांत खर्च होतो; म्हणजे शिकत असलेल्या विद्यार्थ्यांच्या चुका काढणें, त्यांच्या वह्या तपासणें, आणि त्याचीं उदाहरणें चूक की बरोबर हें ठरविणे या कामांत तो जातो. आणि नैतिक व बौद्धिक अशा आपल्या ह्या शक्तींचा उपयोग आपण अशा रीतीनें केला नाहीं, तर आपलें कर्तव्यच आपण केलें नाहीं असें या शिक्षकांना वाटतें. माझेंही असेंच आहे. टीका करणें म्हणजे कर्तव्य बजावणें होय इतकें निकडीचें तें मला वाटतें. केव्हां केव्हां एकाद्याच्या बोलण्यांत किंवा करण्यांत कांहीं चूक आहे हें दिसत असूनही मी मोठ्या कष्टानेंच का होईना पण गप्प बसतो. पण गप्प बसलों तरीं माझ्या मनाची अगदीं चुळबूळ चाललेली असते. जें करावयास हवें होतें तें मीं केलें नाहीं या विचारानें मला भारीच अस्वास्थ्य उत्पन्न होतें. आनुवंशिकतेनें आलेली टीकाबुद्धि ही कर्तव्यविषयक उपजत बुद्धीचें रूप धारण करते व आपोआप बोलूं लागते.

आनुवंशिकतेनें माझ्या अंगांत उतरलेल्या आणखी एका सदृश स्वभावविशेषाचा असाच खुलासा करावयास हवा. दुसऱ्याचें न जुमानणें हा माझ्या स्वभावाचा एक विशेष आहे. हा विशेष माझ्या इतका फार थोड्या लोकानी दाखविला असेल. लहानपणचें एक उदाहरण मला आठवतें. मी तेरा वर्षांचा होतों. डॉ. आर्नो यांनीं आपल्या विज्ञानशास्त्रावरील ग्रथात ' स्थितैक्य ' म्हणजे इनर्शिया या तत्त्वाचें विवेचन केलें आहे, तें मला मान्य नाही असें मी म्हणालों. माझे काका म्हणाले कीं, ग्रथकर्त्याचे म्हणणेंच बरोबर आहे. काका व ग्रंथकर्ता असे एक झाले तरी माझा हट्ट सुटेना. माझेंच म्हणणें बरोबर असें मीं म्हणत राहिलों. १८९८ सालीं असाच एक प्रकार घडला. त्या वेळचे सर्व ज्योतिषी म्हणू लागले होते कीं, धूमकेतूंतील नेब्यूलाची निघालेली उपपत्ति निःसंशय युक्त व स्वीकार्य आहे; पण मला ती नापसंत आहे असें मीं ठासून प्रसिद्ध केलें. तसेंच पृष्ठवशधारी सांगाड्याच्या अस्थींतील नात्यासबधीं ओवेन यांनीं जी उपपत्ति बसविली तीही मीं पत्करण्याचें साफ नाकारलें ! वास्तविक, तेव्हांच्या शास्त्रज्ञानीं ती उपपत्ति मान्य केली होती व ती मेडिकल सस्थातून प्रत्यक्ष शिकवीतही असत. पण मी ती झिटकारून दिली ! स्वतत्र मत बनविण्यास माझ्या हातीं जर पुरेसें साहित्य नसलें तर मात्र इतराचें प्रस्थापित प्रामाण्य मानावयास माझ्या लिहिण्यांत मी तयारी दाखविली आहे. गणित, उच्च पदार्थविज्ञान, व रसायनशास्त्र या

विषयात मला असें करावें लागलें. स्वतंत्र साहित्याच्या अभावीं तज्ज्ञाचें मत मानणें प्राप्तच बनतें. दुसऱ्याचें न जुमानण्याची ही माझी प्रवृत्ति अमर्यादच आहे, पण तिचेंही उगमस्थान वर सांगितलेलेंच आहे. शिक्षकाची नेहमीची मनाची बैठक तरी काय असते ? विद्यार्थ्यांच्या समोर तोच काय तो प्रामाण्याचा गड्डा ! त्याच्यापुढें कोणाचेंच चालावयाचें नसतें. धंद्याच्या या तऱ्हेमुळें त्याच्या प्रौढ वयांत तरी इतर कोणाच्या प्रामाण्यापुढें मान लववावी हें त्याला माहीत झालेलेंच नसतें. त्याच्यापेक्षा श्रेष्ठ दर्जाच्या लोकांशी त्याचा संबंध येतो, पण कनिष्ठाशीं जितका येतो त्याच्या मानानें तो काहींच नसतो. त्यामुळें दुसऱ्यांचें जुमानण्याची प्रवृत्ति त्याला भावतच नाहीं.

या प्रवृत्तीच्या जातीचीच दुसरी एक प्रवृत्ति माझ्या अंगीं आहे. ती या प्रवृत्तीचीच दुसरी एक बाजू असें म्हटलें तरी चालेल. मला कोणाही वरिष्ठाचें मनांतून भय वाटत नाहीं. मात्र यात श्रेष्ठाच्या प्रामाण्याचा आदरही माझ्या मनात नसतो हें ओघानेंच येतें. आणखी एक कलम त्यात आहे. प्रामाण्याच्या अनादराचे जे दुष्परिणाम, त्याच्याविषयींही मी बेफिकीर असतों लहानपणींच माझ्या अंगांत ही वृत्ति दिसू लागली होती व ती मोठेपणीं माझ्या सगळ्या लिखाणात दिसून आली. अमका गृहस्थ काय म्हणेल किंवा तमकें मंडळ काय म्हणेल याचें पुसटसुद्धां भय मीं कोठें दाखविलें नाहीं. पुढें आपलें काहीं तरी बिघडेल या भयानें एखादी गोष्ट करावयास मीं कधीं मागें पुढे पाहिलें नाहीं. किंबहुना होणारें नुकसान मला

कधीं दिसलेंच नाहीं, कारण मीं त्याचा कधीं विचारच केला नाहीं. लोकमत आपल्याविरुद्ध आहे असें जरी दिसत असलें तरी माझा हाच खाक्या आहे. सरकारनें लोकांना शिक्षण द्यावें या तत्त्वाला मी सारखा विरोध करीत आलों आहें. या विरोधाला मीं प्रथम सुरवात केली तेव्हा मी केवळ बावीस वर्षांचा होतों ऱ्याहत्तर वर्षांच्या वयातही मी तितकाच किंवा अधिक जोराचा विरोध करीत आहें ! या सगळ्या काळात अखिल राष्ट्र माझ्याविरुद्ध आहे याची मला पुरी जाणीव आहे ! तरी माझा विरोध कायम आहे. याही प्रकरणीं उगमस्थानाची वरचीच उपपत्ति लागू पडते. शिक्षक आणि विद्यार्थी याच्यात काय संबध असतो बरें ? तो संबंध असा असतो की, त्यात भीति बाळगण्याचें त्याला कसलेंही कारण नसतें. शाळा म्हणजे एक लहानसा समाजच होय, आणि समाजातील कोणाही एकाला किंवा सबंध समाजाला शिक्षक कधींही भीत नसतो !

आतां इतक्याच महत्त्वाच्या एका शारीरिक लक्षणाविषयीं थोडें लिहितों. माझे हात फार लहान आहेत माझ्याहूनही कमी उंच असलेल्या एखाद्या स्त्रीच्या हाताहूनही ते लहान आहेत. आंतली हाडांची चौकट आणि तिच्यावर असलेल्या स्नायूंची वाढ या दोनही बाबतींत ते असावयास हवेत त्यापेक्षां किती तरी लहान म्हणजे खुरटलेले आहेत माझे वडील आणि आजोबा यांनीं जन्मभर काय केलें हें पाहिलें म्हणजे याचें कारण स्पष्ट दिसतें. दिवसामागें दिवस टाक चालविण्यापलीकडे त्यांनीं कोणताही व्यवसाय केला नाहीं.

हातांचा उपयोग होईल असा कोणताही खेळ ते खेळले नाहीत किंवा कसला व्यायामही त्यांनीं केला नाहीं. हे केलें असतें तर मात्र हाताचा आकार असावयास हवा तेवढा राहिला असता तरुणपणीं माझे वडील मासे धरावयास जात असत आणि केव्हां केव्हां, एखादे वेळीं बागेमध्यें काहीं बारीक सारीक काम करीत असत. पण नित्याच्या व्यवसायांत हाताचा जो कांहीं उपयोग होई त्यापलीकडे त्याच्या हातून काहीं होत नसे. स्वाभाविकपणेंच माझे लहान हात म्हणजे दोन पिढ्यांत हातांचा वापर पुरेसा न झाल्याचें फळ आहे असें म्हटलें पाहिजे. अशा प्रकारें संपादित स्वभावविशेष आनुवंशिकतेनें खालीं उतरतात हें चार मानसिक विशेषानें आणि एका शारीरिक विशेषानें सिद्ध झालें आहे.

असें म्हणतात की, माणसाच्या अगांत जे गुण असतात त्या गुणांच्या अंगभूतच कांहीं दोषही असतात; आणि हें बरोबर आहे. त्याला ज्या चागल्या गोष्टी दिलेल्या असतात त्याबरोबर कांहीं वाईट गोष्टीही त्याला प्राप्त होतात. आनुवंशिकतेनें प्राप्त झालेले जे स्वभावविशेष मीं वर सांगितले आहेत त्यांच्या व्यापारांकडे व परिणामाकडे लक्ष दिलें म्हणजे या विधानाची सत्यता चांगली पटते. मी कोणाचेंही प्रामाण्य मानीत नाहीं आणि दुसऱ्या माणसाचें मत न जुमानल्यामुळें होणाऱ्या हानीचें मला कसलेंही भय वाटत नाहीं. तत्त्वज्ञानाच्या संशोधनांत मला जें कांहीं यश मिळालें तें काहीं अंशीं, यामुळेंच शक्य झालें. मोठ्या लोकांच्या नांवाबद्दल बहुतेक लोकांना आदर वाटतो आणि त्यामुळें प्रस्थापित तत्त्वें आपो-

आप स्वीकार्यता पावतात. मी जर हेंच केलें असतें तर माझ्या अगांतील स्वतंत्रपणाचा बाणा नष्ट झाला असता आणि मग तत्त्वज्ञानांतील जे सिद्धान्त मीं प्रस्थापित केले ते मला करतां आले नसते. या किंवा त्या मुद्यासबंधानें लोकांनी आधींच काय मत बनवलें आहे याचा विचार न करतां जीवितांत जें प्रत्यक्ष दिसतें त्याच्याशीं सरळ गांठ घालणें हें माझें नेहमींचें धोरण बनलें व त्याचा विचार करून स्वतंत्रपणें मला जीं अनुमानें बांधतां आलीं तीं मीं बांधलीं अर्थात् यांतील कांही, चुकीचीं ठरलीं असतील, पण कांहीं खरींही ठरलीं आहेत. दरम्यान माझ्या लहान पणीं या वृत्तीचा स्वभावावरही थोडा विपरीत परिणाम झाला. माझ्या बाबाच्या हें ध्यानांत यावयास हवें होतें पण आलें नाहीं कीं, लहानपणीं आणि मोठा झाल्यावरसुद्धां कोणाचें न ऐकण्याची जी प्रवृत्ति मी दाखवी ती अप्रत्यक्षरीत्या मला, ते स्वतः आणि आजोबा याच्याकडूनच, प्राप्त झालेली होती. अर्थात् याचा परिपाक म्हणजे वडिलांचें न मानणें हा होय. याचेंही सर्वांना वाईट वाटत असे. कारण यामुळें माझी कांहीं प्रत्यक्ष नुकसानी झालीच, पण कांहीं अप्रत्यक्षही झाली. मुख्य म्हणजे जेथें तेथें मी तटा उत्पन्न करतों व कोमल मनोवृत्तींना मी पारखा होतों. माझ्यासबंधानें कुणाला ममत्व उत्पन्न होत नाहीं. या अवगुणांच्या अभावीं, समंजसपणानें, कोमल मनोवृत्तीनें, आणि इतरांच्या ममत्वानें माझ्यावर जे संस्कार व्हावयाचे त्यांना मी खचितच मुकलों. यामुळें मला सहानुभूतीचा

आवेगही येत नाहींसा झाला. विचारप्रवण अशा माझ्या मनाला जरी या गुणाचा म्हणजे फटिगपणाचा चांगला उपयोग झाला, तरी इतर दृष्टींनीं माझें नुकसान झालें हें यावरून स्पष्ट दिसतें. नुकसान झालें असें म्हणावयाच्या ऐवजी नुकसान होत आहे असेंच म्हटलें पाहिजे. कारण मला अजूनही त्याचे विपरीत परिणाम स्पष्ट दिसत आहेत.

या गुणामुळें मला अशी एक सवय लागली आहे कीं, वर्तमान-काळाचा महिमा मला जितका मोठा वाटतो तितका भूतकाळाचा वाटत नाहीं; भूतकाळाला मी कमी मानतों. हें खरेंच आहे की, भूतकाळाचा बडेजाव फारच माजविण्याची जी प्रथा पडली आहे तिची ही माझ्या ठिकाणी प्रतिक्रिया झाली असावी. अगदी लहान-पणी मुलांच्या मनावर ग्रीक आणि रोमन संस्कृतींच्या फलश्रुति फारच जोरानें बिंबवितात. यांतील कित्येक कलश्रुतींचें कौतुक रानवट मनाला फार मोठें वाटतें. खुद्द ते ग्रीक आणि रोमन लोकसुद्धा याच प्रवृत्तीचे होते. या संस्करांतून मुलें बाहेर पडत नाहीत आणि मरेतोंपर्यंत लहानपणीं बनलेली त्यांची विपरीत मतें कायम राहतात. जें जें कांहीं जुनें असेल तें तें अस्तित्वबुद्धीनें पाहिलें पाहिजे आणि जें जें कांही नवें असेल त्याच्याकडे शंकाबुद्धीनें पहावें असा त्यांच्या मनाचा कल बनतो पण माझ्या मनावर हे संस्कार झाले नसल्यानें मी बहुधा दुसऱ्या टोंकाला जाऊन बसतों. उदाहरणार्थ, प्लेटोविषयींचे माझें मत घ्या. मीं प्लेटोचें पुस्तक पुनःपुन्हां वाचावयास घेतों; आतां हा सवाद काढावा, मग तो संवाद वाचावा आणि शेवटीं अगदीं

नकोसें होऊन पुस्तक ठेवून द्यावें असें कितीदा तरी झालें आहे. प्लेटोच्या विचारातील अनिश्चितता, मूळ वस्तूशीं नातें न ठेवणारे त्यानें योजलेले शब्द, आणि गुंगारे मारीत चालणारी त्याची तर्कपद्धति यामुळें पुस्तक दूर सारावेंसें वाटतें. एकदां एका प्राचीन विद्येच्या पंडिताशी याविषयीं बोलत असतां तो मला म्हणाला, "तुम्ही म्हणता तें खरें आहे. पण त्याच्या वाङ्मयांतील कला म्हणून तरी तें वाचावयास हवें आहे." मग मीं प्लेटोचें पुस्तक पुन्हां उघडलें तेव्हा त्याची कला काय आहे हें पाहाण्याचें ठरविलें आणि शेवटीं पहिल्यापेक्षाही अगदी सतापून जाऊन मीं पुस्तक बाजूस ठेवून दिलें. एखादा तत्त्ववेत्ता आणि त्याचा मानसपुत्र यांच्यांतील भाषणाची देवघेव हिलाच जर संवाद म्हणावयाचें असेल तर तो मूर्खपणाचा प्रकार आहे. कारण तत्त्ववेत्त्याला सोईचें वाटेल तेंच त्याचा मानसपुत्र बोलत राहतो आपल्याकडील तिय्यम प्रतीच्या कादंबरीकारांनीं लिहिलेल्या संवादातसुद्धा जास्त उचित असें नाट्य भरलेलें असतें !

या माझ्या टीका करण्याच्या सवयीमुळें एखाद्या कलाकृतीनें मला एरवी जितका आनंद झाला असता त्यापेक्षां कमी होतो. दोषैकदृक् बनल्यामुळें सौंदर्याचा माझा अनुभव सुद्धां कमी होतो. कारण मनांत आधीं वैगुण्याच्या कल्पनाच भरून राहतात. पूर्वी होऊन गेलेल्या चित्रकाराच्या कृतींत कलेचें कसब उच्च प्रकारचें असणें अगदीं संभाव्य आहे, पण माझ्या मनावर त्याचा फारसा परिणाम होत नाहीं. कारण त्या कृतींतील चुकांकडे माझें लक्ष विशेष प्रकारें जातें....ग्रीक

लोकांच्या खोदकलेकडे मी पाहूं लागलों म्हणजे तिच्यांतील अस्वाभाविक आणि कलाविहीन वस्त्रचित्रणाकडे माझें सारखें लक्ष जातें.... गाण्याच्या बाबतीतही माझें कांहींसें असेंच झालें आहे. पूर्वी मीं पुष्कळदा नाटकाला जात असें, पण तेथेंही मनावर होणाऱ्या परिणामांचें पृथक्करण करीत राहिल्यानें त्याच्यामुळें उत्पन्न होणाऱ्या आनंदाला मला बहुतेक मुकावें लागे, कारण ज्या ज्या मानानें बुद्धीचा व्यापार चालू राहतो त्या त्या मानानें भावनांचा व्यापार मंद होत जातो. केवळ कलाकृतीच्या बाबतीत माझी ही तऱ्हा होते असें नाही, सृष्टींतील वस्तुजात पाहतांनाही तेंच होतें. अर्थात् मानवी देहही या वस्तुजातात धरला पाहिजे. पॉटर नावाच्या एका गृहस्थाची व माझी नुकतीच ओळख झाली होती. त्याला एक धाकटी बहीण होती, नाकाडोळ्यांनी ती अत्यंत सुदर होती व तिची अंगलटही सुबक होती. एकदा माझ्या चुलतीनें मला विचारलें, "का रे ! पॉटर याची मुलगी कशी काय आहे ?" माझ्या ठिकाणी दुसरा एकादा तरणा पोऱ्या असता तर त्यानें त्या पोरीच्या स्तुतीचा पाऊस पाडला असता ! पण माझें पाहा ! मी काकूस म्हणालों, "या मुलीच्या डोक्याचा आकार कसासाच आहे, मला तो पसत नाही !" कारण आम्ही मस्तिष्कशास्त्रदृष्ट्या पृथक्करण करणारे ! हा प्रकार मला अजूनही आठवतो. केवळ तात्त्विक मुद्यावर ज्या एखाद्या उणीवेनें मला कसेंसें वाटलें होतें त्या उणीवेचाच मीं वेड्यासारखा उच्चार करावा आणि त्या मुलीच्या इतर सरस सौंदर्यविशेषांचा मी उल्लेखही करूं नये याचें मला पुढें फार वाईट वाटलें !

## १६ : : मलाही चैन पडेनासें झालें !

गटे या जर्मन कवीचा जन्म १७४९ सालीं झाला. कालिदासाचे शाकुंतल नाटक वाचून हर्षनिर्भर झाल्याने जो जर्मन कवि नाचू लागला असे आपण वाचतों तो हाच होय. त्याचे शिक्षण लेप्झिग येथील महाविद्यालयात झाले. तेथे त्याला कायद्याचे शिक्षण घेणे जरी प्राप्त होते तरी त्या विषयावर त्याचे मन बसेना. आधिभौतिकशास्त्र, वाङ्मय, आणि अखिल मानव्याचा विचार या विषयावर त्याचे मन सारखें आसक्त असल्यामुळे कायद्याच्या गुतागुतींत ते रमेना. याच सुमाराला रूसोचें लिखाण प्रसिद्ध होत होते. त्यातील विचारानीं तेव्हाच्या युरोपातील तरुण लोकाचीं मने अगदीं भरून गेलेलीं होतीं. जीवितातील आजवर उत्पन्न झालेले कृत्रिम सोडून देऊन शुद्ध स्वाभाविकतेकडे आपण सर्वांनीं वळावे हा रूसोचा सदेश सर्वांना पटल्यासारखा झालेला होता इतराप्रमाणे गटेलाही वाटले की शास्त्र, कला, आणि समाज यात आपण क्राति करून टाकू त्याने आपल्या पहिल्याच पुस्तकात असा एक नायक निर्माण केला कीं ज्याने प्रतिकूल मताच्या आणि रूढीने बाधलेल्या समाजाच्या विरुद्ध खूप जोराचा झगडा केला. आणि अपयश पत्करूनही आपले स्वतत्र मत ठाम धरून ठेवले. या पुढील पुस्तकातील तरुण नायकाला आत्मसतोष हवा असतो, त्याला बुद्धिस्वातत्र्य हवें असते, पण

हीं दोनही संपादण्याच्या कामांत त्या नायकाला केवळ अपयश येतें. या पुस्तकानें त्याची कीर्ति बरीच वाढली आणि त्याला एका मोठ्या राजपुरुषाकडे नोकरी मिळाली त्याचा लिहिण्याचा हव्यास मात्र चालूच होता यापुढील पुस्तकांत त्यानें आपली संस्कृतीची कल्पना विशद केली. बुद्धि, भावना, इच्छाशक्ति, या सर्वांचे व्यापार परस्पराशीं संगनमत राखू नच चालले पाहिजेत आणि आपल्या जीवितांत आपल्या निरनिराळ्या शक्तींचा परस्पराशीं उत्कृष्ट तोल राहिला पाहिजे, यालाच संस्कृति म्हणावें आणि जे कोणी असा तोल ठेवतात त्यांना सुसंस्कृत म्हणावें, असें मत त्यानें प्रतिपादिलें मानव प्राण्याची खरी प्रौढी ही आहे कीं त्याला बाह्य परिस्थितीवर जितकी जास्त हुकमत ठेवतां येईल तितकी ठेवतां यावी आणि तिच्या कब्जांत त्यानें होतां होईतों जातां कामा नये हेंही मत त्यानें आग्रहानें प्रतिपादिलें यापुढें त्यानें वाङ्मय आणि कला यांवर टीकाग्रंथ लिहिले त्यांतच 'कविता व सत्य' हें एक आत्मचरित्रपर पुस्तक त्यानें लिहिलें पण त्याचा सर्वप्रसिद्ध ग्रंथ म्हणजे 'फॉस्ट' हें शोकपर्यवसायी द्विखंडात्मक नाटक होय युरोपच्या बाहेर तरी त्याची कीर्ति जी स्थिर झाली आहे ती या नाटकाबरच होय तो इ. स. १८३२ सालीं वयाच्या चौऱ्याशीव्या वर्षीं वारला मरतांना 'जास्त कळावयास हवें, जास्त ज्ञान पाहिजे' हे शब्द त्याच्या तोंडीं होते. त्याच्या हातून पुष्कळ प्रमाद घडले होते. तथापि जर्मन राष्ट्राला या कवीचा मोठा अभिमान वाटतो

आत्मचरित्र या नांवानें मोडणारें त्याचें जे पुस्तक आहे त्यांत त्यानें विविध विषयांवरील आपलीं मतें सविस्तर सांगितलीं आहेत. खुद्द त्याच्या चरित्राची अशी फार थोडी हकीगत त्यांत आली आहे त्यांत काल-निर्देश नाहींत, पत्रव्यवहार नाहींत, व्यवसायाच्या हकीगती नाहींत, दहा

दहा वर्षांचे खड मधेच पडलेले दिसतात, ज्या प्रेमप्रकरणाना पुढे कसलेच यश आले नाही, त्याना महत्त्व मिळालें आहे, तपशीलाचा तर फारच सुकाळ झालेला आहे, काही चमत्कारिक मतेही त्याने प्रतिपादिलीं आहेत आणि नव्या धर्मांच्या कल्पनाही सागितल्या आहेत. तथापि हे सर्व दोष असूनही हे पुस्तक वाचनीय आहे यात काहींच शका नाहीं. यातून चरित्रविषयक व काही वाङ्मयविषयक परिच्छेद पुढे दिले आहेत.)

* * * १ फ्रान्स देशाच्या अगदीं हद्दीवर रहात असूनही आम्ही एका सपाट्यास आमच्या जीवितातल्या प्रत्येक फ्रेंच गोष्टीचा अगदी निकाल लावला. फ्रेंच लोकाची रहाणी आम्हाला भारी ओतीव पद्धतीची आणि शिष्टपणाची वाटे, त्यांचें काव्यही कोमेजलेलें दिसे, त्यांची टीकेची तऱ्हा तर केवळ मारकच ठरत असे, आणि त्याचें तत्त्वज्ञान जरी मोठें गहन असलें तरी त्यानें मनाला कधीं समाधान उत्पन्न होत नसे म्हणून काही तरी नवें करून पहावें म्हणून आम्ही शुद्ध जड जीविताकडेच आमचें मन वळवूं लागलों होतों. पण आम्ही सावरलों कारण कीं, एक नवाच विचाराचा झोत आमच्यावर आला. त्यानें आम्हांला जीविताच्या अधिक उंच व व्यापक स्वरूपाची कल्पना आली, त्यानें आमचें बुद्धिरंजन तर झालेंच पण तितकेंच प्रतिभारंजनही झालें. हा झोत प्रथम हळूहळू न कळत आमच्यावर येत होता; मग मात्र तो वाढत जाऊन उघडपणानें आणि सपाट्यानें आमच्या जीवितांत येऊन दाखल

झाला. हा स्रोत म्हणजे शेक्सपियरचें वाङ्मय होय. या कवीची थोरवी इतर कोणत्याही राष्ट्रांतील लोकापेक्षा, म्हणजे खुद्द इग्लंडांतील लोकांपेक्षांही, जर्मन राष्ट्रांतील लोकांनीं जास्त ओळखिली आहे व मान्य केली आहे, आम्ही स्वत.ची जितकी तरफदारी केली नाहीं तितकी त्याची केली आहे, आम्ही स्वतःच्या बाबतीत जी ऋजुता दाखविली नाहीं तितकी त्याला दाखविली आहे; व जेथें स्वत.ची गय केली नाहीं तेथें त्याची केली आहे. आमच्याकडील मोठमोठ्या बुद्धिमान् लेखकानीं परिश्रम करून या कवीच्या प्रतिभेचें रूप अशा रीतीनें स्पष्ट केलें आहे कीं, वाचकाला तें हृद्यच वाटावें, तसेंच त्याच्यासबंधीं सन्मानबुद्धि दाखवावी म्हणून, किवा त्याच्या तर्फेनें, किवा त्याला सभाळून धरण्यासाठी जें जें काहीं आमच्या लोकांनीं लिहिलें आहे त्याला मीं तर आपली संमतिही दाखविली आहे.

माझ्या लहानपणीं 'शेक्सपियरचीं सौदर्यस्थळें,' या नांवाचें एक पुस्तक प्रसिद्ध झालें होतें. मूळ ग्रथांतील निरनिराळे चकते एकत्र केलेले म्हणून अशा पुस्तकाना जरी दोष देण्याची पद्धति असली तरी त्यांचा फार चांगला उपयोग होतो . पुढें वीलॅंड यानें केलेलें समग्र भाषांतर प्रसिद्ध झालें. पुढें येतांच लोकांनी तें अधाशासारखें वाचलें, लोकानी तें एकमेकास वाचावयास दिलें, मित्राना व परिचितांना लोकांनी आग्रहानें सांगितलें की हें तुम्ही अवश्य वाचा ! आम्हां जर्मन लोकाचें हें एक भाग्य म्हटलें पाहिजे

कीं इतर देशातील मोठाल्या ग्रंथांचीं इतकीं सुगम व चित्ताकर्षक रूपें मातृभाषेत आमच्यापुढें प्राप्त व्हावीं. प्रथम वीलॅड यानें व मग एशनबर्ग यानें शेक्सपियरचें गद्यरूप भाषांतर केलें. या गद्यरूपामुळें तें वाङ्मय सर्व लोकांना सुगम बनलें, कोणाही वाचकानें तें वाचावें असें झालें. त्यामुळेंच त्याचा इतका प्रसार झाला व लोकांवर त्याची इतकी विलक्षण छाप पडली. अर्थात् तालबद्धता व यमक यांची किमत मी कमी मानीत नाही, कारण कविता ही कविता ठरते ती प्रथम या तालानें व यमकानेंच ठरते. पण ज्याचा रिघाव आपल्या मनांत खराखरा खोलवर होतो व जें मनाच्या अगदीं तळाशी जाऊन पोहोंचतें, जें ज्ञानही देतें व चेतनाही आणतें, तें काय असतें म्हणाल तर इतकेंच म्हणता येईल की कवीच्या काव्याचें गद्यरूप भाषातर केल्यावर त्याचें जें काहीं शिल्लक उरतें ते ! अशा प्रकारें जें कांहीं शिल्लक उरतें तो शुद्ध गाळीव अर्क असतो. हा जर मुळात इतकासा नसला तर वस्तूला काव्यरूप देऊन कवीला त्याचा आव आणतां येतो, पण जर मुळात तो असला तर या काव्यरूपानें तो झाकाळून मात्र जातो ! म्हणून मुलाच्या शिक्षणाच्या कामीं तर पद्यरूप भाषांतरापेक्षा गद्यरूप भाषातरेंच मला जास्त उपयोगाचीं वाटतात. मुलें अगोदर मोठीं वात्रट असतात व विडंबन करण्याचा मिष्किलपणा त्याच्या अंगी स्वाभाविकच असतो, अर्थात् पद्यांतील नादमधुर शब्द व अक्षरांवरील ठेका यांतच तीं दंग होतात व अगदीं सर्वोत्तम लिखाणांतील गंभीर मर्म त्यांच्या हाती अशा

रीतीनें नष्ट होतें...या बाबतींत लूथरनें केलेल्या बायबलाच्या भाषांतराचा उल्लेख अगदी युक्त ठरेल. वास्तविक पहातां बायबलांत कितीतरी निरनिराळ्या भाषाशैली आलेल्या आहेत. त्या सगळ्या लूथरनें मातृभाषेंत एकरूप केल्या आहेत व त्यांतील भावनास्वराचे सर्व पर्याय–काव्यरूप, ऐतिहासिक, अधिकारयुक्त आणि उपदेशपर एकाच मुशीत ओतले आहेत. याच्या बळावर या थोर गृहस्थानें धर्माच्या कार्याचा इतका उठाव केला कीं, मुळातील सगळ्या वैशिष्ट्यांसह जर त्यानें बायबलाचे तपशिलवार भाषांतर केलें असतें तर हा उठाव मुळींच साधला नसता. यानंतर जोष, साम्स, इत्यादि प्रकरणें व इतर वीणापर प्रकरणे हीं त्याच्या मूळच्या सारख्या काव्यरूपांतच वाचकाना पोंचविण्याचें काम अनेकानीं केलें, पण त्यांचा कांहीं उपयोग झाला नाही. सामान्य जनसमूह कीं, ज्याच्यासाठींच असले प्रयत्न होतात, तो अगदीं साध्या सरळ भाषांतराची वाछा करतो व तेच अजूनही खरें खरे उपयोगानें ठरत आहे. मूळ संहितेशी स्पर्धा करणारी जी वाकबगाराचीं भाषांतरें आहेत तीं पंडिताचीच काय करमणूक करतील तेवढेंच, असो. मूळचें वाचून किंवा भाषांतरें वाचून, वेंचे वाचून किंवा सर्वच्या सर्व वाचून आम्हा मंडळीवर शेक्सपीयरची एवढी छाप बसली की, आम्ही त्याच्या वाङ्मयाचे अगदीं दर्दी होऊन गेलों.

ग्रंथ मनोरंजक असो किंवा गंभीर असो, त्यांचें उद्दिष्ट शेवटीं एकच असतें; तें हें कीं, दुःखाची धार कमी करावी आणि सुखाची

लजतही कमी करावी. जें कथानक असेल तें अतिशय कुशलतेनें आणि आनंदकर पद्धतीनें वठविल्यानें हें घडून येतें. या दृष्टीनेंच इंग्रजी भाषेंतील बहुतेक कविताचा विचार करावयास हवा. त्यातील बहुतेक नीतिपर आणि उपदेशपर असतात आणि सरासरी मानाने त्याचें तात्पर्य असें दिसतें कीं, जीवित म्हणजे एक मोठी कंटाळवाणी यात्रा आहे, दुसरें काहीं नाहीं. या इंग्रजी कवींना मानवप्राण्याचाच तिटकारा उत्पन्न झालेला दिसतो. हा कशानें उत्पन्न झाला असेल आणि ज्याच्या त्याच्याशीं एक तऱ्हेचा अप्रिय वैरभाव यांच्या लिहिण्यांत का दरवळत असेल याचा विचार केला तर असें दिसून येतें कीं, इंग्लंड देशांत अनेक पक्षोपपक्ष असल्यामुळें याना बहुतेक जन्मभर या किंवा त्या पक्षाशींच निष्ठावंत रहावें लागते. आपल्याच पक्षाच्या सभासदांची त्यांना स्तुति करिता येत नाही, किंवा त्या पक्षाच्या तत्वाचीहि करिता येत नाही. कारण, त्या योगानें मत्सर व वैर उत्पन्न होण्याचा संभव असतो, म्हणून प्रतिपक्षातील लोकाची निंदा करण्यातच ते आपलें बुद्धिवैभव खर्च करितात, आपल्या उपहासाच्या शस्त्राला जितकी धार लावता येईल तितकी लावितात, व जितकें विष माखतां येईल तितकें माखतात. दोन्ही पक्षांकडील लोक हेंच करीत असल्यामुळें त्याच्यामधील सामाजिक जीवनाचा केवळ नष्टांश होऊन जातो. स्वाभाविकपणेंच हें राष्ट्र इतकें मोठें समंजस आणि अगीं चांगले रग असलेलें असूनसुद्धां आम्हांला तें मूर्ख आणि वेड्या लोकांनीं भरलेल्या बाजारासारखें वाटतें. हें वर्णनही मीं जपूनच केलेलें आहे !

त्यांच्यांतील प्रेमकाव्याचे विषयसुद्धां बहुधा रडकेच असतात. या काव्यात बघावें तों एखाद्या दगलबाजानें फसविलेली मुलगी मरत आहे असें दिसेल, त्यात पहावें तर एखादा विश्वासू नायक पाण्यांत बुडत आहे किंवा चार झपाट्याचे हात पाण्यावर मारून आपल्या प्रेयसीपाशीं येऊन ठेपायच्या आतच एखादा मासा त्याला खात आहे ! अगदीं ग्रेसारखा कवि ध्यावा, तो सुद्धां मसणवटीत बसलेला असतो आणि आपलें तें सर्वपरिचित तुणतुणें वाजवू लागतो. ताबडतोब ते सगळे त्याचे दु:खीकष्टी मित्र त्याच्या भोंवतीं जमा होतात ! मिल्टनलासुद्धा काही जोरकस पद्यें गाऊन ' अलेग्रो ' काव्यांतील आपली मरगळ प्रथम घालवावी लागते, आणि मगच त्याला आनंदाचा मदसा तजेला प्राप्त होतो. गोल्डस्मिथ हा वास्तविक पाहता मोठा उल्लसित गडी आहे पण ' डिझर्टेड व्हिलेज ' या आपल्या काव्यात एखादें आनंदवन गमावल्याचें दु:ख त्याने चित्रित केलें आहे ! तें चित्र सुंदर आहे खरें, पण गोल्डस्मिथची भावना मात्र केवळ शोकाची आहे, आणि मग हाच कवि तें गमावलेलें नंदनवन सापडावें म्हणून ' ट्रॅव्हलर ' बनून पुन: सगळ्या जगभर भटकत सुटतो ! मला हें माहीत आहे की, या किंवा त्या झगझगीत ग्रंथाकडे किंवा उल्लसित काव्याकडे बोट दाखवून कोणी असें म्हणतील की, तुम्ही असें कसें म्हणता ? पण इंग्रजी काव्यांतील बहुतेक सगळी काव्यें आणि त्याच्यातील सारी मुख्य मुख्य काव्यें तर नि:संशय याच जातीची आहेत; शिवाय याच जातीचीं अगदीं

मलाही चैन पडेनासें झालें !

अलीकडे जीं काव्यें झालीं आहेत त्याच्यात सुद्धां तीच कचाळीची कडवट प्रवृत्ति दिसून येते, आणि स्त्रियान्च्या विषयी तर तीं शुद्ध अवहेलना दाखवितात . .चमत्कार हा आहे की, खुद्द शेक्सपीअर, की ज्याला आम्ही आमचा पिता समजतों आणि जो आमचा मार्गदर्शक आहे तो, शुद्ध आनदाचें वारें कसें पसरवावें हें जाणत असूनही, मानसिक असमाधानाची आपली वृत्ति मात्र खचितच वाढवीत सुटतो हॅम्लेट आणि त्याची ती आत्मगत भाषणें यानीं आमचीं तरुण मने केवळ भुतासारखीं झपाटून टाकलीं होतीं. आम्हापैकीं प्रत्येकाला वाटे की यातील मुख्य मुख्य परिच्छेद पाठ करून टाकिले पाहिजेत आणि मोठ्यानें म्हटले पाहिजेत. वास्तविक, आम्ही कोणीच भूत पाहिलेलें नव्हतें, आमचा कोणाचाही बाप राजा नव्हता, आणि त्याच्यावर आम्हा कोणाला सूडही उगवावयाचा नव्हता ! पण ज्याला त्याला असें वाटे की, हॅम्लेट प्रमाणें कपाळाला हात लावून बसणे हे आपल्यालाही अवश्यच आहे !

* पण आमच्या नाजुक मनोगताची चर्चा व्हावयाची म्हणजे एकमेकांनी एकमेकांस आपलीं हृद्गते सांगणें प्राप्तच झालें. थोडेसे दिवस गेले आणि एका अगदी प्रशान्तसमयीं आपल्या यौवनदशेतील सर्व हकीकत तिनें मला सागितली. तीवरून दिसून आले कीं, अमुक एका दर्जाच्या कुळांत जन्माला आल्यामुळें जे काही सामाजिक लाभ होतात ते सर्व लिलीला लाभलेले होते आणि ससारांतील सर्व सुखें तिला लाभलेलीं होती. हळूहळू आपले भाऊ कसे आहेत,

नातेवाईक कसे आहेत हेंही तिनें वर्णन करून सांगितलें आणि आपला स्वतःचाही थोडासा इतिहास सांगितला. प्रापंचिक विनयबुद्धीने तिनें आपल्या आईविषयी मात्र कांहींच सांगितलें नाहीं. आपल्या कांहीं वैगुण्याचाही तिनें उच्चार केला आणि दुसऱ्याला मोह घालण्याची आपल्या अंगी शक्ति आहे याची मला थोडीशी जाणीव आहे असेंहि ती म्हणाली. आणि थोडें पुढें जाऊन तिनें सांगितलें कीं, जे मजवर मोहित झाले त्यांची उपेक्षा करण्याची प्रवृत्तिही पण माझ्या अंगी आहे ! शेवटीं होता होता आम्ही मुख्य मुद्यावर येऊन ठेपलों. ती म्हणाली कीं, तुमच्यावरही मीं माझी मोहनी पसरली होती पण या कामीं मला चांगलीच शिक्षा झाली. कारण तुम्हांला मोह घालतां घालता शेवटीं मलाच तुमचा मोह पडला ! तिच्या मनोगताचा हा उच्चार इतका शुद्ध नि अकृत्रिम होता की, या उच्चारानें तिनें मला सर्वस्वी अंकित करून टाकलें. आता आम्ही एकमेकास हवींहवींशीं झालों, आणि एकमेकास भेटल्याशिवाय आम्हांला करमेनासें झालें. पण कित्येकदां असे होई की, आजवरचीं तिचीं म्हणून जीं कोणी माणसें होतीं ती तिच्याभोंवती रात्रीं इतका वेळपर्यंत बसून राहत कीं, मला तिची एकटीची गांठ पडणें मुष्कील होई. बरें, त्या घोळक्यांत तिची गांठ पडून मला काय करावयाचें होतें ? या परिस्थितीचें मला फार दुःख होत असे.......माझ्या मनाला एक चमत्कारिक हुरहूर लागून राहिली. आणि ती मला आवरता येईना. मला तिच्यावांचून चैन पडेना आणि तिला

माझ्यावांचून चैन पडेना. पण त्यांच्या घरची राहण्याची तऱ्हाच कांहीं अशी होती आणि तिच्या माणसांतील काहीं लोक इतके नको तेव्हां मधें मधें करणारे होते कीं, दिवसच्या दिवस, अन् तासन् तास तिची विशेष गांठ न पडतांनाच वाया जात.

लिलीच्या अगविक्षेपांत एक मोठी गमतीदार लकब असे. ती एकाद्या टेबलाशीं बसलेली असावी किंवा समोर दुसरें कांही सपाट पाठीचें असावें. अशा वेळीं जर कोणीं कांहीं अमंगळ बोललें किंवा सांगितलें तर ती त्या टेबलावर हाताचा झटका मारीत असे. एकदां एक तिऱ्हाइत गृहस्थ तिच्या शेजारींच जेवावयास बसला होता, तो कांहीं तरी वेडेंवांकडें बोलला. त्याबरोबर, आपली प्रसन्न मुद्रा यत्किंचितही न पालटतां, तिनें आपला उजवा हात मोठ्या सफाईने टेबलाच्या पृष्ठावरून बाजूला झटकला आणि या हाताच्या सुकुमार फटकाऱ्याच्या वाटेंत जें कांहीं आड आलें तें सारें तिनें टेबलाच्या खालीं लोटून दिलें ! म्हणजे टेबलावर कांहीं राहिलेंच नाहीं—सुऱ्या, काटे, वाढलेले पदार्थ—तिच्यापुढचे व शेजाऱ्याचेही—चटसारें खालीं गेलें ! प्रत्येक जण दचकून पाहूं लागला; नोकरचाकर लगबगीनें पुढें आले आणि काय झालें हें कोणाच्याच ध्यानात येईना. मात्र ज्यांचें पुरतें लक्ष होते त्यांना अगदीं आनंद झाला कीं असल्या अमंगळ बोलणाराला चागली थप्पड बसली. तिनें त्याला चूप बसविलें आणि तेंही इतक्या सफाईनें ! तेव्हांपासून एकाद्या प्रसंगीं नापसंती दाखवावयाची असली म्हणजे आम्ही—लिलीचें अनुकरण करून—उजवा हात सफाईनें झाडूं लागलों !

माझा जम चांगला बसत चालला होता, निदान बसत होता त्यापेक्षा तो जास्त चागला बसत आहे असें मला वाटूं लागलें, आणि म्हणून या प्रकरणाचा एकदां जलदीनें निकाल लावावा असें मीं ठरविलें, कारण लिलीचें व माझें नातें फारच आपुलकीचें आहे असें चारचौघातही स्पष्ट दिसून येई व म्हणून तसेंच रहाणें थोडें अवघड वाटूं लागलें शिवाय सगळीकडे घडतें तसेंच आमचेंही झालें होतें, आम्ही अजून एकमेकाला शब्द दिला नव्हता, पण आम्हांला एकमेकाच्या सगतीनें पराकाष्ठेचें समाधान लाभलें होतें, आपण अत पर एकमेकांस कधी सोडून जाऊ ही कल्पनाही आम्हाला शिवेनाशी झाली होती, आमची परस्परांवर निष्ठाच उत्पन्न झाली होती—या सर्वांचा परिणाम म्हणजे मी अगदी गभीर बनत चाललों होतो, इतका कीं मला शेवटी थोडी खिन्नताच येऊ लागली. ती घालविण्यासाठी, जगाचे व्यवहार कितीका सपक वाटेनात, पण मी त्यांत मनापासून लक्ष घालूं लागलों

मी अशा प्रकारच्या चमत्कारिक पेचांत सांपडलों असतां कोणी एक स्त्री आमच्या सहाय्याला आली ती आमच्या ऋणानुबंध्यापैकींच होती आणि कोण माणसें कशात गुंतलीं आहेत, त्याचें काय चालू आहे इत्यादिकाचें तिला चागलें बारीक ज्ञान असे. लिली लहानपणापासून तिला माहीत होती इतकेंच नव्हे तर ती लिलीवर फार ममता करी. या बाईच्या स्वभावाला विशेष प्रकारचें अग्र आलेलें होतें. ती तोंडावरून मोठी गंभीर दिसे. तिची छबी थोडी

पुरुषीच होती, आणि चालू लागली म्हणजे ती आपलीं पावलें ठासून, मोजून आणि जलदीनें टाकी. उगाच नाहीं तेथें उलाढाल करण्याचा तिचा स्वभाव नव्हता हे खरें आहे. एखादा बनाव जर बनत चालला असेल तर त्याच्यावर बारीक लक्ष ठेवावयाचें आणि त्यावरून आपण काढलेली अनुमाने मात्र कोणास सांगावयाची नाहीत अशी तिची तऱ्हा असे. नेमकें पुढें केव्हां व्हावे हें तिला हेरता येत असे, आणि माणसांना निश्चय करता येत नाही पण निश्चय करावयास मात्र हवा आहे असें जेव्हा तिला दिसे, तेव्हा ती एवढ्या करारीपणानें त्या प्रसंगात येऊन दाखल होई कीं, आपल्याला हवें आहे तें घडविल्याशिवाय ती कधीही राहत नसे. बघावयास गेलें तर अशा कामात आपलें साधावयाचें असें तिचें काहींच नसे. पण काहीं तरी घडवून आणलें, जें कुचंबलें होतें तें चालीस लावलें, विशेषत: लग्नाचें कोठें काही चाललें असेल तें जमवून आणलें, एवढें आपल्या हातून झालें तर तिला आनंद वाटे. पुष्कळ दिवस झाले, आमचें चलनवलन काय आहे आणि आम्ही कोठवर येऊन थांबलों आहोंत हे तिला कळलें होतें. ती आमच्याकडे घरीं पुष्कळदा येई आणि आमचें हें प्रकरण तिनें बारकाईनें पाहिलें होतें. तेव्हां तिच्या ध्यानांत येऊन चुकलें होतें की, या पोरांची एकमेकावर खरोखरच प्रीति आहे आणि म्हणून त्यांना प्रोत्साहन दिलें पाहिजे. तिला दिसून आलें कीं, यांचे बेत मोठे चांगले आहेत; पण हीं दोघें जितकीं निश्चयी असावींत आणि आग्रही दिसावींत

तितकी दिसत नाहींत आणि म्हणून त्यांना थोडा हातभार लावला पाहिजे व हें सुरू झालेलें छोटेसें रम्य प्रेमप्रकरण होतां होईतों जलदीनें पुरें केलें पाहिजे.

तिचा आणि लिलीच्या आईचा फार दिवसांचा लोभ होता. एकदां मीं तिची आमच्या घरच्या माणसांना ओळख करून दिली आणि तेव्हांपासून आईला व बाबांना ती फार आवडूं लागली होती. चालचलणुकींत ती थोडीशी तुसड असे. पण त्याचें कोणी वाईट वाटून घेत नसे; कारण या तुसडपणाच्या जोडीला तिच्या अंगी शहाणपण आणि हुन्नर हींही असत. आमच्या इच्छा काय आहेत आणि आशा काय आहेत याची तिला पूर्ण माहिती होती. कांहीं तरी घडवून आणीत असावें या तिच्या प्रवृत्तीमुळें या कामात पडावें असें तिला वाटूं लागलें. थोड्यांत बोलावयाचें म्हणजे माझे आईबाप आणि ती यांचा या बाबतींत एकविचार झाला. पुढें या स्त्रीनें आपलें काम कसें सुरू केलें आणि आपल्या मार्गांतील अडचणी कशा दूर केल्या हे मला मुळीच कळलें नाहीं. पण एके दिवशीं संध्याकाळीं ती आमच्याकडे आली आणि आली ती लिलीची संमतिच घेऊन आली ! थोड्या भावनावश करारी आवाजानें ती म्हणाली, " घाला हातांत हात आतां. " मी लिलीच्या समोर उभा होतों. मी माझा हात पुढें केला. तिनें थोडेसें काकूं केलें पण हळू हळूं तिनें आपला हात माझ्या हातांत घातला. मग आम्हीं एक दीर्घ निःश्वास सोडला. यावर आम्हांला प्रेमाचें भरतें आलें व शेवटीं आम्हीं एकमेकांस मिठी मारली.

## १७ : : मीं चित्रेंसुद्धां पुसून टाकलीं !

[फिरोजशहा तुघलख याची कारकीर्द इ. स. १३५१ पासून १३८८ पर्यंत झाली. त्याची आइ दीपलपूरचा राजा मल भट्टी याची मुलगी होती असे इतिहासात म्हटले आहे. मुसलमानी धर्माचा कडक अभिमान, त्याच्या शुद्धीकरणाची वासना, शासन करण्याची तत्परता, प्रजाच्या हिताची आस्था, शेतकऱ्याचे हित पाहण्याची दृष्टि, नव्या इमारती बांधण्याचा शोक इत्यादींचें कांहीं चमत्कारिक मिश्रण फिरोजशहाच्या स्वभावात आलेले होते. त्याची मूळची प्रवृत्ति धामधूम माजविण्याकडे नव्हती. सुखाने आणि जमले तर विलास भोगीत राज्य करावे अशीच त्याची इच्छा होती. तथापि धार्मिक अभिमानाच्या भरीस पडून त्याने अनेक अपकृत्ये केलीं. त्याच्या स्वतःच्या दृष्टीने तीं सत्कृत्येच होतीं. आपण तीं केलीं याचा त्याला मोठा अभिमान वाटत असे. या कृत्यांचीं वर्णने त्याने स्वतःच करून ठेविलीं आहेत. त्यावरून स्वच्छ दिसून येते कीं, आपण सद्धर्मानेच वागत आहोत अशी त्याची कल्पना होती. हिंदुधर्मावर त्याचा अगदीं दात होता आणि सार्वजनिकपणें मूर्तिपूजा करणें हा त्याने गुन्हा ठरविला होता. हिंदूवर पूर्वी बसलेला जिझिया कर हा त्याच्या मतानें युक्तच होता. हिंदू लोकांच्या यात्रातून त्याच्या मताप्रमाणें जर कांहीं विपरीत घडत असले तर ते जबरदस्तीने बंद

करण्यात आणि ते करणाऱ्याना अमानुष शासन करण्यात त्याला मोठे भूषण वाटत असे. ही त्याची तऱ्हा हिंदुधर्मापुरती होती असेहि नाहीं. खुद्द त्याच्या स्वतःच्या धर्मातसुद्धा एखादे नवीन मत निघाले किंवा एखादा नवीन पथ निर्माण झाला तर तो दडपून टाकण्यासाठीं तो वाटेल तसल्या उग्र उपाययोजना करीत असे पेगंबराने सांगितलेल्या मूळ संदेशाच्या पलीकडे अणूभरही कोणी जाता कामा नये असा त्याचा आग्रह असे. अगदीं आरंभींच्या काळी महमदी धर्मात जी कलेवरील अनासक्ति होती आणि वैराग्याची छटा होती तीच साम्राज्यशाही उत्पन्न झाल्यावर सुद्धा शिल्लक राहिली पाहिजे असे त्याचे मत असल्यामळे त्याने मुसलमानी समाजाच्या तत्कालीन आचारविचाराच्या बाबतींत पुष्कळच उलाढाली केल्या. त्यापैकीं काहींशी व हिंदुधर्मीयाशीं त्याने जे वर्तन ठेवले होते त्याची हकीकत त्याने लिहिलेल्या आत्मचरित्रातून पुढे दिली आहे. )

* * * माझ्या कारकीर्दीच्या आधीं, काफिर लोकांना नष्ट करतांना जी लूट मिळालेली असते तिचा चारपंचमांश सरकारी खजिन्यांत भरावा आणि एकपंचमांश ती मिळविणाराला द्यावा असा कायदा व शिरस्ता असे, पण धर्मपुस्तकाप्रमाणे पहातां सरकारानें एकपंचमांश घ्यावा व चारपंचमांश ती संपादणाराला रहावा असें आहे. म्हणजे असें की, स्मृतिवचनाच्या अगदीं उलट शिरस्ता पडलेला होता. स्मृतिवचन असें धुडकाविलेलें असल्यामुळें, ज्याला जी लूट मिळेल ती बळकावून बसणें हें तो रीतसर समजूं लागला.

स्वाभाविकच पकडून आणलेल्या स्त्रियाना होणारीं मुलें कुमारिकांशीं व्यभिचार करून झालेल्या प्रजेप्रमाणें ठरत. ही बजबज नाहींशीं व्हावी म्हणून मीं ठरविलें कीं लुटीचा पाचवा हिस्सा सरकारांत जमा व्हावा व चार हिस्से ती लूट आणणाराच्या मालकीचे व्हावे.

खाफिज् किंवा शिया या नांवाच्या पथानें आपला मतप्रसार करून माणसें मुडण्याचें काम चालू केलें होतें या पंथवाल्यानीं नवे ग्रंथ लिहिले, आपल्या मताचें शिक्षण व प्रवचन चालू केलें आणि आमच्या धर्माचे जे पहिले प्रमुख आचार्य त्यांची निंदा सुरू केली. मी या सर्व लोकाना पकडून आणिलें आणि तुमच्या हातून प्रमाद घडत आहे व लोक भ्रष्ट होत आहेत हें त्यांस शाबित करून दिलें. त्यांच्यांतील जे फारच आग्रही होते त्यांना मीं शिक्षा केल्या व इतरांची नुसती निर्भर्त्सना केली किंवा त्याना ताकीद दिली. त्यांचे ग्रंथ मीं चवाठ्यावर भस्मसात् केले आणि परमेश्वरी कृपेनें या पंथाचें समूळ उच्चाटन झालें.

एकदां एक पाखंडी लोकाचा पंथ निघाला होता ते बुद्धिभेद करीत आणि लोकांना आपल्या पाखंडांत ओढून घेण्यासाठी धडपड करीत. रात्रींच्या वेळीं अमूक एका ठिकाणीं व ठरलेल्या वक्ताला ते जमत. त्यांत ओळखीचे, अनोळखीचे असे सगळे असत. ते तेथें सुरापान करीत व विचारलें तर म्हणत कीं, हाच आमचा धार्मिक पूजाविधि आहे. त्याच्याबरोबर याही प्रसंगीं त्यांच्या आया, बहिणी, बायका, याही असत. मग जणू कांहीं नमनासाठींच म्हणून

पुरुष मंडळी जमिनीवर आडवी होत आणि ज्याचा ज्या स्त्रीच्या लुगड्याला हात लागेल ती स्त्री त्यावेळीं त्याची ठरे. या अबाहतियान् मुळहिद लोकांचे जे प्रौढ पुढारी होते त्यांची डोसकीच मी मारिलीं आणि बाकीच्यांना कैदेंत घातलें किंवा हद्दपार केलें. अशा रीतीनें या घाणेरड्या आचाराचा नायनाट करून टाकला.

दुसरा आणखी एक पथ निघाला होता. यांतील लोकांनीं नास्तिक्यवाद पांघरला होता, आणि बधनें झुगारून देऊन लोकाना उन्मार्गवर्ती बनविण्याचें काम चालविलें होतें. यांच्या म्होरक्याचें नांव अहमदबहारी असें होतें. तो शहरांतच राही आणि त्याच्या अनुयायांतील कांहींजण त्याला देवच मानीत. या लोकांच्या मुसक्या बांधून त्याना माझ्यापुढें उभे केलें; तेव्हा मला कळलें कीं, हा बढाईखोर माणूस स्वतःला द्रष्टा समजतो आणि म्हणतो कीं, जो माझ्या पथात प्रविष्ट होत नाही त्याला द्रष्टेपणाचें वैभव कसें प्राप्त होईल ? त्याचा एक शिष्य जोरजोरानें सांगू लागला कीं, दिल्ली शहरांत एक देव अवतरला आहे आणि त्याचें नांव अहमदबहारी आहे. या लोकांवरचे हे आरोप जेव्हां सिद्ध झाले तेव्हां मी त्यांना शिक्षा केल्या व बेड्या ठोकल्या. इतरांना सांगितलें की, पश्चात्तापानें शुद्ध व्हा. मग त्यांना मी दूरदूरच्या गांवीं हांकून दिलें, अशासाठीं कीं, या ओंगळ पथाचा शेवट व्हावा.

दिल्ली शहरांत रुखनुद्दीन या नांवाचा एक माणूस होता. याला लोक महादी म्हणत. कारण हा बेलाशक पुकारा करूं लागला कीं,

भावीकालात होणार, होणार म्हणून म्हणतात तो इमाम महादी मीच आहें, आणि मला सर्व ज्ञान स्वयंभूच आहे. आपण कोणाच्याही हाताखालीं शिकलों नाहीं तरी सर्व वस्तुजातांचीं नावें आपल्याला माहीत आहेत. आदामपासून पाहिले तर आजवर एकाही द्रष्ट्याला असें ज्ञान लाभलेलें नाहीं. तो असेंही भासवू लागला कीं, अक्षरज्ञानाचीं गूढें इतर कोणाही मानवाला व्यक्त झालीं नाहीत तितकीं आपणास झाली आहेत आणि आपण त्या ज्ञानावर अनेक पुस्तकें लिहिलीं आहेत. यौगिक विद्येचीं काहीं खुळें त्यानें आरंभिलीं आणि आपण स्वतः रुखनुद्दीन म्हणजे परमेश्वराचे प्रेषित आहों अशा विपरीत कल्पना त्यानें पसरविल्या... स्मृतिशास्त्रज्ञ म्हणाले हा काफीरच आहे आणि इस्लामच्या अनुयायात असलीं घाणेरडीं व घातक प्रमेयें पसरविणारास देहान्त शासनच हवे. या शासनाला जर का विलंब लागला तर हीं प्रमेयें सांथीसारखीं पसरतील आणि सत्यधर्मापासून अनेक मुसलमान चळतील. मीं हुकूम केला कीं, या पाजी माणसाचा दुष्टावा आणि बडावा विद्वत्समूहांच्या कानीं घालावा आणि लहानथोर सर्व प्रकारच्या लोकांना तो पटवून द्यावा आणि स्मृतिशास्त्रज्ञ जी शिक्षा सांगतील ती या गुन्हेगारावर बजावावी. शेवटीं लोक याच्यावर, याच्या साथीदारावर व चेल्यांवर तुटून पडले व त्यांनीं त्यांच्या अंगाचीं कातडीं काढलीं व त्यांच्या हाडाचे तुकडे केले. याप्रकारें हा गैरप्रकार समाप्त झाला.

एक गृहस्थ आमिन् माहरूचा शिष्य होता. आपण शेख आहों म्हणून त्यानें गुजराथेंत आपलें बस्तान बसविलें. कांहीं शिष्यशाखाही त्यानें गोळा केली व मी देवच आहें असें तो बोलू लागला. शिष्यांना त्याची अशी ताकीद असे कीं, आपण हे शब्द बोलताच ' आपण देव आहातच, आहातच ' असा जबाब त्यांनीं करावा. तो असेंही म्हणूं लागला कीं, मी असा राजा आहें कीं, ज्याला मरण नाही. आपला एक स्वतंत्र धर्मग्रंथही त्यानें लिहिला. त्याच्या हातात कड्या घालून त्याला मजपुढे उभें केलें. आरोप सिद्ध होताच मीं त्याला शिक्षा फर्माविली, आणि त्याचा धर्मग्रंथ जाळून टाकला. इस्लामच्या श्रद्धावान् अनुयायात हें नवें खूळ पसरण्याचें अशा रीतीनें एकदम थाबलें.

इस्लामच्या शास्त्राला संमत नसलेला एक प्रघात मुसलमानी शहरात पडला होता. सणाच्या दिवशीं पालख्यातून, गाड्यातून, घोड्यावरून, खेचरावर बसून किंवा पायांनींच स्त्रियाच्या टोळ्याच्या टोळ्या दर्ग्याकडे जाण्याचा परिपाठ पडला होता. दुर्वृत्त, बेफाम वृत्तीचे, उनाड व बदफैली लोक या संधीचा फायदा घेऊन पाचकळपणानें हमामा माजवीत असत. तेव्हां मीं फर्माविलें की, कोणाही स्त्रीनें दर्ग्याकडे जातां कामा नये, जी जाईल तिला शिक्षा होईल. देवदयेनें याचा परिणाम असा झाला की, आतां कोणीही अब्रदार स्त्री दर्ग्याच्या जत्रेला जात नाही. हा प्रघात अजिबात बद पडला.

हिंदूनीं व मूर्तिपूजकानी आम्ही काणाडोळा करावा म्हणून कर भरण्याचें पतकरले होतें, आणि आपल्याला कसला उपसर्ग लागू नये म्हणून जिजिया कर भरण्याचेंही मान्य केलें होतें. पुढें या लोकानी शहरात व आजूबाजूस नवीं देवळें बाधावयास आरंभ केला. महमदी धर्माच्या अगदी विरुद्ध हें काम झालें त्याचे तर असे सागणें आहे कीं, असलीं देवळें होऊ देता कामा नये. दैवी इच्छा प्रमाण धरून मी ही मदिरें पाडून टाकिलीं आणि या काफिरशाहीचे जे पुढारी लोकाना पातकास प्रवृत्त करीत त्याना ठार मारून टाकलें व सटरफटर लोकाना फटकेमार दिला. शेवटी हा घाणेरडा प्रकार बद पडला. उदाहरणादाखल सागतों–मल्लू नावाच्या खेड्यात एक तळें आहे. याला ते कुड म्हणतात. येथें देवळें बांधलेलीं होती. विशेष प्रकारच्या दिवशी सशस्त्र होऊन आणि घोड्यावर बसून हिंदू लोक तेथें जात असत त्यांचीं बायकामुलें पालखीतून किंवा गाड्यातून जात. ते हजारोंनीं जमत व मूर्तीची पूजा करीत. या अनाचाराकडे इतका काणाडोळा झाला कीं, बनिया लोकानी आपापल्या गोण्या भरून तेथें न्याव्या व बाजार थाटावा आणि माल विकावा असा प्रकार सुरू झाला. आपण कोण, काय हें विसरून केवळ पैका मिळावा म्हणून काहीं मुसलमानही तेथें जमूं लागले. हें वर्तमान कळतांच माझ्या धर्मबुद्धीप्रमाणें मला वाटलें कीं, इस्लामी धर्माची अप्रतिष्ठा करणारें आणि निंदास्पद असें हें कृत्य थाबविलेच पाहिजे. मग जत्रेच्या दिवशी मी जातीनेंच तेथें गेलों व हुकूम दिला कीं, या

लोकाचे पुढारी आणि या गलिच्छ प्रकाराचे पुरस्कर्ते यांना ठार मारावे. सरसकट हिंदु लोकांना कांहीं कडक शासन करण्यास मीं प्रतिबंध केला; पण मीं त्यांचीं देवळें उलथून टाकलीं आणि त्यांच्या जागीं मशिदी बांधल्या. देवाच्या दयेनें, मूर्तिपूजक आणि काफीर लोक मूर्तींची पूजा करीत असत तेथेंच आज मुसलमान खऱ्या देवाची आराधना करीत आहेत.

कोहान्न नांवाच्या गांवीं एक नवीन देऊळ झालें व तेथें हे मूर्तिपूजक जमून पूजाअर्चा करूं लागले. या लोकाना पकडून माझ्याकडे आणलें. मीं फर्माविलें कीं, या दुष्ट कामांतले जे पुढारी आहेत त्यांच्या विपरीत वर्तणुकीची दवंडी चोंहोकडे करावी व राजवाड्यापुढें त्यांचा शिरच्छेद करावा. तसेंच त्यांच्या पोथ्या, त्याच्या मूर्ति व त्यांच्याबरोबर असलेलीं त्यांचीं उपकरणीही चवाठ्यावर होळींत घालावी. उरलेल्याना सख्त ताकिदी दिल्या कीं, मुसलमानांच्या देशात असल्या दुष्ट प्रघाताकडे बिलकूल काणाडोळा होणार नाहीं.

माझ्या आधींच्या राजवटींत राजवाड्यातील पक्तीत सोन्या-रुप्याचीं भांडीं माडीत असत व तलवारींचे पट्टे व बाणांचे भाते रत्नखचित करीत. मी हें बंद केलें. हत्याराचीं म्यानें वगैरे हाडकाचीं करावीं व स्मृतीत सांगितलेल्या तऱ्हेचीच भाडीं मांडावीं असा शिरस्ता मीं घालून दिला. घोड्याच्या सामानांवर, पोषाखांवर तऱ्हतऱ्हेची चित्रें काढण्याची चाल पडली होती. स्मृतिवचनाप्रमाणें

मी ती बंद करून टाकली. राजवाड्यांवरील चित्रें सुद्धां मीं पुसून टाकावयास सांगितलें मोठ्या लोकांचे पोषाख भरजरीचे रेशमी असत स्मृतीविरुद्ध असल्यामुळें मी तें बंद केलें

परमेश्वरी कृपेनें मला इमारती बांधण्याची वासना आहे म्हणून मीं पुष्कळ मशिदी, विद्याशाळा व मठ बांधिले, धर्मास समत म्हणून कालवे काढले, झाडें लावलीं व जमिनीही लावून दिल्या. धर्मशास्त्र्यांना फारच जिकीर होते हें खरें आहे. म्हणून त्यांच्या खर्चाच्या मानानें मी त्यांना नेमणुकी करून दिल्या आतां त्यांना नियमितपणें नेमणूक मिळते.

## १८ . . .... आम्ही कवि आहों !

[ काउंट टॉलस्टॉय हा आधुनिक काळातील एक जगप्रसिद्ध लेखक म्हणून मान्य झाला आहे हा इ स १८२८ साली जन्मला. शिक्षण संपल्यानंतर हा आपल्या देशाच्या म्हणजे रशियन फौजेत शिरला आणि क्रिमियन युद्धातील सेबॅस्टपूलच्या प्रचंड संग्रामानंतर याने आपली सैन्यातील नोकरी सोडून दिली या युद्धाचा त्याच्या मनावर विलक्षण संस्कार झाला आणि त्याचे मन अन्तर्मुख बनले आपले हेतु साध्य करून घेण्याला आणि मानवी जीवनाची पूर्ण परिणति होण्याला युद्धासारखीं हिंस्र साधने मुळींच उपयोगाची नाहीत असे त्याच्या मनाने घेतले आणि होता होता अहिंसेच्या तत्त्वावर त्याची दृढ श्रद्धा बसली. अहिंसेचे तत्त्व मनात घोळत राहिल्याने, आणि नित्याचे व्यवहार व तत्त्व यामध्ये फारकत असता उपयोगाची नाही हेही सूत्र त्याने पत्करलेलें असल्यामुळे या अहिंसेच्या तत्त्वाचें त्याने तत्त्वज्ञान बनविले बुद्धाच्या ग्रंथाचीही त्याने ओळख करून घेतली आणि येशू ख्रिस्ताच्या सर्व प्रतिपादनाचा अर्थ अहिंसापर लावण्याचा प्रयत्न त्याने केला युद्धातून परत आल्यावर त्याने लग्न केले आणि बराच जमीनजुमलाही केला, परंतु आपले काही तरी चुकत आहे असें त्याला अधिक अधिक वाटू लागले आणि प्रपंचात राहूनसुद्धा त्याची प्रपंचावरची भक्ति मात्र उडाली. वैयक्तिक जीवन हे त्याला कमी वाटू लागले आणि सामुदायिक जीवनाची कल्पना

त्याच्या मनात उद्भवूं लागलीं. या मनःस्थितीपर्यंत आपण कसे येऊन पोहोंचलो आणि यापुढेही येशू खिस्ताच्या तत्त्वज्ञानाचा सामुदायिक जीवनाला अनुकूल असा अर्थ लावण्यापर्यंत आपली मजल कशी येऊन पोहोंचली याचें टॉलस्टॉय यानें मोठें गंभीर विवेचन केलेलें आहे. म. गांधींच्या विचार-प्रणालीवर टॉलस्टॉय याच्या लिहिण्याचा फार खोल परिणाम झालेला दिसून येतो. प्रपंचातील जीं कामें आपण सहज करून टाकतों आणि ज्याच्या युक्ततेविषयीं आपल्या मनात कधीं प्रश्नच उद्भवत नाहीं तीं कामें कां करावयाचीं असले प्रश्न त्याच्या मनात येऊं लागले. हळूहळू त्याच्या शेतवाडीवर काम करीत असलेले जे शेतकरी लोक त्याच्या जीविताकडे त्याचें लक्ष जाऊं लागलें आणि आजकाल युरोपखंडात आणि आता सगळ्या जगभर कामकरी आणि शेतकरी याच्यासंबंधीं जें तत्त्वज्ञान पसरलेलें आहे व ज्याला अनुसरून मोठमोठाल्या क्रान्त्या होत आहेत त्या तत्त्वज्ञानाचा मोठा प्रवाह बनविण्यास ज्या काहीं मतवाहिन्या उपयोगी पडल्या त्यांत काउंट टॉलस्टॉय याचें मतप्रतिपादन आणि त्याचा प्रत्यक्ष आचार याचाही मोठा उपयोग झाला. सर्व जन्मभर तो लिहीतच होता. त्यानें कादंबऱ्या लिहिल्या, तत्त्वज्ञानपर ग्रंथ लिहिले, लघुकथा लिहिल्या, आणि कविताही लिहिल्या. पण या सगळ्या लिहिण्याचा झोक सामान्य लोकांच्या जीविताचें निरीक्षण करण्याकडे आणि त्यांना नवें उत्थान कसें प्राप्त होईल याची विवेचना करण्याकडेच होता. टॉलस्टॉय १९१० सालीं दिवंगत झाला. आपली पहिली प्रवृत्ति अनाचाराकडे कशी होती पण त्यांतून बाहेर पडल्यावर जीविताच्या अर्थाचे निरनिराळे प्रश्न आपणास कसे भेडसावूं लागले याचें मोठें उद्बोधक वर्णन टॉलस्टॉय यानें केलें आहे. ]

* * * लहानपणापासून मला जें धर्मतत्त्व शिकविलें होतें तें आतां माझ्यांतून लुप्त होऊं लागलें, इतरांचेंही असेंच होतें. फरक इतकाच कीं, पंधरा वर्षांच्या वयांतच मीं तत्त्वज्ञानाचीं पुस्तकें वाचूं लागल्यामुळें, माझ्या धर्मतत्त्वाला जी ग्लानि येऊं लागली तिची जाणीव मला फार लवकर झाली. मी सोळा वर्षांचा झालो तेव्हा आपण होऊन प्रार्थना करणें, देवळांत जाणें, किंवा उपासतापास करणें हें सर्व बंद झालें. मला लहानपणी जें कांही शिकविलें होतें त्यावरची माझी श्रद्धा अजिबात उडाली. पण इतकें मात्र खरें कीं, कशावर तरी माझी श्रद्धा उरली होती. ती कशावर उरली होती हें मात्र मला तेव्हा सांगता आलें नसतें माझी परमेश्वरावर श्रद्धा उरली होती. अथवा ती माझी श्रद्धा उडाली नव्हती एवढें तरी खरें. पण हा परमेश्वर म्हणजे कोण हें मात्र मला सांगतां आलें नसतें. जीझस खाईस्ट यालाही मी मानीत होतों आणि त्याचें प्रतिपादनही मला नाकारतां येत नव्हतें. पण त्याच्या प्रतिपादनाचें मर्म काय हें मला तेव्हां मुळींच सांगतां आलें नसतें. तेव्हांचे स्मरण करून पाहिलें म्हणजे मला आतां स्वच्छ दिसतें कीं, ज्याला मी माझी श्रद्धा म्हणत होतों ती म्हणजे आत्मविकासावरील माझी श्रद्धा होय. पण हा आत्मविकास म्हणजे तरी काय, आणि त्याचा हेतु काय हेंही मला तेव्हां सागतां आलें नसतें. मीं माझ्या मनःशक्तीचा विकास करीत होतों. मी प्रत्येक गोष्टीचा अभ्यास करीत होतों. जें जें काय हातीं लागेल त्याचा त्याचा अभ्यास करावा असें मी करीत होतों. माझें निश्चयाचें बळही

मी वाढवीत होतों. स्वतःच्या वर्तनासाठीं मी कांही नियमही करून ठेवले होते. मनाबरोबर माझ्या शरीराचीही वाढ होत होती. निरनिराळे खेळ खेळून बल आणि चपलता हीं मी अंगीं आणीत होतों आणि सोशीकपणा व कंटकपणा अंगीं यावा म्हणून मुद्दामच मधून मधून अन्नावांचून राहत असें. या साधनानीं आपला पूर्ण विकास होईल असे मला वाटलें. प्रथम प्रथम माझी कल्पना नैतिक विकासाची होती. पण पुढे सर्व तऱ्हेचा विकास व्हावयास हवा असें मला वाटूं लागलें. आपल्या स्वत:च्या दृष्टीनेंच आपण अधिक चांगलें व्हावें किंवा परमेश्वराच्या दृष्टीनें आपण अगदी शुद्ध व्हावे इतकेंच नव्हें तर लोकाच्या दृष्टीनें सुद्धां आपण अधिक चांगलें व्हावें असें मला वाटूं लागलें. या दिशेनें चालू असलेल्या प्रयत्नांतून आपण इतरापेक्षां अधिक प्रबल व्हावें अशी इच्छा उत्पन्न झाली. लोकांहून अधिक कीर्तिमान् व्हावें, आपला बडेजाव अधिक व्हावा, आपण अधिक श्रीमंत व्हावें असें मला वाटूं लागले.

आपण भलें असावें अशी मात्र माझी मनापासून इच्छा होती. पण मी तेव्हां अगदीं कोंवळा होतों. अर्थात् विकारवश होतों, आणि अंगचा भलेपणा वाढविण्याच्या कामात तर मला कुणाचेंच साहाय्य नव्हते. आपण नीतिदृष्ट्या फार चांगले व्हावें असें मला अगदीं मनापासून वाटे. पण मी तसें बोलून दाखविलें म्हणजे कोणी माझा तिरस्कार करीत आणि कोणी तर माझा उपहासच करीत. उलट कांहीं वाईट विकारांना मी वश झालों तर मात्र ते माझी तारीफ करीत

आणि मला प्रोत्साहनही देत असत. महत्त्वाकांक्षा, अधिकाराची हाव, लोभ, व्यसनाधीनता, गर्विष्ठपणा, रागीटपणा आणि सूडाची वासना या विकारांचीच भोंवतालचे लोक तारीफ करीत असत. हळूहळू मला हेच विकार बरे वाटू लागले आणि मग त्या वडील माणसांप्रमाणेंच मीही बनलों आणि याचें ते मोठें कौतुक करीत आहेत हेंहि माझ्या ध्यानात आलें. मी माझ्या मावशीच्या घरी राहात असे; ती स्वत· अत्यंत शुद्ध वर्तनाची स्त्री होती. पण ती सुद्धां मला नेहमीं म्हणे कीं लग्न झालेल्या एखाद्या स्त्रीशीं तुझें नातें उत्पन्न व्हावें याहून तुझ्या बऱ्याचें मला कांहींहि दिसत नाहीं. माझा उत्कर्ष म्हणून तिला आणखी असें वाटे कीं, मी कुणातरी थोराच्या आणि जमल्यास बादशहाच्याच दिमतीला असावें. पण तिच्या दृष्टीनें मला जास्तींत जास्त सुख लागणारी गोष्ट म्हणजे एखाद्या श्रीमताच्या मुलीशीं माझें लग्न व्हावें आणि आपल्या शेतवाडीवर शेंकडों कुळें राबत आहेत असें मला दिसावें.

त्या दिवसांची आठवण झाली म्हणजे आतां माझ्या पोटांत धस्स होतें. मला अगदीं शिसारी येते आणि माझ्या डोक्याची शीर उडूं लागते. तेव्हां मी अनेक लोकांना युद्धात ठार केलें आणि अनेकाना आव्हान देऊन त्यांना द्वंद्वयुद्धांत नाहींसें करून टाकलें. माझा पैसा जुगारींत जाऊं लागला. गड्यामाणसांनीं शेतावर राबावें आणि मी ऐतोबासारखें खावें असें होऊं लागलें. आणि मी उलट त्यांनाच शिक्षा करूं लागलों. मला नीतिविचाराची कांहीं चाड राहिली नाहीं आणि लोकांना मी उघड उघड फसवूं लागलों. खोटें बोलणें,

चोरी करणें, दारू पिणें, लोकांच्या अंगावर धांवून जाणें, खून करणें आणि व्यभिचारकर्म करणें यांत मला कांहींच वाटेनामें झालें. मी केला नाहीं असा एकही गुन्हा शिल्लक राहिला नाही. तथापि लोक माझ्या वर्तनाची स्तुतीच करीत असत. ते मला तेव्हाही भला माणूस म्हणत असत आणि आताही भलाच म्हणतात ! अशा प्रकारें माझी दहा वर्षें गेलीं.

मी सव्वीस वर्षांचा झालों तेव्हां मी राजधानीच्या शहरीं आलों आणि तेथें माझी अनेक लेखकांशीं गांठ पडली. मीही आधीं बरेंच लिहू लागलों होतों. या कामीं मला मोठा डौल वाटे. माझ्या लिहिण्यात लोभ आणि गर्व हींही दिसून येत. शहरांत आल्यावर ते लेखक मला म्हणाले, "बरें झालें तुम्हीं आमच्यात आलात. तुम्ही लिहितांही फार चांगलें." वास्तविक खरी गोष्ट काय होती हें कळून यावयाच्या आधींच ज्या लेखकांच्या मेळाव्यांत मी येऊन पडलों होतों त्यांची वागणुकीची तऱ्हा मींही उचलली, आणि होतां होतां आत्मविकसनाची माझी प्रथम-पासूनची इच्छा समूळ नष्ट झाली ! या लोकांच्या तोंडून मीं जें ऐकलें त्यावरून मला एवढाच बोध झाला कीं, आपला वर्तनक्रम कितीही छिनाल असला तरी त्यालाही कांही युक्त कारणें असतात ! ग्रंथकर्तृत्वांतील माझ्या या मित्रांचें तत्त्व असें होतें कीं, जीविताचा एकदरीनें विका-सच होत जातो आणि या विकसनांत आपण जे विचारास चालना देणारे लोक, ते मोठाच वांटा उचलतों; आणि त्या लोकांतही खास आपण म्हणजे कवि आणि कलावत त्यांचा महिमा तर विचारतांच

कामा नये. आमचा जीवितहेतु म्हणजे मनुष्यप्राण्याला ज्ञान देणें हा होय. पण कदाचित् कोणी असा साधासुधा प्रश्न करील कीं, तुम्हांला स्वतःला काय कळतें? आणि तुम्ही काय शिकविणार? तर या लोकांच्या तत्त्वज्ञानांत यावरही एक तोड तयार ठेवलेली असते. ती ही कीं, कलावत आणि कवि यांना आपल्या ज्ञानाची जाणीव असावी लागते असें नाहीं. त्याचें ज्ञान स्वतःचें स्वतःस भासलें पाहिजे असें नाहीं! मोठा अकास कलावंत आणि कवि म्हणून माझी चहा होऊं लागली होती. अर्थात् आतांच सांगितलेली ही तोड मी एकदमच पत्करली.

मी कलावंत आहें, मी कवि आहें, मी लिहितों, मी ज्ञान देतों, मी काय सांगतों हें माझें मलाच माहीत नाहीं! अशी माझी वास्तविक स्थिति होती. पण यासाठींच मला पैसा मिळूं लागला. सुग्रास अन्न खावें, माड्या–खिडक्यांत रहावें, सुंदर स्त्रियांचा सहवास प्राप्त व्हावा आणि समाजांत मानमान्यता मिळावी असा प्रकार चालू झाला. माझी कीर्तीही पसरत चालली. अर्थात् मला वाटलें कीं, आपण जें लिहितों तें खरोखरच चांगलें असलें पाहिजे. कविता कविता म्हणून म्हणतात तिचा अर्थ हाच आहे आणि आत्मविकास म्हणतात त्याचाहि अर्थ हाच आहे ही माझी भावना मला धर्माच्या ठिकाणीं दिसूं लागली, आणि अशा धर्माचा मी एक आचार्य आहें असें मला वाटूं लागलें. हा आचार्यपणाचा धंदा मोठा सुखप्रद आणि फायद्याचा असे. अर्थात् यांत कांहीं गैर आहे कीं काय

अशी शंका न येतांच माझे कित्येक दिवस या भावनेंत गेले. पण दोनतीन वर्षें जातांच या आमच्या धर्मातही कांहीं प्रमाद आहे कीं काय अशी शंका मला येऊ लागली आणि मी त्याची तपासणी करू लागलों. मला ही शका येण्याचें पहिलें कारण झालें तें हें कीं, या धर्माचे आमचे ते जे मोठमोठाले उपाध्याय—म्हणजे कलावत व कवि—त्याचें एकमेकांशीं बिल्कुल जमत नसे. कोणी म्हणत आम्ही सर्वांहून चागले प्रतिपादक आहोंत, आमचेंच बोलणें जास्त उपयोगाचें आहे, ज्याची आज जरूर आहे तेंच आम्ही शिकवितों; पण हे जे आमचे दुसरे प्रतिस्पर्धी आहेत ते काय वाटेल तें सांगत बसतात. उलट दुसरे कोणी म्हणत कीं, 'भलतेंच एकादें! आम्हीच खरे सच्चे प्रतिपादक आहोंत. तुम्ही मात्र केवळ भकत सुटतां.' अशा प्रकारें ते एकमेकांशीं तंडत असत, भांडत असत, ते एकमेकांला शिवीगाळ करीत असत, ते एकमेकाला फसवीत असत, आणि दगा देत असत. आमच्यांत असेही कित्येकजण असत कीं, ते खरा कोण आणि खोटा कोण याची मुळींच क्षिति बाळगत नसत; पण आमच्या या वादावादींतून आपला फायदा कसा करून घेतां येईल एवढ्यावर मात्र त्यांची दृष्टि असे. या सर्व कारणांमुळें माझ्या मनांत हा विचार भरत चालला कीं, आपला हा कलावंतांचा आणि कवींचा पथ असावा तितका पायाशुद्ध नाही.

याबरोबरच या पथाच्या उपाध्यांचें-लेखकांचें—चारित्र्य मी बारकाईनें पाहूं लागलों. तेव्हां मला कळून चुकलें कीं, या पंथाचे

बहुतेक सगळे उपाध्याय नीतिभ्रष्ट आहेत आणि यांना कसलीही दानत नाहीं; मी लष्करांत असतांना आम्ही जीं व्यसनासक्त माणसें येथें असू त्यापेक्षांही हे लोक अधिक नादान आहेत. पण यांच्या अगीं आत्मविश्वास मोठा होता आणि ते मोठे आत्मसतुष्टही असत. जे खरो-खरच पवित्र आहेत त्यांच्या अगीं तरी हे गुण असतात; किंवा पावित्र्य म्हणजे काय हें ज्यांच्या गांवींही नसतें त्यांच्या अंगीं तरी हे असतात. शेवटीं याच्यावरून माझें मन अगदीं उडालें, माझी मलाच लाज वाटू लागली. कारण हा पथ म्हणजे शुद्ध लुच्चेगिरी आहे हें माझ्या पुरेपूर ध्यानांत आलें. पण असें झालें तरी या लोकांच्यांत वागल्यामुळें मला जी पदवी प्राप्त झाली होती मी माझ्या-च्यानें सोडवेना. मी मोठा कलावान् झालों होतों. मी कवि झालों होतों. लोकांना शहाणे करणारा मी आहे असें ठरलें होतें. मला उगाचच वाटे कीं आपण कवि आहोंत, कलावन्त आहोंत, आणि आपण काय शिकवीत आहों हें आपल्याला जरी कळलें नाहीं तरी लोकांच्यापुढें पांडित्य करण्याचा आपला हक्कच आहे. आम्हां सर्वांची अशी खात्री होऊन चुकली होती कीं, आपल्याला बोलत राहिलें पाहिजे, लिहीत राहिलें पाहिजे, आणि जितकें म्हणून छापतां येण्या-सारखें आहे, तितकें जलदीनें छापलें पाहिजे. आणि जर लोकांचें हित व्हावयास हवें असेल तर हें सर्व अवश्यच आहे. आम्ही शेंकडों लोक लिहित होतों आणि छापित होतों; आम्ही एकमेकाला विरोध करीत होतों आणि शिव्याशापही देत होतों, तथापि आम्ही सगळे लोकशिक्षणाचें काम करीत होतों हें मात्र खरें !

आपल्याला कांही कळत नाहीं हें आमच्या ध्यानांतच येत नव्हतें. बरें कशास म्हणावें व वाईट कशास म्हणावें हे जे जीवितांतले अगदीं साधे प्रश्न आहेत त्याचीं उत्तरें सुद्धा आम्हास देतां येत नव्हतीं. तरी आमचा बोलण्याचा धडाका चाललाच होता. आम्ही एकमेकांचें ऐकावयासही तयार नव्हतों. आज याचा पक्ष घ्यावा, उद्या त्याला शाबासकी द्यावी म्हणजे तोही केव्हां तरी आपला पक्ष घेतो व आपल्याला शाबासकी देतो, असें चाललें होतें. शेवटीं सर्वजण एकमेकांशीं भांडत बसत असूं. असा हा वेडेखाना तयार झालेला होता. आमच्या छापखान्यात हजारों कामगार लोक रात्रंदिवस अगदीं टेकीस येईपर्यंत काम करीत असत. खिळे जुळविणें आणि पानेंच्या पानें छापून काढणे ही त्याचीं कामें असत. आमचें हें पाडित्य सर्व रशियाभर पसरत असे. इकडे आमचा लिहिण्याचा धडाका चालूच होता. आपल्या हातून पुरेसें लोकशिक्षण होत नाहीं याचें आम्हांला वाईट वाटे आणि आपण इतकें करीत असतां आपल्याकडे लोक पुरेसें लक्ष देत नाहींत हें पाहून आम्हांला फार राग येई. खरोखर, आम्हीं काहीं भलतेंच करीत होतों. आता मात्र आम्हांला त्याचा अर्थ चांगला उमगतो. जितका पैसा काढतां येईल आणि लोकांकडून जितकी वाहवा मिळवितां येईल तितकी मिळवावी हाच काय तो आमचा अगदीं आंतील आणि खराखुरा हेतु होता. अर्थात् हें साध्य व्हावें म्हणून पुस्तकें लिहिणें आणि वर्तमानपत्रें खरडणें एवढेंच काय तें आम्हांस करतां येण्यासारखें होतें. म्हणून आम्ही हें करीत

होतों. पण असलें हें भिकार काम आपल्या हातून व्हावें म्हणून, आणि आपण म्हणजे कोणी तरी गोमागणेश आहोंत असें आपल्यालाच वाटावें म्हणून आम्हांला कांही तरी तत्त्वज्ञानाचा पुरवठा हवा होता. अपेक्षेप्रमाणें हें तत्त्वज्ञानही आम्हांला लाभलें. " जें जें काहीं विद्यमान असतें तें तें सर्व युक्तच असतें; जें कांहीं अस्तित्वांत आहे तें विकसित होत असतें, हें विकसन संस्कृतीनें घडत असतें; संस्कृति किती झाली आहे याचें माप लोकांत वर्तमानपत्रें आणि पुस्तकें किती खपतात यानें लागतें, आम्हीं पुस्तकें आणि वर्तमानपत्रे लिहितों म्हणून लोक आम्हांला पैसे देतात आणि आमचा मान करतात, अर्थात्च आम्ही सर्वांत चांगलीं माणसें आहोंत आणि आमचाच सर्वांत जास्त उपयोग आहे. " असें हे तत्त्वज्ञान होतें ! या बाबतीत आम्हा सर्वांचें जर एकमत असतें तर हें सगळें भाकड बरोबर ठरलें असतें. पण आमच्यापैकीं एकानें कोणताही एक विचार सांगितला कीं, लागलीच बरोबर उरफाटा विचार दुसरा कोणीतरी सांगत असे. यावरून तरी आत्मशोधनाचा विचार आम्हास सुचावयास हवा होता. पण आम्ही याकडे केवळ दुर्लक्ष करीत होतों व लोक आम्हांला पैसे देत आणि ज्याच्या त्याच्या पक्षातील लोक त्याची त्याची वाहवा करीत ! अर्थात् प्रत्येकाला वाटत असे कीं, आपण म्हणत आहोंत तें बरोबरच आहे. सुमारें सहा वर्षें असला उद्योग मी करीत होतों.

मध्यंतरीं मी परदेशी प्रवासाला गेलों. पुढें परत आल्यानंतर

माझें लग्न झाले आणि मी प्रापंचिक बनून गुण्यागोविंदानें राहूं लागलों. यात माझी पधरा वर्षें गेली. लेखकाचा धंदा जरी मला आता तितकासा महत्त्वाचा वाटत नव्हता तरी अजूनही मीं लिहिण्याचें काम चालूच ठेवलें होतें. ग्रथकर्तृत्वाची चांगलीच चटक मला लागली होती. मीं काही सटरफटर जरी लिहिलें तरी मला बेसुमार पैसा मिळे आणि लोक माझी तारीफही करीत. अर्थात् आपलें घर भरण्याचे हें उत्तम साधन असल्यामुळें तें मी अव्याहत चालूं ठेवलें. पण त्यातून माझा आणखीही एक फायदा होत होता. आपलें जीवित म्हणजे काय आहे आणि एकदर मानवी जीवित म्हणजे तरी काय हे प्रश्न माझ्या मनात जोरानें उठत असत, ते दाबून टाकावयास मला या व्यवसायाचा फारच उपयोग होई ! अशा प्रकारे माझी दिनचर्या चालू होती. पण हळूहळू मला थोडी जाचणूक वाटू लागली आणि कांहीं नैतिक पेंच उत्पन्न होत आहेत असें मला वाटू लागलें. जणू काहीं, काय करावें आणि कसें जगावें याचाच मला बोध होईनासा झाला मला खिन्नता येऊ लागली आणि वाटू लागलें कीं, यांत कांहीं तात्पर्य नाही. मग हें अभ्रही गेलें आणि पहिल्यासारखे मी सर्व कांहीं करूं लागलों. पण अशा प्रकारचीच अभ्रें पुन्हां पुन्हां येऊ लागलीं आणि मनाला हा प्रश्न पडूं लागला की ही धडपड कशासाठीं आहे ? आपण कोणीकडे चाललों आहों ? मधून मधून वाटे की, " हे प्रश्न उगाच कांहीं तरी आहेत. आपल्याला याच्याशीं काय करावयाचें आहे ?

यांची उत्तरेंच जर हवीं असलीं तर तीं माझी मला सहज देण्यासारखीं आहेत उत्तराचें मर्म कोणालाही माहीत आहे. अर्थात् सध्यां वेळ नाहीं म्हणून; नाही तर याचीं उत्तरें मी हा हां म्हणतां देईन." तथापि हे प्रश्न पुन्हां पुन्हां माझ्या मनांत आवर्तनें करूं लागले आणि यांना उत्तरें दिल्याशिवाय आतां गति नाहीं असा धाक मला पडूं लागला. एकाच जागेवर शाईचें थेंब जर पुनः पुनः पडले तर जसा एक मोठा काळा ठिपका होतो तसाच या प्रश्नांचा माझ्या मनांत बसला. यानंतर मग, प्राणघातक असा हाड्या ज्वर ज्याला येऊं लागतो त्याला जी लक्षणें होतात तींच मला होऊं लागलीं. प्रथम प्रथम नुसतें कसेंसेंच वाटतें; अर्थातूच रोगी त्याच्याकडे काणाडोळा करतो. मग हीं लक्षणें पुन्हां पुन्हां होऊं लागून दिवसभर कसकस वाटत राहतें. मग याचें चक्क दुखणें बनतें आणि ज्याला केवळ 'बरे न वाटणें' एवढेंच नांव त्यानें आरंभीं दिलेलें असतें तें काय आहे याचा तलास लागण्याच्या आधींच, तें मृत्यूचेंच बोलावणें आहे असें शेवटी ठरतें. माझें असेंच झालें. माझ्या ध्यानात आलें कीं, आपल्या मनाची जी मळमळ आहे ती कांहीं एखादे वेळीं होणाऱ्या गोष्टींपैकीं नाहीं. वरील प्रश्न माझ्या मनाला पुन्हां पुन्हां पडूं लागले आणि त्यांचीं उत्तरें आपल्याला मिळालींच पाहिजेत असेंही वाटूं लागलें.

समारा शहरीं माझी शेतवाडी होती. माझ्या मुलाचें शिक्षण व्हावयाचें होतें आणि मला ग्रंथलेखनही करावयाचें होतें; पण या

प्रत्येक प्रसंगीं मी स्वतःस विचारूं लागलों कीं हें सगळें कशासाठीं आहे ? याचें उत्तर मिळालें नाहीं तोंपर्यंत मला कामाला हात घालतां येईना आणि मला चैनही पडेना. मी स्वतःस विचारी "समारा परगण्यांत तुझी सहस्रावधि बिघे जमीन आहे आणि तुझ्यापाशीं तीनशें घोडे आहेत, हो आहेत, पण पुढें काय ?" मुलाच्या शिक्षणाविषयी कांही योजना मनांत आली म्हणजे मी विचारी, "शिक्षण कशासाठी द्यावयाचें ?" किंवा शेतकऱ्यांची स्थिति कशी सुधारावी याचा विचार मनात आला कीं, चटकन् असा प्रश्न उत्पन्न होई कीं, यांचा आणि माझा काय संबंध आहे ? ग्रंथलेखनाचा प्रश्न मनांत आला म्हणजे असेंच वाटे की, हो, हो; गोगोल, पुष्टिन, शेक्सपिअर, मॉलिअर यांच्यापेक्षांसुद्धां तुला जास्त कीर्ति मिळाली किंवा सगळ्या जगांत तुझा पहिला नंबर लागला तरी यांतून काय निष्पन्न होणार ? या प्रश्नांचीं उत्तरें मला हवीं होतीं. आणि तीं त्वरित हवीं होतीं पण माझीं मला तीं देता येईनात. मला वाटूं लागलें कीं, ज्या दगडावर आपण उभे होतों तो दगडच पायाखालून निसटला आहे, ज्याच्या बळावर मी जगत होतों तें सत्त्वच आता नष्ट झाले आहे. अशाप्रकारें जीविताचा सर्व व्यवहार अजिबात बंद पडला. अर्थात् माझी श्वसनक्रिया चाललीच होती. मी खातपीत होतों आणि मला झोपही लागत होती. याचें कारण तरी इतकेंच कीं, त्यांवाचून मला गतीच नव्हती.

एखाद्या देवतेनें जर पुढें येऊन म्हटलें असतें कीं, मी तुला प्रसन्न

आहे. वर माग ! तर मीं तिला काय मागितलें असतें कोणास ठाऊक ? प्रापञ्चिक वासनाना मधूनमधून भर येतो, आणि तेंच आपल्याला हवें असें वाटतें. पण मन थोडें शुद्धीवर आलें म्हणजे दिसूं लागतें की, या वासना म्हणजे केवळ एक माया आहे अमुक हवें असें कांहींच म्हणतां येण्यासारखें नाही. सत्य-ज्ञान व्हावें असेंही मला वाटेना. कारण तें ज्ञान काय आहे याचा मला अंदाज करतां येत होता. तें ज्ञान हेंच की, मानवी जीवित केवळ अर्थशून्य आहे. मला वाटे कीं आपण पूर्ण जागे आहों आणि मार्गक्रमण करीत आहों, आणि शेवटीं येता येता एका कड्यावर येऊन ठेपलों आहों आणि तेथून पुढें पाहिलें म्हणजे सर्वनाशाशिवाय दुसरें कांहींही दिसत नाहीं. या मार्गक्रमणात थांबणें अशक्य आहे. परत फिरणें अशक्य आहे. डोळे मिटून घेणें हेंही अशक्य. डोळ्यासमोर क्लेश, आणि प्रत्यक्ष मरण, व सर्वनष्टांश हींच आहेत. हें विसरता येण्यासारखे नव्हतें..........मला हा पेंच उत्पन्न झाला. तेव्हां मी खरोखर चांगला सुखातच होतों. माझी पन्नाशीही अजून उलटली नव्हती; माझी बायको फार चागली होती आणि तिची माझ्यावर प्रीति असे. माझीही तिच्यावर तशीच असे. माझीं मुलेंही मोठीं गोजिरवाणीं होतीं. आणि माझी शेतवाडीसुद्धा, मी स्वतः विशेष कांहीं न करता, वाढत चालली होती व तिच्यांतून मला गल्लाही जास्त मिळूं लागला होता. माझे सगेसोयरे पहिल्यापेक्षां मला आतां मानूं लागले होते. इतर लोकही माझी स्तुति करीत आणि माझी

कीर्तिही पसरूं लागली होती. या माझ्या समजात कसलाही भोळेपणा नव्हता. माझें मन अगदी निकोप असून चाणाक्षपणानें जीविताकडे पाहत असे माझ्याइतपत माणसांना मनाचें आणि शरीराचें जेवढे सामर्थ्य असतें त्यापेक्षा मला जास्त होते कापणीच्या वेळीं मी शेतकऱ्यांच्या बरोबरीनें काम करीत असें आणि कसलाही शीण न वाटता आठ–आठ, दहा–दहा तासपर्यंत मी बौद्धिक व्यवसाय करीत असें. अशा या स्थितीतच वरील प्रश्न येऊन ठेपला होता.

मला बसल्या जागींच असें वाटे कीं, कोणीतरी माझी गंमत पाहत असेल, ही गंमत पाहणारा तो कोठें उभा आहे कोणास ठाऊक ? पण असा कोणी तरी असावा असें मला वाटे. आज तीस चाळीस वर्षे झाली, शिक्षण झालें, माझी वाढ झाली, शरीर पोसलें ! मन बलिष्ठ झालें आणि शेवटीं जीविताच्या अगदी शिखरावर येऊन पोहोचल्यानतर मी अगदीं बावरल्यासारखा झालों. अगदी बावळ्यासारखा झालों. जीविताला कसलाही अर्थ नाही, मागेंही नव्हता, आणि पुढेंही राहणार नाहीं ! माझी ही दशा पाहून तो कोणीतरी मनात काय म्हणत असावा बरें ? पण अशा रीतीनें मला मनांतल्या मनात हसणारा कोणी असो किंवा नसो, तेवढ्यानें माझ्या स्थितीत कांहींच फरक पडत नव्हता. माझ्या जीविताचा आणि प्रत्येक कृतीचा कांहीं अर्थ बसविण्याचा यत्न मी करून पाहूं लागलों. परतु तो यत्किंचितही बसेना. वास्तविक ही गोष्ट सर्वांना

कळत असते. आणि मला सुद्धां आरंभापासून माहीत झालेली होती. पण मी जाणूनबुजून आजवर आपलीच वचना कां केली असावी याचें मला आश्चर्य वाटूं लागलें. आज ना उद्यां जरा आणि मरण हीं मला प्रिय असलेल्या माणसांना आणि मला स्वतःला येणारच येणार. आणि मग शेवटीं घाण आणि कृमि याशिवाय आमचें म्हणून काहीच शिल्लक राहणार नाहीं. माझें हें, माझें तें, असें जें मी म्हणत असतों तें सर्व नाहींसें होईल आणि मी स्वतःच मरून जाईन. मग ही सर्व धडपड कशासाठीं चालू आहे ? या विचारांनीं माझें मन भरून गेलें.

---